# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र

## (Economics of Growth and Development)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**

**अर्थशास्त्र :**

EC-8 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
**सुधारित आवृत्ती :** २०२३
एम. ए. भाग - २ करिता (वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-60-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिति


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अर्थशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. विद्यावती प्रल्हाद कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. पी. एस. कांबळे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. मनोहर आप्पासाहेब कोरे**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली

- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश कृष्णा टोने**
  सावित्रिबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

- **डॉ. किरण शंकर पवार**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. सचिन आप्पासाहेब सरदेसाई**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध,
  जि. सातारा

- **डॉ. प्रभाकर तानाजी माने**
  जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
  शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर

- **डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **डॉ. हणमंत एन. कठारे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  राजाराम कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. रमेश गणेशराव दंडगे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. मोहन गोविंद सदामते**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,
  जि. सांगली

- **श्री. मोहन नरहर पंडितराव**
  यशोदीप ८५, मंगेशकर नगर, सुभाष रोड,
  मंगळवारपेठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१९-२० पासून सत्र पद्धती सुरू होत आहे. त्या अनुषंगाने 'वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सत्र ४ साठी लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, कोष्टके, गणितीय सूत्रे, आकृत्या इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, क्षेत्रीय अभ्यासासाठी विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र या विषयातील आर्थिक वृद्धी आणि विकास, विकासाचे अर्थशास्त्र, विकासाचे सामाजिक व क्षेत्रिय दृष्टिकोन आणि स्थूल आर्थिक धोरणे आणि विकास या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. त्याबद्दल घटक लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**

प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,

प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड-मलकापूर,

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सविता अशोक माने (वावरे)**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | **१** |
| **डॉ. प्रसाद दावणे**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **१, २, ३** |
| **श्री. किशोर सुतार**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | **२** |
| **डॉ. जे. एस. इंगळे**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, जि. कोल्हापूर | **२** |
| **डॉ. सुभाष तुळशीदास कोंबडे**<br>अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | **३, ४** |

**■ संपादक ■**

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड–मलकापूर,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | आर्थिक वृद्धी आणि विकास | १ |
| २. | विकासाचे अर्थशास्त्र | ४१ |
| ३. | विकासाचे सामाजिक व क्षेत्रिय दृष्टिकोन | १२४ |
| ४. | स्थूल आर्थिक धोरणे आणि विकास | १६१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# आर्थिक वृद्धी आणि विकास
## (Economic Growth and Development)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दी

  अविकसित देशांची वैशिष्ट्ये

  आर्थिक विकासाचे निर्देशांक

  १.२.२ वृध्दी प्रतिमाने

  आर्थिक वाढ व विकास यावर परिणाम करणारे घटक

  हेरॉड-डोमर प्रतिमान

  सोलो प्रतिमान

  १.२.३ कॅल्डार प्रतिमान

  सुवर्णयुग प्रतिमान

  फी आणि रानीस प्रतिमान

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्यन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये :

आर्थिक वृध्दी आणि विकास या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१) आर्थिक वृध्दी आणि विकास या संकल्पना स्पष्ट होतील.

२) आर्थिक वृध्दी आणि विकास यातील फरक त्याचे निर्देशक आणि या दोहोंवर परिणाम करणारे घटक स्पष्ट होतील.

३) हेरॉड-डोमर प्रतिमान स्पष्ट होईल.

४) प्रा. सोलो यांचे विकास वृध्दी प्रतिमान लक्षता येईल.

५) प्रा.हिक्स यांचे प्रतिशमान विषद होईल.

६) पर्याप्त बचत दर आणि रॅमसे नियम हे प्रारूप समजेल.

७) बचतीचा सुवर्ण नियम ही संकल्पना समजेल.

८) ए. के. प्रतिमान आणि आर्थिक वृद्धी स्पष्ट होईल.

## १.१ प्रस्तावना (Introduction)

देशाची अर्थव्यवस्था प्रबळ आणि गतीमान होण्यासाठी त्या देशाचा आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दी होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या दोन्ही संकल्पना परस्परपूरक असल्या तरी, समान असल्या तरी यातील फरक समजून घेणे आणि अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

अविकसीत देशाची उद्दिष्ट्ये यांचा अभ्यास करुन त्यासाठी विकासाचे किंवा वृध्दीचे योग्य प्रतिमान याचा वापर करणे आवश्यक आहे. अविकसित देशांची प्रगती करण्यासाठी योग्य उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. यासाठी कोणते निर्देशक आहेत याचा अभ्यास करुन त्याची अंमलबजावणी, आढावा घेणे आवश्यक आहे.

आर्थिक वृध्दी आणि विकास यावर परिणाम करणारे घटक कोणते आहेत आणि वृध्दीसाठी आवश्यक प्रतिमाने कोणती आहेत याचाही अभ्यास आपण करणार आहोत. आर्थिक वृध्दीतील काही महत्त्वाची प्रारूपे आहेत. तसे, हेरॉड-डोमर प्रतिमान, सोलो प्रतिमान हिक्स यांचे प्रारुप, ए.के प्रतिमान यांचाही अभ्यास आपण करणार आहोत. बचतीचा सुवर्णनियम अशाही महत्त्वाच्या संकल्पना आपण या घटकामध्ये अभ्यासणार आहोत.

## १.२ विषय विवेचन (Subject Description)

आर्थिक वृद्धी आणि विकास या घटकामध्ये आपण या दोन्ही संकल्पनांचा अर्थ, व्याख्या व फरक यांचा अभ्यास करणार आहोत.

अविकसीत देशाची वैशिष्ट्ये अभ्यासण्यासाठी आवश्यक काही महत्त्वाची प्रतिमाने जसे हेरॉड-डोमर प्रतिमान, सोलो प्रतिमान, ए. के. प्रतिमान इ. प्रारूपांचा अभ्यास करणार आहोत.

## १.२.१ आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी

**(Economic Development & Economic (Growth) :**

आर्थिक विकासासंबंधीचे लेखन खऱ्या अर्थाने १९४५-१९७० या दरम्यान मोठ्या प्रमाणात झाले. यासाठी दोन गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत होत्या. एक म्हणजे, १९२९-१९३३ ची जागतिक महामंदी, पाश्चिमात्य देशातील अर्थव्यवस्था या महामंदीमुळे खिळखिळ्या झाल्या होत्या. त्या पूर्ववत होण्यासाठी, समृद्ध होण्यासाठी आर्थिक विकास महत्त्वाचा होता. दुसरी बाब म्हणजे १९३९-१९४५ दरम्यान झालेले दुसरे महायुद्ध. महायुद्धानंतर अनेक नवीन राष्ट्रे उदयास आली. प्रत्येक राष्ट्राने आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या वाटा शोधावयास सुरूवात केली. आर्थिक प्रगती ही फक्त विकसनशील, अविकसित किंवा गरीब राष्ट्रांचा प्रश्न राहिलेला नव्हता, तर जगातील सर्व देशांचे ते मुख्य उद्दिष्ट झाले. आजही जगातील सर्व देश आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी धडपडताना आपणाला पहावयास मिळतात. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी परस्परांना सहाकार्य व्हावे यासाठी अनेक जागतिक स्वरूपाच्या संघटना निर्माण झालेल्या आहेत. प्रत्येक देश आपले दरडोई उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. संपूर्ण जगामध्ये आर्थिक विकास आणि वृद्धी यावर भर देण्यात येत आहे.

आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या दोन्ही संकल्पना ढोबळ मानाने एकाच अर्थाने वापरल्या जातात, परंतु यामध्ये सूक्ष्म असा फरक आहे. तो पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

**आर्थिक विकास (Economic Development) :**

'आर्थिक विकास म्हणजे औद्योगिकरण' असा त्याचा एक अर्थ काढला जातो. तसेच अविकसीत देशातील जास्तीत जास्त लोकसंख्या ही शेतीक्षेत्रावर आधारित असते. शेतीक्षेत्रातील लोकसंख्येचा भार कमी करणे म्हणजे आर्थिक विकास असेही म्हटले जाते. खऱ्याअर्थाने 'अविकसीत देशातील उत्पादन वाढ, रोजगार व उत्पन्नात वाढ होते, राहणीमानाचा दर्जा सुधारणे यालाच आर्थिक विकास म्हणतात' ही संकल्पना पुढील व्याख्यांतून अधिक स्पष्ट होईल.

**आर्थिक विकासाच्या व्याख्या : (Definition of Economic Development)**

**१) मायर व बाल्डविन –** ''आर्थिक विकास ही दीर्घकाळ अविरतपणे चालणारी प्रक्रिया आहे की, त्या प्रक्रियेमुळे राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ घडून येते.''

**२) प्रा. किंडल बर्जर –** ''आर्थिक विकास म्हणजे त्यामुळे अधिक उत्पादन घेणे शक्य होते असा तांत्रिक व संस्थात्मक बदल होय.''

**३) प्रो. बाईट सिंह –** ''आर्थिक विकास म्हणजे, त्या देशातील समाजामध्ये अल्पविकसित स्तरातून उच्च आर्थिक स्तराला गाठण्याचा प्रयत्न केला जातो.''

**४) प्रो. लुईस –** ''दरडोई उत्पन्नात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय.''

थोडक्यात आर्थिक विकास म्हणजे एक असा बदल जो विशेष प्रयत्नांना आणि विस्तारक पद्धतीला

गतिमान करण्यासाठी मदत करीत असतो, तर आर्थिक वृद्धी म्हणजे विकास प्राप्त झाल्यानंतरची अवस्था होय.

**आर्थिक वृद्धी (Economic Growth) :**

आर्थिक विकासानंतरची अवस्था म्हणजे आर्थिक वृद्धी होय. आर्थिक वृद्धीचा अर्थ पुढील व्याख्यांवरून अधिक स्पष्ट होईल.


**व्याख्या (Definition) :**

**१) जे. के. मेहतर –** ''आर्थिक विकास होत असताना त्यामध्ये होणारे बदल हे गुणात्मक स्वरूपाचे असतात, तर आर्थिक वृद्धी होत असताना त्यामध्ये होणारे बदल हे संख्यात्मक स्वरूपाचे असतात.''

**२) शुंपीटर –** ''विकास म्हणजे अर्थव्यवस्थेचा स्थैतिक अवस्थेतील उत्स्फूर्त बदल होय. ही विकासाची प्रक्रिया खंडित स्वरूपाची असू शकते. तर आर्थिक वृद्धी म्हणजे अर्थव्यवस्थेमध्ये दीर्घकाळात संथपणे व सातत्याने होणारा बदल होय.''

**३) उर्त्सुला हिक्स –** ''विकसनशील देशातील होणारी प्रगतीची प्रक्रिया म्हणजे विकास होय, तर विकसित देशातील वाढीची असणारी प्रक्रिया म्हणजे वृद्धी होय.''

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आर्थिक वृद्धी ही विकासाच्या नंतरची अवस्था आहे हे स्पष्ट होते. म्हणजेच आर्थिक वृद्धी होण्यासाठी आर्थिक विकास होणे गरजेचे आहे. आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास यातील सूक्ष्म फरक हा उत्पादन शक्यता वक्राच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.



वरील आकृतीमध्ये 'OX' अक्षावर 'X' वस्तुचे उत्पादन दर्शविलेले आहे. तर 'OY' अक्षावर 'Y' वस्तुचे उत्पादन दर्शविलेले आहे. प्रचलित उत्पादन तंत्राचा वापर करून व उपलब्ध साधन सामग्रीचा संपूर्ण वापर करून असे गृहीत धरले आहे की, 'X' आणि 'Y' वस्तुचे जास्तीत जास्त किती उत्पादन करणे शक्य आहे. हे दर्शविणारे दोन शक्यता वक्र आकृतीत दर्शविलेले आहेत. जर एखाद्या देशाची अर्थव्यवस्था 'F' बिंदूत उत्पादन करीत असल्यास ती अर्थव्यवस्था दिलेल्या मर्यादेत पूर्ण विकसीत आहे, असे म्हटले जाते. तर एखाद्या देशाचे उत्पादन 'F' ऐवजी 'P' इतके असेल तर त्या देशाची अर्थव्यवस्था विकसनशील आहे असे म्हटले जाते आणि जर एखाद्या देशाची अर्थव्यवस्था 'F' बिंदूतून 'B' बिंदूकडे वाटचाल करीत असेल तर त्यास आर्थिक वृद्धी असे म्हटले जाते.

**आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी – फरक**

**(Distinction between Economic Development and Growth)**

| आर्थिक विकास | आर्थिक वृद्धी |
|---|---|
| १) आर्थिक विकास वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ दर्शविते. | १) आर्थिक वृध्दी राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ दर्शविते. |
| २) आर्थिक विकास ही क्रिया दीर्घकाळात सातत्याने घडून येते. | २) आर्थिक वृध्दी ही क्रिया विशिष्ट काळातच घडून येते. |
| ३) आर्थिक विकास ही स्थितीशील अर्थव्यवस्थेत घडून येणारी क्रिया आहे. | ३) आर्थिक वृध्दी ही गतिशील अर्थव्यवस्थेत घडून येणारी क्रिया आहे. |
| ४) आर्थिक विकास या क्रियेत जुना असणारा समतोल नष्ट होतो. नवीन समतोलाचा पुढचा टप्पा गाठला जातो. | ४) आर्थिक वृध्दी या क्रियेत होणारा बदल दिलेल्या समतोल अर्थव्यवस्थेत घडून येत असतो. |
| ५) आर्थिक विकास म्हणजे गुणात्मक स्वरुपाचा बदल होय. | ५) आर्थिक वृध्दी ही भौतिक व संख्यात्मक वाढ असते. |
| ६) आर्थिक विकासात एखादी अर्थव्यवस्था तीव्र गतीने उन्नतीकडे येते. | ६) आर्थिक वृध्दीत एखादी अर्थव्यवस्था पुढे अतिशय मंद गतीने येते. |
| ७) आर्थिक विकासाचा संबंध विकसनशील देशाशी असतो. | ७) आर्थिक वृध्दीचा संबंध हा विकसित झालेल्या देशाशी असतो. |
| ८) आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये कोणत्याही स्वरुपाचा स्तर विचारात घेतला जात नाही. | ८) आर्थिक वृध्दीच्या बाबतीत कमीत कमी एक स्तर विचारात घेतला जातो. |
| ९) आर्थिक विकास या क्रियेत पूर्वनियोजित विचारपूर्वक बदल विचारात घेतले जातात. | ९) आर्थिक वृध्दी या राशीमध्ये युध्द परिस्थिती यामुळे होणारा आकस्मिक बदल अशा प्रकारचा विचार केला जातो. |
| १०) आर्थिक विकास हा गणितीय कोष्टकामधून होत नसल्याने वेगवेगळी धोरणे आखावी लागतात. | १०) आर्थिक वृध्दी ही विविध सैध्दांतिक कोष्टकाद्वारे स्पष्ट करता येते. |

**अविकसीत देशाची वैशिष्ट्ये (Characteristics of LDCS) :**

**१) दरडोई वास्तव उत्पन्न –** देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशाच्या एकूण लोकसंख्येने भागल्यास जो आकडा मिळतो त्यास दरडोई उत्पन्न म्हणतात. अविकसीत देशांचे दरडोई उत्पन्न कमी असते. उत्पन्नाच्या क्रय शक्तीवर वास्तविक उत्पन्न आधारित असते. अर्थतज्ञ कुरिहरा यांच्यामते, निकृष्ट दरडोई वास्तविक उत्पन्न हे अविकसीत देशाचे प्रमुख लक्षण असते. अविकसीत देशामध्ये राष्ट्रीय उत्पन्न कमी असते आणि लोकसंख्या वाढीचा वेग मात्र प्रचंड असतो त्यामुळे दरडोई उत्पन्न कमी असते.

**२) शेतीक्षेत्रावरील अतिरिक्त भार –** अविकसीत देशांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असतो. कारण अशाप्रकारच्या देशांमध्ये उद्योगधंदे, वहातूक व्यवस्था, दळणवळण, सेवाक्षेत्र इत्यादींचा विकास झालेला नसतो. त्यामुळे लोकांना शेतीक्षेत्रावरच अवलंबून रहावे लागते. शेतीक्षेत्रामध्ये जुन्या पद्धतीची यंत्रसामुग्री, सुविधा वापरल्यामुळे शेतीतून निघणारे उत्पादनही अल्प स्वरूपाचेच असते. लोकसंख्या अधिक असल्याने शेतीक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात छुपी बेकारी आढळते. अविकसीत देशातील लोकसंख्या वेगाने वाढत असल्याने शेतीक्षेत्रातील भार वाढतो. परिणामी शेतजमिनीचे तुकडीकरण व विभाजन वाढत आहे.

**३) उत्पादनाचे स्वरूप –** आर्थिक व्यवहारांचा विचार केला तर त्रिस्तरीय वर्गवारी पहावयास मिळते. प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्र. अविकसीत देशामध्ये द्वितीय क्षेत्र किंवा तृतीय क्षेत्र यापेक्षा प्राथमिक क्षेत्रातील उत्पादन काढण्यासाठी भांडवल खूप कमी लागते. तसेच यंत्रसामुग्रीही आधुनिक स्वरूपाची लागत नाही. अविकसीत देशामध्ये कच्चा माल आणि उपजीविकेसाठी अन्नधान्याचे उत्पादन केले जाते. त्यामुळे अशा अविकसीत देशांचे राष्ट्रीय उत्पन्न देखील कमी असते.

**४) भांडवलाची कमतरता –** अविकसीत देशातील लोकांचे उत्पन्न कमी असते. त्यामुळे त्यांची बचत कमी असते. बचत कमी असल्याने गुंतवणूक कमी आणि गुंतवणूक कमी असल्यामुळे भांडवल कमी, अविकसीत देशामध्ये भांडवलाची कमतरता असल्याची अजुनही बरीच कारणे स्पष्ट करता येतील. जसे, या देशातील भांडवली बाजार हा असंघटित स्वरूपाचा असतो. बचत संस्थांचा विकसीतपणा, कौटुंबिक उत्पन्नाची निकृष्ट पातळी, लग्न व मृत्यू अशा प्रसंगावर मोठा खर्च करण्याची प्रवृत्ती इ. कारणामुळे अविकसीत देशामध्ये भांडवलाची कमतरता असते व भांडवल निर्मितीचा दर ही कमी असतो.

**५) नैसर्गिक साधन सामग्रीचा अपर्याप्त वापर –** अविकसीत देशामध्ये नैसर्गिक साधन सामग्रीचा पर्याप्त वापर होत नाही किंवा हा वापर चुकीचा होतो. अशा देशामध्ये नैसर्गिक साधनसामग्रीचा तुटवडा नसतो. पण या देशांनी तांत्रिक, सामाजिक, आर्थिक संघटनामध्ये आवश्यक बदल केलेले नसतात. तसेच दुर्मिळतेवर मात केलेली नसते. म्हणून नैसर्गिक साधनसामग्री ही चुकीच्या पद्धतीने वापरली जाते. तिचा पर्याप्त वापर झाल्याचे दिसत नाही. म्हणून अशा देशांची प्रगती झालेली दिसत नाही.

**६) सार्वत्रिक दारिद्र्य –** अविकसीत देशामध्ये दारिद्र्य मोठ्या प्रमाणात असते. दारिद्र्य या संकल्पनेचे दोन प्रकार पडतात. एक सापेक्ष दारिद्र्य जे दुसऱ्या देशांशी तुलना करून मोजले जाते आणि दुसरे म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य. निरपेक्ष दारिद्र्य म्हणजे व्यक्तीला आपल्या आवश्यक असणाऱ्या गरजाही भागविता येत नहीत. निरपेक्ष

दारिद्र्य मोजताना उत्पन्नाचा विचार करण्याऐवजी कुपोषण, निरक्षरता, अपुरे वस्त्र, अपुरा निवारा इत्यादी घटकांचा विचार करून मोजले जाते. अविकसीत देशामध्ये हे दारिद्र्य मोठ्या प्रमाणात असते.

**७) उत्पन्नाचे विषम वाटप –** अविकसीत देशातील उत्पन्नाचे वाटप हे अतिशय विषम पद्धतीने झालेले असते. ज्या वर्गाकडे जास्तीचे उत्पन्न जाते अशा लोकांची ही मानसिकता मोठ्या प्रमाणात बचत करण्यावर नसते. श्रीमंत वर्गातील लोकांचे अनुकरण मध्यम वर्गीय लोक करतात. तर मध्यम वर्गीय लोकांचे अनुकरण गरीब लोकांकडून केले जाते. म्हणजे समाजातील जास्तीत जास्त पाच ते सहा टक्के लोक बचत करतात आणि ती बचत देखील अनुउत्पादक कार्यात गुंतवितात. उत्पादक कार्यासाठी गुंतवणूक होत नाही.

**८) द्विदल पद्धतीचा विकास –** अविकसीत देशात द्विदल पद्धतीचा विकास होत असतो. अशा देशातील अर्थव्यवस्था ही द्विमुखी असते. एक म्हणजे बाजाराधिष्ठित किंवा शहराशी निगडीत अर्थव्यवस्था आणि दुसरी म्हणजे निर्वाह अर्थव्यवस्था जी ग्रामीण भागाशी संबंधित असते.

अविकसीत देशामध्ये काही प्रमाणात शहरी भागाचाही विकास होत असतो. ग्रामीण भागामध्ये उत्पन्न वाढविण्याऐवजी उदरनिर्वाह करण्यासाठी व्यवसाय केला जातो. अशाप्रकारे बाजाराधिष्ठित व निर्वाह अर्थव्यवस्था अशा द्विदल पद्धतींचा अवलंब अविकसीत देशामध्ये दिसून येतो.

**९) बेरोजगारीचे प्रमाण अधिक असते –** अविकसीत देशामध्ये कामाच्या संधी कमी असतात तर लोकसंख्या ही प्रचंड वेगाने वाढत असते. परिणामी अशा देशामध्ये छुपी बेकारी, खुली बेकारी, अर्ध बेकारी मोठ्या प्रमाणात आढळते. अशा देशामध्ये अल्प भांडवल गुंतवणूक व प्रचंड लोकसंख्या या कारणामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**१०) करव्यवस्था –** अविकसीत देशात करापासून शासनाला मिळणारे उत्पन्न मर्यादित असते. अशा देशातील लोकांचे उत्पन्न अल्प असल्याने ते लोक करांचा परताव अल्प स्वरूपात करतात. परिणामी शासनाला कर उत्पन्न कमी मिळते म्हणून शासन मोठी जबाबदारी उचलू शकत नाही. त्यामुळे विकासाशी निगडीत असणारे कार्य शासन उत्पन्नाअभावी पूर्ण करीत नाही.

**११) तांत्रिक मागासलेपणा –** अविकसीत देश हे तांत्रिक स्वरूपात मागासलेले असतात. अशा देशामध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे श्रमपुरवठा अधिक आणि वेतन दर अल्प अशी स्थिती असते. वेतनदर कमी असतानादेखील तांत्रिक मागासलेपणामुळे सरासरी उत्पादन खर्च खूप मोठा असतो. परिणामी उत्पादनामध्ये घट होते. उत्पन्न पातळीही कमी असते.

**१२) प्रशासनाचे स्वरूप –** अविकसीत राष्ट्रामध्ये सक्षम प्रशासन नसते. अविकसीत देशातील प्रशासन वर्ग सर्व सामान्याविषयी नेहमी उदासीन असल्याचे दिसून येते. सामान्य जनता ही त्यांच्या हक्काविषयी जागरूक नसते. तर प्रशासक त्यांच्या कर्तव्यासंबंधी जागरूक असल्याचे दिसून येत नाही. परिणामी अविकसीत देशातील प्रशासन हे विकासाला अनुकूल नसून प्रतिकूल ठरते.

**१३) दारिद्र्याचे दुष्टचक्र –** अविकसीत देशाची अनेक प्रतिकूल वैशिष्ट्ये आपण बघितली. साहजिकच

यामुळे अशा देशामध्ये गरीबी खूप मोठ्या प्रमाणात असते. बचत आणि गुंतवणूकीची पातळी निकृष्ट असते. अशा देशाचा विकास न झाल्यामुळे त्या देशातील लोकांचे उत्पन्न कमी, बचत कमी परिणामी गुंतवणूक कमी आणि परत गरीबी जास्त. अशाप्रकारे दारिद्र्याचे दुष्टचक्र आढळते.

**१४) जीवनमुल्ये –** अविकसीत देशामध्ये उद्योगाला पोषक असणारी जीवनमुल्ये खूपच कमी असतात. अशा देशामध्ये भौतिक सुखे मिळविली पाहिजेत अशी विचारसरणी प्रबळ असते. अशा देशातील लोकांमध्ये प्रगत विचार तर नसतात याउलट अंधश्रद्धा, दैववाद, धार्मिकता, रूढीपरंपरा इत्यादी प्राबल्य असते. परिणामी अशा देशांचा विकास होत नाही.

**१५) आर्थिक संस्था –** आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आर्थिक संस्था सक्षम असणे खूपच आवश्यक असते. परंतु देशात उत्पन्नाचे प्रमाण कमी, त्यामुळे बचत कमी, बचत कमी असल्यामुळे बँकामध्ये ठेवल्या जाणाऱ्या ठेवीचे प्रमाण कमी, ठेवीचे प्रमाण कमी त्यामुळे बँका असक्षम असतात. त्या शेतीक्षेत्राच्या विकासाकरिता किंवा उद्योगक्षेत्राच्या विकासाकरिता भरीव अशा स्वरूपाची वित्तीय मदत, कर्जपुरवठा करू शकत नाहीत. परिणामी देशाला गुंतवणूकीअभावी अविकसीतच रहावे लागते.

**आर्थिक विकासाचे निर्देशक (Indicators of Economic Development) :**

प्रत्येक देश आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. विविध देशादेशामध्ये यामध्ये मोठी स्पर्धा निर्माण झाल्याचे दिसते. परंतु एखाद्या देशाचा आर्थिक विकास कितपत साध्य झाला याचे मापन करणे कठीण असते. आर्थिक विकासाचे निर्देशांक कोणत्या बाबींना मानावे याबाबत अनेक अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. आर्थिक विकासाचे मोजमाप करणे दोन कारणामुळे कठीण जाते. एक म्हणजे आर्थिक विकास ही संकल्पना मुळातच सापेक्ष स्वरूपाची आहे. तिला निरपेक्ष स्वरूपात मोजणे कठीण काम आहे. दुसरे म्हणजे विकासाचा निश्चित असा कालखंड नाही त्यामुळे दीर्घकाळातील बदल विचारात घेणे कठीण काम आहे. तरी देखील काही मापदंडाच्या आधारावर आर्थिक विकास मोजला जाऊ शकतो. ते घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ –** राष्ट्रीय उत्पन्न हे आर्थिक विकास मोजण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय उत्पन्न अधिक असेल तर विकास अधिक व राष्ट्रीय उत्पन्न कमी असेल तर विकास कमी असे मानले जाते. याबाबतीतही अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. कुझनेट, मायर व बाल्डवीन हे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा निकष विकासाचा निकष म्हणून स्वीकारतात तर व्हाईनर, लुईस हे दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ हा निकष मानतात.

वास्तव राष्ट्रीय उत्पन्न मोजताना त्यासाठी स्थिर किंमतीनुसार येणारे राष्ट्रीय उत्पन्न मोजणे आवश्यक असते. त्याचबरोबर लोकसंख्येचाही याठिकाणी विचार करणे गरजेचे आहे. जर लोकसंख्या वाढत गेली तर विकास दिसून येणार नाही.

**२) वास्तव दरडोई उत्पनात वाढ –** देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न भागिले देशाची एकूण लोकसंख्या म्हणजे दरडोई उत्पन्न होय. दरडोई उत्पन्न हे आर्थिक विकासाचे सोपे व अत्यंत महत्त्वपूर्ण मापक आहे असे म्हटले

जाते. या दरडोई उत्पन्नामुळेच लोकांच्या राहणीमानाचा दर्जा किती उंचावला आहे किंवा किती ढासळला आहे हे समजते. आर्थिक विकासाबरोबर लोकसंख्या वाढली तर विकास झाला नाही असे म्हणता येणार नाही. परंतु त्या देशामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण कशा प्रकारे होते व त्याचा लाभ किती लोकांना, कशा प्रकारे मिळतो यावर विकास अवलंबून राहील. तरीही हे मापक अपुरे असल्याचे दिसून येते. कारण दरडोई उत्पन्नामध्ये कल्याणाचा उल्लेख होत नाही.

**३) आर्थिक कल्याण –** प्रत्येक देश हा आर्थिक कल्याण साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. लोकांच्या राहणीमानात वाढ झाली, कल्याणाची पातळी उंचावली तर आर्थिक विकास झाला असे म्हणता येईल. आर्थिक कल्याण हे दोन बाबींवर अवलंबून असते. एक म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचे समाजातील विविध घटकांमध्ये झालेले वाटप आणि दुसरे, किंमत पातळीतील स्थैर्य.


समाजामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप समान पद्धतीने झालेले असेल तर समाजातील सर्व घटक संतुष्ट राहतील व या सर्व घटकांचा आर्थिक विकासाला हातभार लागेल. याउलट राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप असमान पद्धतीने झाल्यास समाजातील विविध घटक असंतुष्ट होऊन आर्थिक विकासाबाबत निरूत्साही वातावरण तयार होईल. त्याचबरोबर वस्तुच्या असणाऱ्या किंमती स्थिर राहिल्या तर मुद्रेची क्रयशक्ती वाढून आर्थिक विकास साध्य होईल व किंमती वाढत गेल्यास मुद्रेची क्रयशक्ती कमी होऊन आर्थिक विकासास पोषक वातावरण तयार होणार नाही.

**४) तौलनिक पद्धत –** आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, आर्थिक कल्याण याबरोबरच तौलनिक पद्धतीचा वापर करून आर्थिक विकासाबाबतचा अंदाज काढला जातो. यासाठी पुढील दोन बाबींचा विचार करावा लागेल.

१) विशिष्ट काळात दोन देशांनी आर्थिक विकासाची केलेली तुलना.

२) एकाच देशाने वेगवेगळ्या कालखंडात किंवा दोन कालखंडात केलेली आर्थिक विकासाची तुलना.

हे पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.



वरील आकृतीत ‘OX’ अक्षावर कालखंड दर्शविलेला आहे. तर ‘OX’ अक्षावर पैशातील राष्ट्रीय उत्पन्न दर्शविलेले आहे. ‘F’ या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न ‘P’ या देशापेक्षा जास्तीचे होते, परंतु ‘B’ या बिंदूनंतर ‘P’ या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वेगाने वाढ होऊन ‘F’ या देशाहून जास्तीचे वाढले, परंतु ‘B’ या बिंदूचा मापन अभ्यास केल्यास दोन्ही देशांची विकासाची पातळी ही समान असल्याचे दिसते.

**५) भांडवल संचयात वाढ –** एखाद्या देशात भांडवल संचय वाढत असेल तर आर्थिक विकास होतो आहे असे संबोधले जाते. कारण भांडवल संचयाची वाढ हे आर्थिक विकासाचे मोजमाप म्हणून ओळखले जाते.

**६) उत्पादकतेमध्ये वाढ –** उत्पादकतेमध्ये वाढ घडून येणे हा देखील आर्थिक विकासाचा दर्शक मानला जातो. उत्पादकता ही दर माणशी, दर तासी मोजली जाते. ज्या देशाचे भांडवल कमी आहे. अशा देशात उत्पादन, उत्पादकता ही देखील कमी असते.

**अ) स्वयं अध्ययन प्रश्न :**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) आर्थिक वृद्धी ही ------ तील वाढ दर्शविते.

अ) वास्तव उत्पन्न ब) राष्ट्रीय उत्पन्न क) लोकसंख्या ड) बचत

२) आर्थिक वृद्धी चा संबंध ------ देशाशी असतो.

अ) विकसीत ब) अविकसीत क) अर्धविकसीत ड) विसनशील

३) आर्थिक विकास हा ------ स्वरूपाचा असतो.

अ) संस्थात्मक ब) गुणात्मक क) तांत्रिक ड) सामाजिक

४) अविकसीत देशामध्ये ------ पद्धतीचा विकास होत असतो.

अ) एकदल ब) श्रमिक क) द्विदल ड) भांडवली

५) ------ हा घटक आर्थिक विकासाचा निर्देशक आहे.

अ) लोकसंख्या ब) दारिद्रय क) तांत्रिक मागासलेपण ड) भांडवल संचयात वाढ

**१.२.२ वृद्धी प्रतिमाने : आर्थिक वाढ व आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक**

**(Growth Models Factor affecting Economic Growth & Development) :**

आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. प्रत्येक देशामध्ये आर्थिक विकासाची पातळी ही वेगळ्या स्वरूपाची असते. विकसनशील देशांपेक्षा विकसीत देशामध्ये असणाऱ्या पायाभूत सुविधा, नैसर्गिक साधनसंपत्ती ही अधिक विपुल आणि चांगल्या दर्जाची असते. तसेच एखाद्या देशातील पण दोन वेगवेगळ्या अवस्थांमधील, विविध क्षेत्रातील आर्थिक वाढ व विकास यामध्येही तफावत असते. कोणत्याही देशातील आर्थिक विकास व वृद्धी याचा अभ्यास केला तर बरेच आर्थिक व आर्थिकेतर घटकांचा प्रभावा यावर झालेला असतो. त्यामुळे आर्थिक विकास व वृद्धी प्रक्रियेमध्ये या घटकांचा विचार

करणे आवश्यक आहे. हे घटक पुढीलप्रमाणे.

**१) भांडवल (Capital) :**

भांडवल हा घटक कोणत्याही देशाच्या आर्थिक वाढ किंवा विकास या प्रक्रियेमध्ये अतिशय महत्त्वाचा आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री, विविध साधने, उद्योगधंदे, विपणन व्यवस्था, दळणवळण सुविधा या सर्व साधनांच्या पुरवठ्यासाठी भांडवल पुरवठा अतिशय गरजेचा आहे. विकसनशील देशांच्या प्रगतीसाठीही भांडवल पुरवठा हा महत्त्वाचा आहे. कोणत्याही राष्ट्राच्या भौतिक व मानवी साधनसामग्रीच्या विकासासाठी भांडवल साठा आवश्यक आहे. याचाच अर्थ कोणत्याही देशाचा आर्थिक विकास किंवा वृद्धीची प्रक्रिया ही भांडवल संचायाच्या साठ्यावर अवलंबून असते. बऱ्याच विकसनशील देशापुढे आर्थिक विकास परिपूर्ण न होण्यामागे भांडवल प्रश्न ही मुलभूत समस्या असते. भांडवल हे उत्पादन निर्मितीचे महत्त्वाचे साधन असते. अशाप्रकारे भांडवल या घटकावर त्या देशाची तांत्रिक व मानवी साधनसंपत्ती विस्तारत असते. म्हणून य घटकाकडे विशेष लक्ष देऊन त्यामध्ये वाढ करणे महत्त्वाचे असते.

भांडवलाची संकल्पना आर्थिक वाढीच्या दृष्टीने अनेक अर्थांनी उपयुक्त ठरते. विकसीत राष्ट्रांमध्ये प्रभावी मागणी हा घटक प्रबल करायचा असेल तर त्यासाठी भांडवल हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच उत्पादनवाढीसाठी, कार्यक्षमता दीर्घकाळ वाढविण्यासाठी भांडवल पुरवठा आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी, आर्थिक वृद्धीसाठी तांत्रिक प्रगती, यंत्रसामग्री, कुशल श्रमपुरवठा, उत्पादनाचे वाढते प्रमाण हे घटक विकसीत होणे गरजेचे आहे. यासाठी जर भांडवल संचयामध्ये वाढ झाली तरच अशा देशांचे राष्ट्रीय उत्पन्न वाढते राहील. परिणामी आर्थिक वृद्धी होईल. तसेच विकसीत देशामध्ये वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर (Incremental Capital-Output Ratio) केवळ भांडवलाच्या वाढत्या प्रमाणातील पुरवठ्यामुळे आढळून येते.

आर्थिक सिद्धांताच्या प्रतिपादनामध्येही भांडवल आणि आर्थिक वृद्धी यांचा घनिष्ट संबंध स्पष्ट केलेला आहे. बऱ्याच विकसीत राष्ट्रांमध्ये दरडोई उपलब्ध भांडवालाचे प्रमाण हे विकसनशील देशांपेक्षा तुलनेने अधिक आढळून येते. अर्थतज्ज्ञ लेविस यांच्यामते आर्थिक विकासाच्या प्रगतीमध्ये विकसीत राष्ट्रांच्या तुलनेमध्ये विकसनशील राष्ट्रांचा बचत व गुंतवणूक दर हा राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४ ते ५ टक्क्यांऐवजी १२ ते १५ टक्क्यांपर्यंत वाढला तर आर्थिक वाढीची शक्यता अधिक असते. म्हणजेच देशाचा अल्पविकसीतपणा व आर्थिक वाढ ही भांडवलाच्या पुरवठ्याशी संबंधित आहे. तसेच आर्थिक विकासाची स्वयंनिर्भरता ही भांडवल पुरवठ्याशी निगडीत असते. थोडक्यात भांडवल पुरवठा व आर्थिक वृद्धी यांचा एकमेकांशी घनिष्ट संबंध असून प्रगतीसाठी तो महत्त्वाचा घटक आहे.

**२) श्रम :**

आर्थिक विकास किंवा आर्थिक वृद्धीतील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे मनुष्यबळ किंवा श्रमपुरवठा कोणत्याही राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादनाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे श्रम, बाजारपेठेतील मागणी निर्माण करणारा क्रियाशील घटक म्हणजे श्रम होय. म्हणूनच आर्थिक वृद्धी प्रक्रियेमध्ये कुशल मनुष्यबळाला

अनन्यसाधारण महत्त्व आहे. ॲडमस्मिथ यांनी आपल्या वेल्थ ऑफ नेशन्स (Wealth of Nations) या ग्रंथात श्रमविभागणी ही आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे, याचे विवेचन केले आहे. पण बऱ्याच अविकसीत देशांमध्ये विपुल श्रमपुरवठा असूनही विकास दर मात्र अल्प रहातो. हा अतिरिक्त श्रमपुरवठा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम करत असल्याचे दिसून येते. कारण फक्त श्रमपुरवठा अधिक असणे गरजेचे नाही तर श्रमाचा पुरेपूर कार्यक्षमतेने वापर होणे महत्त्वाचे आहे. तरच आर्थिक विकास व वृद्धी प्रक्रियेस गती मिळते. म्हणजे अशिक्षित, अकुशल, अकार्यक्षम व परंपरावादी श्रमपुरवठा देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवू शकत नाही. यादृष्टीने अर्थशास्त्रज्ञ शुंपीटरने विकसनशील श्रमपुरवठ्यात नाविन्यनिर्मिती व उद्योजकता असेल तर आर्थिक विकासामध्ये गती येत नाही असे स्पष्ट केले.

आर्थिक वाढीमध्ये शिक्षण प्रक्रिया ही महत्त्वाची आहे. शिक्षणप्रसाराची भूमिका अनेक दृष्टिने महत्त्वाची आहे. उत्पादक स्वरूपाच्या श्रमपुरवठ्यासाठी तसेच तांत्रिकदृष्ट्या कुशल श्रमिकांच्या पुरवठ्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाच्या सोई अत्यावश्यक ठरतात.

विकसीत देशांमध्ये मात्र मनुष्यबळाचा वापर आर्थिक वाढीसाठी पुरेपूर करून घेता येतो. कारण अशा देशातील लोकसंख्येचे प्रमाण पर्याप्त असते. त्यामुळे अशा श्रमाची गुणवत्ता व विकास घडवून आणणे शासनाला सुलभ असते. तसेच अशा राष्ट्रांतील उत्पन्न पातळी उच्च असल्याने श्रमाची उत्पादकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञान सुविधा भांडवल प्रदान तंत्राचा वापर या गोष्टींची पूर्तता होते.

बहुसंख्य विकसीत देशामध्ये श्रमविभागणीमुळे विशेषीकरण व मोठ्या प्रमाणावरील उत्पादन शक्य झालेले आहे. मात्र भारतासारख्या विकसनशील देशात अतिरिक्त श्रमपुरवठ्यामुळे व नैसर्गिक साधनसामग्रीचा पुरेपूर वापरातील अडचणींमुळे विकास प्रक्रियेमध्ये अनेक अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात. परंतु विकसीत देशामध्ये मात्र श्रमाचा पुरेपूर वापर करून उत्पादनात विविधता आणली जाते. अशाप्रकारे विकसीत राष्ट्रांनी उपलब्ध मनुष्यबळाच्या विकासातून उत्पादनात वाढ घडवून सेवाक्षेत्राच्या कक्षाही विस्तारीत केलेल्या आहेत. म्हणूनच आर्थिक विकास व वृद्धी यासाठी 'श्रम' हा घटक ही महत्त्वपूर्ण आहे.

**३) तंत्रज्ञान :**

तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास याचा परस्पर घनिष्ट संबंध आपणास सध्या पहावयास मिळतो. आधुनिक काळामध्ये आर्थिक वृद्धी साधण्यासाठी तंत्रज्ञान हा घटक महत्त्वपूर्ण आहे. ''आर्थिक वस्तू व सेवांची उत्पादन क्षमता वाढविणारे सर्व प्रकारचे ज्ञान म्हणजे तंत्रज्ञान होय.'' तंत्रज्ञानाच्या अद्ययावत वापरामुळे उत्पादनाचा दर्जा चांगला राहतो. विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अनेक बदल होत असल्याने त्यानुसार तांत्रिक बदल केले तर विकास प्रक्रियेला नक्कीच गती मिळेल. पारंपारिक अर्थशास्त्रामध्ये मागणीप्रमाणे पुरवठा केला जातो, असे मानले जात होते. पण आजच्या आधुनिक युगामध्ये जाहिरात व तांत्रिक प्रगती याचा मेळ बघून मागणी पुरवठ्यात बदल घडवून आणला जात आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ शुंपीटरच्या मते, उद्योग व्यवसायातील नाविन्य निर्मिती व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आर्थिक वृद्धी व विकास ही क्रिया गतिमान होते. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे देशाच्या उत्पादनात विविधता येऊन आर्थिक विकास अधिक वेगाने होत आहे. म्हणूनच सध्या सर्वच विकसनशील व

विकसीत राष्टात तंत्रज्ञान विकसीत होताना दिसून येते.

आधुनिक तंत्रज्ञान हे महागडे असल्याने भारतातल्या विकसनशील देशात भांडवलशाहीमुळे ते विकसीत करता येत नाही. अर्थात अलिकडच्या काळात कमी भांडवलावर असे तंत्रज्ञान विकसीत करून व्यवहारात त्याचे फायदे मिळवित आहेत. सायमन कुझनेट्सच्या मते, ही आधुनिक काळात आर्थिक वाढीसाठी तांत्रिक ज्ञान, संशोधन, शास्त्रीय शोध, नाविन्यनिर्मिती आणि तंत्रज्ञानाचा विस्तार ही पंचसूत्री महत्त्वाची आहे. विकसनशील राष्ट्रांनीही श्रमप्रधान उत्पादन पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करून असे तंत्रज्ञान विकसीत करणे गरजेचे आहे.

आधुनिक काळात आर्थिक विकास व वाढ घडवून आणताना तंत्रज्ञानाच्या विकासावरच त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ अवलंबून असते. म्हणून तंत्रज्ञानाचा स्वीकार व प्रसार वेगाने घडवून आणणे आवश्यक ठरते.

**हेरॉड–डोमर प्रतिमान (Harrod-Domar's Model) :**

हेरॉड आणि डोमर या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक वृद्धीचे जे प्रतिमान स्पष्ट केले ते विशेषत: विकसीत अर्थव्यवस्थेसाठी संबंधित होते, परंतु विकसनशील देशानांही ते उपयोगी ठरले. हेरॉड व डोमर यांची प्रतिमाने जरी भिन्न स्वरूपाची असली तरी त्यांची एक संकल्पना मात्र एकाच स्वरूपाची आहे. डॉमर प्रतिमानाचे खास वैशिष्ट्य म्हणजे हे प्रतिमान भारताची जी पहिली पंचवार्षिक योजना राबविली त्यामध्ये उपयोगी ठरले होते.

हेरॉड–डोमर यांनी त्यांच्या प्रतिमानामध्ये 'गुंतवणूक' या घटकाला अग्रस्थान दिले आहे. गुंतवणूकीमुळेच उत्पन्नामध्ये क्रमश: वाढ होत असते. ही संकल्पना स्पष्ट केली. म्हणजे एखाद्या क्षेत्रामध्ये गुंतवणूक केली तर या क्षेत्रातील, श्रमिकांचे उत्पन्न हे वाढते राहील. परिणामी उत्पन्न वाढल्याने भांडवल वाढेल आणि भांडवल वाढल्याने उत्पादन क्षमता वाढेल. याचाच अर्थ गुंतवणूकीचा मागणी परिणाम आणि पुरवठा परिणाम दोन्हीमध्ये वाढ होईल. उत्पन्न वाढणे हा गुंतवणूकीचा मागणी परिणाम आहे तर उत्पादन क्षमता वाढणे हा पुरवठा परिणाम आहे. या दोन्हीमध्ये वाढ होते. परंतु उत्पन्नातील वाढीचा दर आणि उत्पादन क्षमतेच्या वाढीचा दर हा समान राहिला पाहिजे. उत्पन्न वाढले तर किंमती वाढतील आणि उत्पादनक्षमता वाढली तर किंमती कमी होतील म्हणून यामध्ये संतुलन असणे आवश्यक आहे. हेरॉड–डोमरच्या मते उत्पन्नामध्ये इतकी वाढ झाली पाहिजे की, झालेले उत्पादन हे पूर्णपणे उपभोगात आले पाहिजे. तरच भांडवलाच्या उत्पादन क्षमतेचा योग्य उपयोग होईल.

**हेरॉड–डोमर प्रतिमानातील गृहीते :**

हेरॉड–डोमर यांनी प्रतिमान स्पष्ट करताना पुढील गृहीते मांडली.

१) अर्थव्यवस्था बंदिस्त स्वरूपाची असते.

२) भांडवल व उत्पादन या घटकांचे गुणोत्तर स्थिर आणि निश्चित स्वरूपाचे आहे.

३) पूर्ण रोजगाराची अर्थव्यवस्था.

४) व्याज दर स्थिर असतो.

५) निश्चित भांडवल श्रमिक अनुपात.

६) सरकारचे निर्हस्तक्षेप धोरण.

७) भांडवल स्थिर व बदलते असे दोन्ही प्रकारचे आहे.

**हेरॉड यांचे विश्लेषण :**

हेरॉडच्या मते, उत्पादनातील वाढीचा दर हा बचत अनुपात आणि भांडवल उत्पादन अनुपात या गोष्टीवर आधारीत असतो. हेरॉड यांनी आपली रचना स्पष्ट करताना पुढील चिन्ह, अक्षर यांचा वापर केला.

उत्पादनातील वाढीचा दर = G

अपेक्षित वाढीचा दर = Gw

(W - Warranted - अपेक्षित)

नैसर्गिक वाढीचा दर = Gn

(N - Natural - नैसर्गिक)

प्रतिमान स्पष्ट करताना हेरॉड यांनी Gw व Gn ही कल्पना मांडली. नैसर्गिक वाढीचा (Gn) दर म्हणजे लोकसंख्या वाढ आणि तांत्रिक सुधारणा या घटकांमुळे जो आधिक वाढीचा दर निश्चित होईल तो, आणि नैसर्गिक दर हा भांडवल यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, नैसर्गिक संपत्ती, लोकसंख्या या विविध घटकांवर आधारित असतो.

उत्पन्नातील वाढीचा अपेक्षित दर (Gw) स्पष्ट करताना हेरॉड यांनी असे विवेचन केले की, ज्या दरामुळे उत्पादकांचे समाधान होईल तो दर म्हणजे उत्पन्नातील वाढीचा अपेक्षित दर होय. या दरालाच उत्पादक व्यापारी यांच्या उत्पादनाला अधिक मागणी राहिल्याने उत्पादक उत्पादन सुरू ठेवतील. याठिकाणी वस्तू व सेवा यांची मागणी-पुरवठा समान राहिल्याने उत्पादकांना समाधानकारक लाभ मिळेल.

हेरॉड यांनी प्रतिमान स्पष्ट करताना पुढील दोन सूत्रांची मांडणी केली.

1) GC = S

G = उत्पादनवाढीचा दर हा $\frac{\Delta I}{I}$ असाही स्पष्ट होतो.

C = गुंतवणूक आणि उत्पन्न अनुपात हा आपण $\frac{I}{\Delta Y}$ असाही दाखवू शकतो.

S = सरासरी बचत प्रवृत्ती ही $\frac{S}{Y}$ अशीही दर्शविता येते.

म्हणून $\boxed{\frac{\Delta I}{I} \times \frac{I}{\Delta Y} = \frac{S}{Y}}$

$$G \times C = S \therefore \frac{I}{Y} = \frac{S}{Y}$$

हेच समीकरण आकडेवारीच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

$$\frac{100}{1000} X \frac{2000}{100} = \frac{2000}{1000}$$

भाग देण्याचे कारण नाही कारण,

I = S

I = 2000 = S = 2000 ही किंमत कायम ठेवणे उचित ठरेल.

2) GwCr = S

हे सूत्र हेरॉड यांनी बचतीची सीमांत प्रवृत्ती स्थिर आहे, या गृहीतांवर अधारित स्पष्ट केले आहे.

Gw = वाढीचा अपेक्षित दर म्हणजेच $\frac{\Delta Y}{Y}$

Cr = भांडवल उत्पादनप्रमाण म्हणजेच $\frac{I}{\Delta Y}$

S = $\frac{S}{Y}$ = सरासरी बचत प्रवृत्ती

Gw X Cr = S

$$\frac{\Delta Y}{Y} X \frac{I}{\Delta Y} = \frac{S}{Y}$$

$$\frac{100}{1000} X \frac{2000}{100} = \frac{2000}{1000}$$

तेव्हा आधीच्या सूत्राप्रमाणे $\frac{I}{Y} = \frac{S}{Y} = \frac{2000}{1000} = \frac{2000}{1000}$

म्हणजे I = S = 2000 = 2000 असे समीकरण तयार होईल.

उत्पादनातील वाढ आणि उत्पन्नातील वाढ यातील दर समान असणे आवश्यक आहे. Gw = $\frac{S}{Cr}$

पूर्ण रोजगाराच्या अर्थव्यवस्थेमध्ये देशातील उत्पादनाच्या वाढीचा दर आणि अपेक्षित वाढीचा दर समानच असले पाहिजेत. तरच अर्थव्यवस्थेत संतुलन निर्माण होईल. जर उत्पादन वाढीचा दर अपेक्षित दरापेक्षा कमी असेल तर भांडवल साठ्यांमध्ये वाढ होऊन मंदीची परिस्थिती उद्‌भवेल. याउलट जर उत्पादन वाढीचा दर अपेक्षित उत्पादन दरापेक्षा जास्त असेल तर किंमतीमध्ये वाढ होऊन स्फितीची परिस्थिती उद्‌भवेल. त्यामुळेच G आणि Gw यामध्ये संतुलन असणे, समानता असणे आवश्यक आहे.

**डोमर यांचे विवेचन :**

प्रा. डोमर यांनी त्यांच्या प्रतिमानाद्वारे गुंतवणूकीची एकूण पुरवठा बाजू व एकूण मागणी बाजू यांच्यातील सहसंबंध स्पष्ट केला.

गुंतवणूकीमुळे उत्पन्न वाढते, परिणामी भांडवलाची उत्पादन क्षमताही वाढते. अशावेळी पूर्ण रोजगार सिद्ध

करण्यासाठी उत्पन्नाच्या वाढीचा दर आणि उत्पादनक्षमतेच्या वाढीचा दर समान असण्यासाठी एकूण गुंतवणूकीचा दर किती प्रमाणात असावा या सर्व बाबींचा अभ्यास प्रा. डोमर यांनी त्यांच्या विश्लेषणामध्ये केला आहे.

प्रा. डोमर यांनीही सूत्ररूपाने स्पष्टीकरण करताना काही अक्षर, चिन्ह याचा वापर केला आहे.

**एकूण पुरवठा बाजू –**

S = वाढीव उत्पन्नाचे वाढीव भांडवलाशी गुणोत्तर = $S = \frac{\Delta Y}{I}$

$I \times \sigma$ = गुंतवणूकीची सरासरी उत्पादनक्षमता

$\sigma$ = Sigama सिग्मा

$\Delta Y$ = उत्पन्नातील वाढ

I = गुंतवणूक

$$\sigma = \frac{\Delta Y}{I}$$

नवीन गुंतवणूकीमुळे उत्पादन क्षमतेवर जरी अनुकूल बदल/परिणाम होत असतील तरी त्याचबरोबर जुनी गुंतवणूक, उत्पादनाचे जुने घटक याचा प्रतिकूल परिणाम हा भांडवल क्षमतेवर होत असतो. डोमरच्या मते नवी व जुनी भांडवलाची एकूण उत्पादन क्षमता याचा विचार करता,

$I \times \sigma$ हे नेहमीच $I \times S$ पेक्षा कमी राहील.

म्हणजेच गुंतवणूकीची सरासरी उत्पादन क्षमता ही वाढीव भांडवली गुणोत्तरापेक्षा कमी राहील.

**एकूण मागणी बाजू –**

एकूण मागणी बाजू स्पष्ट करण्यासाठी प्रा. डोमर यांनी पुढील सूत्राचा वापर केला.

$$\Delta Y = \Delta I \ \frac{I}{\alpha}$$

$\Delta Y$ = उत्पन्नातील वार्षिक वाढ

$\Delta I$ = गुंतवणूकीतील वार्षिक वाढ

$\alpha$ = Alpha अल्फा

$\Delta S$ = बचतीतील बदल

$\Delta Y$ = उत्पन्नातील बदल

$\alpha = \frac{\Delta S}{\Delta Y}$ = बचत प्रवृत्ती

वरील सूत्रानुसार डोमर यांनी स्पष्ट केले की, पूर्ण रोजगाराची स्थिती कायम ठेवण्यासाठी गुंतवणूकीच्या वाढीच्या दराचे प्रमाण हे भांडवलाची उत्पादनक्षमता x सीमांत बचतप्रवृत्ती या गुणोत्तराशी समान असले पाहिजे.

म्हणजेच $\frac{\Delta I}{I} = \alpha \times \sigma$

गुंतवणूकीच्या वाढीच्या दराचे प्रमाण = भांडवल उत्पादन क्षमता x सीमांत बचत प्रवृत्ती

$\frac{\Delta I}{I}$ ही किंमत जर $\alpha \times \sigma$ यापेक्षा जास्त आली तर किंमती वाढतील आणि तेजीची परिस्थिती निर्माण होईल. याउलट $\frac{\Delta I}{I}$ ही किंमत जर $\alpha \times \sigma$ यापेक्षा कमी आली तर गुंतवणूक कमी होईल आणि मंदीची परिस्थिती निर्माण होईल.

अशा प्रकारे प्रा. डोमर यांनी त्यांच्या सूत्रानुसार पूर्ण रोजगारीकरिता, उत्पादनक्षमता वाढविण्याकरिता कोणत्या दराने गुंतवणूक वाढविली पाहिजे तो दर स्पष्ट होतो हे विश्लेषण केले. हे डोमर यांच्या सूत्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारे हेरॉड डोमर यांचे विवेचन बऱ्याच अंशी समान स्वरूपाचे आहे.

**हेरॉड डोमर प्रतिमानाच्या मर्यादा :**

१) पूर्ण रोजगारावर आधारित पण वास्तवात पूर्ण रोजगाराची बाजारपेठ नसते.

२) बचत प्रवृत्ती ( $\alpha$/ S ) आणि भांडवल उत्पादन प्रमाण ($\sigma$) हे दोन्ही रचनेत स्थिर मानले पण वास्तवात असे घडत नाही.

३) सरकारी हस्तक्षेप नाही हे गृहीतक चुकीचे.

४) बंदिस्त अर्थव्यवस्थेशी निगडीत प्रतिमान हे चुकीचे - वास्तवात अशी अर्थव्यवस्था नसते.

५) श्रमिक आणि भांडवल यांचे प्रमाण स्थिर मानले हे चुकीचे.

अशाप्रकारे या प्रतिमानावर काही मर्यादा असल्या तरी अर्धविकसित व विकसनशील देशांसाठी आर्थिक वृद्धी व विकास साधण्यासाठी हेरॉड-डोमर प्रतिमान अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणूनच भारतानेही डॉमर यांच्या प्रतिमानाचा वापर पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये केला. तसेच हेरॉड यांचेही विवेचन आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक घटक व संस्थात्मक घटक यातील सुधारणांशिवाय विकास शक्य नाही. हेही हेरॉड यांचे प्रतिपादन वृद्धीसाठी महत्त्वाचे ठरते.

**सोलो यांचे वृद्धी-प्रतिमान (Solow's Model of Growth) :**

प्रा. आर. एन. सोलो हे अर्थशास्त्रज्ञ नवसनातनवादी आहेत. सोलो यांच्या वृद्धी प्रतिमानालाच दीर्घकालीन वाढीचे प्रतिमान असेही म्हणतात.

यापूर्वी आपण ते हेरॉड-डोमर चे प्रतिमान पाहिले. त्यालाच पर्याय म्हणून हे सोलोचे प्रतिमान प्रचलित आहे. प्रा. सोलो हे अधिक व्यवहारवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत. प्रा. सोलो यांनी हेरॉड-डोमर यांच्या प्रतिमानातील मर्यादा सुधारून नविन प्रतिमान स्पष्ट केले. हेरॉड-डोमर यांनी त्यांच्या प्रतिमानामध्ये भांडवल, उत्पादन प्रमाण स्थिर मानले, घटकांचे प्रमाण स्थिर मानले. परंतु सोलो यांनी ही अवास्तव गृहीते स्पष्ट करून सुधारित रचना आपल्या प्रतिमानाद्वारे मांडली.

हेरॉड–डोमर यांनी समायोजनासाठी, संतुलनासाठी भांडवल उत्पादन प्रमाण स्थिर मानले. परंतु प्रा. सोलो यांच्या मते, श्रम आणि भांडवल यांची एक विशिष्ट प्रकारची मात्रा निवडावी लागेल. ज्यामुळे अर्थव्यवस्थेत समतोल निर्माण होईल. ही मात्रा निवडताना श्रम व भांडवल या घटकांमध्ये बदल करून समायोजन करावे लागेल. सोलोच्या मते, संतुलनासाठी Gw आणि Gn याचा अधिक वापर करून त्याद्वारे भांडवल श्रम प्रमाण म्हणजे CLR (Capital Labour Ratio) निर्माण करावा. त्यातून अपेक्षित समतोल साधता येईल.

सोलोच्या मते, Gn हा श्रमशक्ती वाढीच्या दरावर निर्धारित असतो. तर Gw हा बचत गुंतवणूक यावर आधारित असतो. अपेक्षित समतोल साध्य करण्यासाठी घटक पर्यायता असणे आणि Gn-Gw स्थिर प्रमाणामधून उत्पादनाचे स्थिर प्रमाणफल असणे आवश्यक आहे.

**सोलो प्रतिमानाची गृहीते :**

१) पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ.

२) उत्पादनातील संबंधामुळे बचत आणि गुंतवणूक परिवर्तनीय असतात.

३) श्रम आणि भांडवल हे घटक परस्पर पर्यायी असतात.

४) बचत स्थिर स्वरूपाची असते.

५) किंमती व वेतन हे मागणी पुरवठ्यानुसार बदलणारे म्हणजेच लवचिक असतात.

६) उत्पादन हे सरेषीय एकजिनसी उत्पादन फलनानुसार होते. त्यामुळे स्थिर उत्पादन फल अनुभवास येते.

७) श्रमशक्तीतील वाढ हा बाह्यघटक आहे.

८) तांत्रिक प्रगतीमुळे कामगारांची कार्यक्षमता वाढते.

९) उत्पादन भांडवलसाठा व श्रमपुरवठा यांच्यामुळे ठरते.

**प्रतिमान–रचना :**


प्रा. सोलो यांचे विवेचन हे दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. सोलो यांच्या गृहीतानुसार उत्पादन हे भांडवलसाठा व श्रमपुरवठा यांच्यामुळे ठरते. सरेषीय एकजिनसी उत्पादन फलन असल्यामुळे भांडवलाच्या आणि श्रमाच्या वाढीच्या दरात समानता गृहीत धरली आहे. परंतु भांडवल हे श्रमिकांपेक्षा जादा दराने वाढते, परिणामी भांडवल श्रम प्रमाण (CLR) (Capital Labour Ratio) हा जादा राहतो. त्यामुळे कामगार उत्पादन घटते. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न कमी होते. बचत कमी होते. तसेच भांडवल व गुंतवणूक घटू लागते. ही घट तोपर्यंत चालू राहते जोपर्यंत भांडवल वाढीचा दर व श्रम वाढीचा दर समान रहात नाहीत. याचाच परिणाम म्हणून भांडवल –श्रमप्रमाण आणि भांडवल–उत्पादन प्रमाण स्थिर रहातात.

प्रा. सोलो यांनी अविकसीत देशातील विकासा संदर्भात विवेचन करताना अशा देशामध्ये दोन प्रकारच्या अर्थव्यवस्था असतात असे प्रतिपादन केले. १) भांडवली किंवा औद्योगिक अर्थव्यवस्था/क्षेत्र २) श्रम किंवा कृषी अर्थव्यवस्था/क्षेत्र.

तांत्रिक सहगुणक हा एक चल आहे. त्यामुळे भांडवल श्रम प्रमाण स्वत: समतोल प्रमाणाशी समायोजित होतो हे सोलो यांचे गृहीत आहे. त्यानुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये भांडवल संचयाचा दर हा श्रम शोषणाच्या दरापेक्षा अधिक असतो. तसेच तांत्रिक सहगुणकांच्या सहाय्याने रोजगाराच्या संधी निर्माण होतात. तर कृषीक्षेत्र किंवा श्रमक्षेत्र यामध्ये वास्तव उत्पन्न घटत्या स्वरूपाचे असते. त्यामुळे श्रमिक उत्पादकताही घटते. अशाप्रकारे भांडवल श्रम उत्पादन हे जादा असल्याने दीर्घकालीन वृद्धी घडून येते.

प्रा. सोलो यांनी (CLR) किंवा भांडवल प्रदानता विकासासाठी महत्त्वपूर्ण असते हे स्पष्ट केले. अधिक भांडवल प्रदानता किंवा अधिक CLR असेल तर भांडवली क्षेत्राचा विकास होतो. याउलट कमी (CLR) किंवा श्रमप्रदान तंत्र असेल तर श्रम क्षेत्राचा विकास/वृद्धी होते.

प्रा. सोलो यांनी समाजाच्या वास्तव उत्पन्नाचा अधिक विचार केला. त्यांच्यामते, एकूण उत्पन्नातून उपभोग वजा केला असता जी शिल्लक राहते त्याला बचत म्हणतात. हीच बचत-गुंतवणूक म्हणून वापरली जाते. म्हणजे निव्वळ गुंतवणूक ही भांडवलाच्या साठ्यातील वाढीचा दर असते.



भांडवल श्रम गुणोत्तर

वरील आकृतीतमध्ये OX अक्षावर भांडवल श्रम गुणोत्तर तर OY अक्षावर वृद्धीदर दर्शविला आहे. Otr हा श्रमशक्तीचा हिस्सा दर्शविते. श्रमशक्तीचा हिस्सा स्थिर उत्पादन फलामुळे $cd(s_1)$ असा क्षितीज समांतर राहतो. भांडवल-श्रम प्रमाण स्थिर असते. श्रमशक्ती ज्या दराने वाढते त्याच दराने भांडवलसाठाही वाढत जातो.

अशाप्रकारे  भांडवल-श्रम प्रमाणाचे सुरवातीचे मूल्य कोणतेही असू दे नैसर्गिक कर पद्धतीने ते समतोल वाढीच्या स्थितीकडे विकसीत होते.

**प्रा. सोलो प्रतिमान–मर्यादा :**

प्रा. सोलो यांनी जे प्रतिमान स्पष्ट केले ते हेरॉड व डोमर यांच्या प्रतिमानातील सुधारणा आधारित केले. अधिक लवचिक गृहिते स्पष्ट करून भांडवल श्रम गुणोत्तर, तांत्रिक सहगुणक असे प्रभावी चल वापरले. तरीही या प्रतिमानामध्ये काही उणिवा स्पष्ट होतात त्या पुढीलप्रमाणे.

१) उत्पादन फलनाचा विचार सोलो नी केला पण गुंतवणूक फलन याचा विचार केला नाही.

२) सोलोने भांडवली साठा ही संकल्पना दुर्लक्षित केली.

३) प्रत्यक्ष वृद्धीदर व अपेक्षित वृद्धीदर यांच्यातील फरकाचा, उणिवांचा अभ्यास केला नाही.

४) तांत्रिक सहगुणक स्पष्ट केले पण तांत्रिक प्रगतीचा अभ्यास केला नाही.

५) पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेचे गृहीत चुकीचे.

६) किंमती वेतन हे घटक लवचिक मानले. यामुळे काही समस्या निर्माण झाल्या.

७) सोलोच्या प्रतिमानातील गृहीते अवास्तव वाटतात.

अशा काही मर्यादा या प्रतिमानात असल्या तरी दीर्घकाळात विकासासाठी प्रा. सोलोचे प्रतिमान महत्त्वाचे ठरते.

**ब) स्वयंअध्ययन प्रश्न :**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय सूचवा.**

१) ------ आर्थिक वृद्धी विकास यावर परिणाम करणारा प्रभावी घटक आहे.

अ) तंत्रज्ञान ब) लोकसंख्या क) बेरोजगारी ड) भांडवल अभाव

२) हेरॉड-डोमर प्रतिमानामध्ये ------ या घटकात अग्रस्थान होते.

अ) बचत ब) गुंतवणूक क) भांडवल ड) श्रम

३) ------ प्रारूपामध्ये Gw आणि Gn कल्पना मांडली.

अ) हेरॉड-डोमर ब) सोलो क) हिक्स प्रतिमान ड) ए.के. प्रतिमान

४) गुंतवणूकीची एकूण पुरवठा बाजू व एकूण मागणी बाजू यांच्यातील सहसंबंध ------ यांनी स्पष्ट केला.

अ) हेरॉड ब) डोमर क) सोलो ड) मिसेस रॉवीन्सन

५) प्रा. सोलो यांच्या प्रतिमानालाच ------ प्रतिमान म्हणतात.

अ) स्थिरकालीन प्रतिमान ब) अल्पकालीन वाढीचे प्रतिमान

क) दीर्घकालीन वाढीचे प्रतिमान ड) भांडवलकालीन प्रतिमान

### १.२.३ उत्पन्न वितरणाचे कॅल्डोर प्रतिमान Kaldor Model of income Distribution

**प्रास्ताविक:–**

विकासाची प्रक्रिया नेमकी कोणत्या घटकावर अवलंबून असते याबाबत कॅल्डोर यांनी विकास प्रतिमान स्पष्ट केले आहे आर्थिक विकास हा उत्पन्न आणि उत्पन्नाचे वितरण या दोन घटकावर अवलंबून असतो असे त्यांनी आपल्या प्रतिमानामध्ये स्पष्ट केले आहे. केन्स यांनी प्रभावी मागणी वरतीच विकास अवलंबून असतो आणि प्रभावी मागणीच्या कमतरतेने विकासात अडथळा निर्माण होतो असे म्हटले आहे. कॅल्डोर यांनी हे मत मान्य केले नाही. याउलट रिकार्डो यांनी म्हटल्याप्रमाणे नैसर्गिक साधनसामग्रीच्या मर्यादेवरच विकास ठरतो यांच्याशी त्यांनी आपली मत सहमती दाखवली आहे. पण त्याचबरोबर ॲडम स्मिथ, रिकार्डो आणि हेरॉड डोमर यांनी बचत आणि गुंतवणूक यांच्यावर विकास अवलंबून असतो असे म्हटले होते. ते कॅल्डोर यांनी नाकारले व सोलो यांनी म्हटले प्रमाणे विकास हा तांत्रिक प्रगतीवर अवलंबून असतो याच्यावर भर दिला आहे.

**गृहीते:–**

१. उत्पादनात भांडवल आणि श्रम हे दोन घटक आहेत व एकूण उत्पन्न वेतन आणि नफा किंवा व्याज यामध्ये विभागले जाते.

२. उत्पादनात स्थिर प्रमाण प्रत्येकाचा अनुभव येतो त्यामुळे नफ्याचा दर स्थिर असतो.

३. पूर्ण स्पर्धा असल्याने सर्व ठिकाणी नफा आणि वेतन समान असते.

४. भांडवल आणि श्रम हे परस्पर पूरक आहेत.

५. सर्व नफा हा बचतीसाठी वापरला जातो आणि सर्व वेतन हे उपभोगासाठी वापरले जाते.

६. अल्पकाळात पूर्ण रोजगार अस्तित्वात असतो.

७. कॅल्डोर यांच्या प्रतिमानात उत्पन्नाचे वितरण हे भांडवल संचय यावर अवलंबून असते आणि भांडवल संचय हा नफ्यावर अवलंबून असतो तर नफा हा भांडवलदाराच्या एकूण उत्पन्नातील जो वाटा असतो त्यावर अवलंबून असतो.

८. कॅल्डोर यांच्या प्रतिमानात विकासाचा दर हा केवळ साधनसामग्रीची उपलब्धता आणि तांत्रिक प्रगती यावर अवलंबून असतोच असे नाही तर तो संचेयाच्या तीव्रतेवर अवलंबून असतो.

या प्रतिमानामध्ये उत्पन्न आणि वितरण या एकमेकांशी निगडित गोष्टी आहे उत्पन्न वितरणावरच विविध गटाची बचत प्रवृत्तीचे व बचतीचे प्रमाण ठरते. दुसऱ्या बाजूला उत्पन्न वितरण हे विकासाचा दर आणि समाजातील विविध बचत जर गुंतवणूक कमी झाली तर एकूण मागणी कमी होते. परिणामी किमती घटतात.

किमतीत होणारी घट ही कामगारांच्या पैशातील वेतनात होणाऱ्या घटपेक्षा अधिक असते परिणामी उत्पन्नाची वितरण कामगारांना अनुकूल आणि भांडवलदारांना प्रतिकूल असे होते. भांडवलदारांची उत्पन्न घटल्याने बचत कमी होते आणि बचत व गुंतवणूक यामध्ये संबंध प्रस्थापित होते यालाच कॅल्डोरचे उत्पन्न वितरणाचे प्रतिमान असे म्हणतात.

**कॅल्डोर विकास प्रतिमानातील तीन टप्पे:-**

**१. विकासाचा प्राथमिक टप्पा-** विकासाच्या प्राथमिक टप्प्यात श्रम पुरवठा हा अमर्यादित असतो त्यामुळे वेतन किमान निर्वाह पातळीवर राहते या टप्प्यात उत्पन्नातील वाढ व विकासदर हा भांडवल संचय यावर अवलंबून असतो बचत उत्पन्न गुन्हा दर हे विकासाचा दर ठरवते म्हणून यास प्राथमिक टप्पा असे संबोधले आहे

**२. विकासाचा दुसरा टप्पा-** यामध्ये श्रमाचा अतिरिक्त साठा संपुष्टात येतो आणि वेतन दर वाढू लागतो पण याचवेळी श्रमाची बचत करणारी तंत्रे शोधली जातात आणि श्रम टंचाईचा प्रश्न काही प्रमाणात सुटतो वेतन वाढ न झाल्याने त्याचा अनिष्ट परिणाम भांडवल संचय आणि नफा यावर होत नाही.

**३. विकासाचा तिसरा टप्पा-** या टप्प्यामध्ये वेतन दर वाढतात वेतन दर वाढीचा परिणाम म्हणून नफ्याचा आणि भांडवल संच याचा दर कमी होतो अर्थव्यवस्थेत लोकसंख्या वाढीच्या दरा इतका भांडवल संचयाचा दर असल्याने अर्थव्यवस्था स्थिर विकास दराने प्रगती करते.

कॅल्डोरच्या या प्रतिमानात भाववाढ आणि भावघट यांचा उत्पन्न वितरणावर होणारा परिणाम महत्त्वाचा मानला आहे. भाववाढीच्या काळात उत्पन्नाचे वितरण भांडवलदारांच्या बाजूने होते वेतनातील वाढीपेक्षा वस्तूच्या किमतीत होणारी वाढ ही अधिक वेगाने होते त्यामुळे नफा आणि विकासदर वाढतो मंदीच्या काळात याच्यावर उलट परिणाम झालेला दिसून येतो.

**कॅल्डोर प्रतिमानातील महत्त्वपूर्ण घटक:-**

१. आर्थिक विकासासाठी भांडवल संच याचा आणि नफ्याचा दर मोठा असणे आवश्यक असते.

२. संचयाचा दर हा नफ्याच्या प्रमाणावर अवलंबून असल्याने राष्ट्रीय उत्पन्नात नफ्याचा वाटा अधिक असावा लागतो.

३. विकास प्रक्रियेत श्रमाचा उत्पन्न वितरणातील वाटा वाढल्यास प्रवृत्तीचे घटक यावर अवलंबून असते. कॅल्डोर यांच्या प्रतिमानात नफ्याचा दर किंवा नफ्याचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा हा संचियाच्या दरावर म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नातील किती हिस्सा गुंतवणुकीसाठी वापरला जातो यावर अवलंबून असतो तर दुसऱ्या बाजूला भांडवल संचय हा राष्ट्रीय उत्पन्नातील नफ्याच्या प्रमाणावर अवलंबून असतो. हे पुढील समीकरणाच्या साह्याने स्पष्ट करता येईल.

नफा, संचय, विकासदर यातील परस्पर संबंध- कॅल्डोर यांच्या प्रतिमानात नफा, संचय, आणि विकासदर हे घटक परस्परांवलंबि आहेत हे स्पष्ट करण्यासाठी पुढील दोन सूत्रे उपयुक्त ठरतात.

**A. भांडवल संचय व गुंतवणूक सूत्र-**

$$\frac{I-(Sr-Sw)}{P+Sw} \quad \frac{P+Sw}{Y}$$

वरील सूत्रात-

I = गुंतवणूक

Y = राष्ट्रीय उत्पन्न

Sr = नफ्यातून होणारी बचत

Sw = वेतनातून होणारी बचत

P = बचत

वरील सूत्रातून असे स्पष्ट होते की गुंतवणुकीचे प्रमाण हे राष्ट्रीय उत्पन्नाशी किती प्रमाण असेल ते नफ्यातून होणारी बचत व नफ्याचे प्रमाण आणि वेतनातून होणारी बचत यावर अवलंबून असते. वेतनातून होणारी बचत शून्य असल्यास गुंतवणुकीचे प्रमाण हे नफ्याच्या प्रमाणावरच अवलंबून असते असे म्हणता येईल.

**B. नफा राष्ट्रीय उत्पन्न प्रमाण सूत्र-**

नफ्याचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नात किती असेल हे गुंतवणुकीचे राष्ट्रीय उत्पन्नात असणाऱ्या प्रमाणावर ठरते ठरत असते यासाठी पुढील सूत्र उपयुक्त ठरते.

$$\frac{P}{Y} = \frac{I}{Y}$$

वरील सूत्रातून असे स्पष्ट होती की जेवढ्या प्रमाणात गुंतवणूक अधिक असेल तेवढा नफ्याचा दर अधिक असतो

४. भांडवलाची कार्यक्षमता वाढल्यास परिणामी विकासाचा दही वाढतो कॅल्डोर यांनी आपल्या प्रतिमानाचे समर्थन करण्यासाठी १९ व्या शतकातील विकास प्रक्रियेची आकडेवारी अभ्यासली आहे विकासाच्या प्रक्रियेत भांडवलदार आणि श्रमिक यांचा तोलनिक वाटा स्थिर राहिला आहे दुसरे महत्त्वाचे निरीक्षण केलर यांनी नोंदवले आहे ते म्हणजे तांत्रिक प्रगतीचा परिणाम म्हणून उत्पादन तंत्र भांडवल अधिक वापरणारे किंवा भांडवलाची बचत करणारे अशा दोन्ही स्वरूपाचे नसते.

**कॅल्डोर प्रतिमान– विकास निर्धारित करणारे घटक:–**

या प्रतिमानात विकास हा बचत गुंतवणूक गुणोत्तर, तांत्रिक प्रगती आणि लोकसंख्या वाढ यावर अवलंबून असतो जेव्हा लोकसंख्या वाढीचा दर स्थिर असतो तेव्हा एकूण वास्तव्य उत्पन्नात होणाऱ्या वाढीचा दर व दरडोई वास्तव उत्पन्न वाढीचा दर समान असतात मात्र लोकसंख्या वाढत असेल तर वास्तव उत्पन्नात होणारी वाढ ही लोकसंख्या वाढ आणि उत्पन्न वाढ यांच्यावर अवलंबून असते

**स्थिर लोकसंख्या व विकास**

बचत फलन, गुंतवणूक फलन आणि तांत्रिक प्रगती फलन यावर विकास अवलंबून असतो ही तीन महत्त्वाची फलने पुढे प्रमाणे मांडता येतील.

**१. बचत फलन–**

बचत ही नफ्यातून (Sr) आणि वेतनातून (Sw) केली जाते.

Q = उत्पादन

r = व्याजदर

K = भांडवल

$K_1$ = गुंतवणूक गृहीत धरले तर $K_1$ = Ks

S = Sr (rk) + Sw (Q-rk)

वरील सूत्रातून एकूण बचतही भांडवलदाराची एकूण नफ्यातून (rk) भांडवलदाराची बचत व श्रमांकडून केली जाणारी बचत (Sw) यावर अवलंबून असते श्रमाची बचत ही एकूण उत्पादनातून एकूण नफा वजा केल्यास जे शिल्लक राहते त्यावर अवलंबून असते (Q-rk)

**गुंतवणूक फलन:–**

गुंतवणूक ही नफ्यावर अवलंबून असते त्याचबरोबर ती भांडवल साठा टिकून ठेवण्याच्या भूमिकेवरही अवलंबून असते. एखाद्या विशिष्ट काळात असणारा भांडवल साठा हा त्यापूर्वीच्या काळातील उत्पन्न व त्या काळातील उत्पन्नाशी भांडवलाचे असणारे प्रमाण यांच्यावर अवलंबून असते. सूत्ररूपाने हे पुढील प्रकारे सांगता येते.

$$Kt = \alpha yt - I + \beta \left[\frac{Pt-1}{Kt-1}\right] Yt - \qquad 1..(a)$$

Yt – वास्तव उत्पन्न

Kt – भांडवल साठा

Pt– नफा

अल्फा ($\alpha$) आणि $\beta$ हे स्थिरांक आहेत.

कॅल्डोर यांच्या मते प्रचलित काळातील गुंतवणूक (Kt) ही प्रत्यक्षातील भांडवल आणि अपेक्षित भांडवली यातील फरकावर अवलंबून असते.

पुढील काळात आवश्यक असणारे भांडवल म्हणजे अपेक्षित भांडवल (Kt+1) होय. हे सूत्र पुढील प्रकारे मांडता येते.

$$Kt\text{-}1 = \alpha\, yt + \beta \left[\frac{Pt\text{-}}{Kt}\right] \quad Yt \qquad \text{................. (b)}$$

सूत्र a आणि b यावरून गुंतवणूक फलन पुढीलप्रमाणे ठरते.

$$H = \alpha\, Yt + \beta \left[\frac{Pt}{Kt}\right] - Yt - a\, Yt{+}1 + \beta \left[\frac{Pt\text{-}1}{Kt\text{-}1}\right] Yt\text{-}1$$

**तांत्रिक प्रगती फलनः–**

भविष्यकाळात किंवा पुढील वर्षात (yt+1) होणारी उत्पन्नातील वाढ ही चालू काळातील गुंतवणुकीचे चालू काळातील भांडवल गुंतवणुकीच्या प्रमाणाशी निगडित असते. भांडवल गुंतवणुकीच्या प्रमाणावर अवलंबून असते.


$$\frac{Yt + 1 - Yt}{Yt} - = \alpha + \beta \frac{It}{Kt}$$

या ठिकाणी अल्फा आणि बेटा हे स्थिरांक असून ते धनात्मक आहेत.

**कॅल्डोर प्रतिमान आकृतीच्या आधारे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील:–**

कॅल्डोर यांच्या प्रतिमानात बचत आणि गुंतवणुकीचे दर हे महत्त्वाची भूमिका पार पाडतात जेव्हा हे दोन्ही दर समान होतात तेव्हा अर्थव्यवस्था संतुलित होते. अर्थव्यवस्थेचे घटक केवळ या समानतेवर अवलंबून नसते


तर त्यासाठी बचतीचे प्रमाण संतुलन बिंदूवर गुंतवणुकीच्या प्रमाणापेक्षा अधिक असले पाहिजे हे पुढील आकृतीने स्पष्ट करता येते.




वरील आकृतीत QQ1 हा वक्र बचत फलन दर्शवतो तर PP1 हा गुंतवणूक फलन दर्शवतो (I)आय या ठिकाणी दोन्ही वक्र छेदतात. या बिंदू नंतर अर्थव्यवस्था संतुलित विकासासाठी करते कारण QQ1 हा बचतीचा दर PP1या गुंतवणूक दरापेक्षा जास्त आहे. अर्थव्यवस्थेची या संतुलित विकासावरील मर्यादा देखील विचारात घ्यावे लागतील. ही मर्यादा पुढीलप्रमाणे मांडता येते.

या प्रतिमानामध्ये नफा हा उत्पन्नातून वेतन वजा केल्यानंतर राहणाऱ्या प्रमाणंपेक्षा कमी असला पाहिजे किंवा तो त्यापेक्षा अधिक असता कामा नये हे नफ्याचे महत्तम प्रमाण आहे नफ्याची किमान प्रमाण हे दुसऱ्या निकषातून स्पष्ट होते किमान नफ्यापेक्षा प्रत्यक्षातील नफा कमी असता कामा नये विकासाचा दर होता कॅलडोर यांच्या प्रतिमानात नफ्याच्या प्रमाणाबरोबरच तांत्रिक प्रगतीवर अवलंबून असतो ह्या मर्यादा लक्षात घेणे अपेक्षित आहेत.

विकासाचा दर आणि भांडवल संचय दर यामध्ये असणारा सहसंबंध पुढील आकृतीच्या द्वारे स्पष्ट करता येतो.




समजा प्रचलित गुंतवणूक ही असून ती या दराच्या डावीकडे आहे.

या गुंतवणुकीशी संबंधित विकासाचा दर G1 आहे यातून अपेक्षित गुंतवणूक ही प्रत्यक्षातील गुंतवणुकीपेक्षा अधिक असल्याने गुंतवणूक वाढवली जाते व विकासदर G1 पासून G2 व G सा वाढतो G या ठिकाणी उत्पन्न वाढचा दर आणि भांडवलवाडीचा दर दोन्ही समान आहेत.

**कॅल्डोर यांच्या प्रतिमानाचे मूल्यमापन–**

१. कॅल्डोर यांच्या प्रतिमानात भांडवलदार वर्गाच्या बाजूने होणाऱ्या उत्पन्न वाटपाचे समर्थन केले आहे वास्तविक सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने उत्पन्नाचे वितरण श्रमिक वर्गाच्या बाजूने होणे अपेक्षित होते असे यामध्ये दिसून येत नाही.

२. कॅल्डोर आणि भांडवलदारांच्या नफ्याला व त्यातून होणाऱ्या आर्थिक प्रगतीला गरजेपेक्षा जास्त महत्व दिले आहे. तांत्रिक प्रगती होण्यासाठी श्रमिक वर्गाला पुरेसे उत्पन्न मिळणे आवश्यक असते याचा यामध्ये विचार झालेला दिसून येत नाही.

३. मीड या अर्थशास्त्रज्ञाने कॅल्डोर यांच्या प्रतिमानावर विसंगतीची टीका केली आहे. एका बाजूला भांडवल आणि श्रम पूर्ण पर्यायी नसल्याचे म्हटले आहे त्यावेळी वेतन घट होणे हे योग्य असणे असे म्हटले आहे. वेतन कमी झाल्याने त्यांची उत्पादकता आणि भांडवलदारांचा नफा घटतो याकडे दुर्लक्ष केले आहे.

४. कॅल्डोर यांच्या प्रतिमानात भाववाढचा परिणाम दुर्लक्ष झालेला दिसून येतो यांच्या प्रतिमानातून भाववाढ व नफ्यात वाढ अपेक्षित आहे अशा भाववाढीतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची कॅलडोर आणि चर्चा नियमानुसार केलेली नाही.

५. कॅल्डोर यांच्या मते जर लोकसंख्या वाढीचा दर हा राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा अधिक असेल तर त्याचा प्रतिकूल परिणाम तांत्रिक प्रगतीवर होतो व अर्थव्यवस्था अवेळी स्थितिशील होते पण कॅल्डोर यांच्या मते अनुभवाच्या आधारे अवास्तव ठरते.

## सुवर्णकाळ / सुवर्णयुगाचा आदर्श (Golden age model)

**सुवर्णकाळचा अर्थ:–**

जर लोकसंख्येचा वाढीचा दर भांडवलाच्या वाढीच्या दरासारखा असेल तर अर्थव्यवस्थेत श्रम आणि भांडवल या दोन्हींचा पूर्ण रोजगार उपलब्ध होईल. श्रीमती जोन रॉबिन्सन याला सुवर्णकाळ म्हणतात.

१९५६ मध्ये ङ्गद एक्युमुलेशन ऑफ कॅपिटलफ जोन रॉबिन्सनचे मॉडेल विकसनशील अर्थव्यवस्थेतील लोकसंख्या वाढीची समस्या स्पष्टपणे घेते आणि भांडवल संचय आणि उत्पादन वाढीच्या भूमिकेवर लोकसंख्येच्या प्रभावाचे विश्लेषण करते.

श्रीमती जॉन रॉबिन्सनचे आर्थिक विकासाचे सुवर्णयुग मॉडेल खेळाच्या भांडवली नियमांवर आधारित आहे. तिच्या मते, जर त्यांच्याकडे कोणताही उद्योजक नफा जमा करू शकत नाही आणि जर ते जमा झाले नाहीत तर त्यांना नफा नाही.अशाप्रकारे, नफा जमा करणे हा आर्थिक वाढीच्या रॉबिन्सन सिद्धांताभोवतीचा मुख्य आधार आहे.

आर्थिक वाढीचे मॉडेल दोन मूलभूत घटकांवर आधारित आहे:–

१. भांडवल निर्मिती ही उत्पन्नाच्या वाटपाच्या पद्धतीनुसार असते.

२. अर्थव्यवस्थेत ज्या दराने श्रम वापरले जातात ते मजुरांचा पुरवठा आणि भांडवल पुरवठ्याचे कार्य आहे.

**गृहीतके:–**

१. Laissez faire अर्थव्यवस्था बंद आहे असे गृहीत धरले जाते, म्हणजे, कोणताही विदेशी व्यापार नाही.

२. अर्थव्यवस्थेत श्रम आणि भांडवल हे केवळ उत्पादक घटक आहेत.

३. दिलेल्या उत्पादनासाठी भांडवल आणि श्रम निश्चित प्रमाणात वापरले जातात.

४. तांत्रिक प्रगती स्थिर आहे.

५. मजुरांची टंचाई नाही आणि उद्योजक त्यांना हवे तितके कामगार कामावर ठेवू शकतात..

६. संपूर्ण उत्पन्न दोन वर्गांमध्ये वितरीत केले जाते - कामगार आणि उद्योजक

७. अर्थव्यवस्थेत उद्योजक हा एकमेव बचत-गुंतवणूक करणारा वर्ग आहे.

८. किंमत पातळीत कोणताही बदल नाही.

९. उद्योजक हे भांडवल निर्मितीचे एकमेव स्त्रोत आहेत.

१०. एकूण राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एकूण वेतन-बिल आणि एकूण नफा यांची बेरीज.

११. एकूण वेतन-बिल हे वास्तविक वेतन दर आणि कामगारांच्या संख्येचे उत्पादन आहे.

१२. एकूण नफा म्हणजे नफ्याचा दर आणि गुंतवलेल्या भांडवलाची रक्कम

**गणितीय व्याख्या:-**

ती या औपचारिक विधानाने सुरुवात करते की राष्ट्रीय उत्पन्नामध्ये एकूण रकमेचा समावेश होतो मजुरीची रक्कम आणि एकूण नफा. एकूण मजुरीची रक्कम म्हणजे संख्येने गुणाकार केलेला वास्तविक दर कामगारांची संख्या, आणि एकूण नफा नफ्याच्या दराच्या प्रमाणात गुणाकार केला जातो भांडवल हे खालील समीकरण म्हणून सांगितले जाऊ शकते:

$$Y = wN + pK$$

जेथे, $Y$ = राष्ट्रीय उत्पन्न, $w$ = वास्तविक वेतन दर, $N$ = कामगारांची एकूण संख्या, $p$ = नफ्याचा दर, $K$ भांडवलाची रक्कम.

वरील समीकरणावरून ते $p$ चे मूल्य सहज काढू शकते जे च्या दरासाठी आहे
नफा, आणि जे भांडवल संचयनासाठी महत्वाचे आहे. हे असे व्यक्त केले जाऊ शकते:

$$P = \frac{Y - wN}{K}$$

जेथे नफ्याचा $p$ दर, एकूण उत्पन्न $(Y)$ वजा एकूण वेतन बिल $(wN)$ चे गुणोत्तर आहे.

भांडवलाची रक्कम $(K)$. कामावर घेतलेल्या प्रति मजुराच्या नफ्यात फरक असल्याने प्रति मजूर उत्पादन आणि वास्तविक मजुरी, नफ्याचा दर कामगार उत्पादकतेवर अवलंबून असेल,वास्तविक मजुरीचा दर आणि प्रति मजूर भांडवलाची रक्कम. तर नफ्याचा दरही वाढेल भांडवल आणि श्रम यांचे प्रमाण कमी होते.

**उत्पन्नाची बाजू:-**

नफ्याचा दर वाढविला जाऊ शकतो, बशर्ते उत्पन्न वाढेल, परंतु दर मजुरी स्थिर राहते किंवा मजुरीचा दर कमी होतो, जर उत्पन्न स्थिर राहते आणि किंवा भांडवल- कामगार प्रमाण कमी होते. या केवळ अशाच अटी आहेत जेव्हा उत्पादक सक्षम होतील त्यांचा नफा वाढवा.

**खर्चाची बाजू:-**

राष्ट्रीय उत्पन्न (Y) एकूण उपभोग (C) आणि एकूण समान असावे गुंतवणूक (I). समीकरण असे असू शकते:

$$Y = C + I$$

समतोल स्थितीची पूर्तता करण्यासाठी बचत गुंतवणुकीसारखीच असली पाहिजे आणि याला समीकरणाच्या रूपात म्हटले जाऊ शकते:

$$S = I$$

श्रीमती रॉबिन्सनच्या वाढीचे मॉडेल असे गृहीत धरते की कामगार स्वभावाने उधळपट्टी आहेत. काहीही वाचवू नका आणि त्यांचे संपूर्ण वेतन वापरा आणि दुसरे म्हणजे, उद्योजक काहीही वापरत नाहीत आणि त्यांचा संपूर्ण नफा गुंतवा. या परिस्थितीत, बचत-गुंतवणूक संबंध असू शकतात

म्हणून प्रस्तुत करा:

$S = PK$

And $I = K$ where K represents the net growth in real capital.

Since $S = I$

$pK = K$

or

K


त्यातून असा निष्कर्ष काढला गेला की K/K भांडवल जमा होण्याचा दर आर्थिकदृष्ट्या निर्णायक आहे विकास भांडवल K/K च्या वाढीचा दर नफ्याच्या दरासारखा आहे आणि म्हणून तो असे म्हणता येईल की दोघेही एकमेकांवर अवलंबून आहेत.

**सुवर्णकाळ:-**

जर लोकसंख्येचा वाढीचा दर भांडवलाच्या वाढीच्या दरासारखा असेल तर अर्थव्यवस्थेत श्रम आणि भांडवल या दोन्हींचा पूर्ण रोजगार उपलब्ध होईल. मिसेस जोन रॉबिन्सन याला सुवर्णयुग म्हणतात. सुवर्णयुग अशा परिस्थितीशी सुसंगत आहे जिथे नैसर्गिक, हमी आणि वास्तविक दर राष्ट्रीय उत्पन्न वाढीचे सर्व समान

आहेत. ते आर्थिक आनंदाची स्थिती दर्शवते, वापर जास्तीत जास्त तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य दराने वाढत आहे जो सुसंगत आहे, पासून अर्थव्यवस्थेत वाढीचा दर राखणे. हे कामगारांच्या पूर्ण रोजगाराचे आणि भांडवलाच्या पूर्ण वापराचे सूचक आहे.

**आकृती –**




OX अक्ष भांडवल श्रम गुणोत्तर दर्शवितो, OY अक्ष मजुरीच्या वेतन दराचे प्रतिनिधित्व करतो. OP उत्पादन कार्य वक्र आहे. यात श्रम आणि भांडवल यांचे प्रमाण सूचित होते आउटपुटची विशिष्ट पातळी तयार करण्यासाठी एकत्रित. बिंदू A भांडवल प्रमाण OC आहे, आणि द मजुराची उत्पादकता OD आहे आणि OW पैकी मजुरीचा दर आहे. अधिशेष WD चा दर आहे. त्यात असेही म्हटले आहे की A बिंदूवर, श्रमाचा भांडवलाचा वाढीचा दर विकास दराच्या बरोबरीचा आहे.

**असमतोल स्थिती–**

जर लोकसंख्येच्या वाढीचा दर भांडवलाच्या वाढीच्या दरापेक्षा जास्त असेल तर काही विशिष्ट परिस्थितीत सुवर्णयुगात परत येणे शक्य होईल.भांडवलाच्या वाढीचा दर लोकसंख्येच्या वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे, तांत्रिक सुधारणांद्वारे सुवर्णयुग समतोल पुनर्संचयित होण्याची शक्यता आहे ज्यामुळे भांडवल–उत्पादन गुणोत्तर वाढेल.

**सुवर्णयुगाचे प्रकार:–**

१. लंगडा सुवर्णयुग – भांडवली वाढ पुरेशी नाही.

२. एक संयमित सुवर्णयुग - भांडवल अपेक्षित विकास दरापेक्षा कमी आहे.

३. एक बास्टर्ड गोल्डन एज - भांडवली स्टॉक वाढत नाही.

४. प्लॅटिनम वयूविकासाचे मापदंड कठोर मानले जातात.

**टीका:-**

A. अवास्तव गृहीतकेवर आधारित आहे.

B. संस्थात्मक घटकाच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करते.

C. बंद अर्थव्यवस्था आहे.

D. मानवी भांडवलाच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करते.

E. राज्याच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करते.

F. UDEs साठी मर्यादित महत्त्व.

G भांडवल आणि श्रम एका निश्चित गुणोत्तरामध्ये कार्यरत आहेत.

H. धोरणाच्या परिणामांसाठी तटस्थता.

**फे-रानिस प्रतिमान Fei -Ranis Model**

आर्थिक वाढीचे Fei-Ranis प्रतिमान हे विकासात्मक अर्थशास्त्र किंवा कल्याणकारी अर्थशास्त्रातील द्वैतवादाचे प्रतिमान आहे जे जॉन सी.एच. फी आणि गुस्ताव रॅनिस यांनी विकसित केले आहे आणि लुईस प्रतिमानचा विस्तार म्हणून समजले जाऊ शकते. हे सरप्लस लेबर प्रतिमान म्हणूनही ओळखले जाते.हे आधुनिक आणि आदिम दोन्ही क्षेत्रांचा समावेश असलेल्या दुहेरी अर्थव्यवस्थेची उपस्थिती ओळखते आणि अविकसित देशांना निसर्गात एकसमान मानणाऱ्या इतर अनेक विकास मॉडेल्सच्या विपरित, बेरोजगारी आणि संसाधनांची कमी बेरोजगारीची आर्थिक परिस्थिती विचारात घेते. या सिद्धांतानुसार, आदिम क्षेत्रामध्ये अर्थव्यवस्थेतील विद्यमान कृषी क्षेत्राचा समावेश होतो आणि आधुनिक क्षेत्र हे वेगाने उदयास येणारे परंतु छोटे औद्योगिक क्षेत्र आहे.दोन्ही क्षेत्रे अर्थव्यवस्थेत सहअस्तित्वात आहेत, ज्यामध्ये विकासाच्या समस्येचा मुख्य भाग आहे. कृषी क्षेत्राकडून औद्योगिक अर्थव्यवस्थेकडे प्रगतीचा केंद्रबिंदू पूर्णपणे बदलूनच विकास घडवून आणला जाऊ शकतो, हे दर्शविते की जसे की औद्योगिक उत्पादनात वाढ. हे कृषी क्षेत्रातून औद्योगिक क्षेत्राकडे श्रमांचे हस्तांतरण करून केले जाते, अविकसित देशांना कामगार पुरवठ्यातील अडचणींचा त्रास होत नाही. त्याच वेळी, कृषी क्षेत्रातील वाढ नगण्य असू नये आणि त्याचे उत्पादन अन्न आणि कच्च्या मालासह संपूर्ण अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी पुरेसे असावे. हॅरॉड-डोमर प्रतिमानप्रमाणे, जेव्हा विकसनशील देशांमध्ये आर्थिक विकासाचा विचार केला जातो तेव्हा बचत आणि गुंतवणूक ही प्रेरक शक्ती बनतात.

**फे –रानिस** Fei - Ranis **प्रतिमानची वैशिष्ट्ये:–**

लुईस प्रतिमानप्रमाणे, फे–रानिस प्रतिमान देखील नूरसेच्या आर्थिक विकास प्रतिमानवर आधारित आहे. फे–रानिस प्रतिमान लुईस प्रतिमानच्या मर्यादांवर मात करण्याचा प्रयत्न करते त्यातून काही प्रमुख निर्गमन समाविष्ट करणे ज्यामुळे Fei-Ranis प्रतिमान म्हणून पाहिले जाते लुईस प्रतिमानपेक्षा सुधारणा. खालीलप्रमाणे हे निर्गमन आहेत:–

**१. लुईस प्रतिमान कृषी क्षेत्राचे महत्त्व नेहमीच अधोरेखित करते –** लुईसच्या मते वाढीचे एक प्रतिमान ज्यामध्ये भांडवलशाही क्षेत्र आणि कृषी क्षेत्र यांच्यात परस्परसंवाद नाही, त्याशिवाय अतिरिक्त श्रमशक्ती कृषी क्षेत्रातून पुढे सरकते. भांडवलशाही क्षेत्र या प्रतिमानमध्ये एक क्षेत्र सतत वाढत आहे तर दुसरे मागे आहे, म्हणजेच भांडवलशाही क्षेत्र कृषी क्षेत्राच्या खर्चावर वाढते. तथापि, फे–रानीस प्रतिमान भांडवलशाही क्षेत्र आणि कृषी क्षेत्र यांच्यातील परस्परसंवाद महत्त्वपूर्ण आहे यावर भर देते. आणि या परस्परसंवादामुळे एकूण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गती मिळते.


२. Fei-Ranis प्रतिमान LDC मध्ये प्रचलित असलेल्या वास्तवाच्या जवळ आहे कारण ते प्रभाव लक्षात घेते श्रमशक्तीवर लोकसंख्या वाढ. लुईस प्रतिमानमध्ये हे वैशिष्ट्य पूर्णपणे गायब आहे लुईस प्रतिमान जमीनमालकाला कोणतीही भूमिका देत नाही म्हणजे जमीनदार हा एक निष्क्रिय घटक आहे आणि कोणतीही महत्त्वाची भूमिका बजावत नाही. पण Fei-Ranis प्रतिमान मध्ये जमीनदार एक महत्वाची भूमिका बजावते या अर्थाने की त्याला कदाचित नावीन्यपूर्ण आणि तांत्रिक प्रगतीचा परिचय करून देण्यास प्रवृत्त केले जाईल. कृषी क्षेत्रात दोन परिस्थितीत आहेत:–

(a) जर कृषी क्षेत्रातील उत्पादनांच्या किमती वाढू दिल्यास

(b) इनपुट खर्चाच्या अनुदानाच्या बाबतीत


३. लुईस प्रतिमानमध्ये, श्रमशक्तीचे कृषी क्षेत्राकडून भांडवलशाही क्षेत्राकडे हस्तांतरणाचा वेग भांडवलशाही क्षेत्राच्या नफ्याच्या वाढीवर अवलंबून असते. Fei-Ranis प्रतिमान मध्ये, तो औद्योगिक भांडवल, लोकसंख्येच्या वाढीचा दर, तांत्रिक प्रगतीचे स्वरूप आणि वाढ यावर अवलंबून असते. कृषी क्षेत्रातून निर्माण होणारे औद्योगिक भांडवल हे उद्योगांच्या नफ्याच्या वाढीवर आणि अधिशेषावर अवलंबून असते.

४. लुईस प्रतिमानमध्ये, अंतिम परिणाम हा विकासाचा १) तरफा नमुना आहे कारण भांडवलदार क्षेत्र कृषी क्षेत्राच्या खर्चावर वाढते. २) एकाच वेळी वाढू शकत नाहीत आणि अंतर ओव्हरटाईम वाढते. दुसरीकडे, Fei-Ranis प्रतिमान मध्ये, संतुलित भांडवलशाही आणि कृषी क्षेत्राची वाढ आवश्यक आहे कारण अन्यथा अंतिम उत्पादन स्तब्धता असेल.




Fei-Ranis प्रतिमानमध्ये जेव्हा अतिरिक्त श्रमशक्ती संपते, तेव्हा श्रम पुरवठा वक्र वरच्या दिशेने वळतो. याचा अर्थ असा होतो की, जर जास्त मजूर कामावर ठेवायचे असतील तर कामगारांना उच्च वेतन दर दिला गेला पाहिजे. लुईस प्रतिमानमध्ये, पुरवठा वक्र उत्तम प्रकारे लवचिक आहे.

**संक्रमण प्रक्रियेचे तीन टप्पे:–**




OM हे श्रमशक्तीचे एकूण प्रमाण आहे, जे निश्चित केले जाते, तर श्रमाची मागणी श्रमाच्या सीमांत उत्पादन वक्र द्वारे दिली जाते जी MPL आहे. श्रमशक्तीची OL रक्कम उत्पादकपणे कार्यरत आहे आणि LM अल्परोजगार किंवा बेरोजगार आहे.

पहिल्या टप्प्यात, ते श्रम A Sr. वरून K Sr. मध्ये हस्तांतरित केले जातील ज्यांचे किरकोळ उत्पादन ऋण किंवा शून्य असेल जेणेकरून त्या कामगार शक्तीच्या निर्गमनाने A क्षेत्राच्या कामगिरीवर कोणताही फरक पडणार नाही.

दुसऱ्या टप्प्यात, त्या श्रमशक्तीचे हस्तांतरण केले जाते ज्यांचे किरकोळ उत्पादन सकारात्मक आहे परंतु निर्वाह मजुरीच्या दरापेक्षा कमी आहे. हे निर्गमन A Sr. आउटपुटमध्ये फरक करेल.

तिसऱ्या टप्प्यात, शेतीचे व्यावसायीकरण केले जाते ज्याद्वारे कृषी क्षेत्र आणि K वरिष्ठ श्रमशक्तीसाठी एकमेकांशी स्पर्धा करतात. म्हणून, ते मजुरीच्या दराची बोली लावतात आणि जो कोणी वाढीव वेतन दर प्रदान करतो तो अतिरिक्त श्रमशक्ती मिळविण्यात यशस्वी होईल.

**फी–रानीस प्रतिमानची गृहीतके:–**

१. दुहेरी अर्थव्यवस्थेची उपस्थिती आहे. पारंपारिक किंवा कृषी क्षेत्र निष्क्रिय आणि स्थिर आहे तर भांडवलशाही क्षेत्र सक्रिय आणि प्रगतीशील आहे.

२. जमिनीचा पुरवठा निश्चित केला जातो, आणि A सेक्टर आणि K दोन्ही सेक्टर जमिनीचा वापर करतात.

३. लोकसंख्या हा एक बाह्य घटक आहे. म्हणजेच तो प्रतिमानमध्ये उपस्थित असलेल्या घटकांव्यतिरिक्त इतर घटकांद्वारे निर्धारित केला जातो.

४. औद्योगिक क्षेत्रातील वास्तविक मजुरीचा दर निश्चित आहे. हा मजुरीचा दर प्रारंभिक पातळीच्या उत्पादकतेइतका आहे आणि त्याला स्थिर संस्थात्मक वेतन दर देखील म्हणतात.


५. श्रमाच्या संदर्भात स्केलवर सतत परतावा मिळतो. जेथे A Sr. आणि K Sr. दोन्हीमध्ये श्रम एक परिवर्तनीय घटक म्हणून कार्य करते.

६. A Sr. मध्ये एक प्रकार वगळता, म्हणजे, जमीन पुनर्संचयित केल्याचे कोणतेही संचय नाही. याचा अर्थ असा की जर शेतीमध्ये तांत्रिक प्रगती झाली नाही तर हे क्षेत्र मोलाचे होईल आणि थकवा जाणवेल. त्यामुळे जमिनीची सुपीकता राखली पाहिजे.

७. A Sr. चे उत्पादन जमीन आणि श्रमावर अवलंबून असते, तर K Sr. चे उत्पादन श्रम आणि भांडवल यावर अवलंबून असते.

८. श्रमाचे किरकोळ उत्पादन काही ठिकाणी शून्य असते आणि अशी श्रमशक्ती A Sr. मधून K Sr मध्ये हस्तांतरित केली जाऊ शकते, जेथे उत्पादक क्षमता A Sr. ला कोणतेही नुकसान न होता अधिक असते.

**कृषी क्षेत्राचे कामकाज–**





भाग (A) मध्ये, अर्थव्यवस्थेतील श्रमाचा एकूण पुरवठा x-अक्षावर OP वर निश्चित केला जातो आणि उपलब्ध जमिनीची एकूण रक्कम y-अक्षावर OL आहे. OA आणि OB या रिजलाइन्स सीमा आहेत, ज्यामध्ये उत्पादनाच्या विविध घटकांमध्ये म्हणजे जमीन आणि श्रम यांच्यामध्ये बदलण्याची शक्यता आहे. दोन रेषांना जोडणारे वक्र– R, R', R' या उत्पादन सीमारेषा आहेत. उत्पादकपणे कार्यरत कामगार शक्ती LU आहे, म्हणून, श्रमशक्ती आणि अधिशेष UV आहे.

भाग (B) मध्ये, आपल्याकडे x-अक्षावर श्रमाचे प्रमाण आणि y-अक्षावरील श्रमाचे एकूण उत्पादन आहे. श्रमाचे एकूण उत्पादन OM आहे, N नंतर ते थोडेसे कमी होते. OF हे संबंधित वेतन विधेयक आहे. संक्रमणाच्या पहिल्या टप्प्यात, आपण सोयीसाठी असे गृहीत धरू की अतिरिक्त श्रमशक्ती (UV=QP=GP) पासून आपण YP भाग (b) मधून काढून घेतो. आम्ही OY श्रमशक्तीचा वापर करून उत्पादनाची XY पातळी तयार करतो आणि एकूण वेतन बिल ZY आहे. त्यामुळे एकूण कृषी अधिशेष XZ आहे. Fei-Ranis

प्रतिमानमध्ये, हे XZ लपविलेल्या बचतीचे स्त्रोत आहे जे एकत्रित केले जाऊ शकते; उच्च भांडवल संचयनास कारणीभूत ठरते आणि अर्थव्यवस्थेला उच्च वाढीच्या मार्गावर आणू शकते. जर ही बचत K Sr. साठी दृश्यमान नसेल, तर ते लपलेले राहतील. म्हणून, कृषी क्षेत्र वाढीच्या प्रक्रियेत दोन महत्त्वाचे योगदान देते.

संक्रमणाच्या दुसऱ्या टप्प्यात, त्या श्रमशक्तीचे हस्तांतरण केले जाते ज्याची किरकोळ उत्पादकता सकारात्मक आहे परंतु स्थिर संस्थात्मक वेतन दर SQ पेक्षा कमी आहे.शेवटी, तिसऱ्या टप्प्यात, शेतीचे व्यापारीकरण होईल आणि दोन्ही क्षेत्रे श्रमशक्तीच्या OS रकमेसाठी स्पर्धा करतील.

**औद्योगिक क्षेत्राचे कामकाज–**




भाग (अ) मध्ये x-अक्षावर श्रम आहे, तर भांडवल y-अक्षावर आहे. IQ0, $IQ_1$ आणि $IQ_2$ हे आउटपुटच्या दिलेल्या पातळीसाठी L आणि K च्या विविध संयोगांचे प्रतिनिधित्व करणारे उत्पादन शक्यता वक्र आहेत. उच्च isoquant उच्च पातळीचे उत्पादन दर्शवते. OM हा OK0 शी संबंधित K Sr. चा विस्तार मार्ग आहे, जर आपण श्रमशक्तीचे $L_0$ प्रमाण लागू केले तर आपल्याला $MP_0$ वक्र (भाग (b) मध्ये) मिळेल. हे

आम्हाला सांगते की जर मजुरीचा दर OE असेल आणि $OL_0$ श्रमशक्ती लागू केली असेल, तर एकूण वेतन बिल $OExOL_0$ असेल आणि एकूण उत्पादन $OPE_0L_0$ असेल. म्हणून, एकूण अधिशेष $EPE_0$ आहे. प्रत्येक भांडवलदाराला आपला अधिशेष वाढवण्याचा मोह होतो आणि म्हणून तो हा अतिरिक्त पैसा व्यवसायात नांगरतो. यामुळे $K_1$ च्या भांडवलात वाढ होते आणि $L_1$ मधील श्रमात वाढ होते जे उच्च सीमांत उत्पादन $MP_1$ शी संबंधित होते आणि अधिशेष आणखी जास्त होईल. हा अधिशेष पुन्हा होईल. A Sr ($E_2$ पर्यंत) पासून श्रमशक्ती पूर्णपणे संपेपर्यंतच परत नांगरली जाते. यापलीकडे, कामगार शक्तीची आणखी कोणतीही रक्कम केवळ उच्च वेतन दराने उपलब्ध असेल.

**A Sr. आणि K Sr चा संवाद.–**

भाग (अ) मध्ये, SS' हा K Sr. मध्ये श्रम पुरवठा वक्र आहे आणि DL हे श्रमाचे सीमांत उत्पादन आहे. सुरुवातीला K Sr. OG च्या श्रमशक्तीचा वापर करतो आणि त्या अनुषंगाने श्रमशक्तीचा AG भाग A Sr. वरून K Sr. मध्ये हस्तांतरित होतो. G शी संबंधित, आमच्याकडे भाग (b) मध्ये F आणि J बिंदू आहेत. OX हे एकूण वेतन बिल आहे आणि OF हे A Sr मध्ये एकूण भौतिक उत्पादकता वक्र आहे. OG च्या श्रमशक्तीच्या प्रमाणात, K Sr. चे एकूण अधिशेष DSE आहे ज्याच्याशी संबंधित एकूण वेतन बिल OSEG आहे. त्यामुळे भांडवलदाराला K Sr. मध्ये DSE ची पुनर्गुंतवणूक करण्यास सांगितले जाते ज्यामुळे DL वक्र D'L' वर सरकते आणि E' हा समतोलपणाचा नवीन बिंदू आहे ज्याच्याशी संबंधित M' K Sr. साठी M' मध्ये कार्यरत आहे. श्रमशक्तीची रक्कम, OM A Sr. मधून काढून घेतली जाते ज्यामुळे MN वेतन बिल आणि NC कृषी अधिशेष होतो. आता K Sr. मध्ये श्रमशक्तीच्या M' रकमेसह K Sr. मधील एकूण अधिशेष D'SE' कडे आहे जे पुन्हा व्यवसायात गुंतवले जाईल. A Sr. वरून K Sr. कडे श्रमशक्तीच्या हस्तांतरणाची ही प्रक्रिया बिंदू "S" पर्यंत चालू राहील जिथे एकूण भौतिक उत्पादकता आणि वेतन बिल यांच्यातील अंतर कमाल आहे.

**फे–रानीस प्रतिमानची टीका–**

- बेरी आणि सोलिगो यांच्या मते फे–रानीस प्रतिमानच्या पहिल्या टप्प्यातील कृषी उत्पादन स्थिर राहणार नाही आणि ते कमी होऊ शकते, तर एफआर प्रतिमानने असे गृहीत धरले आहे की प्रारंभिक टप्प्यात कृषी क्षेत्रात एमपीएल शून्य आहे.
- या प्रतिमानवर टीका करण्यात आली आहे की कृषी क्षेत्रातील उत्पादन निश्चित करण्यात भांडवल देखील मोठी भूमिका बजावते जे फे–रानीस प्रतिमानने दुर्लक्षित केले होते ज्याने उत्पादन केवळ जमीन आणि श्रमाद्वारे निर्धारित केले जाते.
- Fei आणि Ranis प्रतिमान बंद अर्थव्यवस्था गृहित धरते म्हणून, त्यामुळे या प्रतिमानामध्ये परदेशी व्यापाराकडे दुर्लक्ष केलेले आहे असे दिसून येते.

- शेवटचे पण किमान नाही, LDC मध्ये निर्वाह शेती क्षेत्राची उत्पादकता कमी आहे ज्यामुळे औद्योगिक क्षेत्राचे स्वरूप मंदावले आहे, परंतु जोर्गेनसन यांच्या मते, ज्यांनी असा युक्तिवाद केला की आधुनिक क्षेत्राच्या सुधारणेसाठी पारंपारिक क्षेत्राला चालना द्या.

**सारांश–**

फे-रानीस (१९६१) यांनी लुईस सिद्धांताची औपचारिकता केली आणि लुईस प्रतिमानमधील पहिल्या टप्प्याचे दोन टप्प्यांत उप-विभाजन करून द्वैतवादी आर्थिक विकासाचे तीन ङ्गटप्पेफ्र परिभाषित केले.

- द्वैतवादी आर्थिक विकासाचा फे-रानीस सिद्धांत त्यामुळे आशियाई देशांप्रमाणे श्रम-अधिशेष विकसनशील अर्थव्यवस्थांच्या वाढीच्या मार्गाचा अभ्यास करण्यासाठी एक योग्य सैद्धांतिक फ्रेमवर्क प्रदान करतो.
- दुहेरी अर्थव्यवस्थेचे Fei-Ranis (FR) प्रतिमान कृषी क्षेत्रातील उत्पादकता कशी वाढली हे स्पष्ट करते. औद्योगिक क्षेत्राला चालना देण्यासाठी हे क्षेत्र उपयुक्त ठरेल.
- Fei-Ranis प्रतिमानने परकीय व्यापाराच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले कारण ते खुल्या अर्थव्यवस्थेऐवजी बंद अर्थव्यवस्था मानले जाते.

**१.३ सारांश :**

आर्थिक विकास अणि आर्थिक वृद्धी या संकल्पना एकमेकांशी मिळत्या-जुळत्या असल्या तरीही त्यामध्ये बराचसा महत्त्वाचा फरक आहे. आर्थिक वृद्धीचे निर्देशक घटक हे अतिशय महत्त्वाचे असून त्याद्वारेच त्या देशाच्या विकासाचा/वृद्धीचा दर निश्चित होतो. तसेच आर्थिक वृद्धीवर परिणाम करणारे घटकही महत्त्वपूर्ण आहेत. भांडवल, श्रम, तंत्रज्ञान, सामाजिक कल्याण अशा घटकांचा विकास झाल्याशिवाय वृद्धी घडून येत नाही. कोणत्याही अविकसीत राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रगतीसाठी या घटकांचा पुरेपूर लाभ होणे महत्त्वपूर्ण आहे.

या सर्व बाबींचा विचार करण्याबरोबरच आर्थिक वृद्धीचे जे महत्त्वाचे प्रतिमान आहेत तेही अभ्यासणे गरजेचे आहे. हेरॉड-डोमर प्रतिमान असो किंवा हिक्स यांचे तटस्थ तांत्रिक प्रगती स्पष्ट करणारे प्रतिमानही विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. रॅमसे प्रतिमान व बचतीचा सुवर्ण नियम या संकल्पना ही विकासाची योग्य दिशा दर्शवितात. ए. के. प्रतिमानाद्वारे गुंतवणूक दराचे महत्त्व स्पष्ट होते.

**१.४ पारिभाषिक शब्द :**

१ = द्विदल अर्थव्यवस्था = बाजाराधिष्ठित आणि निर्वाह अशा दोन्ही स्वरूपाची अर्थव्यवस्था.

**१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

अ = १) ब २) अ ३) ब ४) क ५) ड

ब = १) अ २) ब ३) अ ४) ब ५) क

क = १) ब २) अ ३) ड ४) ड ५) अ

ड = १) अ २) ब ३) ड

**१.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा लिहा.**

१) आर्थिक विकास-वृद्धी (फरक).

८) तटस्थ तांत्रिक प्रगती.

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) अविकसीत देशाची वैशिष्ट्ये स्पष्ट करून आर्थिक वृद्धीचे निर्देशक घटक स्पष्ट करा.

२) वृद्धीचे प्रारूप - हेरॉड - डोमर स्पष्ट करा.

३) सोलो यांचे प्रतिमान आर्थिक वृद्धीसाठी कसे महत्त्वपूर्ण आहे विशद करा.

**१.७ संदर्भ पुस्तके :**


1) R. K. LEKHI, "The Economic of Development and Planning" Kalyani Publishers, New Delhi, Noida.

2) Dr. Vijay Kakvinandan, "Economics of Development of Planning" Shree Mangesh Publishing, Nagpur.

3) Editor = Dr. J. F. Patil, "Growth & Development Economics"
वृद्धी विकासाचे अर्थशास्त्र, Phadake Publication, Kolhapur.

4) Jhinhan M. L., "The Economics of Development and Planning" Vikas Publishing House, New Delhi.

5) Higgins B., "Economic Development", ww, Nortan, New York.

6) James Tobim (1996), "Money & Economics Growth", Econometrica Vol. 33. No. 4


***

# घटक – २
# विकासाचे सिद्धांत
## (Theories of Development)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ विकासाचा सनातनवादी सिद्धांत
- २.२.२ रिकार्डोचा आर्थिक विकासाचा सिद्धांत
- २.२.३ माल्थस यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत
- २.२.४ कार्ल मार्क्स यांचा सामाजिक बदल अतिरिक्त मूल्य आणि नफ्याचा सिद्धांत
- २.२.४ रोझेन्स्टिन रोडान यांचा प्रबळ धक्का सिद्धांत
- २.२.६ गुन्नार मिर्डाल यांचा चक्रीय कार्यकारण संबंध सिद्धांत
- २.२.७ प्रो. हार्वे लायबेनस्टिन यांचा 'किमान आवश्यक प्रयत्न' आणि 'न्यून उत्पन्न समतोल सापळा' सिद्धांत
- २.२.८ समतोल वृद्धी सिद्धांत
- २.२.९ असमतोल वृद्धी सिद्धांत
- २.२.१० अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांत

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न

२.६ स्वयंअध्यन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी प्रश्न

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची कल्पना येईल.

१) विविध अर्थतज्ज्ञांनी मांडलेले आर्थिक विकासाचे सिध्दांत अभ्यासता येतील.

२) आर्थिक विकाससंबंधी सनातनवादी आर्थिक सिध्दांत समजावून घेता येतील.

३) आर्थिक विकासाच्या सिध्दांतामधील रिकार्डोचे योगदान लक्षात येतील.

४) कार्ल मार्क्सची विकासाबाबत मांडलेले सामाजिक बदल, अतिरिक्त मूल्य व नफा याविषयीची सिध्दांत लक्षात येतील.

५) उत्पादन फलन विषयक 'कॉब डग्लस' यांचे प्रतिमान समजावून घेता येईल.

६) विकसनशील देशाच्या विकास प्रक्रियेबाबत मांडलेला रोझेस्टिन रोडान यांचा प्रबळ धक्का सिध्दांत स्पष्ट होईल.

७) अविकसित देशांमधील मागासलेपणाच्या मागील कारणांची मीमांसा करणारा गुन्नार मिर्डाल यांचा 'विकासाचा चक्रिय कार्यकारण संबंध सिध्दांत' स्पष्ट करता येईल.

८) विकसनशील देशांच्या विकासामधील 'न्यून उत्पन्नाच्या समतोलाचा सापळा' आणि विकासाची प्रक्रिया गतीमान होण्यासाठीचा 'किमान आवश्यक प्रयत्न' हे सिध्दांत लक्षात येतील.

९) आर्थिक विकासाचे 'फे-रॅनिस' प्रतीमान अभ्यासता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत घटकात आपण विविध अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाविषयी मांडलेले सिध्दांत पाहणार आहोत. अर्थतज्ज्ञांच्या अभ्यासात आर्थिक विकास हा विषयक फार पूर्वीपासून असलेला दिसून येतो. विविध अर्थतज्ज्ञांनी त्या त्या कालखंडातील आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीला अनुसरुन मांडलेले सिध्दांत आजच्या परिस्थितीला कितपत लागू पडतात. त्यावर कोणत्या मर्यादा येतात याचे परीक्षण करणे गरजेचे आहे. वास्तविक पाहता आर्थिक विकास विषयक सिध्दांताच्या शास्त्रशुध्द मांडली. सनातनवादी आर्थिक विचारांपासून (Classical School and Economics) सुरुवात झाली. त्यामध्ये अॅडम स्मिथ, डेव्हीड रिकार्डो, थॉमस माल्थस इ. विचारवंतांनी आर्थिक विकास विषयक प्रश्नांचे विश्लेषण केले. येथे ही बाब देखील लक्षात घेतली पाहिजे की, सनातनवादी विचारवंताच्याही खूप आधी व्यापारवादी व निसर्गवादी विचारवंतांनी देखील याबाबत आपआपले विचार मांडलेले आहेत. मात्र ते विस्कळीत व बऱ्याच अंशी एकांगी असल्याने त्याला शास्त्रशुध्द व सैध्दांतिक बैठक नव्हती. कारण त्याचा उद्देश हा फक्त विशिष्ट विचारांच्या, तत्त्वांच्या मर्यादेत राहून देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे हा होता. या सर्व पार्श्वभूमीवर आपण प्रस्तूत घटकात सनातनवादी, समाजवादी व नव-सनातनवादी आधुनिक असे 'आर्थिक विकासविषयक सिध्दांत' अभ्यासणार आहोत.

## २.१ विषय विवेचन :

सनातनवादी विचारांमधील सनातनवादी विकास सिध्दांत, रिकार्डोचे योगदान यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. औद्योगिक क्रांतीनंतर विकासविषयक एक नवा वैचारिक दृष्टिकोन कार्ल-मार्क्सच्या रुपाने पुढे आला. त्याचा सामाजिक बदल तसेच अतिरिक्त मूल्य व नफ्यासंबंधीचा विचार महत्त्वाचा ठरतो. याशिवाय कॉब डग्लस, रोझेस्टिन रोडान, गुन्नार मिर्डाल, प्रो. हार्वे लेबेस्टग्न, के-रॅनिस यांचे आधुनिक विचार हे आर्थिक विकासावर भाष्य करणारे विचार प्रवाह सविस्तरपणे पुढीलप्रमाणे पाहूया.

### २.२.१ विकासाचा सनातनवादी सिध्दांत : (Classical Theory of Development)

#### २.२.१.१ प्रस्तावना :

आर्थिक विचारांच्या परंपरेतील 'सनातनवादी आर्थिक विचार' (Classical School of Economics) ही एक महत्त्वपूर्ण विचारधारा आहे. या संप्रदायाचा संस्थापक ॲडम स्मिथपासून डेव्हिड रिकार्डो, जॉन स्टुअर्ड मिल, थॉमस माल्थस इ. अर्थतज्ज्ञापर्यंत अनेकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या सर्व विचारवंतांनी 'आर्थिक विकासा' संबंधी मांडलेले विचार भिन्न भिन्न स्वरुपाचे असलेले दिसून येतात. मात्र आर्थिक विकासाबाबत त्यांना अभिप्रेत असलेली उद्दिष्ट्ये जवळपास एकसारखीच असलेली दिसून येतात. या उद्दिष्टांमधून सनातनवादी विचारवंतांची आर्थिक विकासाबाबत जी एक मध्यवर्ती कल्पना ध्वनीत झाली आहे. त्या मध्यवर्ती कल्पनेचाच उल्लेख सर्वसाधारणपणे सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांत (Classical Theory of Development) म्हणून ओळखली जाते.

#### २.२.१.२ सनातनवादी आर्थिक सिध्दांतातील प्रमुख बाबी :
**(Key Issues in Classical Development Theory)**

सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांत ज्या प्रमुख आर्थिक गृहीतांवर, तत्त्वांवर मांडण्यात आला. त्या प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे :

**१) आर्थिक भांडवल संचयाची मध्यवर्ती भूमिका : (Central Role of Economic Capital Accumulation)**

आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरु करुन ती गतीमान करण्याकरिता 'भांडवल संचयाची' गरज मोठ्या प्रमाणावर असल्याचे आग्रही मत सनातनवादी विचारवंतांनी मांडली अशी भांडवल संचयाची पूर्तता ही मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बचतीतून होऊ शकते. मात्र अशा बचतीकरता उत्पन्न पातळी देखील उच्च असावी लागते. त्यामुळे सनातनवाद्यांच्या मते, विकसनशील देशांमध्ये फक्त भांडवलदार व जमीनदार असे दोनच वर्ग बचत करु शकतात. उरलेले श्रमिक व कारागीर हे आपल्या 'निर्वाह पातळीएवढेच' उत्पन्न मिळवत असल्याने ते फारशी बचत करु शकत नाहीत. या कारणांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील 'भांडवल निर्मिती' त्या अनुषंगाने सनातनवादी विचारवंत भांडवलदार व जमीनदार वर्गाला महत्त्व देतात.

**२) नफ्याची घटती प्रवृत्ती : (Delining Trend of Profit)**

सनातनवादी अर्थतज्ज्ञ हे 'नफा' हा घटक गुंतवणूकीचा प्रेरक असल्याचे मानतात. कारण त्यांच्या मते, नफ्याच्या दरात वाढ झाल्यास भांडवलनिर्मितीला देखील चालना मिळते व आर्थिक विकासाची प्रक्रिया अधिक गतीमान होते. मात्र प्रत्यक्षात नफ्याच्या दरामध्ये अशी सातत्यपूर्ण वाढ होत नाही. कारण महत्तम व जास्तीत जास्त नफा प्राप्त करण्याच्या प्रेरणेतून भांडवलदारांमध्ये आपआपसात स्पर्धा सुरु होते व यातूनच नफ्याचा दर घटण्यास सुरुवात होते. ॲडम स्मिथ व रिकार्डो यांनी आपल्या विश्लेषणात, 'वेतनाचा दर व खंड यांच्यामधील होणारी वाढ ही नफ्याचा दर घटविण्यामागील' प्रमुख कारण असल्याचे प्रतिपादन केले.

**३) निर्हस्तक्षेपाचे धोरण : (Laissez Fair Policy)**

सनातनवादी विचारवंतांनी 'अर्थव्यवस्थेमध्ये पूर्ण स्पर्धेची स्थिती गाठण्याकरिता कोणत्याही सरकारच्या हस्तक्षेपाच्याशिवाय मुक्त वातावरणात वाढली पाहिजे' असे प्रतिपादन केले. सरकारची आवश्यक तेवढ्याच व महत्त्वपूर्ण कार्यावर लक्ष द्यावा. थोडेच कर आकारावेत. आर्थिक घटक, क्रिया, संस्था यांना मुक्त व खुल्या वातावरणामधये स्पर्धात्मक पध्दतीने वाढ होऊ द्याव्यात.

**४) स्थितीशील अवस्थेची मिमांसा : (Analysis of Stagnation)**

सनातनवाद्यांच्या मते, भांडवल संचयाची प्रक्रिया जेव्हा एका विशिष्ट पातळीला जाऊन पोहोचते आणि आर्थिक विकास देखील त्या त्या कमाल मर्यादेपर्यंत जाऊन पोहोचतो. तेव्हा अर्थव्यवस्था हे एका 'स्थितीशील' (Stagnation) अवस्थेत जाऊन पोहोचते. अशा वेळी अर्थव्यवस्थेची भांडवलनिर्मितीची प्रक्रिया पूर्णपणे मंदावते. परिणामी नफ्याचा दर हळूहळू घटू लागतो. नफ्याच्या दरातील घटीची तीव्रता एवढी जास्त असते की, ती शून्यापर्यंत जाऊन थांबते. वेतनाचे दर देखील निर्वाह पातळीला येऊन थांबतात. लोकसंख्या वाढ थांबते. ॲडम स्मिथच्या विश्लेषातील नैसर्गिक संसाधनांची दुर्मीळता प्रत्यक्षात येऊ लागते व सरतेशेवटी संपूर्ण अर्थव्यवस्था स्थितीशील ठरते.

**५) घटत्या सीमांत उत्पादकतेच्या नियमाची कार्यवाही : (Implementation of Law of Decreasing Marginal Productivity)**

सनातनवादी विचारवंतांच्या मते शेती क्षेत्रामध्ये दिसून येणारे घटत्या सीमांत उत्पादकतेचे तत्त्व हे अपरिहार्य असते. आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापनाद्वारे हा नियम थोडाफार पुढे ढकलता येतो अथवा त्याची परिणामकारकता कमी करता येते. मात्र तरीही हे तत्त्व आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबविण्यास कारणीभूत ठरते. हा अनुभवाधरीत नियम आहे.

पुढे थॉमस माल्थसने आपल्या लोकसंख्याविषयक विश्लेषणाद्वारे अन्नधान्याचे उत्पादन आणि लोकसंख्यावाढीचा दर यातील परस्पर सहसंबंध स्पष्ट करणाऱ्या सिध्दांताची मांडणी केली. परिणामी भांडलनिर्मितीच्या प्रक्रियेत सातत्यपूर्ण वाढ घडवून आणण्याकरिता लोकसंख्या नियंत्रणावर भर दिला गेला. लोकसंख्यावाढ व भांडवलनिर्मितीचा वेग या दोहोंमधील ऋणात्मक सहसंबंध हा घटत्या सीमांत उत्पादकतेच्या नियमामुळे अस्तित्वात येतो. या तत्त्वामुळेच शेवटी विकासाची प्रक्रिया थांबून स्थितीशील बनते. मिलच्या मते, अर्थव्यवस्थेतील

शेती क्षेत्रामध्ये तांत्रिक सुधारणांचा अभाव असताना जर भांडवलनिर्मितीच्या दरापेक्षा लोकसंख्यावाढीचा दर तर जास्त राहिला तर नफ्याचा दर घटत जातो व शेवटी विकासप्रक्रिया थांबून अर्थव्यवस्था स्थितीशील बनते. प्रो. मील यांनी मात्र या स्थितीशील अवस्थेचे स्वागत केलेले आहे. कारण त्याच्या मते, ही स्थितीशील अवस्था उत्पन्न व संपत्तीच्या अधिक समतापूर्ण वाटपासाठी योग्य असते. शिवाय या स्थितीतच कामगारांना अधिक मोबदले प्राप्त होतात. मात्र त्यासाठी त्यांना लोकसंख्या नियंत्रणाची गरजही व्यक्त केली आहे.

**२.२.१.३ सिध्दांताचे मूल्यमापन : (Critically Evaluation of Theory)**

आर्थिक विकास सिध्दांताची मांडणी त्या विचारांपासून शास्त्रीयदृष्ट्या सुरु झाली. त्या सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांताचे टिकात्मक परिक्षण पुढीलप्रमाणे :

**१) समाजाचे चक्रांचे वर्गीकरण : (Range Classification of Society)**

सनातनवादी आर्थिक विचारांमध्ये समाजाचे वर्गीकरण मुख्यत्वे भांडवलदार, जमीनदार, कामगार असे केलेले आहे व त्यामध्ये त्यांनी भांडवलदार व जमीनदार वर्गाला विकास प्रक्रियेत मानाचे स्थान दिलेले आहे व कामगार वर्गाच्या योगदानाकडे दुर्लक्ष केलेले आहे. शिवाय त्यांनी व्यापारी, व्यावसायिक, कलाकार इ. मध्यम वर्गाला दुर्लक्षीत केलेले आहे. अर्थव्यवस्था ही समाजातील विभिन्न स्तरातील वर्गाद्वारे व घटकांनी बनलेली असून ही परस्परांशी जोडलेली असते हे सनातनवाद्यांच्या लक्षात आले नाही.

**२) निर्हस्तक्षेपाचे अवास्तव गृहीतक : (Unrealistic Assumption of Laissed Fair)**

सनातनवाद्यांनी आपल्या आर्थिक विकास सिध्दांतांच्या मिमांसेमध्ये आर्थिक व्यवहारामधील पूर्ण स्पर्धा व सरकारच्या हस्तक्षेपाचा पूर्ण अभाव या दोन मुख्य पूर्व अटी सांगितल्या. मात्र त्याचे हे गृहीतक वास्तववादी नाही. कारण पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ ही विविध कारणांनी वास्तवात आढळून येत नाही हे एक आदर्श बाजारपेठेचे प्रारुप आहे. आर्थिक चलांना योग्य दिशा, गती देण्याकरिता संपत्तीला समतापूर्ण वाटण्याकरिता सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. थोडक्यात सध्याच्या 'कल्याणकारी राज्याच्या' संकल्पनेत सनातनवाद्यांचे 'निर्हस्तक्षेप निती' चे गृहीतक अवास्तव ठरले आहे.

**३) विज्ञान-तंत्रज्ञानाच्या भूमिकेकडे दुर्लक्ष : (Ignorance to the Role of Science & Technology)**

सनातनवाद्यांनी आपल्या विकास सिध्दांताची मांडणी करताना नफ्याचा रास्त दर, घटती सीमांत उत्पादकता, स्थितीशील अवस्था यांचे विवेचन करताना विज्ञानातील नवनवे शोध, तांत्रिक ज्ञानात पडत जाणारी भर याकडे दुर्लक्ष केलेले आहे. कारण विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीबरोबर उत्पादन खर्च, कच्चा माल, अंतर्गत व बाह्य बचती, व्यवस्थापन इ. फायदे मिळतात. त्यामुळे विकासाला चालना मिळत राहते.

**४) स्थितीशील अवस्थेची अवास्तव कल्पना : (Unrealistic Idea of Stagnation)**

सनातनवादी विकास सिध्दांतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा शेवट हा स्थितीशील अवस्थेत होईल असे भाकीत केलेले आहे. त्यांनी हा निष्कर्ष घटत्या सीमांत उत्पादकतेच्या नियमाच्या आधारे केलेली होती

व त्याला माल्थसच्या लोकसंख्या सिध्दांताची जोड दिली होती. मात्र आजच्या प्रगत तांत्रिक युगामध्ये घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम प्रभावहीन होत आहे. तसेच माल्थसचे 'लोकसंख्याविषयक सिध्दांत' देखील खरा ठरलेला नाही. अर्थअवस्थेचा आर्थिक चढ-उतारातून जातात. मात्र त्या स्थितीशील नसतात.

**५) वेतन व नफ्याची चुकांची कल्पना : (Wrong Idea of Wage & Profit)**

सनातनवादी विचारवंतांनी आपल्या सिध्दांतांत नफा व वेतन हे आर्थिक विकासाच्या वाढीबरोबर घटत जाईल असे प्रतिपादन केले. मात्र नफ्याचा व वेतनाचा दर हे सातत्याने वाढत राहिल्याचाच अनुभव आहे, कारण हे दोन्ही घटक वाढ त्या आर्थिक विकासाचे निदर्शक घटक आहेत.

**६) आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे अवास्तव विश्लेषण : (Unrealistic Analysis of Process of Economic Development)**

आपल्या विकास सिध्दांतामध्ये सनातनवाद्यांची आर्थिक विकास प्रक्रियेचे ते विश्लेषण केलेले आहे. ते वास्तवाला धरुन नाही. त्यांच्या मते भांडवलनिर्मिती हा एकमेव मुख्य असा विकासाचा घटक आहे. शिवाय आर्थिक विकासाबरोबर नफा घटत जाऊन ती शून्य होतो. वेतनदर निर्वाहपातळीला स्थिरावतात. शेवटी अर्थव्यवस्था स्थैतिक बनते. मात्र वास्तवात तर आर्थिक विकासाची प्रक्रिया ही सातत्यपूर्ण व स्थिर दराने वाढत जात राहणारी असते.

**२.२.१.४) समारोप : (Summary)**

अशाप्रकारे सनातनवादी विकास प्रतिमानावर वरील विविध टिका होत असल्या, त्यात कालसापेक्ष, काही उणिवा नसतील तरीदेखील आर्थिक विकास सिध्दांत मांडणीतील त्यांचे महत्त्व आजही महत्त्वपूर्ण आहे. कारण नफ्याच्या दरातील वाढ गुंतवणूकीमध्येही वाढ घडवून आणते. यातून अस्तित्वातील भांडवलाच्या साठ्यात वाढ होते. या सर्वांचा परिणाम म्हणून उत्पादन तंत्रामध्ये देखील सुधारणा घडून येतात. भांडवल संचय जसजसा वाढत जातो. तसतसा वेतनविधी देखील वाढत जातो. परिणामी वेतनाचे दर देखील वाढू लागतात. यातून राहणीमानाचा दर्जा सुधारत जाऊन लोकसंख्यावाढ होऊ लागते. वाढती लोकसंख्या अन्नधान्याच्या मागणीत वाढ घडवून आणाते. ही वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्याकरिता अधिक श्रम, कच्चा माल, आधुनिक तंत्रज्ञान यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करुन उत्पादनात वाढ घडवून आणली जाते. मात्र शेती क्षेत्रात 'घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम' लागू होते. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून वेतन व खंडाचे दर वाढतात. क्रमशः नफ्याचा दर घटू लागतो व अर्थव्यवस्था स्थैतिक होते.

आर्थिक विकास सिध्दांत मांडणाऱ्या प्रारंभीच्या काळात सनातनवाद्यांची केलेले वरील विवेचन मुलभूत स्वरुपाचे होते यात शंका नाही.

### २.२.२ डेव्हिड रिकार्डोचा आर्थिक विकासाचा सिध्दांत : (David Ricardos Theory of Economic Development)

#### २.२.२.१ प्रस्तावना :

आर्थिक विकास सिध्दांतांची मांडणी सनातनवादी आर्थिक विचारवंतामध्ये जरी ॲडम स्मिथपासून होत असली तरी आर्थिक विकास सिध्दांतांच्या शास्त्रशुध्द विश्लेषणाचा पाया याच्यामध्ये 'डेव्हिड रिकार्डो' यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. त्याने आपल्या सन १८१७ साली लिहीलेल्या Principles of Political Economy and Taxation या ग्रंथात आपले आर्थिक विकासविषयक विचार मांडले आहेत. रिकार्डो हा जरी अर्थतज्ज्ञ असला तरी व्यवसायाने तो बँकर असल्याने त्याचे विचार बरेच व्यावहारीक व वास्तवदर्शी होते. आपल्या विचारांना अनुभवांची जोड दिल्याने त्याचे विचार हे प्रभावी ठरले. रिकार्डोचे नाव जरी त्याच्या खंडविषयक सिध्दांतासाठी प्रसिध्द असले तरी आपण प्रस्तुत घटकात त्याच्या आर्थिक विकासाविषयक सिध्दांतांचा अभ्यास करणार आहोत.

#### २.२.२.२ उत्पादन फलन : (Production Function)

रिकार्डोने देखील ॲडम स्मिथ प्रमाणेच आपल्या विश्लेषणात उत्पादन फलनाचे मुख्य तीन घटक गृहीत धरलेले आहेत. १. भूमी (Land) २. श्रम (Labour) ३ भांडवल (Capital)

ॲडम स्मिथची तुलना करता असे आढळून येते की, रिकार्डोने आपल्या विवेचनामध्ये पुढील दोन बाबींचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. त्या अशा १) घटत्या सीमांत उत्पादकतेचे तत्त्व २) उत्पादन प्रक्रियेतल नव्या तांत्रिक सुधारणा.

या दोन बाबींच्या सह अस्तित्वाद्वारे रिकार्डोने हे दाखवून दिले की, जरी उत्पादन प्रक्रियेत 'घटत्या सीमांत उत्पादकतेच्या नियमा' चे अस्तित्व अपरिहार्य असले तरी ज्ञान-विज्ञानातील व तंत्रज्ञानातील प्रगतीबरोबर ही घटत्या फलाची प्रवृत्ती काही काळ थोपविणे शक्य आहे. तिची परिणामकारकता कमी करुन तिला पुढे ढकलता येईल. मात्र रिकार्डो याची मर्यादाही सांगतो. तांत्रिक ज्ञानाचा हा प्रभाव अल्पकालीन असेल. कारण दिर्घकाळाचा विचार करता, 'घटते उत्पादन फल' लागू होणे क्रमप्राप्त असणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर उत्पादन फलनाची रिकार्डोने केलेली मांडणी पुढीलप्रमाणे -

$P = f(C, L, W, T)$

P = Production Function (उत्पादन फलन)

f = Functional Correlation (तांत्रिक सहसंबंध)

C = Capital (भांडवल)

L = Land (जमीन)

W = Workers (कामगार)

L = Technology (तंत्रज्ञान)

वरील चार उत्पादन घटकांपैकी भूमी = Land, श्रम = Labour, भांडवल = Capital हे तीन घटक रिकार्डोचे स्मिथच्या विश्लेषणातून घेतले व तंत्रज्ञान Technology या चौथ्या घटकाची त्यात भर घातली.

### २.२.२.३ सिध्दांतांची गृहीते : (Assumption of Theory)

डेव्हिड रिकार्डो यांची सनातनवाद्यांच्या वैचारिक चौकटीमध्ये पुढील गृहीतांच्या आधारे आपल्या विकास विषयक सिध्दांतांची मांडणी केली.

१. नफ्याच्या प्रेरणेतून भांडवलाची निर्मिती होते.

२. अर्थव्यवस्था पूर्ण स्पर्धेत कार्यरत असते.

३. जमिनीचा पुरेपुर वापर शेती उत्पादनासाठी केला जातो.

४. जमिनीच्या वापराला घटत्या सीमांत उत्पादकतेचे तत्त्व लागू होते.

५. जमिनीचा वापर मुख्यत्वे अन्नधान्य उत्पादनासाठी होतो.

६. जमिनीचा पुरवठा मर्यादित असतो.

७. अन्नधान्यासाठीची मागणी ही संपूर्णपणे अलवचिक असते.

८. श्रम व भांडवल हे उत्पादन कार्यातील बदलते घटक आहेत.

९. भांडवल हे एकजिनसी स्वरूपाचे असते.

१०. श्रमिकांना त्यांचा निर्वाह पातळीएवढे वेतन दिले जाते.

११. उत्पादनाच्या तंत्रात फारसे बदल होत नाहीत.

१२. श्रमाची दिलेली पुरवठा किंमत ही स्थिर असते.

१३. श्रमाची मागणी ही भांडवल संचयाच्या दरावर ठरते.

१४. श्रमाची मागणी किंमत व पुरवठा किंमत या स्वतंत्र असतात.

१५. श्रमाचा मागणी-पुरवठा हा त्यांच्या सीमांत उत्पादकतेशी संबंधीत असतो.

### २.२.२.४ अर्थव्यवस्थेतील मुख्य गट आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप : (Main Groups in the Economy and Distribution of National Income)

डेव्हिड रिकार्डोनी विकास प्रक्रियेचे विश्लेषण करताना भांडवलदार वर्ग, जमीनदार वर्ग आणि श्रमिक या तीन समाजातील मुख्य तीन गटांना महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. आपले विचार रिकार्डो एका उदाहरणाद्वारे मांडतात. संपूर्ण अर्थव्यवस्था ही एखाद्या स्थिर स्वरूपाचा पुरवठा असणाऱ्या शेतजमिनीसारखी आहे असे मानून या शेतजमिनीतून उत्पादन घेण्यासाठी भांडवलाचे व श्रमाचे एकजिनसी एकक वापरात आणले जातात. अशा प्रकारे एकूण मिळणारे राष्ट्रीय उत्पन्न हे जमिनदार, भांडवलदार व श्रमिकांमध्ये विभागले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचे त्यांच्यातील हे विभाजन खंड, नफा व वेतन या स्वरूपात विभागले जाते.

**अ) जमीनदार वर्ग :** अशा प्रकारे रिकार्डोने राष्ट्रीय उत्पन्नातील समाजाच्या प्रत्येक घटकाचा विशिष्ट हिस्सा ठरलेला असतो हे दाखवून दिले. मात्र जमिनीचा पुरवठा हा सर्वत्र स्थिर असतो. आर्थिक विकासाबरोबर लोकसंख्या वाढत जाऊन अन्नधान्याची मागणी देखील वाढते ही मागणी पूर्ण करण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात सुपीक जमीन लागवडीखाली आणली जाते. परिणामी सुपीक जमीन दुर्मिळ होते. त्यामुळे पुढे पुढे 'कमी सुपीक जमीन' लागवडीखाली आणावी लागते. एका बाजूला शेतजमिनीच्या सुपीकतेतील गुणभेदामुळे व दुसरीकडे घटत्या सीमांत उत्पादकतेच्या तत्त्वामुळे शेतातील सीमांत उत्पादनाचा दरही घटत जातो. उत्पादकांमध्ये सुपीक जमिनीसाठी चढाओढ सुरु होते. परिणामी अशा सुपीक जमिनीची मालकी असणाऱ्या जमीनदार वर्गाला एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील जास्त वाटा मिळतो.

**ब) भांडवलदार वर्ग :** राष्ट्रीय उत्पन्न वाटपातील समाजामधील दुसरा महत्त्वाचा गट म्हणजे जमीनदार वर्ग होय. भांडवलदार वर्ग हा नेहमी अशा गुंतवणूक संधी या शोधात असतात. जिथे त्यांना त्यांच्या भांडवली गुंतवणूकीपासून जास्तीत जास्त नफा मिळेल. या चढाओढीतूनच भांडवलदार वर्गामधील गळेकापू स्पर्धेला सुरुवात होते. यातूनच विविध क्षेत्रातील नफ्याची दराची प्रवृत्ती समान राहण्यास मदत होते. भांडवलदार त्यांच्या गुंतवणुकीपासून प्राप्त होणारा नफा पुन्हा अर्थव्यवस्थेत गुंतवीत राहतात व अशाप्रकारे या भांडवलदार वर्गाकडून अर्थव्यवस्थेतील भांडवल संचयाचे काम होत राहते.

**क) श्रमीक वर्ग :** अर्थव्यवस्थेच्या एकूणच उत्पादन कार्यातील तिसरा व तितकाच महत्त्वपूर्ण घटक म्हणजे 'श्रमीक वर्ग' हो. श्रमिक वर्गाला त्यांच्या निर्वाह पातळीएवढे वेतन दिले जाते. वेतननिधी या आधारावर असे वेतन श्रमीकांना दिले जाते. त्यामुळे एकूण वेतननिधीला जेव्हा आपण एकूण श्रमशक्तीने आणतो तेव्हा आपल्याला वेतनाचा दर काय असेल ते कळते. समजा जर वेतननिधीत वाढ होऊन निर्वाह पातळीपेक्षा वेतन दर जास्त झाला तर श्रमाचा पुरवठा वाढतो आणि याउलट जर वेतननिधी घटून निर्वाह पातळीपेक्षा वेतनाचा दर जर अल्प राहीला तर श्रमाचा पुरवठा घटतो.

### २.२.२.५ नैसर्गिक साधनसंपत्ती व मनुष्यबळ वेतनदर : (National Resources and Manpower Wage Rate)

रिकार्डोने आपल्या विवेचनात 'भूमी' (Land) या शब्दाचा अर्थ हा जमिनीपुरताचा मर्यादितपणे गृहीत धरलेला होता. त्याच्या मते 'भूमी म्हणजे जमिनीची उपजत व अविनाशी शक्ती होय'. (Original and industructible powers of the soil") रिकार्डो पुढे म्हणतो की, याशिवाय या जमिनीचा पुरवठा हा स्थिर म्हणजे 'Fixed' असा असतो.

रिकार्डोच्या लोकसंख्याविषयक सिध्दांतावर बऱ्याच अंशी ॲडम स्मिथचा प्रभाव असल्याचे दिसून येते. स्मिथप्रमाणेच रिकार्डोनेही वेतनाचे दोन दर गृहीत धरलेले होते. ते पुढीलपमाणे :

**१. प्रत्यक्ष वेतन दर : (Market Wage Rate)**

**२. नैसर्गिक वेतन दर : (Natural Wage Rate)**

नैसर्गिक वेतनाचा दर म्हणजेच असा वेतनदर ज्या दराला तो कामगार आपल्या कुटुंबासह निर्वाह

पातळीइतके जीवन जगू शकेल व त्याचा वंशही टिकू व वाढू शकेल. रिकार्डोच्या मते, या प्रक्रियेत लोकसंख्येतील वाढ किंवा घट अपेक्षीत नसते. मात्र ज्यावेळी वेतनाचा 'बाजारदर' हा त्याच्या 'नैसर्गिक दरा' पेक्षा जास्त वाढू लागतो. त्यावेळी लोकसंख्येच्या दरातही वाढ होऊ लागते. याउलट परिस्थितीत वेतनाचा बाजार दर हा नैसर्गिक दरापेक्षा घटू लागतो. तेव्हा लोकसंख्येतही घट होत जाते असे गृहीत धरु की, एका विशिष्ट कालखंडाला वेतनाचा बाजार दर 'ब' एवढा आहे. तर वेतनाचा बाजार दर ब१ एवढा आहे व त्याच काळातील विशिष्ट अशी कमाल लोकसंख्या ही 'ब' एवढी आहे. ॲडम स्मिथने आपल्या लोकसंख्याविषयक सिध्दांतात रिकार्डोप्रमाणे अशी कमाल मर्यादा घातली नव्हती. स्मिथ आणि रिकार्डोच्या विवेचनातील आणखी एक फरक म्हणजे स्मिथने आपल्या संपूर्ण विवेचनामध्ये निर्वाह वेतनाची पातळी ही स्थिर ठेवली होती. रिकार्डोने मात्र हा निर्वाह पातळीचा नैसर्गिक वेतन दर आर्थिक, सामाजिक सुधारणांसोबत बदलत असल्याचे सांगितले आहे. स्मिथने आपल्या सिध्दांतात, 'लोकसंख्येत वाढ' ही निर्वाह वेतन दर व बाजार वेतनदर या दोन्हीमधील प्रमाणबध्द (Proportional) अशा फरकावर अवलंबून असते. मात्र रिकार्डोच्या मते, लोकसंख्येतील वाढ ही या दोन वेतनदरांच्या 'फलनात्मक सहसंबंधातील' (Functional related) अशा फरकावर अवलंबून असते. जेव्हा श्रमाची मागणी ही लोकसंख्येतील वाढीच्या दरापेक्षा जास्त असते तेव्हा वेतनाचा बाजार दर वाढत जाऊन तो बराच काळ स्थिर राहतो. नव्या वसाहती स्थापन करताना असे अनुभव येताना रिकार्डोने पाहिले होते. शेतजमिनी ज्या प्रारंभीच्या काळात लागवडीसाठी निवडल्या जात त्या अधिक सुपीक व उत्पादक असत. येथे उत्पादन कार्यासाठी भांडवलाची उपलब्धता जरी मोठ्या प्रमाणावर असली तरी श्रमाचा पुरवठा हा ताठर राहतो. त्यामुळे त्याचे बाजारदर हे उच्च राहण्याची प्रवृत्ती असते.

ॲडम स्मिथ त्याचा निर्वाह वेतन असा उल्लेख करतो. रिकार्डो त्यालाच नैसर्गिक वेतन असे म्हणतो. मात्र रिकार्डोने दिलेला नैसर्गिक वेतनाचा दर हा स्मिथच्या निर्वाह पातळीच्या वेतन दरासारखा स्थिर नसून तो देश काल स्थितीसापेक्ष बदलता असतो. त्याची मुख्य दोन कारणे रिकार्डोनी सांगितलेली आहेत.

अ) कृषीक्षेत्रातील घटत्या सीमांत उत्पादन फलाचा सिध्दांत (Law of Diminishing Marginal Returns)
ब) प्रचलीत सामाजिक व सांस्कृतीक पातळी

रिकार्डोच्या मते, जेव्हा शेती क्षेत्रात घटत्या सीमांत उत्पादन फलाचा नियम प्रत्ययाला येतो तेव्हा श्रमीकांना पूर्वीच्याच निर्वाह पातळी एवढे उत्पन्न मिळविण्याकरिता जास्त श्रम करावे लागतात. थोडक्यात यातून उत्पादनाचा वास्तव व्यय (Real Cost) वाढतो व यातून वेतन दरही वाढू लागतात.

**वेतनदरातील बदलाचे स्वरूप : (Nature of Changing in Wage)**

रिकार्डोच्या मते वेतनाचा दर हा विशिष्ट काळामध्ये श्रमाला असणारी मागणी व त्यासाठीचा उपलब्ध श्रमाचा पुरवठा यावरुन ठरतो. समजा श्रमाची मागणी 'अप' एवढी अहे व श्रमाचा पुरवठा हा 'अस' एवढा आहे व बाजार वेतन दर हा 'म' एवढा आहे. अशावेळी जर श्रमाची मागणी 'अप' ही जर श्रमाचा पुरवठा 'अस' पेक्षा जास्त असेल तर वेतनाचा दर 'म' वाढत जातो. याउलट जर श्रमाची मागणी 'अप' या श्रमाच्या पुरवठ्यापेक्षा जास्त असेल तर वेतनदर 'य' हा अल्प राहील. जर श्रमाची मागणी 'अप' व पुरवठा 'अस' दोन्ही

समान असतात तेव्हा वेतनाचा दर 'म' स्थिरावतो.

रिकार्डोच्या मते, वस्तू व सेवांच्या किंमती, जशा मागणी-पुरवठयावरुन ठरतात. त्याप्रमाणे मजूरीचे दर देखील त्यांच्या मागणी पुरवठ्यावरुनच ठरतात. मात्र दिर्घकाळामध्ये जेव्हा नैसर्गिक वेतन दर वाढतात. तेव्हा तेवढ्याच प्रमाणात नफ्याचा दर घटतो व परिणामी आर्थिक विकास दर देखील घटतो. यामुळे नैसर्गिक वेतन दरामध्ये देखील वाढ होते की जी हितावह नसते. यासाठी शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन वेतनदर उच्च ठेवावे लागतात. त्यायोगे काही काळ का होईना 'घटत्या उत्पादन फलाचा नियम' पुढे ढकलता येईल. मात्र हा उपाय अल्पकालीन असतो. कारण तांत्रिक सुधारणा जरी झाली व त्यातून उत्पादन वाढ घडून आली तरी सातत्याने वाढत जाणारी लोकसंख्या या उत्पादन वाढीला पुरी ठरत नाही. त्यामुळे नैसर्गिक वेतनाचे दर वाढतच राहतात.

### २.२.२.६ भांडवल संचय : (Capital Accumulation)

रिकार्डोने आपला 'भांडवल संचय' बाबतीत आपले विचार पुढीलप्रमाणे मांडले.

रिकार्डोच्या मते, भांडवलाचे दोन प्रकार असतात -

१. स्थिर भांडवल : (Fixed Capital)

२. खेळते भांडवल : (Circulating Capital)

स्थिर भांडवल या संकल्पनेमध्ये इमारत, यंत्रसामग्री, कच्चा माल, अन्न, वस्त्र इ. चा समावेश होतो. तर 'खेळते भांडवल' म्हणजे 'वेतन निधी' होय. वेतननिधी हा स्थिर स्वरूपाच्या भांडवलातील वाढीबरोबर वाढत जाणारा असतो. सधन भांडवल गुंतवणूक करण्यासाठी व नव्या तंत्रज्ञानाच्या वापर करण्यासाठी वेतन निधीत फरक पडत जाते. श्रमाची मागणी ही वेतन निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. म्हणजेच वेतन निधीत जर वाढ झली तर श्रमाची मागणी वाढते व वेतन निधी घटला तर श्रमाची मागणी घटते. मात्र वेतन निधी हा अर्थव्यवस्थेतील एकूण उपलब्ध भांडवली साठ्यावर अवलंबून असतो. थोडक्यात अर्थव्यवस्थेतील श्रमाची एकूण मागणी ही त्या अर्थव्यवस्थेतील एकूण भांडवल संचयावर ठरते.

**भांडवल संचयाची प्रक्रिया :**

रिकार्डोने भांडवल संचयाचे दोन प्रकार सांगितले.

१) उत्पन्नातील बचतीतून होणारा भांडवल संचय

२) उपभोग खर्चातील कपातीतून होणारा भांडवल संचय

रिकार्डोच्या मते, समाजात होणारी संपूर्ण बचत ही गुंतवणूक कार्यासाठी वापरली जाते. या बचत आणि गुंतवणूक प्रक्रियेवर साठेबाजीचा कोणताही परिणाम होत नाही. समाजाची बचत क्षमता आणि इच्छा या दोन घटकांवर भांडवल निर्मितीचा दर अवलंबून असतो. एखाद्या देशाची बचत प्रवृत्ती ही त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील जो हिस्सा श्रमशक्तीला निर्वाह पातळीवरील वेतनावर ठेवण्यासाठी वापरला जातो. तो वजा

केल्यानंतर उरलेल्या भागावरुन ठरत असतो. या उरलेल्या भागाला रिकार्डो निव्वळ उत्पन्न असे म्हणतात. हे निव्वळ उत्पन्न जेवढे जास्त तेवढी बचतीची प्रवृत्ती जास्त. यासाठी रिकार्डोनी पावाच्या तुकड्याचे उदाहरण दिलेले आहे. रिकार्डो म्हणतो,'जर माझ्याकडे पावाचे दोन तुकडे असतील तर मी एकाचा उपभोग घेईन व दुसरा बचत करुन ठेवीन. परंतु जर माझ्याकडे पावाचे चार तुकडे असतील तर मी एकाचाच उपभोग घेईन व उरलेल्या तीनची बचत करीन. या उदाहरणावरुन रिकार्डोला हीच बाब सांगावयाची आहे की जर 'निव्वळ आधिक्य' जास्त असेल तर बचतीची प्रवृत्ती देखील जास्त राहील. मात्र ही बचतीची इच्छा भांडवलदार व जमीनदार वर्गाल तेव्हाच होते, जेव्हा नफ्याचा दर जास्त असतो. थोडक्यात नफ्याचे दर जसजसे वाढत जातात तसतसे भांडवलनिर्मितीला चालना मिळते. पण जर नफ्याचे दर जर घटू लागले तर भांडवल संचय व बचतीची प्रक्रिया थांबते. कारण नफ्याचा हा घटलेला दर एवढा अल्प असतो की ह्याद्वारे भांडवल गुंतवणूकीचा खर्च देखील भरुन निघत नाही.

रिकार्डोने दिलेल्या 'भांडवल संचय' व 'नफ्याचा दर' या प्रक्रिया पुढीलप्रमाणे सांगता येतील.

निव्वळ उत्पन्न = राष्ट्रीय उत्पन्न - निर्वाह वेतन दर X कामगारांची संख्या

NP = (NI - CV X L) ...... 1

NP = निव्वळ उत्पन्न

NI = राष्ट्रीय उत्पन्न

CV = निर्वाह वेतन दर

L = कामगारांची संख्या

शुध्द नफ्याचा दर = प्रत्यक्ष नफा दर - एक सामान्य किमान दर

NP = (RP - RR) ...... 2

NP = शुध्द नफा दर

RP = प्रत्यक्ष नफा दर

RR = धोका पत्करण्याचा किमान दर


वरील समीकरणांच्या आधारे रिकार्डोने हे सिध्द केले आहे कि, शुध्द नफ्याचा दर जेवढा जास्त तेवढा बचत व गुंतवणुकीच्या इच्छा जास्त राहतील. याउलट जर शुध्द नफा दर व निव्वळ उत्पन्न यामध्ये जर अंतर जास्त राहिले तर बचत वा गुंतवणुकीची इच्छा कमीत कमी राहील. अशा प्रकारे रिकार्डोने भांडवल निर्मितीमध्ये प्रमुख दोन अडथळे आहेत. अतिशय अल्प असा नफ्याचा दर आणि दुसरा म्हणजे आणि निव्वळ उत्पन्नाचा अल्प दर.

### २.२.२.७ भांडवल संचयाची गतीशील प्रक्रिया : (Dynamic Nature of Capital Accumulation)

रिकार्डोने आपल्या गतीशील अर्थव्यवस्थेचे प्रारुप वर्णन करताना निव्वळ उत्पन्न वाढीबरोबर मिळणाऱ्या नफ्याच्या दराला खूप महत्त्व दिलेले आहे. रिकार्डोने आपल्या विकास सिध्दांतामध्ये 'नफा' (Profit) आणि वेतन (Wage) या दोहोंचाही समावेश केलेला आहे व याबाबत तो असे म्हणतो की, जेव्हा वेतन वाढते तेव्हा नफा घटतो व जेव्हा नफ्याचा वाटा वाढतो तेव्हा वेतन घटते. शिवाय त्याच्या खंडविषयक सिध्दांतांत त्याने सांगितल्याप्रमाणे सीमांत जमीन ही खंडविरहीत असल्यामुळे उत्पादनाचे भांडवल व श्रम असे दोनच घटक उरतात व या दोहोंपैकी एकाचा मोबदला वाढला की दुसऱ्याचा कमी होतो.

रिकार्डोच्या मते, दिर्घकाळात जर भांडवल व श्रमाची वाढ स्थिर दराने होत राहिली तर नफ्याच्या दरात होणारे बदल हे निर्वाह वेतन पातळीच्या दरात होणाऱ्या बदलावर अवलंबून राहतील.पण दिर्घकाळात निर्वाह वेतन पातळीचे दर हे वाढत जातात. त्यामुळे नफ्याचा दर हा घटता राहतो मात्र दुसरीकडे जसजशी तांत्रिक प्रगती होत जाते तसतसा घटत्या फलाचा नियम थोडा काळ तरी लांबणीवर पडतो व एकूण उत्पादनातील निर्वाह क्षेत्राचा वाटा घटू लागतो. कारण आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादनात वाढ घडून येते. मात्र दिर्घकाळात घटत्या फलाचा नियम पुन्हा प्रभावी ठरतो व नफ्याच्या दरात घट घडून येते. यातून भांडवल निर्मितीची प्रक्रिया संघ होत जाते. दिर्घकाळात पुन्हा लोकसंख्यावाढ घडून येते व अतिशय निकृष्ट जमीन देखील लागवडीखाली आणली जाते. यातून सीमांत जमिनीवर मिळणारा नफ्याचा दर हा किमान पातळीवर येतो. यालाच रिकार्डो अर्थव्यवस्थेची 'स्थितीशिल अवस्था (Stationary State)' असे म्हणतो. कारण या स्थितीत भांडवल संचयाची प्रक्रिया स्थिरावते. रिकार्डोने वर्णन केलेली ही स्थितीशील अर्थव्यवस्था आकृतीद्वारे पुढीलप्रमाणे दर्शविलेली आहे.

**आकृती क्र. २.१ : स्थितीशील अर्थव्यवस्था**



आकृतीमध्ये, OX अक्ष = कालावधी (वर्ष)

OY अक्ष = भांडवल गुंतवणुकीचे दर (%)

आकृतीमध्ये R पासून L पर्यंत अर्थव्यवस्था ही स्थितीशील असल्याचे दिसते. प्रत्येक देशाची ही स्थितीशील अवस्था वेगवेगळी असते कारण प्रत्येक देशातील निर्वाह वेतन पातळीचा दर हा भिन्न असतो. हा दर त्या त्या देशातील सामाजिक व सांस्कृतिक स्थितीवर ठरतो. त्यासाठी रिकार्डो 'अ' व 'ब' अशा दोन देशांची तुलना करतो. समजा 'अ' व 'ब' असे दोन वेगवेगळे देश आहेत व त्यापैकी 'अ' देशातील वेतनाची निर्वाह पातळी 'ब' पेक्षा जास्त आहे. अशावेळी 'अ' देशातील श्रमीकांचा राहणीमानाचा दर्जा 'ब' देशातील श्रमिकांपेक्षा जास्त चांगला असेल. शिवाय 'अ' देशातील लोकसंख्या 'ब' देशापेक्षा कमी असेल हे दोन्ही देश जरी स्थितीशील अवस्थेत असले तरी 'अ' देशातील श्रमिक हे 'ब' देशातील श्रमिकांपेक्षा अधिक सुखी व समाधानी असतील.

### २.२.२.८ आर्थिक विकासाची प्रक्रिया : (Process of Economic Development)

रिकार्डोने आर्थिक विकास विषयक त्या अनेक संकल्पना व सिध्दांत मांडले त्या आधारे ही गतीशील आर्थिक विकासाची प्रक्रिया कशी चालते. त्यामध्ये कोणकोणते घटक महत्त्वाचे असतात ते पाहणे महत्त्वाचे आहे.

रिकार्डोच्या मते, प्रत्येक अर्थव्यवस्था ही स्थितीशील अवस्थेकडे (Stationary State) मार्गक्रमण करत असते. या अवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. या अवस्थेत लोकसंख्या दर स्थिर असतो.

२. भांडवल निर्मितीची प्रक्रिया मंदावलेली असते.

३. नफ्याचा दर हा किमान पातळीवर आलेला असतो.

मात्र ही स्थितीशीलता फार काळ टिकत नाही. कारण दरम्यानच्या काळात काही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैज्ञानिक या तांत्रिक बदलांमुळे संतुलन व असंतुलन अवस्था येत-जात राहतात.

समजा, अर्थव्यवस्थेतील निव्वळ उत्पन्नाच्या दरात वाढ झाली व नफ्याच्या दरामध्ये कमाल वाढ झाली. तर साहजिकच भांडवलदार वर्ग आपल्या नफ्याचा फार मोठा हिस्सा हा पुन्हा गुंतवतील व त्यातून श्रमाची मागणी वाढू लागेल. ही मागणी तिच्या पुरवठ्यापेक्षा जास्त राहिली तर वेतनाचे दर वाढत जाऊन ते निर्वाह पातळीपेक्षा जास्त राहतील, अशा वेतनवाढीमुळे लोकसंख्या वाढीचा दर देखील वाढू लागेल. या लोकसंख्या वाढीमुळे श्रमाचा पुरवठा तिच्या मागणीपेक्षा जास्त राहील. परिणामी वेतनाचे दर कमी होत होत ते 'निर्वाह पातळी' एवढे होतील. तंत्रज्ञानातील प्रगतीचे व प्रक्रियेला गती मिळून वेतनाचे दर निर्वाह पातळीच्या खाली जातील. यातून निव्वळ उत्पन्नात वाढ होईल व भांडवलदारांना नव्या गुंतवणुकीसाठी प्रेरणा मिळेल. हे चक्र असेच सातत्याने सुरु राहील.

रिकार्डोने वर्णन केलेल्या आर्थिक विकास प्रक्रियेत काही अडथळे निर्माण होऊन असंतुलन अवस्था

देखील येत असतात. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीद्वारे मानव घटत्या फलाची प्रवृत्ती कमी करु शकतात. सधन व विस्तृत अशा दोन्ही पध्दतींचा वापर करुन देश-काल-परिस्थितीनुसार कृषीची उत्पादकता वाढविली जाते. यामुळे भांडवलदारांचा नफा बराच काळा वाढता राहतो. भांडवल गुंतवणुकीचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षाही जास्त राहतो. परिणामी वेतनाचे दर हे निर्वाह वेतन पातळीपेक्षा जास्त राहण्याची प्रवृत्ती असते. आता या सर्व प्रक्रियेचा शेवट नेमका कसा होतो. तर जोपर्यंत उत्पादन कार्यात आवश्यक असलेले नवे तंत्रज्ञान हे किफायतशीर ठरत असते. तोपर्यंतच ही प्रक्रिया चालते. उत्पादन तंत्र जसजसे जुने होते तोटा वाढू लागतो तसतसा घटत्या फलाचा नियम पुन्हा कार्यान्वीत होतो व अर्थव्यवस्था स्थितीशील बनते.

**२.२.२.९ अविकसीत अर्थव्यवस्था : (Undeveloped Economics)**

रिकार्डोने जगातील अविकसीत देशांची वर्गवारी पुढील दोन गटांमध्ये केलेली आहे.

**अ) अविकसीत अर्थव्यवस्था : (Undeveloped Economics)**

अशा देशांमध्ये मुबलक प्रमाणात सुपीक जमीन उपलब्ध असते. मात्र त्या देशातील नागरिक हे अत्यंत अज्ञानी, युध्दखोर असल्यामुळे त्यांना सतत युध्द, दुष्काळ इ. संकटांचा सामना करावा लागत असे. अशा देशातील लोकांना त्यांच्या निर्वाह पातळीपेक्षाही कमी वेतन मिळतो.

**ब) अतिलोकसंख्येची अविकसीत अर्थव्यवस्था : (Over Populated Undeveloped Economics)**

या देशांमध्ये अनेक वर्षापासून नागरी वसाहती स्थापन झालेल्या असतात. मात्र वर्षानुवर्षे सातत्याने जमिनीचा उत्पादन कार्यासाठी अतिवापर केला गेल्यामुळे अशा अर्थव्यवस्थेला 'घटत्या उत्पादन फलाच्या' नियमाला तोंड द्यावे लागते. हे देश अति लोकसंख्येच्या दबावाखाली असतात.

वरील दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थांमधील विकासातील मुलभूत आर्थिक समस्या सोडविण्यासाठी रिकार्डोने काही उपाय सुचविले आहेत. पहिल्या प्रकारच्या अविकसीत अर्थव्यवस्थेमध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेली सुपीक जमीन जास्तीत जास्त लागवडीखाली आणून त्याद्वारे उत्पादनवाढ घडवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा घवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. संस्थात्मक रचना बळकट करावी लागेल. न्याय, शांतता, सुरक्षितता व सुव्यवस्था आणावी लागेल. शिक्षण, आरोग्य, वाहतुक, दळणवळण इ. सोयीची निर्मिती केली जावी. विज्ञान, तंत्रज्ञान यांचा विकास करायला हवा. तर दुसरी जी अर्थव्यवस्था आहे. तिच्यातील प्रश्न सोडविण्यासाठी रिकार्डो एकमेव उपाय सुचवतात ते म्हणजे 'वाढत्या लोकसंख्येचे नियंत्रण'.

**२.२.३ माल्थस यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत**

**प्रास्ताविक :-**

थॉमस रॉबर्ट माल्थस हे एक सनातनवादी अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांचा जन्म १७६६ चा आणि मृत्यू १८३४ चा. थॉमस माल्थस संपूर्ण जगात प्रसिध्द आहेत ते त्यांनी मांडलेल्या लोकसंख्या सिध्दांतामुळे. सन १७९८ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'An Essay on the Principles of Population' या ग्रंथात माल्थस यांनी आपला

लोकसंख्याविषयक सिध्दांत (Theory of Population) मांडला आहे. प्रा. माल्थस यांनी आर्थिक विकासासंबंधी काही विचार मांडले आहेत. विकाससंबंधीचे त्यांचे विचार, त्यांच्या कल्पना आपणांस त्यांच्या १८२० मध्ये त्यांनी प्रसिध्द केलेल्या Principles of Political Economy या पुस्तकात आढळून येतात. या पुस्तकाचे दोन खंड असून माल्थस यांनी पहिल्या भागात मूल्य आणि वितरण या बाबींवर चर्चा केली आहे तर पुस्तकाच्या दुसऱ्या भागात (The Progress of Wealth) या खंडात आर्थिक विकासासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. माल्थस यांनी आर्थिक विकासाचा जो सिध्दांत मांडला आहे, तो खालीलप्रमाणे थोडक्यात स्पष्ट केला आहे. माल्थस यांचा हा सिध्दांत म्हणजे त्यांनी आपल्या दोन ग्रंथात आर्थिक विकासासंबंधी जे विचार मांडले आहेत त्या विचारांची एकत्रित मांडणी आहे.

**लोकसंख्या आणि आर्थिक विकास :-**

माल्थस यांचा लोकसंख्येचा सिध्दांत जगप्रसिध्द आहे. लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास यांच्यात जवळचे संबंध असतात असे माल्थस यांचे मत आहे. त्यांच्या मते, वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढते (२,४,८,१६,३२,६४) आणि अन्नधान्याचे उत्पादन गणिती श्रेणीने वाढते. (१,२,३,४,५,६,७,८) असे माल्थस यांनी म्हटले आहे. जगाची लोकसंख्या अशाच प्रकारे वाढत राहिली तर उपासमार, कुपोषण, भूकबळी, दारिद्र्य या समस्या निर्माण होतील. अशा प्रकारे वाढती लोकसंख्या हा गरीब राष्ट्रांच्या/न्यून विकसित देशांच्या आर्थिक विकासातील मोठा अडथळा असून या लोकसंख्येमुळे उत्पादनात वाढ होत नाही. कारण ही लोकसंख्या केवळ उपभोक्ता असते असे माल्थस यांनी स्पष्ट केले आहे.

**आर्थिक विकासाची संकल्पना :-**

काही सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी देशाचा आर्थिक विकास आपोआप व नैसर्गिक (automatic and natural) होतो असे म्हटले आहे. परंतु माल्थस यांना हे मान्य नाही. त्यांच्या मते आर्थिक विकास आपोआप होत नाही. आर्थिक विकासासाठी देशातील लोकांनी प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांचे मत होते. (According to Malthus, the process of development is not automatic or natural. But it requires consistent and deliberate efforts on the part of people) आर्थिक विकास होत असताना मंदी येते किंवा अर्थव्यवस्थेत चढ-उतार होत असतात. देशाच्या संपत्तीत वाढ घडून आली तर देशाचा विकास घडून येतो. म्हणून आर्थिक विकास हा राष्ट्राच्या संपत्तीच्या वाढीशी संबंधित असतो. माल्थस यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत संपत्तीच्या उत्पादनाबरोबरच वितरणालाही महत्व दिले आहे.

**प्रभावी मागणी आणि आर्थिक विकास :-**

माल्थस यांच्या मते प्रभावी मागणी (Effective Demand) आणि राष्ट्रांचा आर्थिक विकास या दोहोत जवळचे संबंध असतात. न्यून प्रभावी मागणी (limited effective demand) आर्थिक विकासात अडथळा

निर्माण करते. माल्थस यांना J.B. Say यांचा बाजारपेठेचा नियम मान्य नव्हता. वस्तूचा प्रत्येक पुरवठा आपली स्वत:ची मागणी निर्माण करतो. (Every supply creats its own demand) त्यामुळे अर्थव्यवस्थेत अत्युत्पादन (Over Production) निर्माण होत नाही असे से यांचे मत होते. पण से यांचे हे विचार माल्थस यांनी अमान्य केले. त्यांच्या मते जर प्रभावी मागणी कमी झाली तर अतिरिक्त उत्पादनाची समस्या निर्माण होते. श्रमिक जेवढया मूल्याच्या (किंमतीच्या) वस्तूंचे उत्पादन करतात त्यापेक्षा त्यांना कमी मजुरी मिळते. आणि त्यामुळे श्रमिक बाजारात उपलब्ध असलेल्या सर्व वस्तू विकत घेऊ शकत नाहीत. भांडवलदार, कारखानदार, व्यापारी यांचे उत्पन्न ज्यास्त असते. परंतु त्यांचा उपभोग खर्च कमी असतो. त्यामुळे देशातील एकूण उपभोग वाढत नाही. प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे किंमती, बचत, गुंतवणूक, रोजगार, भांडवल संचय आणि उत्पादन या घटकांवर प्रतिकूल परिणाम होतात. त्यामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाची गती मंदावते. विकासाच्या वेगावर अनिष्ट परिणाम होतो. माल्थस यांच्या मते प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे कृषी, उदयोग आणि व्यापार क्षेत्राचा विकास व विस्तार होत नाही. सनातनवादी अर्थतज्ज्ञ ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राच्या विकासासाठी काटकसर आणि बचत या गोंष्टींवर भर दिला होता. परंतु माल्थस यांनी स्मिथ यांचे हे विचार चुकीचे आहेत असे म्हटले आहे. जनतेने जर काटकसर केली, खर्च न करता बचत केली तर देशाचा आर्थिक विकास होत नाही असे माल्थस यांनी म्हटले आहे. माल्थस यांच्या मते लोकांनी खर्च न करता अधिक बचत केली तर आर्थिक मंदीची समस्या निर्माण होते. म्हणून जनतेने काटकसर केली, बचत केली तर देशाचा विकास होत नाही. श्रीमंत लोक जी बचत करतात त्यांचे रुपांतर गुंतवणूकीत होत असते. परंतु लोकांनी उपभोग कमी करुन बचत करु नये. सक्तीच्या बचतीमुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. मात्र स्वेच्छेच्या बचतीमुळे आर्थिक विकासासाठी गती मिळते. अतिरिक्त बचतीमुळे वस्तूची मागणी कमी होते. त्यामुळे उत्पादकांची उत्पादन करण्याची प्रेरणा नष्ट होते. म्हणून माल्थस यांनी उपभोग खर्च कमी करुन जी बचत केली जाते, त्या बचतीला विरोध केला आहे. अशा बचतीमुळे आर्थिक मंदी निर्माण होते आणि देशाचा विकास होत नाही असे त्यांनी म्हटले आहे. १८१५ ते १८२० या काळात न्यून उपभोग (कमी मागणी), बेकारी, अत्युत्पादन अशा समस्या उद्भवल्या होत्या. या समस्यांचा माल्थस यांनी अभ्यास केला होता. गरीबीला श्रीमंत लोक जबाबदार आहेत असे त्यांना दिसून आले होते. म्हणून त्यांनी उपभोग (प्रभावी मागणी) वाढण्यासाठी काटकसरीला किंवा बचतीला विरोध केला. आधुनिक अर्थतज्ञ प्रा. केन्स यांनी थॉमस माल्थस यांच्या या विचारांचे समर्थन करुन त्यांचे विचार आपल्या सिध्दांतात ठळकपणे मांडून चांगल्याप्रकारे जगासमोर आणले.

**भांडवल संचय आणि आर्थिक विकास :–**

भांडवल संचय (Capital Accumulation) आणि आर्थिक विकास या दोन घटकात जवळचे संबंध असतात असे माल्थस यांनी म्हटले आहे. भांडवल निर्मिती किंवा भांडवल संचय हा आर्थिक विकास निश्चित करणारा महत्वाचा घटक आहे असे माल्थस म्हणतात. रिकार्डो आणि ॲडम स्मिथ यांनी सुध्दा आर्थिक

विकासाच्या प्रक्रियेत भांडवल संचय हा महत्वाचा घटक असतो असे म्हटले आहे. भांडवल संचयात सतत वृद्धी होत असेल तर देशांच्या संपत्तीत (विकासात) वाढ होते असे माल्थस म्हणतात. भांडवल संचयात ज्यांच्यामुळे वाढ होते, त्या भांडवलदारांच्या भूमिकेला माल्थस यांनी महत्व दिले आहे. भांडवलदारांच्या नफ्यावर भांडवल संचय अवलंबून असतो. त्यांना मिळणारा नफा जितका ज्यास्त तितका भांडवल संचय ज्यास्त घडून येतो. (The source of capital accumulation is higher profits) श्रमिक खूप गरीब असतात. त्यामुळे त्यांची बचत सुध्दा खूपच कमी असते. भांडवलदार अधिक बचत करु शकतात. त्यामुळे भांडवलदारांच्या बचतीतून नफ्यात वाढ होते. अधिक नफा मिळवण्यासाठी अधिक बचत करावी लागते. जर भांडवलदारांनी अधिक नफा मिळवण्यासाठी उपभोग्य वस्तूवर खर्च कमी करुन अधिक बचत केली तर आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. (If capitalists save more and spend less on consumer goods in order to have larger profits, economic growth will be retarded) भांडवल संचयात वृद्धी घडवून आणण्यासाठी उपभोगात कपात करु नये असे माल्थस यांनी म्हटले आहे.

**उत्पादन आणि वितरण :– (Production and Distribution)**

माल्थस यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकाससाठी उत्पादन आणि वितरण या दोन घटकांना खूप महत्व दिले आहे. त्यांनी या दोन घटकांना संपत्तीचे महत्वाचे घटक मानले आहे. (Production and distribution are the two grand elements of wealth) उत्पादन आणि वितरण या दोन घटकांना जर योग्य आणि सारखेच महत्व दिले तर अल्पकाळात राष्ट्रांच्या संपत्तीत वाढ घडून येते. या दोन घटकांना सारखेच महत्व दिले नाही तर आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल. आणि आर्थिक विकास घडून येण्यासाठी (राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येण्यासाठी) खूप काळ लागेल असे माल्थस यांनी म्हटले आहे. आर्थिक विकास घडून येण्यासाठी अधिक उत्पादन (Maximum production) आणि उत्पादन साधनांचे पर्याप्त पाटप (Optimum allocation of resoureces) आवश्यक आहे असे माल्थस म्हणतात. अशा प्रकारे अल्पकाळात राष्ट्राचा आर्थिक विकास घडून येण्यासाठी (राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येण्यासाठी) उत्पादन आणि वितरण हे दोन घटक अत्यंत महत्वाचे असून त्यांचा विचार स्वतंत्र (Separate) किंवा अयोग्य प्रमाणात (Undue Proportions) केला तर राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येण्यासाठी हजारो वर्षे लागतील असे माल्थस आपल्या ग्रंथात नमूद करतात.

**आर्थिक विकासाचे घटक :–**

माल्थस यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिध्दांतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक आणि बिगर आर्थिक घटकांना महत्व दिले आहे. माल्थस यांनी Potential gross national product आणि actual gross national product यामधील फरक स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते आर्थिक विकासाचा प्रश्न हा स्थूल राष्ट्रीय उत्पादन निर्माण करण्याच्या क्षमतेशी संबंधित आहे. (The problem of economic development is

related with the achievement of a high level of potential gross national product) स्थूल राष्ट्रीय उत्पादन हे भूमी, श्रम, भांडवल आणि व्यवस्थापन/संयोजन (management) या घटकावर अवलंबून असते. हे उत्पादनाचे चार घटक योग्य प्रमाणात उपयोगात आणले तर कृषी आणि औदयोगिक उत्पादनात वृध्दी घडून येते. भांडवल संचय, सुपीक जमीन (the fertility of soil) आणि तांत्रिक प्रगती यामुळे कृषी आणि औदयोगिक क्षेत्रातील उत्पादनात वाढ घडून येते. माल्थस यांनी आर्थिक विकास घडून येण्यासाठी वरील आर्थिक घटकाबरोबरच काही बिगर आर्थिक घटकांना सुध्दा महत्व दिले आहे. मालमत्तेची सुरक्षा (Security of Property), चांगली राज्यघटना (good constitution), चांगले कायदे (Excellent laws) आणि प्रामाणिक, चांगली नैतिकता असणारी लोकसंख्या (high morals of the people) या घटकांना राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्वाचे स्थान माल्थस यांनी दिले आहे. आर्थिक घटकाबरोबरच बिगर आर्थिक घटक सुध्दा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावतात असे माल्थस यांनी म्हटले आहे.

**आर्थिक कुंठित अवस्था :- (Economic Stagnation)**

अर्थव्यवस्थेत आर्थिक कुंठित अवस्था का निर्माण होते, त्याचे स्पष्टीकरण माल्थस यांनी दिले आहे. अत्युत्पादन (Over Production) आणि उपभोगन्यूनता (deficiency of effective demand) यामुळे कुंठित अवस्था निर्माण होते. माल्थस यांच्या मते, अल्पकाळात श्रम या उत्पादन घटकांचा पुरवठा अलवचिक असतो. त्यामुळे अल्पकाळात श्रमाची मागणी वाढली तर श्रमाचा पुरवठा वाढत नाही. त्यामुळे मजुरीचे दर वाढतात. जरी वेतनाचे दर वाढले तरी उपभोगात (प्रभावी मागणीत) वाढ होत नाही. कारण वेतनातील वाढीमुळे कामगार उपभोग वाढवण्यापेक्षा अधिक आरामदायी जीवन जगणे पसंत करतात. त्यामुळे बाजारात वस्तूचा पुरवठा अधिक राहतो. (general glut or oversupply of goods) यामुळे वस्तूंच्या किंमती, बचत, गुंतवणूक आणि नफा यात घट होते. भांडवलदारांचा नफा कमी झाल्याने त्यांची भांडवल संचयाची शक्ती, प्रेरणा, इच्छा कमी होते. अशा प्रकारे उपभोग कमतरता (under consumption) आणि अत्युत्पादन (glut or over production) यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास कुंठतो. आर्थिक कुंठित अवस्था (economic stagnation) निर्माण होते.

**आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी सुचवलेले उपाय :-**

राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी प्रामुख्याने खालील उपाय सुचवले आहेत.

**१) संतुलित विकास घडवून आणणे :-**

देशाच्या आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी समतोल विकासाला (balanced growth) प्राधान्य दिले आहे. त्यांच्या मते, देशाची अर्थव्यवस्था कृषी आणि उद्योग अशा दोन क्षेत्राात विभागलेली असते. या दोन्ही क्षेत्रांचा विकास एकाचवेळी घडून आला पाहिजे. या दोन क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीने आर्थिक विकास घडून येतो. जोपर्यंत लागवडीयोग्य शेतजमीन लागवडीखाली आणली जात असते, तोपर्यंत शेतीत भांडवल गुंतवले जाते.

शेती क्षेत्राला घटत्या सीमांत उत्पाकतेचा नियम लागू होत असल्याने शेतीक्षेत्रात फायदेशीर गुंतवणूकीच्या संधी राहत नाहीत. त्यामुळे फक्त औद्योगिक क्षेत्रातच गुंतणूकीच्या संधी असतात. औद्योगिक क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीने अतिरिक्त लोकसंख्येला औद्योगिक क्षेत्रात रोजगार मिळू शकतो. माल्थस यांच्या मते उद्योगक्षेत्रात जसजशी गुंतवणूक वाढत जाते, तसतसे आधुनिक तांत्रिक प्रगतीमुळे वाढत्या उत्पादन फलाची प्रचिती येते. त्यामुळे उद्योगक्षेत्राची वाढ होते. उद्योगांचा विस्तार झाल्याने रोजगार संधी वाढतात. माल्थस यांनी आपल्या सिध्दांतात जमीन सुधारणा, संपत्ती व जमिनीचे योग्य वाटप यावर सरकारने भर दिला पाहिजे असे म्हटले आहे. त्याशिवाय उत्पादनात वाढ होणार नाही. आणि प्रभावी मागणी वाढणार नाही असे त्यांचे मत होते. अशा प्रकारे माल्थस यांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी समतोल विकासावर म्हणजेच कृषी व उद्योग क्षेत्रांच्या संतुलित विकासावर भर दिला आहे. कृषी व उद्योग क्षेत्राचा संतुलित विकास म्हणजे आर्थिक विकास असे माल्थस म्हणतात. (In the words of Malthus, economic development means the balanced growth of both the sectors.)

**२) प्रभावी मागणीत वाढ घडवून आणणे :–**

आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी प्रभावी मागणी वाढली पाहिजे असे म्हटले आहे. माल्थस यांच्या मते प्रभावी मागणी जर वाढली नाही तर केवळ तांत्रिक प्रगतीने आर्थिक विकास घडून येणार नाही. आर्थिक विकासासाठी प्रभावी मागणीत वाढ झाली पाहिजे. देशात प्रभावी मागणीची कमतरता असेल तर आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यासाठी माल्थस यांनी खालील ठळक उपाय सुचवले आहेत.

**अ) संपत्ती आणि शेतजमिनींचे समान वितरण आवश्यक :–**

माल्थस म्हणतात, एका व्यक्तीचे (Single Proprietor) वार्षिक उत्पन्न शंभर हजार पौंड असले आणि तीस–चाळीस व्यक्तींचे (Proprietors) वार्षिक उत्पन्न एक ते पाच हजार पौंड असेल तर शंभर हजार पौंड वार्षिक उत्पन्न असणाऱ्या त्या व्यक्तीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या तीस–चाळीस व्यक्तींची गहू, पाव, मांस आणि इतर मॅन्युफॅक्चर्ड उत्पादनांना मागणी खूप जास्त असेल. म्हणून माल्थस यांनी प्रभावी मागणीत वाढ होण्यासाठी संपत्ती आणि जमिनीच्या समान वितरणावर भर दिला आहे. यामुळे मागणीतही वाढ होईल आणि उत्पादनात सुध्दा वाढ होईल. संपत्तीच्या/धनाच्या असमान वाटपामुळे कमी उपभोग (मागणी कमी) आणि अधिक बचत या समस्या निर्माण होतात. संपत्तीच्या समान वितरणामुळे उपभोगात/मागणीत वाढ होते म्हणून संपत्तीचे समान वितरण झाले पाहिजे.

**ब) अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे :-**

देशाच्या प्रभावी मागणीत वाढ घडवून आणण्यासाठी माल्थस यांनी अंतर्गत आणि परकीय व्यापारात वाढ घडवून आणली पाहिजे, असे म्हटले आहे. देशांतर्गत आणि जागतिक व्यापारामुळे (आयात व निर्यात व्यापारामुळे) लोकांच्या गरजा व इच्छा यात वाढ होते. त्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढून नफ्यात वाढ होते. आर्थिक विकासासाठी/आर्थिक वृद्धीसाठी प्रभावी मागणी वाढली पाहिजे. त्यासाठी देशांतर्गत व विदेशी व्यापार वाढला पाहिजे असे माल्थस यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे माल्थस यांनी ॲडम स्मिथ आणि रिकार्डो यांच्याप्रमाणे मुक्त व्यापाराचे समर्थन केले आहे.

**क) अनुत्पादक उपभोक्त्यांच्या खर्चात वाढ आवश्यक :-**

जे उपभोक्ते भौतिक वस्तूंचे उत्पादन करत नाहीत त्यांना अनुत्पादक उपभोक्ते असे म्हणतात. उदाहरणार्थ देशातील जमीनदार लोकांचा समावेश अनुत्पादक उपभोक्त्यामध्ये होतो. भांडवलदार कंजूष असतात. आणि उत्पादक श्रमिकांना केवळ निर्वाहापुरती मजुरी मिळत असते. तेंव्हा प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यासाठी अनुत्पादक श्रमिक आणि जमीनदार महत्वाची भूमिका बजावतात. म्हणून प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यासाठी अनुत्पादक उपभोक्त्यांच्या खर्चात वाढ झाली पाहिजे.

**ड) सरकारी कामे सुरू करणे :-**

प्रभावी मागणीत वाढ घडवून आणण्यासाठी माल्थस यांनी आणखी एक उपाय सुचवला आहे आणि तो म्हणजे त्यांनी सरकारी कामात (Public Works) /शासकीय खर्चात वाढ करावी असे म्हटले आहे. मंदी व बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी माल्थस यांनी हा उपाय सुचवला आहे. रस्तेबांधणी आणि इतर सरकारी कामे काढून गरीबांना सरकारने रोजगार द्यावा. तसेच श्रीमंतांनी नोकरचाकर कामास ठेवावेत. आपले बंगले, बागा यांच्या सौंदर्याकरणावर खर्च करावा. यामुळे उपभोगात व उत्पादनात वाढ होऊन मंदी नाहीशी होईल असे माल्थस यांचे मत आहे.

**३) लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक :-**

राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी लोकसंख्या वाढ नियंत्रित करावी असा उपाय सुचवला आहे. वाढती लोकसंख्या/अतिरिक्त लोकसंख्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते असे माल्थस यांनी म्हटले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे उपासमार, अपुरे पोषण, दुष्काळ, पूर, भूकंप, युध्दे, epidemics आणि इतर नैसर्गिक आपत्ती उद्भवतात. हे टाळण्यासाठी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे असे माल्थस यांनी म्हटले आहे.

अशा प्रकारे आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी वरीप्रमाणे काही उपाय सुचवले आहेत. उपभोग, उत्पादन, गुंतवणूक, नफा आणि आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी त्यांनी हे उपाय सुचविले आहेत.

**माल्थस यांच्या आर्थिक विकास सिध्दांतावरील टीका/उणिवा**

माल्थस यांच्या आर्थिक विकास सिध्दांतावर खालीलप्रमाणे टीका केल्या जातात. सिध्दांतातील उणिवा किंवा दोष थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) अनुत्पादक उपभोक्त्याबाबतचे विचार चुकीचे :–**

परिणामकारक मागणी वाढण्यासाठी देशातील जमीनदारासारख्या अनुत्पादक उपभोक्त्यावर खर्च करावा असे माल्थस म्हणतात. टीकाकारांच्या मते माल्थसच्या या उपायामुळे उत्पादक कामगारांवर अन्याय होतो. यामुळे अनुत्पादक लोकांचा फायदा होईल. पण यामुळे भांडवलनिर्मितीचा दर कमी होईल. अशा प्रकारे टीकाकारांच्या मते अनुत्पादक उपभोक्त्यामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. (Unproductive Consumers retard economic progress)

**२) भांडवल संचयाबाबत नकारात्मक दृष्टिकोन :–**

टीकाकारांच्या मते, भांडवल संचयाबाबत माल्थस यांनी नकारात्मक (चुकीचा) दृष्टिकोन स्वीकारला आहे. टीकाकारांच्या मते भांडवल संचयाच्या दरात वृद्धी झाली की वेतन, नफा, राष्ट्रीय उत्पन्न यात वाढ होऊन उपभोग्य वस्तूंच्या मागणीत वाढ होते. त्याचा विचार माल्थस यांनी केलेला नाही.

**३) भांडवल संचय प्रक्रियेमुळे कुंठित अवस्था येते हे चूक :–**

माल्थस यांनी भांडवल संचय प्रक्रियेमुळे अर्थव्यवस्थेत दीर्घकाळ कुंठित अवस्था येते असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते, माल्थस यांची ही चुकीची कल्पना आहे. ती त्यांनी 'से' यांच्या सिध्दांतावरुन घेतली आहे. सर्व वस्तूंच्या बाबतीत कायमस्वरुपी न्यून उपभोगाची स्थिती आढळते असे माल्थस म्हणतात. पण टीकाकार म्हणतात, सर्व वस्तूंच्या बाबतीत कधीही कायमस्वरुपी न्यूनउपभोगाची (Under Consumption) स्थिती नसते.

**४) बचतीबाबतचे विचार चुकीचे (Wrong saving Base):–**

माल्थस म्हणतात बचत केवळ जमीनदार लोकच करतात. टीकाकारांच्या मते, माल्थस यांचा हा विचार चुकीचा व एकांगी आहे. ते म्हणतात, समाजातील कामगार लोक (Wage earners) बचत करत असतात. नफा मिळवणारे (Profit earners) बचत करत नाहीत.

**५) वाढती लोकसंख्या आर्थिक विकासातील अडथळा :–**

वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो असे माल्थस म्हणतात. परंतु टीकाकारांच्या मते माल्थस यांचा विचार पूर्ण खरा नाही. ज्या देशांची लोकसंख्या मुळातच कमी आहे, अशा देशात लोकसंख्या वाढ घडून आली तर आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत नाही. परंतु ज्या देशात अतिरिक्त लोकसंख्या आहे, अशा देशात लोकसंख्येत वाढ घडून आली तर मात्र त्याचा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

कमी लोकसंख्या असलेल्या देशात लोकसंख्येत वृद्धी घडून आली तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करता येतो. त्यामुळे विकास दरात वाढ होते असे टीकाकार म्हणतात.

**समारोप :–**

अशा प्रकारे थॉमस माल्थस यांच्या सिध्दांतात वरीलप्रमाणे काही उणिवा असल्या तरी त्यांच्या विकास सिध्दातांचे मोल कमी होत नाही. माल्थस यांचा सिध्दांत आजही जगाला उपयुक्त व मार्गदर्शक आहे. वाढती लोकसंख्या देशाच्या विकासात अडथळा निर्माण करते हा त्यांचा विचार अनेक देशात खरा ठरला आहे. लोकसंख्या वाढीचा वेग कमी केल्याशिवाय विकासाचा वेग वाढणार नाही, हा माल्थस यांचा विचार जगातील प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशांना पटलेला आहे. म्हणून त्यांनी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यास सुरवात केली आहे. आर्थिक विकासासाठी किंवा झालेली आर्थिक वाढ टिकवून ठेवण्यासाठी प्रभावी मागणी वाढली पाहिजे हा ही माल्थस यांचा विचार खरा ठरलेला आहे. माल्थस यांचा विकासाचा सिध्दांत गरीब आणि श्रीमंत दोन्ही देशांना उपयुक्त व मार्गदर्शक आहे. न्यून उपभोग (Under Consumption) अतिउत्पादन (Over production) या समस्या भेडसावणाऱ्या देशांना माल्थस यांचा सिध्दांत उपयुक्त आहे. माल्थस यांनी आर्थिक विकासासाठी सुचवलेले उपाय आजही उपयुक्त आहेत. मंदी व बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी सरकारी कामे काढावीत असा एक उपाय माल्थस यांनी सुचवला आहे. तोही उपाय आजही अत्यंत उपयुक्त आहे. माल्थस यांनी आपल्या सिद्धांतात आर्थिक घटकाबरोबरच बिगर आर्थिक घटकांनाही महत्व दिले आहे. हे त्यांच्या या सिध्दांताचे ठळक वैशिष्ट्य सांगता येईल. माल्थस यांच्या आर्थिक विकास सिध्दांतातील प्रभावी मागणी, न्यून उपभोग, अत्युत्पादन या संकल्पना आजही महत्वाच्या आहेत. आधुनिक अर्थतज्ज्ञ प्रा.जे.एम. केन्स यांनी या संकलनांचा आपल्या रोजगार सिद्धांतात विचार करुन, विस्ताराने मांडणी करून माल्थस यांचा एक प्रकारे गौरवच केला आहे. अशा प्रकारे थॉमस माल्थस यांचा आर्थिक विकासाचा सिध्दांत अविकसित आणि विकसित अशा दोन्ही प्रकारच्या देशांना उपयुक्त आहे. तसेच कमी लोकसंख्या आणि अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशानांही तो उपयुक्त आहे.

## २.२.४ कार्ल मार्क्स यांचा सामाजिक बदल, अतिरिक्त मूल्य आणि नफ्याचा सिध्दांत : (Karl Marx : Theory of Social Change, Surplus Value and Profit)

### २.२.४.१ प्रस्तावना : (Introduction)

'कार्ल मार्क्स' या जगप्रसिध्द अर्थतज्ज्ञांचा जन्म सन १८१८ मध्ये जर्मनीत झाला. तर सन १८८३ साली त्याचा मृत्यु झाला. मार्क्सवरती हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा खूप प्रभाव होता. त्याने आपल्या सुप्रसिध्द अशा 'दास कॅपीटल' या ग्रंथाचा पहिला खंड सन १८६७ साली प्रसिध्द केला. त्यानंतरचे दोन खंड १८८४ व १८९५ रोजी त्याच्या मृत्युनंतर त्याचा जीवलग मित्र व अर्थतज्ज्ञ फ्रेडरीक ऐंगील्सने संपादीत करून प्रसिध्द केले. सन १८४८ मध्ये मार्क्स व ऐंगल्स यांनी मिळून 'समाजवादी जाहीरनामा' (Communist Manifesto) लिहून प्रसिध्द केला.

मार्क्सच्या 'दास कॅपीटलने' जगाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय रचनेलाच कलाटणी दिली. सन १९१७मधील रशियन राज्यक्रांती, सन १९४९ मधील चीनमधील मावो प्रणीत क्रांती, यामागील मुख्य प्रेरणा मार्क्सवादाचीच होती. सन १९१७ ते १९९० या कालखंडात जगातील निम्मी लोकसंख्या मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होती. रशिया, चीन, मंगोलीया, क्युबा व युरोपतील अनेक देश, साम्यवादी विचारांनी भारले होते. मार्क्सच्या लिखाणाचा व विचारांचा अभ्यास आज जगभरातील अनेक तज्ज्ञ, अभ्यासक, विद्यापीठे करत आहेत. मार्क्सच्या आर्थिक विकासविषयक सिध्दांताचे अध्ययन यामुळेच क्रमप्राप्त ठरते आहे.

### २.२.४.२ कार्ल मार्क्सचे विकास प्रतिमान : (Marxian Theory of Economic Development)

कार्ल मार्क्सचे विकास प्रतिमान हे व्यापक स्वरूपाचे आहे. कारण ते फक्त आर्थिकच नसून ते सामाजिक व ऐतिहासिक उत्क्रांतीशी संबंधीत आहे. मार्क्सचे विकास प्रतिमान हे मुख्यत्वे तीन गृहीतांवर आधारीत आहे.

१. उत्पादन फलनाचे स्वरूप : **(Nature of Production, Function)**

२. नवप्रवर्तनाचे स्वरूप : **(Innovation)**

३. भांडवल संचयाची प्रक्रिया : **(Processes of Capital Accumulation)**

या तीन घटकांचा परिणाम होऊन भांडवलदारांच्या नफा प्रेरणेवर आणि श्रमिकांच्या वेतन दरावर कसा होतो याचा अभ्यास मार्क्सने केलेला दिसून येतो. त्यामध्ये गतीशील अर्थव्यवस्त व भांडवलदार व श्रमिकांमधील नफा ते वेतनाची विभागणी हा अत्यंत कठीण प्रश्न म्हणून पुढे येतो व त्याचे पर्यवसन संघर्षात होते.

#### अ) अर्थव्यवस्था व उत्पादन प्रक्रिया : (Economy & Production Processes)

मार्क्स आपल्या संपूर्ण विश्लेषणात अर्थव्यवस्थेच्या उत्पादन प्रक्रिया (Production Processes) या घटकावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करतो. त्याच्या मते अर्थव्यवस्था कोणतीही असो त्यामागील उत्पादन कार्यामध्ये सहभागी असणारा श्रम (Labour) हा सर्वात महत्त्वपूर्ण घटक असून त्यासोबत भांडवल (Capital) अणि तांत्रिक ज्ञान (Technology) यांचा क्रम लागतो.

अर्थव्यवस्थेत होणारे वस्तू व सेवांचे उत्पादन हे भूमी (Land) या प्राथमिक घटकांद्वारे श्रमाच्या साहाय्याने केले जाते. या ठिकाणी मार्क्स 'भूमी' या उत्पादन घटकाचा उल्लेख निसर्गाची सर्व प्रकारची गुणसंपदा व कच्चा माल असा होतो. याउलट श्रम या उत्पादन घटकाचे विश्लेषण करताना तो म्हणतो की, श्रम म्हणजे निसर्गाची देणगी नसून या समाजाच्या हजारो वर्षाच्या इतिहासाचे फळ होय. त्यामुळे मार्क्सने देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रामुख्याने श्रमाची उत्पादकता आणि तांत्रिक ज्ञान यावर अवलंबून असल्याचे प्रतिपादन केले. मार्क्सने याच आधारावर आपले उत्पादन फलन पुढीलप्रमाणे मांडले –

$P = f(C, L, W, t)$

P = उत्पादन

f = फलनात्मक सहसंबंध

C = भांडवल

L = भूमी

W = श्रम

t = तंत्रज्ञान

वरील समीकरणामध्ये भांडवल, श्रम, तंत्रज्ञान यावर उत्पादन अवलंबून असते असे दर्शविले आहे. मात्र सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी 'तांत्रिक ज्ञानाचा' जसा संकुचित अर्थ गृहीत धरलेला होता. तसा मार्क्सनी गृहीत धरला नव्हता. मार्क्सने तंत्रज्ञानाचा लावलेला अर्थ हा तंत्रज्ञानाएवढा होता. मात्र त्याला सामाजिक संदर्भ देखील होता. तांत्रिक ज्ञानामुळे उत्पादन पध्दतीत नेमके कोणते बदल होतात. यातून आर्थिक व सामाजिक संबंध कसे निर्माण होतात. याचाही समावेश मार्क्सने आपल्या तांत्रिक ज्ञान या संकल्पनेत केला होता. म्हणून मार्क्स यालाच उत्पादनाचे संबंध (Relations of Production) असे म्हणतात.

**ब) उत्पादनाचे संबंध : (Relations of Production)**

मार्क्सने उत्पादनाचे सहसंबंध या संकल्पनेची सुस्पष्ट अशी व्याख्या दिली नाही. मात्र त्याच्या अनुयायांनी या संकल्पनेचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला. फ्रेडरिक हेगील्स व हॉवर यांनी या संकल्पनेचे स्पष्टीकरण करताना या संकल्पनेमध्ये पुढील तीन घटकांचा समावेश केला.

१. **समाजातील कामगारांचे स्थान :** उत्पादन प्रक्रियेतील कामगार संघटनांची भूमिका कशी आहे. समाजात कामगारांना कोणते स्थान दिले जाते त्यांना किती प्रमाणात स्वातंत्र्य दिले जाते, किती प्रमाणात गुलामगिरीची वागणुक दिली जाते.

२. **उत्पादन प्रक्रियेचे ज्ञान :** देशामध्ये उपलब्ध भौगोलिक क्षेत्रातील नैसर्गिक साधनसंपत्ती, कच्चा माल यांची उपलब्धता व त्याच्या वापराचे ज्ञान.

३. **उत्पादनाचे स्वरूप व वैज्ञानिकत्व :** उत्पादन प्रक्रियेसाठीच्या तांत्रिक पध्दती, विविध प्रक्रिया, वैज्ञानिक ज्ञान व प्रगतीची स्थिती.

थोडक्यात वरील तीन घटकांवरुन हे स्पष्ट होते की, मार्क्सच्या मते, उत्पादनाचे संबंध म्हणजे अर्थव्यवस्थेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय संस्थात्मक (Institutional) रचना देखील समाविष्ट असतो. ऐतिहासिकदृष्ट्या प्रत्येक समाजाचा मुलभूत पाया हा उत्पादन व त्याचे समाजातील वाटप यावरच आधारलेला असतो. यातूनच समाजात वर्गीय रचना निर्माण झाली. उत्पादन कशापासून व कशाचे करावे? यातुनच वर्गीय रचना अस्तित्वात येत गेली. प्रत्येक समाजाची विभागणी ही 'आहे रे' (Haves) आणि 'नाही रे' (Have Note) या दोन वर्गामध्ये झालेली दिसून येते. यामध्ये उत्पादनाची साधने व संपत्ती यांची मालकी असलेला एक वर्ग आणि दुसरा वर्ग म्हणजे ज्यांच्याकडे फक्त स्वत:चे श्रमच आहेत असा एक वर्ग. उत्पादन प्रक्रिया हे समाजाच्या आर्थिक प्रगतीबरोबर सतत बदलत जाणारी असल्याने त्याचा शेवट हा वर्गसंघर्षातच होतो. हा संघर्ष 'आहे रे' व 'नाही रे' अशा दोन वर्गांमध्ये असतो. या संघर्षातूनच अस्तित्वातील समाजव्यवस्था जाऊन त्याठिकाणी नवी समाजरचना अस्तित्वात येते. मात्र हे परिवर्तन होत असताना मार्क्स म्हणतो की, नवी व्यवस्था जुन्या व्यवस्थेची जागा तेव्हाच घेतो जेव्हा जुनी व्यवस्था पूर्णपणे परिपक्व झालेली असते.

### २.२.४.३ सामाजिक बदलाचा सिध्दांत : (Theory of Social Change)

मार्क्सने आपल्या सामाजिक बदलाचा सिध्दांत बौध्दिकवादी दृष्टिकोनातून (Dilectic Materialism) मांडला आहे. यामध्ये उत्पादन संबंधातील बदलानुसार सामाजिक बदल एकूण चार घटकांमधून होत गेला असल्याचे मार्क्सने

१. प्राथमिक साम्यवाद : (Primitive Communism or Asiciatic Age)

२. गुलामगिरी : (Selevery or the Ancient Stage)

३. सरंजामशाही : (Feudalism)

४. भांडवलशाही : (Capitalism)

मार्क्सने वर्णन केलेल्या या चार सामाजिक अवस्था पुढीलप्रमाणे :

**१. प्राथमिक साम्यवाद : (Primitive Communism or Asiciatic Age)**

या अवस्थेतील मानवी समुदाय हा पूर्णपणे वर्गविरहीत (Classless) असा होता. समाजाची विभागणी ही स्त्री व पुरुष अशा दोनच गटांमध्ये लिंगाधारीत होती. पुरूषांनी शिकार करणे, मासेमारी करणे, युध्द करणे, संरक्षण करणे ही कामे केली जात होती. स्त्रियांनी जेवण करणे, सुत कातणे, विणकाम, घरकाम इ. करणे अभिप्रेत होते. हळूहळू या अवस्थेतील मानवाला हातमागावर सुत कातण्याची कला अवगत झाली. हळूहळू पाळीव प्राणी पाळणे व दुग्धव्यवसाय यांची सुरुवात झाली. याहून पाळीव प्राणी सांभाळणारा एकजण समाजाचा वर्ग (Tribe) अस्तित्वात आला. या नवीन वर्गाचा इतरांशी व्यापार विनीमय सुरु झाला. हळूहळू मानवी श्रमाद्वारे उत्पादन वाढ घडवून आणण्याच्या कला या समुहाला अवगत होत गेली. मात्र त्यासाठी जादा श्रमशक्तीचा प्रश्न पुढे आला व यातूनच गुलामगिरी (Selevery) अवस्थेचा जन्म झाला.

**२. गुलामगिरी : (Selevery or the Ancient Stage)**

याच अवस्थेत उत्पादन कार्यामध्ये श्रमविभागणीचे तत्त्व अंमलात येऊ लागले. 'गुलाम' हा उत्पादनाच्या कार्यातील महत्त्वाचा घटक ठरु लागला. ग्रामीण व नागरी भागामध्ये देखील उत्पादन कार्यामध्ये विशेषीकरण येऊ लागले. यातूनच 'व्यापारी वर्ग' (Merchant Class) उदयाला आला. हा वर्ग विविध प्रकारच्या वस्तू व सेवांच्या उत्पादनांमध्ये मध्यस्थांची भूमिका पार पाडू लागला. या व्यवहारांकरिता चलन म्हणून 'पैसा' वापरात येऊ लागला. पूर्वीच्या अवस्थेत जमिनीची मालकी ही समाजाची होती. आता तिला 'खासगी' स्वरूप येऊ लागले. व्याजाने कर्ज देणे, जमिनी गहाण ठेवणे इ. नव्या व्यवहारांचा देखील जन्म झाला. या सर्व कार्यामुळे वर्गीय हितसंबंध निर्माण होत गेले. शिवाय त्यांचे स्वरूप, रचना आणि कार्ये ही अधिक गुंतागुंतीचे होत गेले. आता या सर्वांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे होते. या गरजेतूनच 'शासनसंस्था' (State) अस्तित्वात आले.

**३. सरंजामशाही :** (Feadulism)

गुलामगिरी पध्दतीमध्ये उत्पादनामध्ये जसजशी वाढ होत गेली. तसतशी सरंजामशाही . अवस्था अस्तित्वात

आली. ग्रामीण भागात भू-दासांकडून शेतीची उत्पादक कामे केली जाऊ लागली. हस्तोद्योग व कृषी उत्पादने ही लहान प्रमाणात केली जात असत. जमीन व उत्पादनाची खासगी मालकी अस्तित्वात होती. खेड्यामध्ये व नागरी भागात उत्पादन व उत्पादन साधनांची मालकी स्वत:कडे असणारे अनेक उत्पादक निर्माण झाले. यातूनच उत्पादकांचे 'संघ' अस्तित्वात येऊ लागले. पुढे उत्पादन कार्याचा व विनीमय व्यवहारांचा जसजसा विकास आणि विस्तार होत गेला. तसतशी प्रचलीत सरंजामशाही व्यवस्था या नव्या अवस्थेतील समस्यांना, आव्हानांना तोंड देण्यास असमर्थ ठरू लागली. एवढेच नव्हे तर ही पध्दतीच उत्पादन कार्यातील एक अडथळा ठरू लागली. परिणामी सरंजामशाहीचा शेवट झला व नवीन भांडवलशाही व्यवस्था अस्तित्वात आली.

४. **भांडवलशाही :** (Capitalism)

या अवस्थेमध्ये उत्पादन कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडण्याचे काम बुझ्वी वर्ग (Geolic Class) करत असतो. इतस्त: पसरलेल्या विखुरलेल्या उत्पादन घटकांना एकत्र करुन मोठ्या प्रमाणावर उत्पादन कार्य संघटीत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या वर्गाकडून केले जाते. भांडवलशाही व्यवस्थेचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणजे उत्पादन घटक व उत्पादक यामधील फारकत हे होय. कारण भांडवलशाही पूर्वीच्या अवस्थेत श्रमिकांकडे ते उत्पादीत करीत असणाऱ्या उत्पादन साधनांची मालकी असे. मात्र या भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादन साधनांची मालकी ही कामगार वर्गाकडून भांडवलदार वर्गाकडे जाते व श्रमिक वर्ग हा फक्त श्रम विकून वेतन घेणारा वर्ग उरतो.

भांडवलशाही व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञान व उत्पादन पध्दतींचा अंगीकार करण्यात येऊ लागला. यातून लघु व कुटीर उद्योगांचे उत्पादन हळूहळू बंद पडत गेले व त्याऐवजी कारखानदारी (Manufacture) पध्दतीने उत्पादन प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरु झाले. परिणामी छोटे व लघु उद्योग बंद पडले. हातमागासारखे अनेक उद्योग जे सर्वत्र विखुरलेले होते. त्या जागी आता विशिष्ट शहरांमध्ये औद्योगिक वसाहती निर्माण होऊन उत्पादन कार्याचे केंद्रीकरण होत गेले. यातून उद्योग व शेती अशी दोन भिन्न क्षेत्रे अस्तित्वात आली. पुढे १८व्या शतकात इंग्लंडमध्ये जी औद्योगिक क्रांती घडून आली. यातून यंत्र व तंत्राचा आधुनिक वापर सुरु झाला. महाकाय आकाराच्या उद्योगसंस्थांच्या उत्पादनातील मक्तेदारीचे पर्व सुरु झाले. यातुनच नवा वसाहतवाद (Colonialism) सुरु झाला.

**भांडवलशाहीचा शेवट :**

भांडवलशाही जसजशी विकसीत होत जाते तसतसे आधुनिक तंत्राच्या वापरामुळे उत्पादन व उद्योगंचे आकारमान प्रचंड प्रमाणात वाढत जाते. यातून मोठे उद्योजक छोट्या उत्पादकांना स्पर्धेतून बाजूला करतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठा अस्तित्वात येतात. परंतु ही प्रक्रिया जसजशी परिपक्व होत जाईल तसतसे भांडवलशाही उत्पादन पध्दतीत अनेक अंतर्विरोध निर्माण होतील. टोकाचे केंद्रीकरण व कामगारांचे शोषण यातूनच भांडवलशाहीच्या विनाशाची सुरुवात होईल. पूर्वीच्या तीन अवस्था जशा परिपक्व झाल्यानंतर नष्ट झाल्या. त्याचप्रमाणे भांडवलशाही देखील तिच्या परिपूर्ण अवस्थेकडे गेल्यानंतर नष्ट होईल. भांडवलशाहीच्या जागी सुरुवातीला 'समाजवादी' (Socialism) आणि नंतर साम्यवादी (Communism) अस्तित्वात येतील.

### २.२.४.४ अतिरिक्त मूल्य सिध्दांत : (Theory of Surplus Value)

मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिध्दांत व त्याचा आर्थिक विकास सिध्दांताचा पाया मानला जातो. कारण याच सिध्दांताच्या आधारे जुने भांडवलदार वर्ग कामगार वर्गाचे शोषण (Exploitation) कसे करतो हे दाखवून दिले. तसेच या शोषणाद्वारे भांडवलदार वर्गाला ज्या अतिरिक्त मूल्याची प्राप्ती होते त्याद्वारे तो वर्ग अधिकाधिक प्रभावी कसा होत जातो हे देखील त्यांनी दाखवून दिले. कारण भांडवलदार कामगार वर्गाला त्याच्या सीमांत उत्पादकतेवर वेतन कधीच देत नाहीत. तर ते त्यापेक्षा खूप कमी दिले जाते. त्यांना दिले जाणारे हे वेतन निर्वाह पातळी (Subsistance Wage) एवढेच दिले जाते.

समजा, 'अ' या कामगाराला आपले निर्वाहाएवढे वेतन प्राप्त करण्यासाठी दररोज किमान ६ तास काम करावे लागते. मात्र त्याला आपले दररोजचे श्रम भांडवलदारांना पूर्णपणे विकावे लागते. त्यामुळे त्याचा श्रमाची मालकी असणारा भांडवलदार वर्ग कामगारांकडून दिवसाकाठी १२ तास काम करतो. कामगाराला व त्याच्या कुटुंबीयांना त्यांच्या निर्वाहासाठी लागणारे मूल्य कामगार पहिल्या ६ तासातच पूर्ण करतो व उरलेले ६ तासात तयार झालेले अतिरिक्त मूल्य असते जे संपूर्णपणे भांडवलदार वर्गाला मिळते. हे जादाचे अतिरिक्त मूल्य म्हणजेच भांडवलदार वर्गाचा नफा होय. थोडक्यात जेवढे 'अतिरिक्त मूल्य' जास्त तेवढा भांडवलदारांचा नफा जास्त. पण त्यासाठी भांडवलदारांना श्रमिक वर्गाचे जास्तीतजास्त शोषण करावे लागते. मार्क्सच्या मते, भांडवलदार वर्ग अतिरिक्त मुल्याची निर्मिती पुढील तीन प्रकारांनी करतात.

**१. कामाचे तास वाढवणे :**

श्रमिक आपल्या निर्वाह वेतनाएवढे काम जर ६ तासात करत असेल आणि भांडवलदार त्याच्याकडून दररोज १२ तास काम करुन घेत असेल तर (१२-६=६) ६ तास एवढे अतिरिक्त मुल्य म्हणजेच नफा भांडवलदारांना मिळेल. अशावेळी जर भांडवलदाराला आपला नफा वाढवायचा असेल तर त्याला श्रमिकाचे कामाचे तास वाढवावे लागतील. ते जर १२ तासांवरुन १४ तास असे वाढविले तर (१४-६=८) जादाचे २ तासाचे अतिरिक्त मूल्य किंवा नफा मिळून की जो पूर्वी ६ तास होता. आता तो ८ तास एवढा असेल.

**२. निर्वाह वेतनात घट करणे :**

भांडवलदार वर्ग श्रमिकाला जो निर्वाह वेतन देतो (६ तास) त्यामध्ये जर कपात करुन ते ४ तासांएवढेच दिले. तर भांडवलदारांना कामगारांचे कामाचे तास न वाढवता (१२-४=८) ८ तासांचे अतिरिक्त मूल्य किंवा नफा प्राप्त होईल.

**३. उत्पादकतेत वाढ घडवून आणणे :**

श्रमिकांच्या कामाचे तास न वाढवता किंवा त्याचे निर्वाह वेतन कमी न करता अतिरिक्त मूल्यात वाढ करण्याचा तिसरा मार्ग म्हणजे एकूण उत्पादन व उत्पादकतेत वाढ घडवून आणणे. आधुनिक तंत्रज्ञान उत्पादनाची नवनवी तंत्रे, व्यवस्थापन इ. चा वापर करुन आहे त्या श्रमसंख्येने उत्पादनात भरीव वाढ घडवून अतिरिक्त मूल्य वा नफा वाढवता येतो.

मार्क्सच्या मते भांडवलदार वर्गाला आपला नफा वाढविण्याकरिता वरील तीन मार्ग जरी उपलब्ध असले तरी तो या तीनीपैकी पहिल्या दोन मार्गांचा फारसा अवलंब करु शकत नाही. कारण जर त्याने कामगार वर्गाचे कामाचे तास वाढविण्याचा प्रयत्न केला तर कामगार वर्गच त्याला विरोध करेल. जर त्याने दुसरा मार्ग म्हणजे कामगाराचे निर्वाह वेतन कमी करण्याचा मार्ग अवलंबला तर तसे करणे त्याला परवडणार नाही. कारण कामगार व त्याच्या कुटुंबाचे उदरनिर्वाह चालून त्याची उत्पादकता टिकणे याकरिता त्याला किमान निर्वाह पातळी एवढे उत्पन्न देणे गरजेचे आहे. परिणामी भांडवलदारांकडे अतिरिक्त मूल्य निर्मितीतून नफा वाढविण्याचा एकच मार्ग उरतो. तो म्हणजे कामगारांच्या उत्पादकतेत वाढ करुन एकूण उत्पादन वाढविणे. भांडवलदार वर्गाच्या संचय प्रवृत्तीला उद्देशून मार्क्स म्हणतो, ("Accumulate ! Accumulate ! That is moses and the prophets" (भांडवलदारांनो, संचय करा ! संचय करा ! त्यातच तुमचा परमेश्वर आणि देवदूत).

### २.२.४.५ उत्पादनाची प्रक्रिया व गतिशील अर्थव्यवस्था : (Dynamic Economy & Production Processes)

मार्क्सची भौतिकवादी ऐतिहासिक मिमांसा आपण अभ्यासल्यानंतर आपल्या हे लक्षात येते की, त्याने समाजाच्या विकासाच्या ज्या चार अवस्थांचे वर्णन केलेले आहे. त्या प्रत्येक अवस्थेचा झालेला शेवट व त्याऐवजी अस्तित्वात आलेली नवी व्यवस्था यामागे उत्पादन पध्दतीत किंवा उत्पादन संबंधात जे बदल झाले ते बदलच या स्थित्यंतराला कारणीभूत होते. गतीमान अर्थव्यवस्थेचे प्रश्न व समस्या हाताळण्यास जेव्हा प्रचलीत उत्पादन तंत्र वा उत्पादनाचे संबंध असमर्थ ठरत गेले तेव्हाच नव्या व्यवस्थांनी जुन्या व्यवस्थेची जागा घेतली. मार्क्सच्या विवेचनातील प्राथमिक साम्यवाद, गुलामगिरी, सरंजामशाही व त्यानंतरची भांडवलशाही ही स्थित्यंतरे, यामुळेच झालेली होती. या सर्वांशी उत्पादन पध्दती व तिचे संबंध कारणीभूत होते.

वरील पार्श्वभूमीवर मार्क्सचे उत्पादनाच्या प्रक्रियेचे विश्लेषण पुढील प्रमुख तीन घटकांद्वारे केले.

**१. बदलते भांडवल : V (Variable Capital Wages Fund)**

मार्क्स उत्पादन प्रक्रियेतील पहिला घटक म्हणून 'बदलते भांडवल' (Variable Capital) म्हणजेच वेतन निधी (Wages funds) चा उललेख करतो. त्याला तो 'V' असे नाव देतो.

**२. स्थिर भांडवल : C (Constant Capital)**

मार्क्स उत्पादन कार्यातील दुसऱ्या घटकाला 'स्थिर भांडवल' (Constant Capital) म्हणून संबोधतो. त्याला तो 'C' असे नाव देतो. या स्थिर भांडवलात कच्च्या मालाचा झालेला वापर व यंत्रसामग्री व अवजारांचा झीज खर्च (घसारा) यांचा देखील समावेश करतो. कारण मार्क्सच्या मते या दोहोंमुळे उत्पादनामध्ये कोणतीच मूल्यवृध्दी होत नाही. याउलट उत्पादनाच्या कार्यामध्ये त्यांची झीज होऊन त्यावरील खर्चामुळे मूल्य घट होते. त्यामुळे उत्पादनाद्वारे होणारी संपूर्ण मूल्यवृध्दी ही केवळ 'श्रम' या एकमेव बदलत्या घटकामुळे घडून येते.

**३. अतिरिक्त मूल्य : S (Surplus Value)**

उत्पादन कार्यातील मार्क्सने वर्णन केलेला तिसरा व महत्त्वाचा घटक म्हणजे 'अतिरिक्त मूल्य' (Surplus

Value) होय. मार्क्स त्याला 'S' असे नाव देतो. सनातनवादी याला उत्पादनातील 'मृत्यूवृध्दी'(Value added) असे म्हणतात. मार्क्सच्या 'आर्थिक विकास' सिध्दांतांचा डोलारा हा याच 'अतिरिक्त मूल्य' या संकल्पनेवर आधारलेला आहे.

GPV = V + C + S .................. (1)

सूत्र (१) मध्ये

GPV = स्थूल उत्पादन मूल्य

V = बदलते भांडवल

C = स्थिर भांडवल

S = अतिरिक्त मूल्य

वरील समीकरणामध्ये बदलते भांडवल (V) स्थिर भांडवल (C) आणि अतिरिक्त मूल्य (S) असे स्थूल उत्पादनाचे तीन घटक दिलेले आहेत. यातील अतिरिक्त मूल्य (S) हा घटक म्हणजे भांडवलदाराचा नफा असतो व अतिरिक्त मूल्याची रक्कम जेवढी मोठी तेवढा भांडवलदारांचा नफा मोठा असतो.

म्हणून, अतिरिक्त मूल्य = नफा

**तांत्रिक प्रगती : (Technological Progress)**

उत्पादन पध्दतीतील बदल वा सुधारणा या तांत्रिक प्रगतीद्वारेच करता येतात. मात्र ही तांत्रिक प्रगती ही अर्थव्यवस्थेतील भांडवल निर्मितीच्या दरावर अवलंबून असते. नवी यंत्रे बसवणे किंवा जुनी काढणे यासाठी भांडवल संचयाचा दर किती आहे हे महत्त्वाचे असते. नवे तंत्रवैज्ञानिक शोध जरी लागले तरी त्याचा उत्पादन कार्यातील वापर होण्याकरता वाढीव दराने नवी भांडवल गुंतवणूक होणे गरजेचे असते. त्यासोबतच या तंत्रवैज्ञानिक बदलाचा 'भांडवल श्रम' अनुमानामध्ये होणारा परिणाम देखील पाहावा लागतो. कारण या उत्पादन तंत्रातील बदलांमुळे मजुरांची मागणी व मजुरीचे दरात वाढ होते व बेकारी वाढू लागते. असे जर सातत्याने होत गेले तर उत्पादनातील 'भांडवल प्रधानता' वाढते व अंगीकृत भांडवली संचय वाढत जातो व हे प्रमाण भविष्य काळात देखील सतत वाढत जाते. या बदलाचा दुसरा एक परिणाम दिसू लागतो तो म्हणजे 'कामगारांच्या उत्पादकतेत भरीव प्रमाणात वाढ घडून येते. म्हणजे पूर्वी एवढेच कामगार असताना एकूण उत्पादन देखील वाढत जाते. मार्क्सच्या भाषेत 'अतिरिक्त मूल्य' वाढत जाते. तांत्रिक प्रगतीच्या या दिर्घकालीन प्रक्रियेचे सर्व लाभ भांडवलदार वर्गाला मिळतात.

**श्रमाची मागणी व पुरवठा : (Demand & Supply of Labour)**

भांडवलदार आपला नफा महत्तम करण्यासाठी तांत्रिक प्रगती घडवून आणतात व त्याद्वारे श्रमिकांच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणतात. म्हणजेच भांडवलदार वर्ग स्थिर स्वरुपातील भांडवल गुंतवणूकीत वाढ करतात. मात्र त्या तुलनेत बदलते भांडवल म्हणजे 'श्रम' यावरील गुंतवणूक स्थिर ठेवतात अथवा कमी करतात.

बदते भांडवल वाढले की, मजुरांची मागणी वाढते याउलट जर हे भांडवल कमी झाले तर श्रमाची मागणी कमी होते. मात्र तांत्रिक प्रगती व त्याद्वारे श्रमिकांच्या उत्पादकतेत होणारी वाढ यामुळे दिर्घकाळात बदलत्या घटकात गुंतवणूक कमी कमी होत जाते. त्यामुळे मजुरांचे मागणी व त्यांचे वेतनाचे दर देखील घटत जातात. परिणामी बेकारीचे प्रमाण वाढत जाते. प्रती वर्षी सातत्याने होणारी लोकसंख्यावाढ हा देखील श्रम पुरवठ्यात वाढ करणारा आणखी एक घटक आहे.

**बेकारांची राखीव फौज : (The Concept of Reserve Army)**

वाढत्या लोकसंख्येमुळे नव्या श्रमशक्तीचा प्रवेश व जुन्या मजुरांमधील वाढती बेकारी यामुळे श्रम बाजारपेठेत श्रमाचा अतिरिक्त पुरवठा वाढू लागतो. परिणामी सर्वसाधारण आर्थिक स्थितीला देखील देशातील श्रमबाजारात श्रमाच्या मागणीपेक्षा तिचा पुरवठा जास्त राहतो. मार्क्स यालाच 'बेकारांची राखीव फौज' (Reserve Army) असे म्हणतो. त्याच्या मते कामगारांच्या याच राखीव फौजांचा आकारमानावर त्या कामगार वर्गाची सौदाशक्ती (Bargaining Power) अवलंबून असते व या सौदा शक्तीवरच त्याच्या वेतनाचा दर (Rate of Wage) अवलंबून असतो. या बेकारांच्या फौजेचा आकार जसजसा कमी-जास्त होईल तसतसा त्यांच्या वेतनदरामध्ये देखील बदल होतो. त्याबरोबरच हे वेतन दर व्यापार चक्रातील बदलांनुसार 'निर्वाह वेतनाच्या पातळीला' (Subsistance Wage) थोडे वर-खाली होत असतात.

**२.२.४.६ भांडवल संचयाचा दर : (Rate of Capital Accumulation)**

मार्क्सला अभिप्रेत असलेला 'भांडवल संचयाचा दर' कोणत्या घटकावर अवलंबून असतो हे पाहणे देखील महत्त्वाचे आहे. भांडवल संचयाचा आकार हा भांडवलशाहीतील अतिरिक्त मुल्याच्या आकारावरुन निश्चित होतो. मार्क्सने भांडवल संचयाची प्रक्रिया स्पष्ट करताना त्याचे प्रमुख तीन घटक सांगितले यामध्ये बदलते भांडवल 'V' म्हणजे वेतन निधी (Wage Fund), स्थिर भांडवल आणि अतिरिक्त मूल्य, समजा या तीनीपैकी बदलते भांडवल म्हणजे 'मजूर' हे आपल्याकडील सर्वच उत्पन्न उपभोगावर खर्च करतात. त्यामुळे त्यांची बचत शून्य असते. एकूण उत्पन्नातील भांडवलदारांना जो भाग मिळतो त्यातील विशिष्ट उत्पन्न त्यांना 'स्थिर भांडवला' करता म्हणजे यंत्रे, अवजारे इ. साठी राखून ठेवावा लागतो. कारण उत्पादन कार्यासाठी त्यांना एकूण भांडवलाची पातळी (Capital Stock) स्थिर ठेवणे गरजेचे असते. यातून जो उत्पन्नाचा भाग उरतो तो म्हणजे 'अतिरिक्त मूल्य' जो भांडवलदारांचा नफा असतो. हा नफा भांडवलदार पुन्हा उत्पादन कार्यामध्ये गुंतवितात.

**अतिरिक्त मूल्य – शोषणाचा दर व नफ्याचा दर :**

**(Surplus Value - Rate of Exploitation - Rate of Profit)**

मार्क्सनी आपल्या विश्लेषणात शोषणाचा दर व नफ्याचा दर यांची माहिती पुढील दोन सूत्रांद्वारे दिलेली आहे.

१) शोषणाचा दर (e) = $\frac{C}{V}$ = $\frac{\text{(स्थिर भांडवल)}}{\text{(बदलते भांडवल)}}$

२) नफ्याचा दर (R) = $\frac{S}{C+V}$ = $\frac{S/W}{1xS/V}$ = $\frac{S}{V}$ $\frac{V}{(C+V)}$

वरील समीकरणांद्वारे मार्क्सने हे दाखवून दिले की, अतिरिक्त मूल्य (S) ला, स्थिर व बदलत्या भांडवलाच्या बेरजेने (C+V) भागले असतात आपल्याला नफ्याचा दर काढता येतो. हीच बाब पुढीलप्रमाणे सांगता येते.

नफ्याचा दर (R) = $\frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{एकूण भांडवल}}$ X $\frac{१००}{१}$

ही बाब आपण एका उदाहरणाद्वारे समजावून घेऊ- समजा, भांडवलदाराच्या कारखान्यात ८ लाख कामगार आहेत. हे कामगार सर्व श्रम सामग्री वापरुन ८ लाख श्रम तास काम करतात. कामगारांच्या १ तास श्रमशक्तीचे मूल्य अर्धा तास आहे. यावरुन पुढील ताळेबंदामध्ये अतिरिक्त मूल्य व नफ्याचा दर काढता येईल.

**अतिरिक्त मूल्याचा ताळेबंद :**

स्थिर भांडवल (C) = ४० लाख श्रमतास

बदलते भांडवल (V) = ४ लाख श्रमतास

अतिरिक्त मूल्य (S) = ४ लाख श्रमतास

**अतिरिक्त मूल्याचा दर** (S) = $\frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{बदलते भांडवल}}$ X $\frac{१००}{१}$ = $\frac{C}{V}$ X $\frac{१००}{१}$

= $\frac{४}{४}$ X $\frac{१००}{१}$ = **१००%**

**नफ्याचा ताळेबंद :**

भांडवलदार वर्गासाठी हा ताळेबंद पुढीलप्रमाणे राहील.

एकूण खर्च = (स्थिर व बदलता)

४० + ४ = ४४ लाख श्रम तास

एकूण नफा = अतिरिक्त मूल्य

= ४ लाख श्रम तास

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{कायम + बदलते भांडवल}}$$

$$= \frac{\text{४ लाख}}{\text{४४ लाख}}$$

$$= \text{९.०९}$$

**भांडवलशाहीचा अंत :**

वरील उदाहरणांमध्ये ही बाब स्पष्ट होते की, भांडवलशाहीमध्ये नफ्याचा दर स्थिर असतो. मात्र भांडवलदार स्थिर, भांडवलामध्ये सातत्याने वाढ करीत राहतात. नफ्याचा दर हा कामगारांचा शोषणाच्या दरावर आधारलेला असल्याने भांडवलदार उत्पादनतंत्रात सुधारणा करत कामगारांची व पर्यायाने एकूणच उत्पादकता वाढवून नफा महत्तम करीत राहतात, यातून काही अंतर्विरोधी घटना भांडवलशाहीत घडू लागतात. जसे भांडवलदारांमध्ये आपआपसामध्ये गळेकापू स्पर्धा उभी राहते. मोठे भांडवलदार छोट्या उद्योगांनी नष्ट करतात परिणामी अतिशय थोड्या अशा मोठ्या भांडवलदार वर्गाची मक्तेदारी निर्माण होते. या उरलेल्या भांडवलदारांमध्ये देखील बाजारपेठेच्या वर्चस्वासाठी आणि नफा प्राप्तीकरता 'किंमत युध्द' सुरु होते. दुसरा परिणाम होतो तो म्हणजे 'बेकारांची' राखीव फौज तयार होते. नफ्याचा दर जरी घटत असला तरी शुध्द नफ्यामध्ये सातत्याने वाढ होत जाते.

या सर्व परिस्थितीच्या परिणामांतून कामगार वर्गाची परिस्थिती अतिशय दयनीय होते. अतिउत्पादन त्यातून अतिरिक्त मूल्य व त्याद्वारे महत्तम नफा या हव्यासापोटी भांडवलदार वर्ग सातत्याने उत्पादकतेत वाढ करणारी उत्पादन तंत्रे, यंत्रे वाढवतात. परिणामी कामगारांच्या बेकारीत व दारिद्र्यात भर पडत जाते. यातून समाजात परस्परविरोधी दोन गट निर्माण होतात. एका बाजूला प्रचंड संपत्ती, ऐशोआराम असलेला 'आहे रे' वर्ग (Haves) चा वर्ग तर दुसऱ्या बाजूला प्रचंड बेकारी, दारिद्र्य, मागासलेपणा, शोषण सहन करणारा 'नाही रे' (Have not) वर्ग, मार्क्सच्या मते,'आर्थिक व औद्योगिक विकास वाढत असताना कामगारांचे वेतन मात्र न वाढता ते सातत्याने घटत जाते. ते एवढे घटते की निर्वाह पातळीच्याही खाली जाते. वेतन दरातील घट ही इतकी वेगवान असते की, त्या तुलनेत आर्थिक विकासाचा आणि लोकसंख्यावाढीचा दर देखील कमी असतो.

मार्क्सच्या मते, या सर्व प्रक्रियेचा अंत हा अति भांडवल संचय व नफा मिळविण्याचा अति हव्यास यातच होतो. कारण या शोषणाला कंटाळून कामगारवर्ग क्रांती करेल व कामगार पक्षाची सत्ता येईल. भांडवलशाहीच्या जागी 'साम्यवाद' व्यवस्था येईल व कामगार वर्गाची हुकुमशाही सत्ता स्थापन होईल.

**२.२.४.७ कार्ल मार्क्स व अविकसित अर्थव्यवस्था : (Marx & Undeveloped Economies)**

मार्क्सने आपले 'आर्थिक विकास' विषयक प्रतीमान मांडताना मुख्यत्वे विकसित अर्थव्यवस्थांमधील सामाजिक, आर्थिक परिस्थिती नजरेसमोर ठेवलेली दिसून येते. इंग्लंड, फ्रान्स यांसारख्या देशांमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर ज्या वसाहती निर्माण झाल्या, त्या वसाहतींचे व्यापारी उद्देशाने झालेले शोषण या सर्वातून भांडवलशाहीचा होत गेलेला उदय, विकास व तिच्या अंतांची प्रक्रिया यांची मिमांसा मुख्यत्वे मार्क्सने केलेली दिसून येते, असे

असले तरी त्याचा विचार कक्षेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अविकसित देशांचे संदर्भ आलेले आहेत. सन १८५३ मध्ये त्याने 'न्यूयॉर्क ट्रिब्युन' या वृत्तपत्रामध्ये भारताच्या संदर्भात दोन लेख लिहिले होते. 'भारतातील ब्रिटीश सत्ता' व 'भारतातील ब्रिटीश सत्तेची भविष्यकालीन फलनिष्पत्ती' हे त्या दोन लेखाची शिर्षक होते. यामध्ये त्याने भारताचा भविष्यकाळ उज्जवल असल्याचे मत मांडले होते. त्यासाठी त्याने 'भारतातील ब्रिटीशांचा वसाहतवाद' कारणीभूत ठरेल असेही म्हटले. भारतातील 'ग्रामव्यवस्था' (Village System) ही भारताच्या तांत्रिक प्रगतीमध्ये अडथळा ठरेल असे तो सांगतो. कारण या ग्रामपध्दतीमुळे सरंजामशाही व भांडवलशाहीची पूर्वावस्था गाठण्यात अडथळा येईल असे त्याला वाटले. त्याने आपल्या संपूर्ण विश्लेषणामध्ये अर्थव्यवस्थेतील प्रचलीत परिस्थिती संस्थात्मक सामाजिक व राजकीय रचना विचारात घेऊन अर्थव्यवस्था गतीशिल होण्यामध्ये कोणकोणते घटक कारणीभूत ठरतात याची मिमांसा केली आहे. मागास देशांतील सामाजिक व आर्थिक स्थिती तसे ग्रामव्यवस्था यांमुळे तेथे विकासाची 'कुंठीत अवस्था' असल्याचे तो सांगतो. भारतातील याच 'ग्रामीण स्वयंपूर्ण' अशा केंद्रीत व्यवथेला ब्रिटीशांनी रेल्वे वाहतूक, विमान वाहतूक व जलमार्गांची उभारणी व विकास करुन मोडून काढले असे मार्क्स दाखवून देतो. भारताच्या भवितव्याविषयी मार्क्स खूपच सकारात्मक होता. त्याच्या मते,'भारतात नजिकच्या काळात लवकरच औद्योगिक विकास होऊन भांडवलशाही व्यवस्था अस्तित्वात येईल. मात्र मार्क्सची ही अपेक्षा फोल ठरली.

### २.२.४.८ मार्क्सच्या विकास सिध्दांतांचे टिकात्मक परीक्षण : (Critical Evaluation of Marxs Development Theory)

आर्थिक विकास सिध्दांतांची मार्क्सने केलेली मांडणी, त्याचे एकूण योगदान हे महत्त्वपूर्ण असेच आहे. मात्र तरीही, देश-काल-स्थितीपरत्वे अपूर्ण व्यावहारिक पातळीवर त्याच्या विचारांचे चिकीत्सक मूल्यमापन होणे गरजेचे आहे.

**१. मार्क्सचे सैध्दांतिक विश्लेषण व लिखाण विवादास्पद होते :**

मार्क्सने लिहिलेला 'दास कॅपीटल' हा ग्रंथ म्हणजे त्याच्या विचारांचा 'संपूर्ण संग्रह' होय. मात्र याच 'दास कॅपीटल' ग्रंथावर अनेक विचारवंतांनी जोरदार टीका केली. त्यामुळे तो प्रचंड विवादात सापडला. अर्थतज्ज्ञ उउले डिलार्ड म्हणतात की,'अर्थशास्त्राच्या इतिहासात आजवर तीन ग्रंथ महत्त्वाचे ठरले आहेत. यामध्ये १९व्या शतकातील ॲडम स्मिथचा 'वेल्थ ऑफ नेशन्स' १९व्या शतकातील कार्ल मार्क्सचा दास कॅपीटल

**२. नफ्याचा दर घसरेलच असे नाही :**

मार्क्सच्या मते, जसजशी अंगीकृत भांडवल साठ्यात वाढ होत जाते तसतसा नफ्याचा दर घटत जातो. मात्र वास्तवात तसे घडत नाही. कारण जर अंगीकृत भांडवलाच्या वाढीमुळे श्रमाच्या उत्पादकता वाढीबरोबरच काही तांत्रिक बदल देखील घडून येतात व या दोहोंच्या एकत्रित परिणामातून नफ्याच्या दरातील घट रोखली जाते. त्यामुळे मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे भांडवलदारांमधील आपसातील तीव्र स्पर्धा, नवीन उत्पादन तंत्राच्या वापरामुळे बेकारांची राखीव फौज निर्माण होणे इ. घटना घडणारच नाहीत.

### ३. वेतन दरातील घटींचे भाकीत चूक :

मार्क्सने आपल्या विश्लेषणात तंत्रवैज्ञानिक उपयोजनाने श्रमिकांची उत्पादकता वाढून त्याचे वेतन घटत जाईल व बेकारी वाढत जाईल असे भाकीत केले होते. यातून कामगारांची स्थिती अतिशय दयनीय होईल. मात्र अलिकडील काळात विकसित भांडवलशाही देशांतील कामगाांची स्थिती सुधारत असून त्याचे वेतनाचे दर हे सातत्याने वाढत जात आहेत.

### ४. औद्योगिक केंद्रीकरणाचा कोणताही धोका नाही :

मार्क्सने अतिरिक्त मूल्याच्या वाढीतून औद्योगिक केंद्रीकरण होईल असे सांगितले. त्याद्वारे मोठ्या प्रमाणावरील बडे उद्योग छोट्या उद्योगांना नष्ट करतील. फार थोड्या मोठ्या उद्योगांमध्ये पुन्हा गळेकापू स्पर्धा सुरु होईल. या सर्वांतून संपत्तीचे केंद्रीकरण होऊन आर्थिक विषमता वाढेल. या सर्वांतून वर्ग संघर्ष निर्माण होईल. मार्क्सचा या सर्व म्हणण्यानुसार मोठे बहुराष्ट्रीय उद्योग निर्माण झाले. मात्र त्यांच्यामुळे विषमता वाढून मक्तेदारी आणि वर्ग संघर्ष निर्माण झालेला नाही. कारण अमेरिकेतील 'अँटी ट्रस्ट ॲक्ट' भारतातील 'एम.आर.टी.पी. कायदा' यांसारखी कायदेशीर बंधन घातली जात आहेत.

### ५. बचत गुंतवणुक सहसंबंधावर प्रकाश टाकला :

मार्क्सनी आपल्या आर्थिक विकासाच्या दिर्घकालीन व गतीशिल प्रक्रियेचे विश्लेषण करताना 'बचत' व 'गुंतवणूक' या दोन महत्त्वपूर्ण चलांचे कार्य, त्यांच्यातील सहसंबंध शास्त्रीय पध्दतीने विषद केले. ज्याचा उपयोग भावी काळात हॅरॉड-डामर सारखी विकास प्रतिमाने विकसित करताना झाला.

### ६. अतिरिक्त मूल्य व श्रम सिध्दांत या संकल्पनांमध्ये मोठा गोंधळ :

अनेक अर्थतज्ज्ञांच्या मते मार्क्सचा 'श्रम सिध्दांत' हा परस्पर विसंगत गोंधळानी भरलेला आहे. त्याची 'अतिरिक्त मूल्य' ही संकल्पना अनेकांना शास्त्रीय आणि व्यावहरिकदृष्ट्या चुकीची वाटते. कारण मार्कर्सचे हे अतिरिक्त मूल्य म्हणजे (V) फक्त बदलत्या भांडवलाचे फल असून ते सर्व उत्पादन घटकांपासून समान प्राप्त होते.

### ७. सामाजिक बदलाचा सिध्दांत फोल ठरला :

मार्क्सने आपल्या आर्थिक विचारांमध्ये 'सामाजिक बदलांचा सिध्दांत' मांडला. त्यामध्ये त्याने सामाजिक बदलाच्या चार अवस्था मांडल्या. या अवस्था क्रमाक्रमाने येत जातील. प्रत्येक अवस्था ही परिपक्व झाल्यानंतरच त्या ठिकाणी दुसरी अवस्था निर्माण होईल असे मार्क्सने प्रतिपादन केले. मात्र काळाच्या ओघात मार्क्सचे हे भाकीत देखील खोटे ठरले. कारण १९१७ मध्ये जेव्हा रशियात क्रांती झाली. तेव्हा रशियामध्ये काही भांडवलशाहीचा पूर्णत्वाने विकास झालेला नव्हता. सन १९४९ मध्ये जेव्हा चीनने राज्यक्रांती पाहिली तेव्हा तर चीन हा एक कृषीप्रधान देश होता.

### २.२.४.९ मार्क्सवादाची सद्यस्थिती : (Present situation of Marxism)

मार्क्सच्या विचारांचे कितीही टिकात्मक परिक्षण केले त्याचे खंडन केले, त्यावर वाद प्रतीवाद घातले तरी त्याच्या विचाराचे प्रचंड गारुड संपूर्ण मानवजातीवर कालही होते, आजही आहे व उद्याही राहणार. त्यामुळेच १९९७ ते १९९४ पर्यंत जगभरातील अनेक देशांमध्ये साम्यवादी राज्यव्यवस्था होत्या. रशिया, चीन, व्हिएतनाम, क्युबा, उत्तर कोरिया, पूर्व

युरोपातील अनेक देश यामध्ये येतात. परंतु गेल्या काही वर्षामधये साम्यवादी देशांमध्ये झपाट्याने बदल होत गेलेले दिसून येतात. यामध्ये रशियाचे माजी अध्यक्ष मिस्त्राईल गोर्बाचेव्ह यांनी स्विकारलेल्या धोरणांमुळे सर्वच समाजवादी देशांचे आर्थिक व राजकीय स्वरुपच बदलत गेले. एके काळी स्टॅलीनच्या काळातील रशियाचा ज्याची ओळख 'पोलादी पडद्याचा देश' अशी होती. तिथे व्यक्तीस्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्य नव्हतेच. पण रशिया नावाच्या देशात नक्की काय चाललयं हे बाह्य जगाला समजणे महाकठीण होते. गोर्बाचेव्ह यांनी लोकांना मुक्त विचारांचे दिले. आता रशियात कम्युनिस्ट पक्षाची एकाधिकारशाही जाऊन इतर अनेक राजकीय पक्षांना देखील मान्यता आहे. गोर्बाचेव्ह यांनी काही नवीन आर्थिक सुधारणा (Perestroika) देखील राबविल्या. आता रशियामध्ये कृषी व इतर क्षेत्रामध्ये खासगी गुंतवणुकीला मुक्त वाव देण्यात आला. पूर्वी वस्तू व सेवांच्या किंमती सरकार ठरवीत असे. आता या किंमती 'बाजार यंत्रणेमार्फत' ठरू लागल्या आहेत. रशियामध्ये आता परकीय भांडवल व मदत देखील स्वागतार्ह आहे. हे सर्व बदल का व कसे झाले, याचे गंभीर चिंतन मार्क्सवादाला करावे लागत आहे. या विचारसरणीत व व्यवस्थेत नेमक्या उणिवा आहेत का त्या कालसुसंगत नाहीत.

### २.२.५ रोझेन्स्टिन रोडान यांचा प्रबळ धक्का सिध्दांत : (Big Push Theory of Rosenstein Rodan)

#### २.२.५.१ प्रस्तावना :

गतीहीन अर्थव्यवस्थेला असलेले मुळचे जडत्व नष्ट करुन तिला जास्तीत जास्त उत्पादनक्षम करण्याच्या दृष्टिने अनेक छोटे-छोटे व वेगवेगळ्या कालखंडात विभागलेले प्रयत्न करण्यापेक्षा एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर, सुसंघटीत व व्यापक स्तरावरील प्रयत्न करणे गरजेचे आहे. असा मतप्रवाह १९५० व्या दशकात व्यक्त होऊ लागला. सन १९४३ मध्ये या विचारप्रवाहाला बळकटी देणारा सिध्दांत प्रो. पॉल एन. रोझेन्स्टीन रोडान यांनी मांडला. यालाच रोडान यांचा प्रबळ धक्का सिध्दांत असे म्हणतात.

#### २.२.५.२ रोडान यांचा प्रबळ धक्का सिध्दांत :

रोडान यांच्या सिध्दांतांची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की, विकास प्रक्रिया ही तुटक वा खंडित अशा उड्डाणांची बनलेली असते. यामध्ये विकासाकरता आवश्यक असणारे जे घटक असतात ते परस्परांशी संबंधीत व किमान आकाराचे असतात. त्यामुळे आर्थिक विकासाचा किमान असा एक टप्पा गाठण्याकरता साधनसामग्रीचा व संसाधनांचा असा प्रबळ वापराचा प्रयत्न व्हायला हवा. जो मोठ्या प्रमाणावर परिणामकारक विकास घडवून आणेल यासाठी रोडान विमानाच्या उड्डाणाचे उदाहरण देतात,'एखादे विमान धावपट्टीवरून आकाशात झेपावयाचे असेल तर त्याला किमान एक वेग मर्यादा ओलांडावीच लागते. ही प्रक्रिया देखील तशीच असते.'

थोडक्यात अशा प्रयत्नातून मोठ्या प्रमाणावरल उत्पादनाचे बर्हिगत फायदे प्राप्त करणे हा हेतू असतो. आपला हा दृष्टिकोन स्पष्ट करताना रोडान यांनी बाजारपेठेची व्याप्ती आर्थिक विकास गतिशील करण्यासाकरिता किती महत्त्वाचे असते याचे विश्लेषण केले.

#### २.२.५.३ आर्थिक अविभाज्यता किंवा बाह्य फायदे :

रोझेन्स्टिन रोडान यांनी तीन प्रकारचे आर्थिक अविभाज्यता किंवा बाह्य फायदे मोठया प्रमाणावर मिळतात

असे सांगितले. त्या अविभाज्यता वा बाह्य फायदे पुढीलप्रमाणे :

**१. उत्पादन फलनातील अविभाज्यता :**

हे फायदे प्राप्त करण्यासाठी उत्पादन कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक व आर्थिक सुविधांचे आकारमान वा त्यांचा पुरवठा हा विशिष्ट अशा किमान प्रमाणात असणे गरजेचे आहे. उदा. रेल्वे, रस्ते, शिक्षण, आरोग्य, वीज, दळणवळण, बँका, टपालसेवा, गृहनिर्माण यांसारख्या सोयी-सुविधांची उपलब्धता किमान एका विशिष्ट प्रमाणातच असाव्या लागतात. कारण या सोयी-सुविधा जर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतील तर इतर उद्योग व्यवसायांच्या उत्पादन विनीमयासाठी लागणारी गुंतवणूक देखील वाढते, या वरील सेवा किमान प्रमाणात उपलब्ध असल्याशिवाय इतर व्यवसाय उद्योगांचा विकास होत नाही. कारण या सेवा परदेशांतून आयातही करता येत नाहीत. शिवाय या घटकांवरील गुंतवणूक ही दिर्घकालीन स्वरूपाची असते. त्याचा फलधारणा काळ दिर्घ मुदतीचा असतो. त्यामुळे ही गुंतवणूक किमान स्तरावर झाल्याशिवाय ती परिपूर्ण ठरत नाही. रोडानच्या मते विकसनशील देशांनी त्यांच्या एकूण गुंतवणूकीच्या ३० ते ४०% गुंतवणूक या घटकांवर करणे गरजेचे आहे. तरच या देशाच्या विकास प्रक्रियेला गती प्राप्त होऊ शकते. त्यामुळे या 'अविभाज्यता' घटकांवर विकसनशील देशांनी फार मोठ्या प्रमाण किमान आवश्यक गुंतवणूक करणे गरजेचे आहे. सामाजिक वरकड भांडवल कालाची अविभाज्यता, टिकाऊपणाची अविभाज्यता, दीर्घ फलधारणाकाळाची अविभाज्यता व विविध सार्वजनिक उपयुक्ततांचे मिश्रण असणारी ही अविभाज्यता असते.

अशा प्रकारे सामाजिक वरकड भांडवलाच्या पुरवठ्याच्या अविभाज्यता हा विकसनशील देशाच्या विकास प्रक्रियेतील मुख्य अडसर आहे. त्यामुळे उत्पादनाची प्रक्रिया गतीमान होऊन उत्पादकतेत वाढ होण्याकरता प्रारंभीच्या सामाजिक वरकड भांडवलाची गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर आणि आवश्यक तेवढी झाल्यास विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला गती मिळू शकेल.

**२. मागणीची अविभाज्यता :**

रोडाननी मांडलेली ही संकल्पना नंतर रॅग्नर नर्क्स यांनी 'संतुलित विकास' संकल्पनेचे स्पष्टीकरण देताना अधिक विस्तृतपणे मांडली. प्रो. रोडानच्या मते, मागणीची अविभाज्यता तेव्हाच प्राप्त होऊ शकते जेव्हा परस्परांवर अवलंबीत असणाऱ्या उद्योगांच्या विकासाचा एकाच वेळी मोठा प्रयत्न केला जाईल. कारण एकाच विशिष्ट प्रकल्प वा उद्योगात मोठी गुंतवणुक करण्यामध्ये मोठा धोका व फलनिष्पत्तीची अनिश्चितता जास्त असते. कारण असा प्रकल्प मोठी गुंतवणुक करुन जरी पूर्ण झाला तरी त्याच्या वस्तू या सेवांना मागणी असेलच असे नाही. त्यामुळे एकच एक उद्योग सुरु न करता परस्परांवर अवलंबून असणारे एकापेक्षा जास्त उद्योग एकाच वेळी सुरु करावेत. यातून ते उद्योग एकमेकांच्या वस्तूंना मागणी निर्माण करतील. रोडान यासाठी पादत्राण उद्योगाचे उदाहरण देतात.

समजा, कोणताही परकीय व्यापार नसणारा एक अविकसीत देश आहे. ही एक बंद अर्थव्यवस्था आहे. निर्वाह क्षेत्रातील १०० छुप्या बेकारांना पादत्राणे बनविणाऱ्या कारखान्यात रोजगार दिला. त्यातून त्यांना जे वेतन मिळते त्याद्वारे त्यांचे उत्पन्न वाढते. आता त्यांना मिळालेले हे सर्व उत्पन्न त्यांची जर पादत्राण खरेदी करण्यावरच

खर्च केले तर त्या कारखान्यांची मागणी पूर्ण होऊ शकते. मात्र हे कामगार तसे करणार नाहीत. कारण त्यांना त्या उत्पन्नाद्वारे आपल्या इतर उपभोग्य वस्तू आणि सेवा खरेदी करावयाच्या असतात. परिणामी पादत्राणांना बाजारपेठ उपलब्ध होणार नाही. यामुळे या कारखान्यातील गुंतवणूक ही धोक्याची ठरते. म्हणून हा कारखाना सहसा कुणी सुरु करणारच नाही. याउलट जर एक पादत्राणाचा कारखाना सुरु करण्याऐवजी १०० प्रकारच्या उपभोग्य वस्तू आणि सेवा उत्पादन करणारे १०० प्रकारचे कारखाने चालू केले व त्यासाठी १०,००० छुप्या बेकारांना रोजगार दिला तर हे प्रत्येक जण एकमेकांच्या वस्तूचा मागणी निर्माण करतील व मागणीची अविभाज्याला तयार होईल.

यातून पुढील दोन घटक स्पष्ट होतात.

१. नवीन रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या श्रमिकांचे उत्पन्न त्या उपभोग्य वस्तूंवर खर्च होते. त्यांच्या उत्पादनासाठी किमान विशिष्ट प्रमाणात गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

२. एका उद्योगात केली जाणारी गुंतवणूक ही दुसऱ्या उद्योगातील गुंतवणूकीवरुन ठरते.

म्हणजेच या गुंतवणूक निर्णयांमध्ये एक प्रकारची परस्पर घनिष्ठ अशी अविभाज्यता दिसून येते.

**३. बचतीच्या पुरवठ्यातील अविभाज्यता :**

अल्पविकसीत देशाच्या जलद आर्थिक प्रगतीकरता मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीची गरज असते. मात्र अशा गुंतवणुकीसाठी मोठ्या व व्यापक स्वरुपात बचत उपलब्ध होणे गरजेचे आहे. अल्पविकसित देशात दारिद्र्य जास्त असल्याने उत्पन्नपातळी आधीच अल्प असते. त्यामुळे बचतीची फारशी शक्यता नसते. म्हणूनच रोडान या बचतीच्या वैशिष्ट्याला 'बचतीच्या पुरवठ्याची अविभाज्यता' असे म्हणतात. यातून मार्ग काढण्यासाठी तेव्हा मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक विविध क्षेत्रांमध्ये केली जाईल. तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाचा फार मोठा भाग बचतीत रूपांतरित केला पाहिजे. यासाठी सीमांत बचतीचा दर हा सरासरी बचतीच्या दरापेक्षा जास्त ठेवावा लागेल. मात्र याकरता किमान विशिष्ट प्रमाणात बचत व गुंतवणुक होणे गरजेचे आहे.

थोडक्यात आर्थिक विकासातील अडथळे दूर करुन अर्थव्यवस्थेला गतीक्षम बनविण्यासाठी एका किमान मोठ्या प्रमाणात (Big Push) भांडवल गुंतवणुकीची गरज असते. कारण अल्पविकसीत देशांमध्ये एक प्रकारची मानसिक अविभाज्यता वास करीत असते. ज्यामुळे लोकांना आवश्यक तेवढे सामर्थ्य व उत्साह देणे गरजेचे असते.

**२.२.५.४ टिकात्मक परिक्षण :**

प्रो. रोझेन्स्टिन रोडान यांनी आपल्या सिध्दांतांचे विवेचन अविभाज्यता मोठ्या प्रमाणाच्या बचती, विकास प्रक्रिया ही खंडीत उड्डाणांची असते. या संकल्पनांच्या आधारे केलेले दिसून येते. त्यामुळे त्यांचे विचार हे श्रमिक वास्तवदर्शी व कालसुसंगत वाटतात. रोडान यांनी आपल्या विवेचनाद्वारे समतोलीत अवस्थेकडे जाण्याचा मार्ग स्पष्ट केलेला आहे. त्यांनी विकसनशील देशांतील बाजारपेठांची अपूर्णता लक्षात घेऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात व एकत्रितरित्या, एकाच वेळी मोठी भांडवल गुंतवणूक होणे कसे गरजेचे आहे हे शास्त्रीयदृष्ट्या

दाखवून दिले. रोडान यांचे आर्थिक विकासाचे हे प्रारूप वास्तवदर्शी असते तरी त्यावर पुढील टीका केल्या जातात.

**१. वास्तव खर्चातील वाढीची शक्यता :**

रोडान सांगतो त्याप्रमाणे जर एकाच वेळी अनेक उद्योगांमध्ये गुंतवणुक केल्यास विविध प्रकारची भांडवल साधने, कुशल श्रमाचा पुरवठा, वीज, विजपुरवठा, कच्चा माल इ. साधनसामग्री तौलनिकदृष्ट्या दुर्मीळ होऊ लागेल. यातून त्यांच्या किंमती व खर्च वाढेल. या खर्चामुळे उत्पादनसाठीचा पैशातील आणि वास्तव खर्च वाढू लागेल. त्यामुळे उत्पादित वस्तू व सेवांची किफायतशीर विक्री करण्यामध्ये अनेक अडथळे येतील.

**२. उत्पादन घटकांची स्पर्धात्मकता :**

प्रा. जे. मार्क्स फ्लेमींग यांच्या मते, विकसनशील देशांमधील प्राथमिक अवस्थेतील उद्योगांमधील उत्पादनाचे घटक हे परस्परांशी पूरक असतात. मात्र उत्पादन प्रक्रिया जसजशी विकसीत होत जाते तसतसे हे उत्पादन घटक परस्परांशी स्पर्धक ठरू लागतात.

**३. किफायतशीर उत्पादनाची शक्यता :**

प्रा. किंडल बर्जर यांच्या मते रोडानने गृहीत धरल्याप्रमाणे मागणीची निर्मिती उत्पन्नाद्वारे होते. मात्र प्रत्येक उद्योग आपला उत्पादनखर्च कमी ठेवण्याकडे लक्ष देत असतो. त्यातून उत्पन्न पातळी कामगारांच्या बाजूने सतत वाढतच राहील असे नाही.

**४. आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे दुर्लक्ष :**

प्रो. जॅकोब वायनर यांच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंधातून अविकसित देशांना अनेक परकीय गुंतवणूकाच्या संधी उपलब्ध असतात. शिवाय या देशांच्या एकूण गुंतवणुकीचा फार मेठा वाटा भाग परकीय निर्यातीसाठी खर्च केला जातो. त्या तुलनेत आयातीसाठीची गुंतवणूक अल्प असते.

**५. शेती क्षेत्रातील गुंतवणुकीकडे दुर्लक्ष :**

विकसनशील देश हे मुख्यत्वे शेतीप्रधान असतात. येथील फार मोठी लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या अवलंबून असते. त्यामुळे जर या शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक केली तर त्याचा विकास प्रक्रियेवर होणारा परिणाम रोडान यांनी दुर्लक्षित केला. शेतीत खते, बी-बियाणे, जंतुनाशके, किटकनाशके, यंत्रे-अवजारे, पाणीपुरवठा, वीज, वाहतुक इ. सोयी-सुविधांवर जर गुंतवणुक झाली तरच विकासाच्या गती प्राप्त होईल.

**६. भाववाढ होण्याची शक्यता :**

रोडानने सांगितलेला मार्ग जर विकसनशील देशांनी अंगीकारला तर त्यांना त्यासाठी फार मोठी व दिर्घकालीन गुंतवणुक करावी लागेल व अशा देशांनी एवढी मोठी गुंतवणूक करण्यासाठी पैशाचा पुरवठा वाढवावा लागेल व त्यासाठी तुटीच्या अर्थभरण्याचा मार्ग अंगीकारावा लागतो. मात्र यातून विकास प्रक्रिया

अवरूध्द करणारी भाववाढ निर्माण होते.

**७. अल्प गुंतवणुक देखील किफायतशीर :**

प्रा. जॉन ॲडलर यांनी भारत, पाकिस्तान व अन्य आशियायी देश, दक्षिण अमेरिकेतील काही राष्ट्रे यांचा अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की, अल्प प्रमाणावर गुंतवणूक केलेले प्रकल्प देखील फायद्याचे ठरलेले दिसून येतात. म्हणून विकासाची प्रक्रिया गतमीन करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावरच भांडवल गुंतवणुक करणे ही एकमेव पूर्वअट असू शकत नाही.

**८. संस्थात्मक व व्यवस्थात्मक अडथळ्यांकडे दुर्लक्ष :**

रोडान यांची वर्णिलेला 'प्रबळ धक्का' सिध्दांत जर विकसनशील देशांचा लागू करावयाचा झाला तर त्यासाठी सुदृढ अशी संस्थात्मक रचना अस्तित्वात असणे गरजेचे असते. प्रशासन, बाजारपेठा यांची व्यवस्था देखील गतमीन असावी लागते. दुर्दैवाने विकसनशील देशांमधील संस्थात्मक रचना ही अतिशय मागास, बंदिस्त असतात. प्रशासन, श्रमबाजार हे अकुशल असतात.

**२.२.५.५ समारोप :**

रोडान यांच्या विश्लेषणावर वरील विविध टिका तरी होत असल्या तर विकसनशील देशांमधील बंद स्थितीतील, शिथील पडलेल्या विकास प्रक्रियेला चालना देण्याचा एक संभाव्य मार्ग त्यांनी दिला. हे नाकारुन चालणार नाही. पूर्वापार असलेले दारिद्र्य, विकास प्रक्रिया अवरुध्द करणारी सामाजिक व संस्थात्मक रचना यांना पुनरुज्जीवीत करण्याकरता एका मोठ्या प्रयत्नांची गरज यासाठीच आवश्यक वाटते.

**२.२.६ प्रो. गुन्नार मिर्डाल यांचा चक्रिय कार्यकारण सिध्दांत :**

**(Prof. Gunnar yrdals Theory of Circular Cumulation Causation)**

**२.२.६.१ प्रस्तावना :**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक विषमता हा विषय ज्यांनी प्रकर्षाने पुढे आणला त्यातील एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे 'गुन्नार मिर्डाल' होय. अर्थशास्त्राच्या इतिहासात जो नावलौकिक ॲडम स्मिथला 'वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथामुळे लाभला. कार्ल मार्क्सला जो गौरव 'दास कॅपीटल' या ग्रंथामुळे मिळाला. लॉर्ड केन्सला जी जागतिक प्रसिध्द जनरल थिअरीने मिळवून दिली. या सर्वाप्रमाणेच अर्थशास्त्रज्ञ म्हणून तितकेच गौरवशाली स्थान गुन्नार मिर्डाल यांना त्यांच्या एशियन ड्रामा या ग्रंथाने प्राप्त करुन दिले. मिर्डाल यांची आपल्या आंतरराष्ट्रीय विषमतेच्या मिमांसेमध्ये विविध घटकांच्या चक्रीय कार्यकारण संबंधाची (Circular Causation) चर्चा केली आहे. ही विषमता त्याने या संबंधातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील प्रतिसारक व विस्तारक परिणामांद्वारे व वर्धमान प्रक्रियेद्वारे स्पष्ट केलेली आहे.

**२.२.६.२ स्थिर भांडवलाच्या कल्पनेचा त्याग :**

आपल्या सिध्दांताची मांडणी करताना मिर्डालनी अर्थव्यवस्थेची स्थिर संतुलनाची (Stable Equalibrium)

प्रवृत्ती हे गृहीतक नाकारले. त्यांच्या मते, अर्थव्यवस्थेमध्ये असे स्थिर संतुलन असत नाही. तर विविध गतीमान घटकांच्या व सामाजिक प्रक्रियेच्या (Social Process) विश्लेषणासाठी हे जुने गृहीत तत्त्व अडसर ठरणारे आहे.

आजवर पारंपारिक दृष्टिकोन हा सामाजिक प्रक्रियेचे विश्लेषण हे विशिष्ट दिशेने फिरत राहणारी प्रक्रिया जिचे वर्णन विविध घटकांमधील स्थिर संतुलनाची अवस्था असे करता येईल. अर्थव्यवस्थेत एखादा बदल घडून आला तर त्याच्या विरुध्द प्रतिक्रिया देणारा असा काही बदल घडून येतो की, जो पहिल्या बदलाचा प्रभाव कमी किंवा नष्ट करतो आणि या दोन्ही बदलांच्या क्रिया प्रतिक्रिया एकाच काळात घडून आल्याने संतुलन अवस्थेत कोणताही बदल होत नाही. थोडक्यात या क्रिया-प्रतिक्रियांद्वारे सामाजिक प्रक्रियेमध्ये एका विशिष्ट दिशेने जाण्याची प्रवृत्ती राहते. स्थिर संतुलनामध्ये बिघाड आणणारे घटक हे त्यांच्याच क्रिया-प्रतिक्रियांनी निष्क्रिय होत असतात. थोडक्यात या सर्व प्रक्रियेमध्ये 'स्व-स्थिरीकरणाची' (Self Stabilization) क्षमता असते.

प्रो. मिर्डालनी याच्या अगदी उलट मत व्यक्त केले आहे. जे म्हणतात की, सामाजिक आंतरक्रियेमध्ये असे 'स्व-स्थिरीकरण'असत नाही. परिणामी प्रत्यक्षात संतुलनाऐवजी असंतुलन अवस्थाच पाहायला मिळते. एवढेच नव्हे तर विशिष्ट क्रियेमुळे एखाद्या बदलाच्या प्रक्रियेच्या विरुध्द बाजूने कोणतीही प्रक्रिया न घडून येता तिला पोषक ठरणाऱ्या सम दिशेनेच इतर बदल घडू लागतात. परिणामी असे संतुलन दूर होण्याऐवजी तिच्यामध्ये वाढ होण्याचीच शक्यता जास्त असते. विषमतेच्या दृष्टिने पाहिले असता अनुकूल घटना घडत गेल्याने काही अर्थव्यवस्थांची प्रगती होत राहते. मात्र त्याऐवजी जर प्रतिकूल घटना घडत गेल्या तर त्या अर्थव्यवस्थेचा मागासलेपणा आणि विषमता यांमध्ये वाढ घडवून आणतात.

### २.२.६.३ दुष्टचक्रांचा प्रभाव :

जागतिक पातळीवर वाढत जाणाऱ्या दुष्ट चक्रांचा (Vicious Circles) प्रभाव या संकल्पनेचा आधार घेतला आहे. जेव्हा एखादा प्रतिकुल घटक (Negative Factor) हा दुसऱ्या तशाच एखाद्या प्रतिकुल घटकाचा कारण व परिणाम असतो. यातुनच दुष्टचक्राची निर्मिती होते. मात्र येथे एखादाच विशिष्ट घटक कारण आहे किंवा त्याचा परिणाम आहे हे नेमकेपणाने सांगता येत नाही. कारण ज्याला आपण एखाद्या घटकाचा कारण म्हणू तो कदाचित दुसऱ्या घटकांचा परिणाम देखील असू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रो. नर्क्से यांनी दिलेले दारिद्र्याच्या दुष्टचक्रांचे विश्लेषण नर्क्से म्हणतात,'एखादी व्यक्ती गरीब असल्याने तिचे उत्पन्न अल्प आणि राहणीमानाचा दर्जा निकृष्ट असतो. त्यामुळे त्याची शारीरिक व मानसिक क्षमता अलप राहते. त्यामुळे त्याच्याकडे कौशल्य आणि उत्पादकता दोन्ही अल्प राहतात. परिणामी तो आणखी गरीब होतो. हीच बाब एखाद्या देशालाही तंतोतंत लागू होते. एखादा देश गरीब आहे याचे कारण तो गरीब आहे. (A country is Poor because it is Poor)

थोडक्यात, दारिद्र्याच्या या दुष्टचक्रामध्ये अनेक घटकांचा चक्रीयकार्यकारण संबंध असतो. प्रत्येक येणारा घटक हा पुढच्या घटकाचे कारण ठरत असतो. शिवाय या सर्व घटकांचा एकमेकांवर होणारा परिणाम हा वर्धमान प्रक्रियेद्वारे होत असल्याने हे दुष्टचक्र आणखी तीव्र होते. या दुष्टचक्रामधील गरीबी न्युन उत्पन्न- निकृष्ट

राहणीमान - अल्प उत्पादकता-गरीबी यांचे एकमेकांशी परस्परसंबंध तर असतातच पण यामुळे त्याचे दारिद्र्य आणखीवाढत जाते.

### २.२.६.४ चक्रिय कार्यकारण संबंध व वर्धमान प्रक्रिया :

मिर्डालने आपल्या संपूर्ण विश्लेषणामध्ये एक मुख्य गोष्ट गृहीत धरली ती म्हणजे'अर्थव्यवस्तेील विविध कारक चले' ही परस्परांशी चक्रिय पध्दतीने जोडलेली असतात. शिवाय ही कारक चले परस्परांसाठी कारण व परिणाम ठरत असतात. अविकीत देशांचे दरडोई उत्पन्न हे फारच अल्प असते. त्यामुळे त्यांची उपभोग व बचत प्रवृत्ती अल्प असते. त्यामुळे त्याची गुंतवणुकीची व उत्पादनाची क्षमतादेखील अल्पच राहते. म्हणून पुन्हा त्यांचे दरडोई उत्पन्न आणखी कमीच राहते. म्हणजेच वरील कारक चलांमधील परस्पर चक्रिय सहसंबंधामुळे आणि वर्धमान प्रक्रियेमुळे तो देश मागासलेलाच राहतो.

वरील बाब आणखी सविस्तरपणे स्पष्ट करण्याकरता प्रो. मिर्डाल अमेरिकेतील निग्रो समाजाचे उदाहरण देतात.

**अमेरिकेतील निग्रो समाजाचा प्रश्न :**

अमेरिकेतील निग्रो समाज हा इतर समाजाच्या तुलनेत संख्येनी जास्त असूनही आज वेगळा पडलेला आहे. त्यांची सामाजिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. प्रो. मिर्डालच्या मते, त्यांच्या या परिस्थितीमागे दोन कारक चलांचा चक्रिय कार्यकारण संबंध दिसून येतो.

१. गौरवर्णीयांच्या मनात निग्रोबद्दल जो पूर्वग्रह आहे त्यातून टोकाचा वर्णभेद निर्माण होतो.

२. निग्रो समाजाचा अतिशय खालावलेला राहणीमानाचा दर्जा.

अमेरिकन समाजव्यवस्थेतच निग्रोबद्दलच्या वर्णभेदामुळे त्यांना निकृष्ट राहणीमानाचा आणि सामाजिक दर्जा दिला जातो. त्यामुळे त्यांच्यामध्ये अल्प उत्पन्न, बेकारी, अकुशलता, निरक्षरता, व्यसनाधीनता, गुन्हेगारी वृत्ती इ. दोष निर्माण होतात. या दोषांमुळे त्यांच्याविषयीचा पूर्वग्रह आणखी बळावत जातो. त्यामुळे त्यांचे प्रश्न आणखी गंभीर होतात. थोडक्यात त्यांच्यातील वर्णभेद आणि पुर्वग्रह या दोन्ही घटकांच्या परस्पर चक्रिय सहसंबंधाने ते परस्परांचे कारणही आहेत आणि परिणामही. त्यातुनच या निग्रोंची सामाजिक, आर्थिक परिस्थिती खालावलेली राहते. प्रत्यक्षात जरी आपण असे मानले की, हे दोन्ही घटक स्थिर राहतील व परिस्थिती तशीच राहील. मात्र यातील एखादा तरी घटक बदलतो आणि वर्धमान प्रक्रिया (Cumulative) सुरू होऊन ते दुष्टचक्र अधिकच तीव्र होत जाते.

एवढेच नव्हे तर प्रो. मिर्डाल हे दाखवून देतात की या दोन घटकांमध्ये देखील आपसात चक्रीय स्वरूपाचा कार्यकारण संबंध असतो. निग्रोचे राहणीमान निकृष्ट ठेवणारा (शिक्षण, आरोग्य, नोकरी, उत्पन्न इ.) एखादा जरी घटक बदलला तरी त्याचा निग्रोंच्या राहणीमानावर अनुकूल वा प्रतिकूल परिणाम घडून येतो. याउलट जर गौरवर्णीयांचा निग्रोविषयीचा दृष्टिकोन बदलला तरीदेखील त्याचाही त्यांच्या राहणीमानावर परिणाम होईल. थोडक्यात या दोन घटकांच्या अंतर्गत कारणांमध्ये जो बदल होईल त्यावर निग्रोची परिस्थिती काय असेल हे

ठरेल. त्यामुळे या अंतर्गत घटकांचा चक्रिय सहसंबंध असल्याने ही सर्व प्रक्रिया त्यांच्यातील बदलांच्या अनुकुलतेवर वा प्रतिकुलतेवर ठरेल. शिवाय ती पुढे जाऊन वर्धमान स्वरूपाची असल्याने ती पूर्वीच्या निश्चित झालेल्या बदलाची दिशा आणि वेग वर्धीत करते.

घटक जेव्हा परिणाम करतील त्यावेळच्या काळावर ते परिणाम अवलंबून राहतील. निग्रोसाठीच्या रोजगाराच्या संधींमध्ये जर वाढ झाली तर वर्धमान प्रक्रिया वेगाने घडून येऊन त्याची परिस्थिती लवकरच सुधारू शकेल. मात्र शिक्षणाद्वारे या परिस्थितीत बदल होण्यास वेळ लागेल. प्रो. मिर्डाल यांच्या या विश्लेषणावरुन पुढील निष्कर्ष काढता येतात.

१. सामाजिक प्रक्रियेमध्ये एखादा घटक मुलभूत म्हणून वेगळा काढणे व फक्त आर्थिक घटकांचाच शोध घेणे हे चुकीचे आहे. कारण ही प्रक्रिया चक्रिय कार्यकारण संबंध असलेल्या घटकांचा परिणाम असतो.

२. आर्थिकेत्तर अशा महत्त्वपूर्ण घटकांचा विचार यापूर्वीच्या अर्थतज्ज्ञांनी केलेला नव्हता तो या सिध्दांतात केला.

३. प्रो. मिर्डाल यांनी विश्लेषण केलेला चक्रिय कार्यकारण सहसंबंधाचे गृहीत मान्य केल्यास फक्त एका घटकामध्ये योग्य दिशेने बदल करुन वर्धमान प्रक्रिया सकारात्मक दिशेने वळविता येईल. मात्र यासाठी जो कालावधी लागणार आहे त्याचा देखील विचार करायला हवा. या सर्वांच्याद्वारे दुष्टचक्रांचे रूपांतर सुष्ट चक्रांमध्ये करुन अल्पविकसित देशाचा आर्थिक विकास जलद गतीने होऊ शकेल.

### २.२.६.५ आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेची मीमांसा :

चक्रिय कार्यकारण संबंध आणि वर्धमान प्रक्रिया या दोन संकल्पनांच्या साहाय्याने प्रो. मिर्डालनी आंतरराष्ट्रीय प्रादेशिक विषमतेचे विश्लेषण केले. त्यांच्या मते, 'विविध घटकांच्या क्रिया-प्रतिक्रियांच्या सहसंबंधामुळे व त्यांचा क्रिया-प्रतिक्रियांमुळे प्रादेशिक विषमता निर्माण होते. देशाच्या काही भौगोलिक भाग असा असतो की, जेथे विकासाची प्रक्रिया योगायोगानेच सुरू झालेली असते व त्यामुळे हा भागाचा आर्थिक विकास होत जातो. मात्र इतर भूभागामध्ये देखील विकासाची तितकीच क्षमता आणि कुवत असतानाही भांडवल, कच्चा माल, यंत्रसामग्री, मजूर इ. उत्पादनाचे घटक विकसीत झालेल्याच क्षेत्राकडेच आकर्षीत होतात. त्यामुळे विकसित भागाचाच आर्थिक विकास होत राहतो व मागासलेला भाग मागासलेलाच राहतो. महत्त्वाची बाब म्हणजे विकसित देशामधील अशी प्रादेशिक विषमता कमी असून ती अधिकच कमी-कमी होण्याची प्रवृत्ती असते. याउलट जर विकसनशील देशांमधील प्रादेशिक विषमता जास्त असून ती दिवसेंदिवस वाढत जात राहते.

काही देशांमधील विकासाचे परिणाम दोन प्रकारचे असल्याचे प्रो. मिर्डाल यांनी संगितले आहेत-

१) प्रतिधारक परिणाम (Backward Effects)

२) विस्तारक परिणाम (Spread Effects)

हे दोन्ही परिणाम ज्या घटकांमुळे होतात ते घटक जरी विविध प्रकारचे असले तरी विकसनशील देशांसाठी ते सर्वसामान्यपणे पाहिले असता प्रतिसारक परिणाम जास्त क्रियाशील आणि विस्तारक परिणाम हे अक्रियाशील

असतात. त्यामुळे या देशांच्या आर्थिक विकासाची स्थिती कठीण असते.

**१) प्रतिसारक परिणाम : (Backward Effects)**

हे परिणाम असे असतात की, त्यामध्ये एका क्षेत्रात प्रगती होत असताना त्याचा दुसऱ्या क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम घडून येतो. हा परिणाम पुढील तीन घटकांद्वारे घडून येतो.

**अ) श्रमिकांचे स्थानांतरण :**

ज्या भागांच्या विकासाची प्रक्रिया सुरु असते. त्या भागाकडे कुशल श्रमिक आकर्षीत होतात व त्या भागाची अधिक प्रगती होते. परिणामी पुन्हा आणखी नवी श्रमशक्ती त्या भागाकडे आकर्षिली जाते. हे श्रमिक मागासलेल्य भागातून आलेले असतात. त्यामुळे त्या भागात श्रमिकांचा तुटवडा निर्माण होतो. तेथील विकासप्रक्रिया मात्र कुंठीत राहते. परिणामी पुन्हा त्या मागास भागातील श्रमाचे स्थानांतरण वाढू लागते.

**ब) भांडवल :**

ज्या भागाची आर्थिक प्रगती झालेली असते तेथे उत्पादन घटक, यंत्रसामग्री इ. चा पुरवठा मागणीनुसार होऊ लागतो. त्यामुळे नवनवीन भांडवल आकर्षीत होत जाते. या भांडवल गुंतवणुकीतून उत्पादन वाढ होते. त्याहून उत्पन्नाची पातळी वाढत जाते. त्यातून उपभोगाच्या व बचतीच्या प्रेरणा मिळत जातात. त्यातून पुन्हा मागणी व गुंतवणूकीत वाढ होते. हा सर्व गुंतवणुकीचा ओघ मागास भागाकडून येत असतो. परिणामी तेथे भांडवलाचा तुटवडा निर्माण होतो. परिणामी त्या भागाच्या मागासलेपणाचे भांडवलाची दुर्मीळता हे कारण आणि परिणाम असतो.

**क) व्यापार :**

प्रत्येक देशांचे भौगोलिक प्रदेश आणि विविध देश देखील व्यापारी संबंधांनी परस्परांशी जोडलेले असतात. वर्धमान प्रक्रियेच्या कार्यवाहीमुळे विकसीत भागाचा व्यापार उलरोलर वृध्दींगत होत जातो. तर मागास व अप्रगत भागाचा व्यापार मात्र अविकसीतच राहतो. विकसीत भागातून स्वस्त अशा वस्तू व सेवांचा पुरवठा मागास भागाकडे होत राहतो. परिणामी मागास भागाचा फारसा औद्योगिक व व्यापारी विकास होत नाही. याउलट प्रगत क्षेत्रातील वस्तू व सेवांची मागणी सातत्याने वाढत जात असल्याने त्यांच्या उत्पादकतेत, व्यवसायात वाढ होत जाईल. प्रो. मिर्डालनी असेही सांगितले की, आजवरचा ऐतिहासिक अनुभव असे सांगतो की, व्यापाराच्या अटी आणि शर्ती देखील विकसित क्षेत्राला अनुकूल असेच असतात.

वरील तीन आर्थिक घटकांसोबतच इतरही काही आर्थिकेत्तर घटकांच्या परिणामामुळे प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावी होतात. हे प्रतिसारक परिणाम विविध घटकांच्या चक्रिय कार्यकारण संबंधातून अधिक वेगाने वर्धमान होतात. त्यामुळे मागास भागाचा लवकर विकास होत नाही.

**२) विस्तारक परिणाम : (Spread Effects)**

विकास प्रक्रियेतून केवळ प्रतिसारक परिणामच घडून येतात असे नसून त्याच्या परिणामातून अनेक विस्तारक परिणामही घडून येतात असे नसून त्याच्या परिणामातून अनेक विस्तारक परिणामही घडून येतात. हा

चांगल्या परिणामांनीच प्रो. मिर्डाल 'विस्तारक परिणाम' असे म्हणतात. त्यांच्या मते एखादे क्षेत्र तेव्हा विकसित होत असते. तेव्हा खऱ्या या विकासाचा परिणाम त्याचा सभोवतालच्या क्षेत्रांवर अनुकूलरित्या होण्यास सुरवात होते. उदाहरणार्थ विकसित भागातील उत्पादन कार्यासाठी कच्चा माल, कुशल श्रम, बाजारपेठा, वित्तपुरवठा, वाहतुक इ. सेवांचा पुरवठा व निर्मिती करण्याची संधी आजुबाजुच्या क्षेत्रांना मिळू लागते. त्यांचा परस्परांशी असणारा सहसंबंधाचा परिणाम वर्धमान प्रक्रियेने हे विस्तारक परिणाम वाढवीत नेते व त्या जवळपासच्या प्रदेशांचा देखील विकास होतो.

विस्तारक आणि अतिसारक परिणाम हे परस्परांच्या अगदी विरुध्द असल्याने ते नेहमी संतुलनामध्ये राहतीलच असे नाही. तरीही मुख्यत्वे विकसनशील देशांबाबतीत प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावशाली असतात.

वरील विवेचनाचा संदर्भ घेऊन युनोने युरोपसाठी नेमलेल्या अभ्यास गटाने जे निष्कर्ष काढले ते खूपच वास्तवदर्शी असे आहेत.

१. पश्चिम युरोपमधील गरीब देशांमध्ये प्रादेशिक विषमता जास्त असून श्रीमंत देशांमध्ये ती कमी प्रमाणांत दिसून येते.

२. विकसित देशांमधील प्रादेशिक विषमता ही सातत्याने कमी होत असून अविकसित देशांमध्ये ती वाढत आहे.

थोडक्यात, आपल्या विश्लेषणांद्वारे प्रो. मिर्डालनी हे दाखवून दिले की, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेची गती आणि प्रगती ही विस्तारक आणि प्रतिसारक परिणामांवर अवलंबून असते. विकसित देशांमध्ये विकास प्रक्रियेतील विस्तारक परिणाम हे अधिक प्रबळ असतात. त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास सातत्यपूर्णरित्या व जलदगतीने होतो. मात्र त्या तुलनेत अविकसित देशांच्या विकास प्रक्रियेमध्ये प्रतिसारक परिणाम अधिक क्रियाशिल असतात. परिणामी त्यांच्या आर्थिक विकासाचा वेग व गती मंद राहते. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भयावह विषमता दिसून येते. यातुन आपण अखिल मानवजातीचे कल्याण करण्यामध्ये कितपत यशस्वी झाली. हा मोठा गंभीर प्रश्न आहे. आज जगाचं चित्र असं दिसून येत आहे की, एका बाजूला अतिश्रीमंत असे मुठभर देश तर दुसरीकडे मोठ्या संख्येने असलेले अविकसित देश मिर्डालने जे आंतरराष्ट्रीय प्रादेशिक विषमतेचे ते विश्लेषण दिलेले आहे. त्या आधारे यातील तीन मुख्य बाबी प्रकर्षाने पुढे येतात.

१. जगात थोडेच देश प्रगत असून बहुसंख्य देश अप्रगत आहे.

२. फार मोठे असलेले विकसित देश विकासाच्या मार्गावर वेगाने मार्गक्रमण करत आहेत. तर बहुसंख्येने असलले अप्रगत देश विकासाच्या कुंठीत अवस्थेतच अडकून पडलेले आहेत.

३. वरील दोन्ही कारणांनी जगातील विषमता सातत्याने वाढत आहे.

### २.२.६.६ सिध्दांताचे मूल्यमापन :

प्रो. मिर्डालनी जे 'आर्थिक विकास आणि विषमतेचे' जे विश्लेषण 'एशियन ड्रामा' या ग्रंथात केले. त्याचे

शिर्षक अतिशय समर्पक आणि त्यातील अभ्यासविषयक कालसुसंगत असा महत्त्वपूर्ण ठरतो. कारण १८व्या शतकात तत्कालीन परिस्थितीच्या परिप्रेक्षामध्ये 'अॅडम स्मिथनी' आपल्या 'राष्ट्रीय संपत्ती' (Wealth of Nations) या ग्रंथामध्ये राष्ट्राची संपत्ती कशी निर्माण होते. यावर प्रकाश टाकला होता. कालौघात संपत्तीनिर्मितीच्या हव्यासापोटी होणाऱ्या भांडवशाहीमुलक शोषणाचा प्रश्न १९व्या शतकात गंभीर होत गेला. त्याचे कालसापेक्ष विश्लेषण मार्क्सनी आपल्या 'दास कॅपीटल' मध्ये केले. पुढे महायुद्धांच्या पार्श्वभूमीवर मंदीच्या खाईत लोटलेल्या जगाला सावरण्यासाठीचे उपाय सांगणारा ग्रंथ २०व्या शतकाच्या प्रारंभी केन्सने आपल्या 'जनरल थिअरी' या ग्रंथातून केला. पण जगाच्या विकासाच्या या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर विषमतेची झालेली वाढ अगदी गंभीरपणे मांडण्याचे महत्त्वपूर्ण काम प्रो. गुन्नार मिर्डाल यांच्या 'एशिन ड्रामा' या ग्रंथाने केले. आता आपणांस बदलत्या परिस्थतीत 'संपत्तीच्या निर्मितीची' चर्चा करुन चालणार नाही. तर दारिद्र्य आणि विषमता याकडे गांभीर्याने पहावे लागेल. म्हणूनच मिर्डालच्या ग्रंथाचे विस्तृत शिर्षक 'An Enquiry into the Poverty of Nations' असे देण्यात आले.

सनातनवादी आर्थिक विचारवंतांनी आपल्या विश्लेषणामध्ये आर्थिक विकासामध्ये 'आंतरराष्ट्रीय व्यापार' या घटकाला महत्त्वाचे स्थान दिले. 'आर्थिक विकासाचे इंजिन' असे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा उल्लेख सनातनवादी विचारवंत करतात मात्र प्रत्यक्षात विकसनशील देशाच्या बाबतीत हे खरे ठरताना दिसत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीबरोबर अविकसीत अर्थव्यवस्थांमधील द्विदलतावाद वाढून त्यांच्यासाठी व्यापारशर्ती या अधिक प्रतिकूल ठरू लागल्या. कारण अप्रगत देश मुख्यत्वे प्राथमिक व कृषि मालाचे निर्यात करणार व प्रगत देश यंत्रे, तंत्रज्ञान इ. ची निर्यात करतात. परिणामी याचे सर्व फायदे विकसित देशांनाच जास्तीत जास्त मिळतात. म्हणूनच  प्रा. मिंटनी दिलेल्या विस्तारक आणि प्रतिसारक परिणामांचा या अनुषंगाने जे मिर्डालनी विस्तार केला. प्रो. हेरॉड आपल्या विकास प्रतिमानामध्ये संतुलनापासून दूर जाणाऱ्या प्रवृत्ती आणि वर्धमान प्रक्रियेचे विश्लेषण केलेले आहे. मिर्डालनी याच संकल्पनेचे सामाजिक व आर्थिक पैलू विचारात घेऊन वास्तवस्पर्शी असे विश्लेषण पुढे आणले.

### २.२.६.७ समारोप :

गरिबी हेच गरिबीचे मुख्य कारण आणि परिणामदेखील आहे. ही वस्तुस्थिती प्रो. गुन्नार मिर्डालनी आपल्या विश्लेषणाद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटकांचा संदर्भा देत स्पष्ट केली आहे. मिर्डालनी मांडलेले अप्रगत देशातील विस्तारक परिणामाची प्रभावहीनता आणि प्रतिसारक पणिमांचा प्रभावीपणा हे विश्लेषण अत्यंत वास्तवदर्शी असे आहे. आणि यातुनच आंतरराष्ट्रीय विषमता मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. या सर्व प्रश्नाला भिडून त्याचे गांभीर्य जगासमोर आणण्याचे काम मिर्डालनी केले. प्रस्थापीत विचारधारेपेक्षा वेगळा असलेला हा विचार त्यामुळेच फार मौलीक ठरणारा असा आहे.

**२.२.७ प्रो. हार्वे लायबेंनस्टिन यांचा किमान आवश्यक प्रयत्न आणि न्युन उत्पन्न समतोल सापळा सिध्दांत: (Prof. Harvey Libenstins Critical Minimum Effort Thesis and Low Income Equilibrium Trap)**

**२.२.७.१ प्रस्तावना :**

निर्णायक किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांतांची मांडणी सर्वप्रथम करण्याचे श्रेय हे प्रा. हार्वे लायबेनस्टिन यांना दिले जाते. खरे पाहता प्रो. रोझेस्टिन व रोडान यांनी मांडलेला जोराचा धक्का सिध्दांत म्हणजे Big Push Theory आणि प्रो. हार्वे लायबेस्टिन यांचा किमान आवश्यक प्रयत्न हे दोन्ही सिध्दांत परस्परांशी अगदी जवळचे साधर्म्य असणारे व समतोल विकास गृहीतत्वाशी संबंधीत असे आहे.

**२.२.७.२ निर्णायक किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांत : (Critical Minimum Effort Theory)**

प्रो. हार्वे लायबेन्स्टिन यांनी मांडलेल्या 'निर्णायक किमान आवश्यक प्रयत्न' सिध्दांतील मुख्य बाबी पुढीलप्रमाणे :

**१. विकसनशील देश आणि अल्प उत्पन्न संतुलन सापळा :**

प्रो. हार्वे लायबेंन्स्टिन यांच्या मते, जगातील विकसनशील देशांमध्ये अल्प उत्पन्न संतुलन सापळ्यामध्ये अडकण्याची प्रवृत्ती असते. या Low Leel Equlibrium Trap मुळे अशा देशांनी जरी स्वयंप्रेरणेने विकास करण्याचा प्रयत्न जरी केला तरी तो फारसा यशस्वी ठरू शकत नाही व ते पुन्हा मागे पडतात व अल्प उत्पन्न संतुलन सापळ्यात अडकतात.

**२. राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या आणि दरडोई उत्पन्न यांमधील परस्परसंबंध :**

प्रो. लायबेंन्स्टिन यांनी आपल्या विश्लेषणामध्ये राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या आणि दरडोई उत्पन्न यांचा आर्थिक विकासाशी असणारा परस्परसंबंध स्पष्ट केला आहे. त्याच्या मते, या तिन्ही घटकांचा आर्थिक विकासावर महत्त्वपूर्ण परिणाम होत असतो. उदा. जर राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग ५% एवढा असेल आणि लोकसंख्या वाढीचा दर हा २% एवढा असेल तर याचा अर्थ असा की, दरडोई उत्पन्न वाढीचा वेग हा (५-२)=३ एवढा राहील. मात्र जर एखाद्या वर्गामध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर १% एवढा व लोकसंख्येच्या वाढीचा दर २% एवढा असेल तर दरडोई उत्पन्नातील होणारी वाढ ही १% घटेल. भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या दरात जेव्हा जेव्हा घट घडून आली आहे. तेव्हा तेव्हा त्यासाठी वरील घटक कारणीभूत असलेले दिसून येतात. थोडक्यात याचा अर्थ असा की जर आपणाला देशातील सर्वसामान्य जनतेच्या, राहणीमानाचा दर्जा जर सातत्याने उंचावत न्यायचा असेल तर, त्यांच्या दरडोई उत्पन्नाची पातळी ही सातत्याने कशी वाढत जाईल यादृष्टिने प्रयत्न होणे गरजेचे आहे. मात्र याकरिता एक आवश्यक अटी अशी आहे की, देशातील राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर हा लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा जास्त असणे आवश्यक असते, मात्र अविकसीत अर्थव्यवस्थांच्या दृष्टिने या अटीची पूर्तता करणे अत्यंत कठीण असते. ही गोष्ट कशी साध्य करता येईल याचा विचार प्रा. हार्वे लायबेंन्स्टिन यांनी केला आहे. त्यांनी आपले याबाबतचे विश्लेषण अल्प उत्पन्न संतुलनाचा सापळा (Low

Level Equlibrium Trap) द्वारे केलेले आहे.

**३. अल्प उत्पन्न संतुलन सापळा :**


प्रो. हार्वे लायबेन्स्टिन यांनी आपल्या सैध्दांतिक विश्लेषणाकरता अविकसीत देशांतील अलप उत्पन्न संतुलन सापळा संकल्पना पुढील आकृतीद्वारे स्पष्ट केले आहे.

आकृतीमध्ये अक्ष अक्ष (OX) = दरडोई उत्पन्न (उत्पादन लोकसंख्या )

अय अक्ष (OY) = लोकसंख्या वाढीचा दर व दरडोई उत्पन्न वाढीचा दर

$\frac{\Delta L}{L}$ = लोकसंख्या वाढीचा दर

$\frac{\Delta I}{I}$ = उत्पन्न वाढीचा दर




आकृतीमध्ये 'S' या बिंदूपासून Y या बिंदूपर्यंत राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त आहे. ( I I ) हा वक्र खालच्या पातळीवर असलेला दिसतो. लोकसंख्या वाढीच्या दबावामुळे उत्पन्नाची पातळी ही सतत अल्प राहते. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न व लोकसंख्या वाढीचा दर दर्शविणारे हे दोन्ही वक्र परस्परांना त्या बिंदूत छेदतात तो म्हणजे बिंदू 'S' या ठिकाणी अर्थव्यवस्थेचे संतुलन साधले जाते. मात्र या 'S' या बिंदुचा ठिकाणी असलेले उत्पन्न पातळी ही एवढी अल्प असते की ती जवळपास निर्वाह उत्पन्न पातळी एवढी असलेली दिसून येते. म्हणून प्रो. हार्वे लायबेन्स्टिन या ('S' बिंदूतील) संतुलनाचा 'अल्प उत्पन्न संतुलन सापळा' असे म्हणतात. यामध्ये देशाचे दरडोई उत्पन्न हे इतर कोणत्याही बिंदुवर कमी असले तरी ते 'S' या संतुलन बिंदुकडेच आकर्षित होते. कारण विकसनशील देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त असतो. मात्र जर भविष्यात दरडोई उत्पन्नाचा वक्र 'Y' बिंदुच्याही वर सरकला. तर तो लोकसंख्या वाढीच्या वक्राला छेदून वरच्या दिशेला जाईल. परिणामी दरडोई उत्पन्नामध्ये लोकसंख्या वाढीपेक्षा सातत्याने वाढ होत जाते. मात्र पुन्हा 'M' बिंदुला लोकसंख्या व दरडोई उत्पन्नवाढ यामध्ये

संतुलन घडून येते. कारण हे दोन्ही वक्र 'M' बिंदुत परस्परांना छेदतात. याठिकाणी पुन्हा अल्प उत्पन्न संतुलनाचा सापळा तयार होतो व लोकसंख्या वाढ ही राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त राहून दरडोईल उत्पन्न सातत्याने घटत जाते.

या अल्प उत्पन्न संतुलन सापळ्यातून अविकसीत देशांना बाहेर पडण्याकरता प्रो. हार्वे लायबेन्स्टिन यांनी 'किमान निर्णायक प्रयत्न' करण्याचा उपाय सुचविला आहे. त्यांच्या मते, 'अविकसीत देशांनी' या सापळ्यातून बाहेर पडण्यासाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर अशी गुंतवणूक करावी ज्यायोगे दरडोई उत्पन्नाची पातळी ही अय पेक्षा जास्त राहील. कारण 'Y' या संतुलन बिंदुच्या पुढे दरडोई उत्पन्न पातळीचा वक्र हा लोकसंख्या वाढीच्या वक्राच्या वरच्या पातळीवर राहतो व ही स्थिती बराच काळ टिकून राहते.

पण याच दरम्यान लायबेन्स्टिन म्हणतात त्याप्रमाणे किमान अशी मोठी गुंतवणुक केली गेली तर ही स्थिती कायमस्वरूपी टिकून राहते व तो देश अल्प उत्पन्नाच्या संतुलन सापळ्यातुन कायमचा बाहेर पडू शकेल. मात्र ही किमान आवश्यक अशी मोठी गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक अशी भांडवलाची उपलब्धता अशा अविकसीत देशांकडे नसल्याने, त्यांना हे शक्य होणे अवघड वाटते. याशिवाय अशा देशांनी विविध मार्गांनी लोकसंख्यावाढीचा दर कमी करणे व शिक्षणाचा प्रचार प्रसार करणे देखील गरजेचे आहे. लोकसंख्या वाढ जर रोखता आली नाही तरी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन व उत्पादकतेत वाढ घडवून आणता येते. न्यून उत्पन्नामुळे जर भांडवलनिर्मितीचा वेग कमी असला तरी परकीय भांडवलांना आकर्षीत करुन गुंतवणुकीमध्ये वाढ घडवून आणे गरजेचे असते.

### २.२.७.३ हार्वे लायबेन्स्टिन याच्या निर्णायक किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांतांचे विश्लेषण :

हार्वे लायबेन्स्टिन यांच्या मते फक्त लोकसंख्या नियंत्रण व भांडवल गुंतवणुक यामुळेच अल्प उत्पन्न सापळ्यातून बाहेर पडता येतो किंवा यामुळे हा सापळा निर्माण होतो असे नाही. तर याला कारणीभूत असणारे इतर अनेक घटक असू शकतात. त्यांचे हे विश्लेषण पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.

आकृतीमध्ये,


OX अक्ष = दरडोई उत्पन्न व उत्पन्न प्रेरीत वृध्दी

OY अक्ष = दरडोई उत्पन्न व उत्पन्न अवरोधक घट

$PP_1$ वक्र = उत्पन्न प्रेरीत वक्र

$RR_1$ वक्र = उत्पन्न अवरोधक वक्र

प्रो. हार्वे लायबेंन्स्टिन यांच्या मते, अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये दरडोई उत्पन्नाच्या वाढीवर परिणाम करणारे दोन परस्पर विरोधी घटक कार्यरत असतात. यापैकी जे घटक दरडोई उत्पन्न वाढीसाठी प्रेरक ठरतात. त्यांना 'उत्पन्न प्रेरक वृध्दी घटक' म्हणतात. याउलट ज्या घटकांमुळे दरडोई उत्पन्नात घट घडून येते त्यांना उत्पन्न अवरोधक घटक म्हणतात. यापैकी आकृतीमध्ये $PP_1$ हा वक्र उत्पन्न, वृध्दीचे घटक दर्शवितो तर $RR_1$ हा वक्र, उत्पन्न अवरोधक घटक दर्शवितो. हे दोन्ही वक्र S बिंदुत परस्परांना छेदतात. त्यामुळे $OS_1$ ही अर्थव्यवस्थेची संतुलन पातळी निश्चित होते. $OS_1$ ते $OM_1$ पर्यंत उत्पन्न अवरोधक घटक हे उत्पन्न प्रेरीत घटकांपेक्षा अधिक प्रभावी असतात. परिणामी दरडोई उत्पन्न हे $OM_1$ पासून खाली जाऊन ते पूर्वीच्याच $OS_1$




पातळीवर संतुलन पावेल. थोडक्यात अल्पकाळ जरी दरडोई उत्पन्नात $OS_1$ वरुन $OM_1$पर्यंत वाढ झाली तरी उत्पन्न अवरोधक घटकांच्या प्रभावामुळे ते घटून पुन्हा $OS_1$ एवढे होईल. लायबेंन्स्टिन यालाच 'अल्प उत्पन्न संतुलन' असे म्हणतात.

अविकसित देशांनी या अल्प उत्पन्न सापळ्यातुन बाहेर पडण्यासाठी प्रो. हार्वे लायबेंन्स्टिन हे 'किमान आवश्यक प्रयत्न' हा सिध्दांत उपाय म्हणून मांडला. त्यांच्या मते, अविकसित देशांनी या अल्प उत्पन्न सापळ्यातून बाहेर पडण्यासाठी एवढी किमान आवश्यक गुंतवणुक करणे गरजेचे आहे. ज्यायोगे दरडोई उत्पन्न पातळी ही OM पेक्षा जास्त राहील. कारण अविकसित देशांनी जर हे OM पातळी ओलांडली तर त्यापुढे उत्पन्न अवरोधक घटकांपेक्षा उत्पन्न प्रेरक घटक अधिक प्रभावी ठरतील. ($RR_1$ चे ४५° रेषेपासूनचे अंतर हे $PP_1$ पेक्षा जास्त आहे ते त्यामुळेच)

**२.२.७.४ सिध्दांतांचे टीकात्मक परिक्षण :**

प्रो. हार्वे लायबेंन्स्टिन यांनी अविकसित देशाच्या मागासलेपणाची कारणमीमांसा आणि त्यावरील उपायांची मांडणी करणारा सिध्दांत मांडून महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. तरीही त्यांच्या या विश्लेषणावर पुढील टीका केल्या जातात.

**१. प्रो. भिलेवाल यांची टीका :**

प्रो. लायबेंन्स्टिन यांनी अविकसित देशांना त्यांच्या ‘अल्प उत्पन्न संतुलन’ सापळ्यातुन बाहेर पडण्यासाठी मोठी अशी किमान गुंतवणुक करण्याचे सुचविले आहे. मात्र प्रो. भिलेवाल यांच्या मते ही किमान मोठी गुंतवणूक अविकसित देशांच्या कुवतीच्या मानाने खूपच मोठी असल्याने त्यांना हे शक्य होणार नाही.

**२. हेगन यांची टीका :**

प्रो. हेगन यांनी याबाबत पश्चिम युरोपातील देशांचा अभ्यास केला व त्याद्वारे त्यांनी असा निष्कर्ष काढला की, या देशांमध्ये ज्या काळात लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त होता. त्याच काळात दरडोई उत्पन्नाच्या दरात देखील वाढ घडून आली. म्हणजेच या देशांमध्ये दरडोई उत्पन्न वाढीमध्ये लोकसंख्येतील वाढ हा घटक अवरोधक न ठरता प्रेरक ठरलेला दिसून येतो.

## २.२.८ समतोल वृध्दी

**प्रास्ताविक :-**

देशाचा अर्थिक विकास कसा घडवून आणायचा? हा प्रश्न जगातील अविकसित (न्यून विकसित/ अर्ध विकसित/विकसनशील/गरीब/मागास) देशांना भेडसावत असतो. अर्थिक विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी या अविकसित राष्ट्रांनी काय करावे या संदर्भात जगातील विविध अर्थशास्त्रज्ञांनी दोन वेगवेगळे विचार मांडले आहेत. त्यांनाच आर्थिक विकासाची तत्वे किंवा विकासाची व्यूहरचना असे म्हणतात. गरीब राष्ट्रांच्या विकासासाठी काहींनी संतुलित वृध्दींचा सिध्दांत (The Theory of Balanced Growth) मांडला आहे. तर काहींनी ‘असंतुलित वृद्धीचा सिद्धांत’ (The Theory of unbalanced Growth) मांडला आहे. गरीब राष्ट्रात दारिद्र्य, उपासमार, बेकारी या समस्या गंभीर स्वरूपाच्या असतात. या समस्या नष्ट करण्यासाठी आणि राष्ट्राचा संपूर्ण विकास घडवून आणण्यासाठी संतुलित आणि असंतुलित विकास सिध्दांत मांडण्यात आले आहेत. या दोन सिध्दांतांची क्रमश: चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**संतुलित विकास संकल्पनेचा अर्थ :-** समतोल विकासाचा सिध्दांत पाहण्यापूर्वी आपणास समतोल विकास या संकल्पनेचा अर्थ पाहणे आवश्यक आहे. संतुलित विकास ही राष्ट्राच्या आर्थिक विकासाची एक व्यूहरचना (Strategy) आहे. युदध जिंकण्यासाठी जशी रणनीती (व्यूहरचना) आखली जाते, त्याप्रमाणे मागासलेल्या राष्ट्रांच्या विकासासाठी व्यूहरचना आखावी लागते. अनेक अप्रगत देशात मानवी, भौतिक आणि नैसर्गिक साधनसंपत्ती (human, material and natural resources) विपुल प्रमाणात असते. या अमर्यादित साधन संपत्तीचा अपुरा, चुकीचा, वापर केला जातो. त्यामुळे देशाचा विकास होत नाही. देशात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा योग्य आणि पुरेशा प्रमाणात (पर्याप्त) वापर केला तर गरीब देशात विकासाची प्रक्रिया सुरू होऊ शकते. गरीब राष्ट्रातील गरिबी, उपासमार, बेकारी नष्ट करण्यासाठी म्हणजेच जलद आर्थिक विकास

घडवून आणण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात (कृषी, उद्योग, व्यापार व वाहतूक) पुरेशी गुंतवणूक केली पाहिजे हा विचार जे तत्व सांगते, त्याला समतोल विकासाचे तत्व (The principle of Blanced Growth / The Doctrine of Balanced Growth) असे म्हणतात. या तत्वालाच 'संतुलित वृद्धीचा सिध्दांत'असे म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या एकाच किंवा निवडक क्षेत्रात गुतंवणूक न करता सर्वच क्षेत्रात गुतंवणूक केल्यास आर्थिक विकासाला चालना मिळते. अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रे एकमेकावर अवलंबून असतात. कृषी क्षेत्र उद्योग व व्यापार, सेवा क्षेत्रावर अवलंबून असते. म्हणून एकाचवेळी अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांचा विकास घडवून आणला पाहिजे. म्हणजे सर्व क्षेत्रात पुरेशा प्रमाणात गुतंवणूक केली पाहिजे असे समतोल विकासाचे तत्व सांगते. हे तत्व अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रात एकाचवेळी पुरेशा प्रमाणात गुतंवणूक करावी म्हणजे अप्रगत राष्ट्रात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गती येईल असे सांगते. समतोल विकासाचे तत्व प्रामुख्याने गरीब/ अर्धविकसित राष्ट्रांना डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या विकासासाठी मांडले आहे. रोझेंटीन रोडॉन, ऑर्थर लेविस, रॅगनर नर्क्स, ॲलन यंग, स्किट व्होस्की इत्यादी अर्थतज्ज्ञांनी समतोल विकासासंबंधी आपले विचार मांडले आहेत. त्यालाच समतोल विकासाचा सिध्दांत असे म्हणतात. या अर्थतज्ज्ञांनी अविकसित देशांच्या विकासासाठी आपले विचार मांडले आहेत. त्यालाच समतोल विकासाचा सिध्दांत असे म्हणतात. या अर्थतज्ज्ञांनी अविकसित देशांच्या विकासासाठी संतुलित विकास तत्वाची शिफारस केली आहे. समतोल वृध्दीची संकल्पना ही स्थैतिक प्रक्रिया आहे. फ्रेडरिक लिस्ट यांनी सर्वप्रथम या सिध्दांताची मांडणी केली. कृषी, उद्योग व व्यापार या तिन्ही क्षेत्राचा समतोल विकास झाला पाहिजे असे मत लिस्ट यांनी आपल्या सिध्दांतात मांडले आहे. ऑर्थर यंग यांनी १९२८ मध्ये समतोल विकासाची संकल्पना मांडली असून विविध उद्योग एकमेकावर अवलंबून असतात. म्हणून सर्व उद्योगांचा सारखाच एकाचवेळी विकास घडवून आणला पाहीजे.

**समतोल विकास संकल्पनेच्या काही व्याख्या :-**

विविध अर्थतज्ञांनी समतोल विकास संकल्पेच्या विविध व्याख्या दिल्या आहेत. काही प्रमुख व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**१. सॅम्युएलसन आणि सोलर :-**

P. A. Samuelson आणि R. M. Solour यांच्या मते ''सर्व प्रकारच्या भांडवली साठयात वाढ होणे म्हणजे समतोल विकास होय.'' (Balanced growth implies growth in every kind of capital stock)

**२. प्रा. अलक घोष :-**

Alak Ghosh यांच्या मते, ''अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांचा सारख्याच प्रमाणात विस्तार होणे आणि त्यामुळे उपभोग, गुतंवणूक आणि उत्पन्न यात सारख्याच दराने वाढ होणे म्हणजे संतंलित वृध्दी होय.'' (Accoding to Alak ghosh, "Planning with balanced growth indicates that all sectors of the

economy will expand in the same proprotion so that consumption, investment and income will grow at the same rates")

३. **बेंजामिन हिगिन्स :-**

Bejamin Higgins यांच्या मते, ''असंख्य उद्योगामध्ये एकाच वेळी भांडवलाची गुंतवणूक करणे म्हणजे समतोल वृध्दी होय.'' (According to Benjamin Higgins "Balanced growth implies simultaneous capital investment in a number of different industries". )

४. **प्रा. लेविस :-**

W. A. Lewis यांनी 'समतोल वृध्दी' संकल्पनेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''समतोल वृध्दीचा अर्थ असा की, अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रे एकाचवेळी वाढणे किंवा विस्तारणे होय. उद्योग आणि शेती क्षेत्र, घरगुती उपभोगासाठीचे उत्पादन आणि निर्यातीसाठी उत्पादन यामध्ये समतोल राखणे. खरे हे आहे, की अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रे एकाचवेळी विस्तारली पाहीजेत.'' (According to W.A. Lewis, "Balanced growth means that all sectors of economy should grow simultaneously so as to keep a proper balance between industry and agriculture, and between production for home consumtion and production for export. The truth is that all sectors be expanded simultaneously".)

५. **पॉल स्ट्रिटिन :-**

''यशस्वीतेसाठी एकमेकावर अवलंबून असणाऱ्या अनेक उद्योगात गुंतवणूकीचे निर्णय घेणे, सतत गुंतवणूक करणे उपभोग्य वस्तू आणि औद्योगिक वस्तूंच्या मागणीत वाढ घडून आली पाहीजे.'' (According to Paul Streeten, "Balanced growth mens wherever several non-infinitesimal investment decisions depend for their success on each other, simultaneous investment in a series of industries, in conformity with the pattern of consumers demand and of different industries demand for each others produot is required.")

६. **आर. एफ. हॅरॉड :-**

R. F. Harrod यांच्या मते, ''संतुलित वृध्दीमुळे उत्पन्न वृध्दीचा दर, उत्पादन वृध्दीचा दर आणि नैसर्गिक साधन संपत्तीच्या वृध्दीचा दर यांच्यात समानता निर्माण होते.'' (According to R.F. Harrod, "Balanced growth aims at equality between growth rate of income, growth rate of output and growth rate of natural resources.")

$$Gy = Gw = Gn$$

Gy= Growth rate of income – उत्पन्न वृध्दी दर

Gw= Growth rate of output – उत्पादन वृध्दी दर

Gn= Growth rate of natural resources – नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वृध्दीचा दर.

**७. श्रीमती जोन रॉबिन्सन :–**

Mrs. Joan Robinson यांच्या मते, ''समतोल वृध्दी म्हणजे भांडवलाच्या वृध्दीचा दर आणि श्रमशक्ती वाढीचा दर यांच्यातील समानता होय.'' (Mrs. Joan Robinsons concept of 'golden age' also implies balaced growth. It states that there must be equilibrium between growth rate of capital and labour force.)

$$\frac{\Delta K}{K} = \frac{\Delta N}{N}$$

$\Delta k$ = Growth rate of captal

$\Delta N$= Growth rate of labour force.

**८. यू. एन पब्लिकेशन :–**

''समतोल वृध्दी म्हणजे पूर्ण रोजगार, उच्च गुतंवणूक पातळी आणि उत्पादक शक्तीत वाढ होय.'' (According to U.N. Publication (1955), "Balanced growth refers to full employment, a high level of investment, overall growth in productive capacity, equilibrium.)

**९. सी. पी. किंडलबर्जर :–**

''अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात किंवा सर्व उद्योगात एकाचवेळी, एकदम सारख्याच प्रमाणात गुतंवणूक करणे, उद्योग व शेती क्षेत्राचा समतोल विकास करणे म्हणजे संतुलित वृध्दी होय.'' (According to C.P. Kindleberger, "Balanced growth implies that investment takes place simultaneously in all sectors or industries at once. Still to others, it implies balanced develoment of manufacturing industries and agriculture.")

'समतोल विकास' किंवा 'समतोल वृध्दी' या संकल्पनेच्या वरील विविध अर्थतज्ज्ञांच्या विविध व्याख्या अभ्यासल्या असता आपल्या असे लक्षात येते की, ही संकल्पना स्थैतिक संज्ञा (Static term) नसून ती गतिजन्य संज्ञा (dynamic term) आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांचा एकाच वेळी सारखाच विकास घडवून आणणे किंवा सर्व क्षेत्रात एकाच वेळी सारखीच गुतंवणूक करणे म्हणजे संतुलित विकास होय.

**समतोल विकास सिध्दांताचे स्पष्टीकरण :–**

गरीब राष्ट्रात अर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी, गरीब राष्ट्रांच्या जलद विकासासाठी काही अर्थतज्ञांनी समतोल विकास तत्वाचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते न्यून विकसित देशांनी संतुलित वृध्दी

सिध्दांताची अंमलबजावणी केल्यास त्यांच्या देशाचा विकास घडून येईल. समतोल विकास तत्वाच्या काही समर्थकांचे विचार या भागात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**रोझेंटिन रोडान (Rosenstein Rodan's views as to theory of Balanced Growth)**

रोझेटिन रोडान हे सुध्दा 'समतोल वृध्दी' संकल्पनेचे समर्थक होते. अर्थतज्ञ रोडान यांनी सन १९४३ मध्ये लिहिलेल्या 'Problem of Industrialisation of South-Eastern Europe' या लेखात समतोल वृध्दी संदर्भात आपले विचार मांडले होते. पण त्यांनी 'समतोल वृध्दी'(Balanced Growth) असा शब्द मात्र वापरला नव्हता. रोडान यांनी न्यूनविकसित (अविकसित) देशांच्या विकासासाठी 'प्रबळ धक्का सिध्दांत' (Big Push Theory) मांडला आहे. या सिध्दांतात त्यांनी 'अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात एकाच वेळी आवश्यक प्रमाणात गुंतवणूक करावी' असे म्हटले आहे. गरीब राष्ट्रांच्या विकासाला गती देण्यासाठी एका मोठ्या धक्क्यांची (मोठ्या गुंतवणूकीची) गरज असते. निवडक क्षेत्रात व थोडया प्रमाणातील गुंतवणूक अप्रगत देशांच्या उपयोगाची नसते. रोडान यांनी 'प्रबळ धक्का सिध्दांत'मांडून एक प्रकारे 'समतोल विकास' संकलनेचे समर्थन केलेले दिसते.

## डयूसनबेरी (Dyusanberi) :-

डयूसनबेरी या अर्थतज्ज्ञाने 'अनुकरण परिणाम' (Demonstration Effect) मांडला आहे. यालाच 'प्रदर्शन परिणाम' आणि ड्यूसनबेरी परिणाम (Dyusanberi Effect) असे म्हणतात. एका व्यक्तीच्या उपभोगाचा दुसऱ्या व्यक्तीच्या उपभोगावर जो परिणाम होतो, त्यास अनुकरण परिणाम किंवा प्रदर्शन परिणाम म्हणतात. A व्यक्तीने एखादी वस्तू खरेदी केली तर त्याचे पाहून B व्यक्ती गरज नसताना सुध्दा ती वस्तू खरेदी करते. अशाच प्रकारे अप्रगत राष्ट्रे प्रगत राष्ट्रांचे अनुकरण करतात. त्यामुळे अप्रगत राष्ट्रांचा अनावश्यक उपभोग वाढतो व आर्थिक विकासावर याचा प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे अप्रगत राष्ट्रात भाववाढीची समस्या निर्माण होते. अनुकरण प्रवृत्तीमुळे अप्रगत देशात भांडवल निर्मितीही कमी राहते. अनुकरण परिणाम कमी करण्यासाठी आयातीवर बंधने घातली पाहिजेत.

**प्रा. लुईस (W.A. Lewis Views to Theory of Balanced Growth)**

प्रा. लेविस यांनीही 'संतुलित वृध्दी' सिध्दांताचे समर्थन केले आहे. अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रे एकाच वेळी विकसित झाली पाहिजेत असे त्यांचे मत होते. कृषी आणि उद्योग क्षेत्रांचा एकत्रित विकास केला पाहिजे. देशांतर्गत उपभोग आणि निर्यातीमध्ये समतोल प्रस्थापित झाला पाहिजे. According to Lewis, "All sectors of the economy should be developed simultaneasly so that balance is maintained between industries and agriculture, production for domestic consumption and production for exports."

**मायर आणि बाल्डविन :–**

मायर आणि बाल्डविन हे सुध्दा समतोल विकास सिध्दातांचे समर्थक होते. अविकसित देशांचा विकास समतोल वृध्दी प्रारुपानुसार व्हावा असे त्यांचे मत आहे. अविकसित राष्ट्रांच्या जलद आर्थिक विकासासाठी त्यांनी 'प्रभावी बिंदूची' (Growing Points) संकल्पना मांडली आहे. विकासाला ताबडतोब सुरवात होईल अशाच क्षेत्रात अविकसित राष्ट्रांनी गुंतवणूक करावी असे मायर आणि बाल्डविन यांनी म्हटले आहे. या क्षेत्रांना त्यांनी 'प्रभावी बिंदू' असे म्हटले आहे. मायर आणि बाल्डविन यांची प्रभावी बिंदूची संकल्पना 'समतोल विकास' संकल्पनेच्या जवळ जाणारी आहे. त्यांनी अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांच्या विकासावर भर दिला आहे.

**१) प्रा. रॅगनर नर्क्स**

प्रा. नर्क्स यांनी आपल्या समतोल वृध्दी प्रतिमानात गरीब देश गरीब का असतो? आणि गरीब माणूस गरीब का असतो? त्याचे स्पष्टीकरण दिले आहे. गरीब किंवा अप्रगत राष्ट्रात दारिद्र्याची दुष्टचक्रे कार्यरत असतात. या दुष्टचक्रात देश अडकलेला असतो. त्यामुळे अशा देशात विकासाला चालना मिळत नाही. दारिद्र्याची दुष्टचक्रे भेदल्याशिवाय अप्रगत राष्ट्रात आर्थिक विकासाला सुरवात होत नाही. त्यासाठी देशात संतुलित विकास तत्वानुसार विकास घडवून आणला पाहिजे. म्हणजे अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात एकाचवेळी पुरेशा प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक केली पाहिजे असे रँगनर नर्क्स यांनी म्हटले आहे. दारिद्र्याच्या दुष्टचक्रामुळे दरिद्री देशाच्या आर्थिक विकासात कसा अडथळा निर्माण होतो, ते नकर्स यांनी काही उदाहरणांच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे. नर्क्स म्हणतात, एखादा मनुष्य गरीब असतो. त्याला खाण्यासाठी पुरेसे अन्न मिळत नाही. त्यामुळे तो शारीरिकदृष्टया सक्षम (strong) राहत नाही तो दुर्बल किंवा अशक्त बनतो. शारीरिक दुर्बलतेमुळे त्याची कार्यक्षमता (काम करण्याची ताकद) कमी राहते. त्यामुळे त्याला कमी उत्पन्न मिळते. ज्यास्त उत्पन्न तो मिळवू शकत नाही. त्यामुळे तो पुन्हा गरीब राहतो. देशाचा विचार केला तर अशा गरीब देशात मागणीच्या बाजूने आणि पुरवठयाच्या बाजूने अशी दारिद्र्याची दोन दुष्टचक्रे सक्रिय असतात. त्यामुळे गरीब देश गरीबीतच राहतात. त्यांचा विकास होत नाही. पुरवठ्याच्या बाजूचे दुष्टचक्र नकर्स यांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

देशातील लोकांचे उत्पन्न कमी असते. त्यामुळे त्यांची बचत क्षमता सुध्दा कमी असते. बचत ही भांडवलनिर्मितीवर अवलंबून असल्याने बचत पातळी कमी असल्याने भांडवल निर्मितीचा दरही खूपच कमी असतो. भांडवल निर्मिती किंवा भांडवल गुंतवणूक कमी राहिल्याने उत्पादन व उत्पादकता कमी राहते.

मागणीच्या बाजूचे दुष्टचक्र स्पष्ट करताना नर्क्स म्हणतात, ''गरीब देशातील लोकांचे उत्पन्न खूपच कमी असते. त्यामुळे त्यांची विविध वस्तूंना असणारी मागणी कमी असते. देशात मागणीची कमतरता असल्याने गुंतवणूकदारांना गुंतवणुकीची प्रेरणा राहत नाही. त्यामुळे ते फारशी भांडवल गुंतवणूक करत नाहीत. गुंतवणूक कमी राहिल्याने उत्पादन व उत्पादकता कमी राहते. अशा प्रकारे अविकसित देशात मागणीच्या आणि पुरवठ्याच्या

बाजूची दोन दुष्टचक्रे कार्यरत असतात. त्यामुळे अविकसित देश अविकसितच राहतात. 'A country is poor, because it is poor' (देश गरीब असतो कारण तो देश गरीब असतो). व्यक्तीच्या गरीबीचे कारण व्यक्तीची गरीबी हे असते. तसेच देशाच्या गरीबीचे कारण देशाची गरीबी हे असते.''

**दारिद्र्याची दुष्टचक्रे कशी भेदायची? How to Break Vicious Circles?**

गरीब देशात कार्यरत/सक्रिय असलेली दारिद्र्याची दुष्टचक्रे मोडल्याशिवाय अशा देशात विकासाची प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही. दारिद्र्याचे दुष्टचक्रे कसे मोडायचे? आणि आर्थिक विकासाला गती कशी दयायची? याचे उत्तर नर्क्स यांनी आपल्या सिध्दांतात दिले आहे. ते म्हणतात, देशातील बाजारपेठांचा विस्तार करुन दारिद्र्याचे दुष्टचक्र मोडता येते. (According to Nurkse, the vicious circle can be broken by enlarging the size of the market.) वैयक्तिक पातळीवरील गुंतवणूक (individual investment efforts) गरीब देशात उपयोगी पडत नाही. त्यात मोठे धोके असतात. अनेक व्यक्तींनी अनेक उद्योगात एकाच वेळी मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक केली पाहिजे. अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रे एकमेकांना पूरक असतात. एका क्षेत्रात भांडवल गुंतवणूक केल्यामुळे त्या क्षेत्रात तयार झालेल्या उत्पादनाला दुसऱ्या क्षेत्रातून मागणी येते. दुसऱ्या क्षेत्रातील उत्पादनवाढीला तिसऱ्या क्षेत्रातून मागणी येते. मनुष्याच्या निरोगी शारीरिक वाढीसाठी ज्याप्रमाणे संतुलित आहाराची गरज असते, त्याप्रमाणे देशाला संतुलित विकासाची गरज असते. बाजारपेठांचा विस्तार झाला की मागणी, पुरवठा यात वाढ होते. त्यासाठी अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात भांडवलाची गुंतवणूक केली पाहिजे. अशा प्रकारे गुंतवणूक प्रकल्पांचा विस्तार करून, बाजारपेठांचा विस्तार करून आणि पूरक उद्योगांचा विकास करुन दारिद्र्याची दुष्टचक्रे मोडता येतात आणि आर्थिक विकासाचा मार्ग मोकळा करता येतो.

**बाजारपेठांचा विस्तार कसा घडवून आणायचा? How can the Market be Enlarged?**

विविध उद्योगात गुंतवणूक करून, प्रभावी जाहिरात करून, चांगले विक्री कौशल्य विकसित करून, उदार व्यापार धोरण स्वीकारून (व्यापारावरील जाचक बंधने काढून टाकून) आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करुन देशातील बाजारपेठांचा विस्तार घडवून आणला पाहिजे. किंमत पातळीत घट करुन आणि मौद्रिक उत्पन्न स्थिर ठेवून बाजारपेठांचा विस्तार करता येतो. यामुळे लोकांच्या वास्तव उत्पन्नात वाढ होऊ शकते. गरीब देशात बाजारपेठांचा आकार लहान असतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादन करून उत्पादन खर्च कमी करणे शक्य होत नाही. शिवाय अशा देशात उपभोक्त्यांची वस्तूंची मागणी अलवचिक असते. संयोजन कौशल्याचा अभाव असतो. तांत्रिक ज्ञान कमी असते. त्यामुळे भांडवलला मागणी कमी असते. त्यासाठी उपाय म्हणून संतुलित विकास पध्दत स्वीकारली पाहिजे. उत्पादक साधनाबरोबर मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक केली पाहिजे. खाजगी गुंतवणूकदारांना अशी गुंतवणूक करण्यास उत्साह नसतो. त्यांना प्रेरणा (incentives) दिली, तर ते गुंतवणूक करण्यास पुढे येतील व त्यामुळे बाजारपेठांचा विस्तार घडून येईल.

अ) कृषी आणि उद्योग (Balance between Agriculture and Industry)

अर्थव्यवस्थेच्या कृषी आणि उद्योग क्षेत्रात एकाचवेळी पुरेशी गुंतवणूक केली पाहिजे. दोन्ही क्षेत्रात योग्य तो समतोल निर्माण झाला पाहिजे. दोन्ही क्षेत्रांचा समतोल विकास झाला पाहिजे. उद्योगातील उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढले पाहिजे. कारखानदारी क्षेत्राची वाढ होऊन तेथे जर अधिक रोजगार निर्माण झाला तर त्या क्षेत्रातून शेतीत तयार होणाऱ्या अन्नधान्याची (कृषी मालाची) मागणी वाढेल. औद्योगिक क्षेत्राला कृषी क्षेत्रात तयार होणारा कृषी माल (कच्चा माल) आवश्यक असतो. म्हणून कृषी क्षेत्राचा विकास झाला पाहिजे. कृषी व उद्योग ही दोन्ही क्षेत्रे परस्परपूरक असतात. त्यांची वाढ व विकास एकमेकांच्या वाढीवर व विकासावर अवलंबून असते. म्हणून दोन्ही क्षेत्रांचा समतोल विकास झाला पाहिजे.

**ब) मानवी भांडवल गुंतवणूक आणि भौतिक वस्तूंच्या उत्पादनातील गुंतवणूक :-**

गरीब/अविकसित देशात मानवी भांडवलाचा दर्जा फारसा चांगला नसतो. लोक अशिक्षित असतात. म्हणून मानवी भांडवलाचा दर्जा सुधारण्यासाठी गुंतवणूक आवश्यक ठरते. मानवी भांडवलाच्या गुंतवणुकीमुळे देशाला चांगले मनुष्यबळ मिळते. मानवी साधनसंपत्तीचा दर्जा सुधारतो. भौतिक वस्तूंच्या उत्पादनातील गुंतवणूकीमुळे उत्पादन, उत्पन्न, बचत, गुंतवणूक वाढते, निर्यात वाढते. म्हणून मानवी भांडवल गुंतवणूक आणि भौतिक उत्पादनातील गुंतवणूक या दोन्ही गुंतवणुकीत समतोल साधला पाहिजे.

**क) अंतर्गत व परकीय व्यापार :- (Balance between Domestic Trade and Foreign Trade)**

देशांतर्गत व परकीय व्यापारात समतोल साधला पाहिजे. देशांतर्गत व्यापाराबरोबरच परकीय व्यापाराची सुध्दा वाढ झाली पाहिजे. आर्थिक विकासासाठी निर्यातीतून मिळणारे उत्पन्न महत्वाचे असते. म्हणून परकीय व्यापाराचे तोटे कमी होतील आणि फायदे कसे ज्यास्त मिळतील हे अविकसित देशांनी पाहिले पाहिजे. चैनीच्या वस्तूंच्या आयातीवर बंदी घालणे, सरकारने आयातीत घट करण्यासाठी व निर्यातीत वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे, वाहतूक सुविधामध्ये सुधारणा करणे, आयात-निर्यात शुल्क जाचक असतील तर ते शिथील करणे या माध्यमातून अंतर्गत व परकीय व्यापारात समतोल घडवून आणता येतो.

**ड) उपभोग्य वस्तूंचे उद्योग आणि भांडवली वस्तूंचे उद्योग :-**

देशाच्या समतोल विकासासाठी उपभोग्य वस्तूंचे उद्योग आणि भांडवली वस्तूंचे उद्योग या दोन्ही उद्योगात समतोल निर्माण झाला पाहिजे. म्हणजे या दोन्ही क्षेत्रात एकाचवेळी सारखीच गुंतवणूक केली पाहिजे. हे दोन्ही उद्योग परस्परपूरक असून त्यांचा विकास एकमेंकांच्या विकासावर अवलंबून असतो. उद्योगाकडून भांडवली वस्तूंना व कच्च्या मालाला मागणी येत असते. पण हे उद्योग/कारखाने चालू राहण्यासाठी या उद्योगात तयार होणाऱ्या वस्तूंना मागणी यावी लागते. भांडवली वस्तू बरोबरच देशात उपभोग्य वस्तूंचे उत्पादनही पुरेशा प्रमाणात झाले पाहिजे. दोन्ही प्रकारच्या उद्योगात समतोल असला पाहिजे.

**इ) उत्पादन घटकातील समतोल :-**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत उत्पादनाचे विविध घटक महत्वाची भूमिका बजावत असतात. म्हणून उत्पादन घटकांच्या मागणी-पुरवठ्यातही समतोल निर्माण होणे आवश्यक असते. उत्पादन घटकांच्या मागणी-पुरवठ्यात समतोल निर्माण झाला तर उत्पादनात वृध्दी घडून येते व देशाचा विकास घडून येतो.

अशा प्रकारे अविकसित देशात आर्थिक विकास घडून येण्यासाठी कृषी आणि उद्योग क्षेत्रात, मानवी भांडवल आणि भौतिक वस्तूंच्या उत्पादनातील गुंतवणुकीत, देशांतर्गत आणि विदेशी व्यापारात, उपभोग्य वस्तूंच्या आणि भांडवली वस्तूंच्या उद्योगात, उत्पादन घटकांच्या मागणी आणि पुरवठ्यात समतोल प्रस्थापित होणे आवश्यक असते. त्याशिवाय अविकसित राष्ट्रांचा समतोल विकास घडून येत नाही.

**समतोल विकासाच्या अटी :-**

संतुलित वृध्दीची संकल्पना यशस्वी होण्यासाठी पुढील काही बाबी आवश्यक असतात.

१) आर्थिक विकासासाठी विकासाच्या योजना आखाव्या लागतात. या योजना योग्य प्रकारे आखून त्यांची अंमलबजावणी सुध्दा चांगल्या प्रकारे झाली पाहिजे. योजनांच्या आखणीत व अंमलबजावणीत उणिवा व दोष असतील तर समतोल विकासाचे प्रारुप अप्रगत देशात यशस्वी होत नाही.

२) समतोल विकास सिध्दांतानुसार विकास साध्य करण्यासाठी देशातील सरकार कार्यक्षम, प्रामाणिक असले पाहिजे. शासनाचा दृष्टिकोन चांगला असला पाहिजे.

३) समतोल विकास सिध्दांतानुसार देशाचा विकास करत असताना जनतेने चांगले सहकार्य केले पाहिजे. विकास प्रक्रियेत जनतेचा सहभाग महत्वाचा असतो.

४) देशात शांतता कायदा व सुव्यवस्था असली पाहिजे.

५) जागतिक पातळीवर देशा-देशात सहकार्याची भावना असली पाहिजे.

**समतोल विकासाचे फायदे**

देशाचा जर समतोल विकास सिध्दातांनुसार आर्थिक विकास घडून आला तर देशाला खालील फायदे मिळतात.

१) सर्व क्षेत्रात एकाचवेळी आणि सारख्याच प्रमाणात (पुरेशा प्रमाणात) गुंतवणूक केल्यामुळे रोजगार पातळीत वाढ होते. बेकारी कमी होते.

२) बाजारपेठांचा विकास व विस्तार होतो.

३) उद्योग क्षेत्राला बाह्य बचती प्राप्त होतात.

४) विदेशी व्यापारात व अंतर्गत व्यापारात वाढ होते.

५) श्रमविभागाचे फायदे मिळतात.

६) प्रादेशिक विषमता कमी होते.

७) औद्योगिक विकासामुळे वाहतूक, वीज, बँकिंग, दळणवळण इत्यादी क्षेत्रांचाही विकास होतो.

८) संतुलित विकास पध्दतीनुसार देशाचा विकास सुरू केला तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य व चांगला वापर शक्य होतो.

९) देश आत्मनिर्भर/स्वावलंबी होतो.

१०) संतुलित वृद्धी प्रतिमानानुसार देशाचा विकास घडवून आणला तर देशाचा सर्वांगीण व जलद विकास होतो. एकांगी विकास होत नाही.

अशा प्रकारे संतुलित विकास प्रारुपाचे काही फायदे वरीलप्रमाणे 'समतोल वृद्धी' समर्थकांनी सांगितले आहेत.

**समतोल विकास सिद्धांतावरील टीका**

समतोल वृद्धी प्रतिमानात काही दोष/उणिवा आहेत. या तत्वाच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे या तत्वावर म्हणजेच समतोल विकास सिद्धांतावर काही अर्थतज्ज्ञांनी टीका केल्या आहेत. त्या टीकांचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे घेतला आहे.

१) अल्पविकसित देशात पुरेसे भांडवल नसते. कुशल श्रमिकांचीही चणचण असते. तसेच तंत्रज्ञानही प्रगत नसते. त्यामुळे अशा देशात समतोल विकास पद्धत योग्य वाटत नाही असे प्रा. सिंगर यांनी म्हटले आहे.

२) समतोल विकास सिध्दांतात खाजगी उपक्रमांना महत्व दिले आहे. सरकारी उद्योग किंवा सार्वजनिक उपक्रमांना महत्व दिलेले नाही. ही टीका प्रा. सिंगर यांनी केली आहे.

३) समतोल विकास सिध्दांतानुसार अप्रगत देशात विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला तर गुंतवणूक प्रचंड केल्याने भाववाढीची समस्या निर्माण होऊ शकते. अशी टीका प्रा. सिंगर यांनी केली आहे.

४) नर्क्स यांनी आपल्या सिद्धांतात नियोजनाला महत्व दिलेले नाही. विविध क्षेत्रांचा विकास करण्यासाठी, भांडवलाची गुंतवणूक करण्यासाठी नियोजन यंत्रणा आवश्यक असते. पण त्याचा विचार नकर्स यांनी केलेला नाही.

५) टीकाकारांच्या मते, समतोल विकास पद्धतीने विकास घडवून आणला तर वस्तूचा उत्पादन खर्च वाढू शकतो. एकाचवेळी सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यास उत्पादन साधनांची व कच्चा मालाची टंचाई निर्माण होऊन उत्पादनाचा खर्च वाढू शकतो. पण त्याचा विचार या सिध्दांतात केलेला नाही.

६) ज्या प्रगत देशात आर्थिक मंदी उद्भवलेली असते, त्या देशांना हा सिध्दांत उपयुक्त आहे. अशा देशात उत्पादन साधनांची चणचण नसते. एकाचवेळी सर्व क्षेत्रात मोठी गुंतवणूक करून प्रगत देशातील मंदी हटू शकते. पण अप्रगत देशात उत्पादनांची साधने व घटक पुरेशा प्रमाणात नसतात. त्यामुळे हे तत्व आर्थिक मंदीत सापडलेल्या प्रगत देशांना अधिक उपयुक्त आहे. अप्रगत देशांना नाही.

७) अकार्यक्षम शासन – अप्रगत देशातील बहुतेक सरकारे अकार्यक्षम असतात. प्रशासन फारसे चांगले नसते. त्यामुळे विकास प्रक्रियेत अडचणी निर्माण होतात.

८) समतोल विकास सिध्दांतानुसार आपला विकास घडवून आणला आहे असा एकही देश किंवा एकही ऐतिहासिक पुरावा नाही अशी टीका काही टीकाकारांनी केली आहे त्यांच्या मते इंग्लड, अमेरिका व जपान या राष्ट्रांनी निवडक उद्योगातच सुरुवातीला गुंतवणूक केली होती.

९) टीकाकारांच्या मते, अप्रगत राष्ट्रात श्रमप्रधान तंत्र वापरुनही विकास करता येत नाही. कारण अशा देशात संयोजन कौशल्याचा अभाव असतो. तसेच प्रभावी व्यवस्थापनाचाही अभाव असतो.

१०) प्रा. नर्क्स यांचा समतोल विकास सिद्धांत जे.बी.से. यांच्या बाजारपेठ नियमावर आधारित आहे. पण हा नियम खोटा ठरला आहे. त्यामुळे समतोल विकास सिद्धांत फारसा उपयुक्त नाही अशी टीका टीकाकारांनी केली आहे.

११) प्रा. सिंजर, फ्लेमिंग, हर्शमन इत्यादी अर्थतज्ज्ञांच्या मते, 'समतोल विकासाची संकल्पना अवास्तव संकल्पना आहे.' सैद्धांतिकदृष्ट्या ही संकल्पना चांगली वाटत असली तरी व्यावहारिक दृष्ट्या ती काहीशी निरुपयोगी आहे. ही संकल्पना व्यवहारात अंमलात आणताना काही अडचणी येतात. पुरेसे भांडवल आणि कुशल श्रमपुरवठा असल्याशिवाय अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांचा विकास घडवून आणता येत नाही.

**समारोप :–**

अशा प्रकारे समतोल विकास संकल्पनेवर वरीलप्रमाणे जरी टीका केल्या गेल्या असल्या तरी समतोल विकास तत्त्वाचे महत्व कमी होत नाही. काही तज्ज्ञांच्या मते, अविकसित देशात विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत जरी या तत्वानुसार विकास करता येत नसला तरी विकासाच्या विशिष्ट अवस्थेनंतर या तत्वाची अंमलबजावणी करुन विकासाचे ध्येय गाठणे शक्य होते. अल्पकाळात जरी हे तत्व उपयोगी पडत नसले तरी दीर्घकाळात या सिद्धांतानुसार विकासाची व्यूहरचना आखली तर न्यूनविकसित देशांनासुद्धा विकासाचे ध्येय गाठणे अवघड नाही.

## २.२.९ असमतोल वृद्धी (Unbalanced Growth):-

**प्रास्ताविक :-**

काही अर्थतज्ञांनी अविकसित देशांच्या विकासासाठी 'समतोल विकास सिद्धांताचा' पुरस्कार केला आहे. तर काहींनी त्यासाठी 'असमतोल विकास तत्त्वाची' शिफारस केली आहे. प्रा. हर्षमन यांनी संतुलित विकास सिद्धांतावर टीका करून गरीब राष्ट्रांच्या जलद आर्थिक विकासासाठी 'असमतोल वृध्दी सिद्धांताच्या' अंमलबजावणीची शिफारस केली आहे. प्रा. अल्बर्ट हर्षमन. एच. डब्लू सिंगर, माकसस फ्लेमिंग, सी. पी. किंडलबर्जर, डब्लू, डब्लू रोस्टोव, पॉल स्ट्रिटिन इत्यादी प्रमुख अर्थतज्ज्ञांनी असमतोल विकास सिध्दांताचे समर्थन केले आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात सारखीच आणि एकाच वेळी गुंतवणूक न करता निवडक क्षेत्रात गुंतवणूक करून विकासासाठी प्रयत्न करावेत असे या सिदधांताच्या समर्थकांचे प्रतिपादन आहे. समतोल विकास सिध्दांत गरीब देशांना लागू करता येत नाही. कारण गरीब देशाकडे भांडवल व इतर साधने पुरेशा प्रमाणात नसतात. त्यांची आर्थिक शक्ती कमी असते. म्हणून समतोल विकास तत्वानुसार गरीब राष्ट्रांना अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात सारख्याच प्रमाणत एकाचवेळी प्रचंड गुंतवणूक करता होत नाही. तसा प्रयत्न केला तर अर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू होईलच असे खात्रीने सांगता येत नाही. कारण कुशल, श्रमिक, धाडसी संयोजक यांची गरीब देशात कमतरता असते. म्हणून गरीब राष्ट्रांनी आपला आर्थिक विकास संतुलित विकास प्रतिमानानुसार न करता असंतुलित विकास प्रतिमानानुसार करावा अशी शिफारस हर्षमन यांच्यासारख्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केली आहे. थोडक्यात असमतोल विकास म्हणजे अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात एकाच वेळी गुंतवणूक न करता महत्वाच्या/निवडक क्षेत्रात गुंतवणूक करणे होय. सर्व क्षेत्रांचा एकाच वेळेस विकास न करता मोजक्या किंवा महत्त्वाच्या क्षेत्रांचा अगोदर विकास घडवून आणावा असे असमतोल वृद्धी तत्व सांगते. महत्वाच्या उद्योगांना आधारभूत उद्योग म्हणतात. या उद्योगात गुतंवणूक केल्यामुळे त्याचा फायदा इतर उद्योगांना होतो. या उद्योगावर अवलंबून असणारे इतर उद्योग विकसित होतात. त्यामुळे देशांच्या विकासाची गती वाढते.

न्यून विकसित देशात भांडवल आणि तंत्रज्ञानाचा अभाव असतो. त्यामुळे अशा देशात सर्व क्षेत्रात एकाचवेळी पुरेशी गुतंवणूक करता येत नाही. म्हणजे सर्व क्षेत्रांचा विकास एकाच वेळेस करता येत नाही. या गृहीतावर असमतोल विकास सिध्दांत आधारित आहे. या सिध्दांताच्या समर्थकांच्या मते, अल्पविकसित देशात संतुलित विकास तत्वाने विकासाचा दर वाढत नाही. कारण सर्व क्षेत्रात थोडी थोडी गुतंवणूक केली तर विकासदरात अगदी नाममात्र वाढ होईल किंवा विकास दर शून्य सुध्दा राहील. म्हणून अर्थव्यवस्थेच्या निवडक (मोजक्या व महत्वाच्या) क्षेत्रातच मोठी गुतंवणूक करून अल्पविकसित देशातील विकासाला चांगली अशी गती देता येते. कारण गुंतवणूकीसाठी निवडलेली महत्वाची व मोजकी क्षेत्रे अशी असतात की त्यांच्या विकासावर इतर क्षेत्रांचा / इतर उद्योगांचा विकास अवलंबून असतो. त्यामुळे या निवडक क्षेत्रातच गुतंवणूक करून किंवा अगोदर विकास घडवून आणावा लागतो. अर्थव्यवस्थेच्या मोजक्या / महत्वाच्या देशातच प्रचंड गुंतवणूक करणे

यालाच अर्थव्यवस्थेला मोठा धक्का देणे (Big Push) असे म्हणतात. असा प्रबळ धक्का अर्थव्यवस्थेला दिला तरच अशा देशात विकासाची प्रक्रिया सुरू होते.

अर्थव्यवस्थेच्या निवडक क्षेत्रांची निवड करून अशा क्षेत्रात गुतंवणूक करणे म्हणजे असमतोल तत्त्वाने गुंतवणूक करणे होय. निवडक क्षेत्रातच गुतंवणूक केल्याने अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण होतो. त्यामुळे अल्पविकसित देशात विकास व्हायला सुरुवात होते. आणि विकासाचाा शुध्द दर जास्त राहतो. समतोल विकास पध्दतीतील विकासाच्या सरासरी दरापेक्षा असमतोल विकास पध्दतीतील विकासाचा शुध्द दर हा जास्त असतो.

**असमतोल विकास संकल्पनेच्या काही व्याख्या :-**

असंतुलित विकास कशास म्हणतात ते आपणास खालील काही व्याख्यावरून लक्षात येईल.

१. **प्रा. हर्षमन** यांच्या मते, ''विकास ही असमतोलाची एक साखळी असून त्यामध्ये असंतुलन दूर न करता ते कायम ठेवले जाते. अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी तणाव (tensions), अप्रमाणता (disproportions), आणि असाम्य (disequilibria) या बाबी टिकवून ठेवाव्या लागतात. "(Acording to Hirschman "Development is a chain of disequilibria that must be kept alive rather than eliminate the disequilibrium of which profits and losses are the symptoms in a compatitive economy. If the econimy is to be kept moving ahead the task of development policy is to maintain tentions, disproprotions and disequilibra.")

२. **प्रा. अलक घोष** यांनी असंतुलित वृद्धी प्रतिमानात नियोजनाला महत्व दिले आहे. नियांजनाच्या माध्यमातून विकास घडवून आणण्याला त्यांनी प्राधान्य दिले आहे. ते म्हणतात, नियोजनाच्या माध्यमातून असंतुलित विकास तत्वाव्दारे नियोजन काळात उत्पन्नापेक्षा गुतंवणूक अधिक दराने वाढेल. आणि उपभोगापेक्षा उत्पन्नात अधिक वेगाने वाढ होईल.

$$\frac{\Delta I}{I} > \frac{\Delta Y}{Y} > \frac{\Delta C}{C}$$

$\frac{\Delta I}{I}$ = गुंतवणुकीच्या वाढीचा दर

$\frac{\Delta Y}{Y}$ = उत्पन्नाच्या वाढीचा दर

$\frac{\Delta C}{C}$ = उपभोगाच्या वाढीचा दर

गुंतवणूक, उत्पन्न आणि उपभोगाच्या वृदधीचे दर समान नसतात हे वरील सूत्रावरून लक्षात येते.

३. **बेंजामिन हिगिन्स** यांच्या मते, ''आर्थिक वृद्धी साध्य करण्याचा चांगला मार्ग म्हणजे काळजीपूर्वक व्यूहरचना तयार करून जाणीवपूर्वक अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण करणे होय.'' (Deliberate imbalancing of the economy in accordance with a predesigned strategy is the best way to achieve economic growth)

**प्रा. हर्षमन यांचा असमतोल विकासाचा सिध्दांत :-** (The Theory of unbalanced growth propounded by Hirschman )

प्रा. हर्षमन यांनी न्यून विकसित देशांच्या विकासासाठी 'असंतुलित विकास तत्वाचे' समर्थन केले आहे. त्यांच्या मते गरीब देशांचा विकास असमतोल विकास तत्त्वानेच शक्य असतो. वित्तीय, बिगर वित्तीय घटक गरीब देशात पुरेशा प्रमाणात नसतात. म्हणून आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेच्या निवडक क्षेत्राातच गुतंवणूक करावी लागते. महत्वाच्या थोड्या क्षेत्रातच गुंतवणूक केली तर अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण होते. असमान विकास धोरण स्वीकारल्याने आर्थिक वृध्दीला गती मिळते. ज्या निवडक क्षेत्राात गुतंवणूक केली जाते, त्या गुतंवणूकीचे फायदे इतर क्षेत्रानाही मिळतात. आणि त्या क्षेत्राचांही विकास घडून येतो. अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण करूनच न्यून विकसित देशात विकास प्रक्रिया वेगाने कार्यान्वित करता येउ शकते, असे प्रा. हर्षमन यांचे मत आहे. म्हणून त्यांनी न्यून विकसित देशांच्या जलद विकासासाठी समतोल विकास तत्वाऐवजी असमतोल विकास तत्वाची जोरदार शिफारस केली आहे. त्यांनी आपल्या सिद्धांतात बाह्य बचतींचा विचार केला आहे. निवडक क्षेत्रात/महत्वाच्या उद्योगात गुतंवणूक केल्यामुळे बाह्य बचती (External economies) प्राप्त होतात. त्या बाह्य फायद्यातून पुन्हा नवनवीन उद्योग प्रकल्प उभे राहतात. त्यामुळे विकासाला गती मिळते.

अर्थव्यवस्थेत जाणीवपूर्वक/हेतूत: असंतुलन निर्माण केले पाहिजे. त्याशिवाय न्यून विकसित देशात विकास सुरू होत नाही. अर्थव्यवस्थेत जाणीवपूर्वक असंतुलन कसे निर्माण करावयाचे हे सुध्दा प्रा. हर्षमन यांनी सांगितले आहे. त्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे दिले आहे.

हर्षमन यांच्या मते. सामाजिक वरकड भांडवलामध्ये गुतंवणूक करून अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण करता येतो. किंवा प्रत्यक्ष उत्पादक क्रियामध्ये अगोदर गुतंवणूक करून सुध्दा असमतोल निर्माण करता येतो.

**सामाजिक वरकड भांडवलाद्वारे असंतुलन** (Unbalancing the Economy with Social Overhead Capital - SOC) :-

अगोदर सामाजिक वरकड भांडवलामध्ये गुतंवणूक केली तर अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण होऊन न्यूनविकसित देशात आर्थिक विकास कसा घडून येतो ते उदाहरणाद्वारे प्रा. हर्षमन यांनी सांगितले आहे. सामाजिक वरकड भांडवलामध्ये (SOC) प्रामुख्याने पायाभूत सेवा सुविधांचा समावेश होतो. या सेवांना आधारभूत सेवा असेही म्हणतात. शेती, उद्योग इत्यादी व्यवसायांचा विकास ज्या सुविधांवर अवलंबून असतो,

त्या सेवांना आंतरसुविधा असे म्हणतात. या आधारभूत सेवामध्ये आरोग्य, शिक्षण, वाहतूक, दळणवळण, पाणी पुरवठा, वीज, सिंचन या सुविधांचा समावेश होतो. प्रा. हर्षमन यांच्या मते, सामाजिक वरकड भांडवलात (पायाभूत सुविधांमध्ये) गुतंवणूक केल्याशिवाय न्यून विकसित देशातील प्राथमिक, व्दितीय आणि तृतीय क्षेत्रातील उत्पादन क्रिया सुरू होऊ शकत नाहीत. (According to Hirschman "Social overhead capital (soc) implies these basic services with which primary, secondary and tertiary productive activities can not function.") सामाजिक वरकड भांडवलामध्ये (आधारभूत सुविधामध्ये) गुतंवणूक केली तर या सुविधांमध्ये वाढ तर होतेच शिवाय या सुविधांमध्ये गुतवंणूक केल्यामुळे अर्थव्यवस्थेतील प्रत्यक्ष उत्पादक क्रियेमधील (Directly productive Activities) गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळते, वीज, आरोग्य, शिक्षण, वाहतूक या सुविधांना सामाजिक वरकड किंवा आवश्यक सेवा असे म्हणतात. या सुविधांच्या निर्मितीसाठी, विकासासाठी जो पैसा खर्च केला जातो, त्यास सामाजिक वरकड भांडवल (SOC) असे म्हणतात. SOC मध्ये मोठ्या प्रवाहात गुतंवणूक केली तर खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळून खाजगी गुतंवणूक वाढते. म्हणजे SOC मधील गुतंवणुकीमुळे DPA क्षेत्राचा फायदा होतो. उदाहरणार्थ SOC मधील गुतंवणूकीमुळे स्वस्त दरात वीज देशात उपलब्ध होऊ शकेल. वाहतूकीच्या सुविधा निर्माण होतील. त्यामुळे DPA क्षेत्राातील उद्योग, कारखाने वाढीस लागतील. शेतीलाही फायदा होईल. व्यापाराला प्रोत्साहन मिळेल. अशा प्रकारे जोपर्यंत SOC मध्ये (आधारभूत सेवामध्ये) गुतंवणूक केली जात नाही जोपर्यंत DPA मध्ये गुतंवणूक करण्यास खाजगी गुतंवणूकदारांना प्रेरणा मिळणार नाही. SOC मधील गुतंवणूक ही राजकीय दबावातून सुध्दा होऊ शकते. SOC मधील गुतंवणूकीमुळे उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ होते. तसेच उत्पादन खर्चात सुध्दा घट होते. DPA मधील खाजगी उत्पादकांना स्वस्त वीज, वाहतूक या सुविधांचा लाभ होतो. त्यामुळे त्यांच्या उत्पादनांचा खर्च कमी येतो. अशा प्रकारे SOC मधील गुतंवणूकीत वाढ झाली की, DPA मधील खाजगी गुतंवणूक सुध्दा वाढते. म्हणून अगोदर SOC मध्ये गुतंवणूक केली पाहिजे आणि अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण केला पाहिजे. SOC मध्ये गुतंवणूक केली की DPA मधील गुतंवणूक आपोआप वाढते व त्यामुळे देशाच्या विकासाची गतीसुध्दा वाढते. थोडक्यात प्रत्यक्ष उत्पादक क्षेत्राच्या (DPA च्या) विकासासाठी सामाजिक वरकड भांडवलातील (SOC मधील) गुतंवणूक ही महत्वाची अट आहे.

**प्रत्यक्ष उत्पादक क्रियाव्दारे अर्थव्यवस्थेत असंतुलन (Unbalancing the Econmy with Directly Productive Activities)**

न्यून विकसित देशात अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे प्रत्यक्ष उत्पादक क्रियेमध्ये (DPA) गुतंवणुक करणे होय. ज्या गुंतवणूकीमुळे वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होते, त्या गुंतवणूकीला प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक (DPA) असे म्हणतात. सामाजिक वरकड भांडवलात (SOC मध्ये) गुंतवणूक करण्याऐवजी अगोदर प्रत्यक्ष उत्पादक क्रियेमध्ये (DPA) गुतंवणूक करून असमतोल निर्माण करता

येतो व विकासाला चालना देता येते. जर अगोदर DPA मध्ये गुतंवणूक केली तर SOC मधील वीज, वाहतूक, पाणी यांचा तुटवडा जाणवेल. त्यामुळे या सुविधा निर्माण करण्याठी खर्च करावा लागेल. त्यामुळे SOC मधील गुतंवणूक वाढेल. अशा प्रकारे DPA मध्ये गुतंवणूक केल्यास कालांतराने SOC मध्ये गुतंवणूक करावी लागेल. कारण अगोदर DPA मध्ये गुतंवणूक केल्यास SOC मधील कमतरतेमुळे DPA मधील खाजगी उत्पादकांचा उत्पादन खर्च वाढेल, यातील वस्तुंच्या किंमती वाढतील. त्यामुळे वीज, पाणी, वाहतूक या सुविधा निर्माण करण्यासाठी SOC मध्ये गुतंवणूक करण्यासाठी सरकारवर दबाव येईल. त्यामुळे SOC मधील गुतंवणूक वाढेल. त्यामुळे अर्थिक विकासाच्या दरातही वाढ होईल.

प्रा. हर्षमन यांच्या मते पायाभूत सुविधा (SOC) किंवा प्रत्यक्ष उत्पादक क्षेत्र (DPA) यापैकी एका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुतंवणूक करून म्हणजे असमतोल निर्माण करून आर्थिक विकास घडवून आणता येतो. SOC व DPA यापैकी एका क्षेत्रात पुरेशी गुंतवणूक करणे शक्य आहे.

**विकासाचा मार्ग :–**


नफ्याच्या अपेक्षा आणि राजकीय दबाव यांचा परिणाम गुतंवणूकीच्या क्रमावर होतो. (Investment sequences are generated by profit expectations and political pressuress.) नफ्याच्या अपेक्षेने गुतंवणूक वाढते तेव्हा अगोदर SOC मध्ये गुतंवणूक होते आणि नंतर DPA मध्ये गुतंवणूक होते. आणि राजकीय दबावाने गुतंवणूक वाढते तेव्हा विकासाचा क्रम DPA to SOC असा राहतो. (Profit expectations generate the sequence from SOC to DPA and political pressures from DPA to SOC). जेंव्हा आर्थिक विकासाचा क्रम SOC $\rightarrow$ DAP असा असतो तेंव्हा त्या विकास मार्गास 'सामाजिक वरकड भांडवलाच्या अतिरिक्त क्षमतेतून विकास' असे म्हणतात. (This sequence of investment (from SOC to DPA) is called the 'pressure relieving investment' development via excess capacity of DPA') आणि जेंव्हा विकासाचा क्रम DPA to SOC असा असतो तेंव्हा त्या विकास मार्गाला 'सामाजिक वरकड भांडवलाच्या न्यूनतम क्षमतेतून विकास' किंवा 'सामाजिक सुविधांच्या कमतरतेतून विकास' असे म्हणतात. (The sequence of investment (from DPA to SOC) is called 'pressure creating investment' or 'development via shortage of social overhead capital or SOC'.)

अशा प्रकारे प्रा. हर्षमन यांच्या मतानुसार दोन पध्दतीने न्यून विकसित देशांचा विकास घडवून आणता येतो. SOC पासून DPA कडे आणि DPA पासून SOC कडे. (SOC $\rightarrow$ DPA किंवा DPA $\rightarrow$ SOC). या दोन मार्गापैकी पहिल्या मार्गाला (SOC to DPA) प्रा. हर्षमन यांनी पसंती दिली आहे. प्रा. हर्षमन यांच्या मते, सामाजिक वरकड भांडवलाच्या अतिरिक्त क्षमतेतून विकास (SOC $\rightarrow$ DPA) हा मार्ग कमी अडचणींचा, कमी धोक्यांचा आणि स्वयंप्रेरक (Vigrously self-propelling) असतो. दुसरा मार्ग (DPA $\rightarrow$ SOC) हा

जास्त धोक्यांचा आणि जास्त अडचणींचा मार्ग आहे. म्हणून पहिल्या मार्गानेच असंतूलन निर्माण करून विकासाला गती दिली पाहिजे.

**आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण :–**

प्रा. हर्षमन यांचा असमतोल विकासाचा सिध्दांत खालील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे.




वरील आकृतीत OX या अक्षावर SOC cost दर्शविला आहे. याचा अर्थ पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आलेला खर्च दर्शविला आहे. OY अक्षावर DPA cost दर्शविला आहे. म्हणजे DPA मधील गुंतवणूक खर्च दर्शविला आहे. $a_1a_1$, $b_1b_1$, $c_1c_1$, हे समउत्पादन वक्र दर्शवितात. SOC आणि DPA मध्ये गुंतवणूक केल्यामुळे जे स्थूल राष्ट्रीय उत्पादन प्राप्त होते, ते $a_1a_1$, $b_1b_1$, $c_1c_1$, या समउत्पादन वक्राव्दारे दिसून येते. SOC आणि DPA मध्ये गुंतवणूक वाढली की स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. त्यामुळे समउत्पादन वक्र वरच्या बाजूला जातो. आकृतीतील $b_1b_1$, $c_1c_1$, हे समउत्पादन वक्र राष्ट्रीय उत्पादनातील वाढ दर्शवतात. ON ही रेषा ४५ अंशाचा कोन करून काढली आहे. ON हा वक्र SOC = DPA दर्शवितो. ON हा वक्र SOC आणि DPA मधील गुंतवणुकीमुळे झालेली संतुलित वाढ दर्शवितो. A, B, C, हे समउत्पादन वक्रावरील इष्टतम (optimum) बिंदू आहेत. $a_1a_1$, $b_1b_1$, $c_1c_1$, या समउत्पादन वक्रावरील A, B व C, हे बिंदू जोडून ON ही रेषा तयार झाली आहे.

प्रा. हर्षमन यांनी आपला असमतोल वृध्दीचा सिद्धांत खालील गृहीतांचा आधार घेऊन मांडला आहे. ती गृहीते अशी

१. SOC आणि DPA ही दोन क्षेत्रे एकाच वेळी विकसित होऊ शकत नाहीत. म्हणून एकाच वेळी दोन्ही क्षेत्रांचा विकास करणे शक्य नाही

२. गुंतवणूकीचे प्रेरित निर्णय जास्तीत जास्त होतील असा विकासाचा क्रम असला पाहीजे.

हर्षमन यांच्या मते, एकतर अगोदर SOC मध्ये गुंतवणूक करावी लागेल किंवा DPA मध्ये अगोदर गुंतवणूक करावी लागेल. न्यून विकसित देशात एकाचवेळी दोन्ही क्षेत्रांचा विकास करणे शक्य नसते. समजा विकासासाठी पहिला क्रम निवडला तर आर्थिक विकास कसा साध्य होते ते आकृतीच्या साहाय्याने सांगता येईल. आर्थिक विकासासाठी 'सामाजिक वरकड भांडवलाच्या अतिरिक्त क्षमतेतून विकास' हा विकासाचा पहिला मार्ग स्वीकारला तर ADBEC असा असेल. SOC मधील (सामाजिक वरकड भांडवलातील) गुंतवणूक A पासून D पर्यंत वाढते. म्हणून DPA मधील (प्रत्यक्ष उत्पादक क्षेत्रातील) गुंतवणूक A पासून F पर्यंत वाढते. SOC मधील गुंतवणूकीचा परिणाम म्हणून DPA मधील खाजगी प्रेरित गुंतवणूक वाढते. जोपर्यंत bb या समउत्पादन वक्रावरिल B बिंदूपाशी संतुलन होत नाही जोपर्यंत ही गुंतवणूक वाढते. B हा बिंदू bb या वरच्या समउत्पादन वक्रावरचा आहे. वरच्या पातळीवरील समउत्पादन वक्र उच्च उत्पादन पातळी दर्शवितात. B बिंदू अर्थव्यवस्थेने उच्च उत्पादन पातळी गाठली आहे हे दर्शवितो. उत्पादनात झालेल्या वाढीमुळे DPA मध्ये गुंतवणूक करण्यासाठी खाजगी गुंतवणूकदारांना प्रेरणा मिळते. त्यामुळे ते DPA मध्ये अधिकाधिक गुंतवणूक करतात. त्याचा परिणाम म्हणून DPA मधील गुंतवणूक B पासून G पर्यंत वाढते. उत्पादनात वाढ झाल्यामुळे सरकार SOC मधील गुंतवणूक B पासून E पर्यंत वाढवते. आणि C बिंदूपाशी समतोल साधला जातो. C हा बिंदू $c_1c_1$ या वरच्या समउत्पादन वक्रावरील आहे C हा बिंदू B बिंदूपेक्षा उत्पादनात झालेली अधिक वाढ दर्शवितो. या मार्गाने जेंव्हा अर्थव्यवस्थेचा विकास होतो, तेंव्हा त्यास 'सामाजिक वरकड भांडवलाच्या (SOC) अतिरिक्त क्षमतेतून विकास'असे म्हणतात.

दुसऱ्या पर्यायाने सुध्दा न्यून विकसित देश विकासाचे ध्येय गाठू शकतात. म्हणजे SOC ऐवजी DPA मध्ये अगोदर गुंतवणूक करून विकासाला सुरुवात करता येऊ शकते. जर DPA मध्ये गुंतवणूक केली तर AFBGC असा विकासाचा मार्ग राहील. जर DPA मधील गुंतवणूक A पासून F पर्यंत वाढवली तर त्यामुळे SOC मधील गुंतवणूक A पासून D पर्यंत वाढेल. DPA मधील गुंतवणूकीमुळे SOC मध्ये गुंतवणूक वाढवण्याची प्रेरणा मिळेल. त्यामुळे वरच्या समउत्पादन वक्रावरील B बिंदूत समतोल साध्य होईल. B हा बिंदू देशाच्या उत्पादन पातळीत (स्थूल राष्ट्रीय उत्पादनात / आर्थिक विकास दरात) झालेली वाढ दर्शवितो. त्यामुळे खाजगी गुंतवणूक वाढीस प्रेरणा मिळते. त्यामुळे DPA मधील गुंतवणूक B पासून G पर्यंत वाढते. त्याचा परिणाम म्हणून SOC

मधील गुंतवणूक B पासून E पर्यंत वाढते आणि अर्थव्यवस्था $c_1c_1$ या वरच्या पातळीवरील समउत्पादन वक्रावरील C बिंदूत संतुलित होते. C हा बिंदू वरच्या समउत्पादन वक्रावर असल्याने तो बिंदू त्या उत्पादनात झालेली वाढ दर्शवितो.

विकासाचा पहीला पर्याय (मार्ग) हा दुसऱ्या मार्गापेक्षा अधिक सातत्यपूर्ण, सरल, निर्विघ्न आणि प्रेरणा देणारा आहे. कारण DPA मधील गुंतवणूक SOC मधील गुंतवणूकीला तात्काळ प्रेरित करू शकत नाही. प्रतिकूल राजकीय परिस्थितीमुळे असे घडते. दुसरा मार्ग पहिल्या मार्गापेक्षा जास्त अडचणींचा, जास्त धोक्याचा आहे. पहिल्या मार्गाने (SOC मध्ये गुंतवणूक करून) जर विकास केला तर तो स्वयंप्रेरक (Self-Propelling) असतो. तसेच DPA मधील गुंतवणूकीला प्रेरणा देणारा असतो. म्हणून अगोदर SOC मध्ये गुंतवणूक करावी व अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण करावा, असे हर्षमन यांनी म्हटले आहे. असमतोल गुंतवणूकीमुळे विकासाला चालना मिळते असे हर्षमन यांनी म्हटले आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात गुंतवणूक न करता निवडक क्षेत्रात गुंतवणूक केली की असमतोल निर्माण होतो. हर्षमन यांनी सर्वप्रथम अंतिम उद्योग प्रथम स्थापन करावेत असे म्हटले आहे. कारण अशा उदयोगांच्या स्थापनेमुळे इतर उद्योगांची स्थापना करण्यास प्रेरणा मिळत असते. उदाहरणार्थ वीज निर्मिती केंद्रात गुंतवणूक केल्यास विजेची उपकरणे तयार करणाऱ्या कारखान्यांची स्थापना होते.

**असमतोल विकास प्रतिमानावरील टीका :–**

असतमोल विकास प्रतिमानात काही उणिवा आणि दोष आहेत. म्हणून या प्रतिमावर काही अर्थतज्ज्ञांनी टीका केली आहे. त्या टीका थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

१. असमतोल विकास तत्वाने न्यून विकसित देशात विकास सुरू केला तर उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात फारशी वाढ होत नाही. कारण या तत्वाने मुलभूत व मोठ्या उद्योगधंद्यात प्रचंड गुंतवणूक केली जाते. त्यामुळे उपभोक्त्यांचे हित होत नाही.

२. या तत्वामुळे देशाचा एकांगी विकास होण्याची शक्यता व भीती काही टीकाकारांनी व्यक्त केली आहे. कारण या तत्वानुसार अर्थव्यवस्थेच्या निवडक क्षेत्रातच गुंतवणूक केली जाते. त्यामुळे इतर क्षेत्रे मागास राहतात.

३. काही टीकाकारांनी या सिध्दांतावर अशी टीका केली आहे की, जर या सिध्दांताची अविकसित देशांत अंमलबजावणी केली तर देशात प्रचंड भाववाढ किंवा महागाई उसळेल.

४. अर्थिक विकासासाठी वीज, तंत्रज्ञान, कच्चा माल, दळणवळण, सक्षम बाजारपेठा आवश्यक असतात. ण त्यांची वणवा/ कमतरता गरीब देशात असते. परंतु त्याचा विचार हर्षमन यांनी केलेला नाही, अशी एक टीका केली जाते.

५. हा सिध्दांत रशिया, चीन यासारख्या समाजवादी देशांना लागू पडतो. परंतु लोकशाही देशांना लागू पडत नाही अशी टीका केली जाते. या सिध्दांतानुसार विकासाला सुरुवात केली की उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होते. लोकशाही देशात असे करता येत नाही.

६. असमतोल विकास सिद्धांतात शेती क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, अशी एक टीका केली जाते. उद्योगांच्या विकासावर या सिध्दांतात अधिक भर दिला आहे.

७. निवडक क्षेत्रातच प्रचंड गुतंवणूक केल्याने या उत्पादक क्षेत्राची उत्पादक शक्ती वाढते. त्या शक्तीचा पुरेपूर वापर भविष्यात करता आला नाही तर त्या शक्तीच्या अपव्यय होतो.

८. या सिद्धांताने उत्पादन साधनांच्या अगतिशीलतेकडे दुर्लक्ष केले आहे. गरीब देशात उत्पादन साधने फारशी गतिशील नसतात. परंतु त्याकडे हर्षमन यांनी लक्ष दिलेले नाही.

९. विविध क्षेत्रात किती प्रमाणात असमतोल असावा? असमतोलाची तीव्रता किती असावी? याचे स्पष्टीकरण या सिध्दांतात दिलेले नाही.

१०. अर्थिक विकासासाठी गुतंवणूकीच्या निर्णयाबरोबरच प्रशासकीय, व्यवस्थापकीय निर्णयही महत्वाचे असतात. पण त्याचा विचार या सिध्दांतात केलेला नाही.

अशा प्रकारे जरी वरीलप्रमाणे असमतोल विकास सिध्दांतावर टीका करण्यात आल्या असल्या तरी या सिद्धांतांचे महत्व कमी होत नाही. गरीब देशात भांडवल कमी असते. म्हणून अशा देशांना एकाचवेळी सर्व क्षेत्रात प्रचंड गुतंवणूक करता येत नाही. म्हणून गरीब देशांनी निवडक/महत्वाच्या/विशिष्ट क्षेत्रातच अगोदर गुतंवणूक करावी हा या सिध्दांतातील विचार गरीब देशांना मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे असे म्हणता येईल.

**२.२.१० प्रा. लेविस यांचा अमर्यादित श्रमपुरवठा सिध्दांत** (Theory of Unlimited Supplies of Labour)

**प्रास्ताविक :–**

प्रा. ऑर्थर लेविस यांनी मे १९५४ मध्ये ‘Economic Development with Unlimited Supplies of Labour’ या प्रसिध्द केलेल्या लेखात आर्थिक विकाससंबंधीचे विचार मांडले आहेत. अविकसित व प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशातील अमर्याद श्रमपुरवठ्याचा वापर करुन आर्थिक विकास कसा घडवून आणता येतो? याचे स्पष्टीकरण लेविस यांनी आपल्या सिध्दांतात दिले आहे. गरीब देशातील अमर्यादित श्रमपुरवठा आर्थिक विकासाचे साधन बनू शकतो असे लेविस यांचे मत आहे. त्यांचे हे प्रारुप प्रामुख्याने जगातील अविकसित राष्ट्रांच्या विकासासाठीचे प्रारुप आहे.

**सिध्दांताची गृहीते :–**

प्रा. लेविस यांचा अमर्यादित श्रमपुरवठा सिध्दांत प्रामुख्याने खालील गृहीतावर आधारित आहे.

१) अप्रगत देशातील बेरोजगार श्रमिकांची सीमांत उत्पादकता ही शून्य असते.

२) अप्रगत देशात निर्वाह पातळीला श्रमपुरवठा पूर्ण लवचिक असतो.

३) अप्रगत देशांची अर्थव्यवस्था भांडवली क्षेत्र आणि निर्वाह क्षेत्र अशा दोन क्षेत्रात विभागलेली असते.

४) भांडवली क्षेत्रातील वेतनाचे दर निर्वाह क्षेत्रातील वेतन दरापेक्षा ज्यास्त असतात.

५) निर्वाह क्षेत्रातील भांडवल संचयाचा दर हा खूपच कमी असतो.

६) भांडवली क्षेत्रात नफ्यासाठी उत्पादन केले जाते.

७) अविकसित देशात श्रमिकांचा पुरवठा शेतकरी, घरगुती कामे करणारे किरकोळ नोकर, स्त्रिया, लहान व्यापारी व लोकसंख्या वाढीमधून होतो.

८) अकुशल श्रमिकांना कुशल बनविण्यासाठी येणाऱ्या प्रशिक्षणाचा खर्च स्थिर असतो.

९) अर्धविकसित देशातील भांडवल आणि नैसर्गिक साधनसामग्री ही लोकसंख्येच्या तुलनेत अपुरी/दुर्मिळ असते.

**व्दिक्षेत्रीय अर्थव्यवस्था (Two Sector Economy):-**


प्रा. लेविस यांच्या मते, न्यून विकसित देशांची अर्थव्यवस्था भांडवली क्षेत्र (Capitalist Sector) आणि निर्वाह क्षेत्र (Subsistence Sector) या दोन क्षेत्रात विभागलेली असते. निर्वाह क्षेत्रात कृषी व्यवसाय, घरगुती व्यवसाय, किरकोळ व्यापार या व्यवसायांचा समावेश होतो. या क्षेत्रातील श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते. तसेच ऋण सुध्दा आढळून येते. निर्वाह क्षेत्रात काम करणाऱ्यांना मजुरी खूपच कमी मिळते. भांडवली क्षेत्रात उद्योग, खाणी, मळे यांचा समावेश होतो. या क्षेत्रात नफ्यासाठी उत्पादन केले जाते. या क्षेत्रातील श्रमिकांना निर्वाह क्षेत्रापेक्षा अधिक मजुरी मिळते.

अप्रगत देशात निर्वाह क्षेत्रात श्रमाचा पुरवठा हा ज्यास्त असतो. सुप्त (अदृश्य) बेकारीचे अस्तित्व असते. निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रात वगळले तर भांडवलनिर्मितीचा दर वाढतो, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते आणि विकासाचा दर वाढतो. म्हणून अप्रगत देशातील अमर्याद श्रमपुरवठयाला फायदेशीर/उत्पादक रोजगार पुरवणे आवश्यक आहे. निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना प्रशिक्षण दिले तर भांडवली क्षेत्राला कुशल श्रमिक उपलब्ध होतात. त्यामुळे कुशल श्रमिकांची टंचाई भासणार नाही.

**भांडवली अधिक्य (Capitalist Surplus):-**

लेविस यांच्या मते, भांडवली क्षेत्रात (कारखानदारी क्षेत्रात) काम करणाऱ्या कामगारांची सीमांत उत्पादकता ही निर्वाह क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांपेक्षा जास्त असते. त्यामुळे भांडवली क्षेत्रात भांडवली अधिक्य निर्माण

होते. यालाच वाढावा (Surplus) असे म्हणतात. हा वाढावा भांडवलदार कारखानदारी क्षेत्रात गुंतवत राहतात. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना भांडवली क्षेत्रात रोजगार मिळतो. भांडवलदार त्यांना मिळणाऱ्या भांडवली अधिक्याची पुनर्गुंतवणूक करत राहतात. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार उपलब्ध होत राहतो. जोपर्यंत देशातील अतिरिक्त श्रमिकांची संख्या संपत नाही, तो पर्यंत ही प्रक्रिया चालू राहते. खालील आकृतीत हे स्पष्ट केले आहे.




वरील आकृतीत OX अक्षावर श्रमिकांची संख्या दर्शविली आहे. तर OY अक्षावर वेतन व सीमांत उत्पादन दर्शविले आहे. OS हा निर्वाह क्षेत्रातील वेतनाचा दर आहे. OW हा भांडवली क्षेत्रातील वेतनाचा दर आहे. SS हा निर्वाह वेतनाचा वक्र WW या भांडवली क्षेत्रातील वेतन वक्राच्या खालच्या बाजूला दर्शविला आहे. कारण अपग्रत देशात भांडवली क्षेत्रातील वेतनापेक्षा निर्वाह वेतनाचा दर कमी असतो. $P_1 L_1 P_2 L_2$ आणि $P_3 L_3$ हे श्रमिकांच्या सीमांत उत्पादकतेचे वक्र आहेत. जेंव्हा भांडवली क्षेत्राात O ते N1 एवढे श्रमिक काम करत असतात, तेंव्हा त्यांचे एकूण उत्पादन $ON_1 E_1 P_1$ एवढे असते. त्यांना एकूण वेतन $ON_1 E_1 W$ एवढे दिले जाते. या ठिकाणी $P_1 E_1 W$ एवढे भांडवली अधिक्य (वाढावा/नफा) निर्माण होतो. कारण एकूण उत्पादन ($ON_1 E_1 P_1$) - वेतनावरचा एकूण खर्च ($ON_1 E_1 W$) = भांडवली अधिक्य होय. $P_1 E_1 W$ या अधिक्याची (नफ्याची) उत्पादकांनी भांडवली क्षेत्रात गुंतवणूक केली तर $P_1 L_1$ हा श्रमिकांच्या सीमांत उत्पादकेचा वक्र

वरच्या बाजूला जातो. $P_2$ $L_2$ या वक्राने हे दर्शविले आहे. त्यामुळे $ON_2$ एवढा रोजगार निर्माण होतो. $N_1$ ते $N_2$ एवढया जादा श्रमिकांना भांडवली क्षेत्रात रोजगार मिळतो. $P_2$ $L_2$ हा सीमांत उत्पादकता वक्र WW चा भांडवली क्षेत्रातील वेतन वक्राला $E_2$ या बिंदूत छेदतो. $ON_2$ एवढे श्रमिक $ON_2$ $E_2$ $P_2$ एवढे एकूण उत्पादन करतात. या श्रमिकांना $ON_2$ $E_2$ W एवढे वेतन मिळते. एकूण उत्पादनापेक्षा वेतनावरचा खर्च कमी आहे. त्यामुळे एकूण अधिक्य $P_2$ W $E_2$ एवढे निर्माण होते. हे अधिक्य भांडवली क्षेत्रात गुंतवले तर $N_2$ ते $N_3$ एवढ्या श्रमिकांना रोजगार मिळतो. $ON_3$ रोजगार पातळीला $WP_3$ $E_3$ एवढे एकूण अधिक्य (नफा) दिसतो. हा नफा जर भांडवली क्षेत्रात गुंतवला तर $ON_3$ पेक्षा अधिक रोजगार निर्माण होऊ शकेल. भांडवलदार नफा मिळवण्यासाठी उत्पादन करत असतात. जोपर्यंत त्यांना नफा किंवा अधिक्य मिळत असते, तोपर्यंत भांडवलदार अधिक्य (वाढावा) भांडवली साधनात गुंतवत राहतात. त्यामुळे देशातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार मिळत राहतो. अधिक्याच्या गुंतवणूकीमुळे देशातील बेकारी कमी होते. तसेच भांडवल संचयात वाढ होऊन देशाचा आर्थिक विकास घडून येतो. आर्थिक विकास दरात वाढ होत राहते. देशातील अतिरिक्त श्रमपुरवठा संपला की ही विकासाची प्रक्रिया थांबते.

लेविस यांनी आपल्या सिध्दांतात तांत्रिक प्रगतीवर भर दिला आहे. तांत्रिक ज्ञानाच्या वापराने भांडवली निर्मितीत आणि श्रमिकांच्या सीमांत उत्पादकतेत वाढ होते. त्यामुळे श्रमिकांच्या सीमांत उत्पादकतेचा वक्र वरच्या बाजूला जातो. भांडवल आणि तांत्रिक ज्ञानाच्या प्रगतीमुळे सीमांत उत्पादकता, राष्ट्रीय उत्पन्न, वेतन, नफा, रोजगार इत्यादी घटकात वाढ घडून येते. म्हणून देशात तांत्रिक प्रगती घडून आली पाहिजे.

आर्थिक विकासासाठी भांडवली निर्मिती आवश्यक असते. भांडवल निर्मितीत सरकार (State Capitalists) आणि देशी भांडवलदार (Indigenous Private Capitalists) महत्वाची भूमिका बनावू शकतात असे प्रा. लेविस यांनी आपल्या सिध्दांतात म्हटले आहे. म्हणून राज्य भांडवलदार आणि खाजगी देशी भांडवलदार यांना प्रोत्साहन दिले पाहिजे असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे.

लेविस यांनी आपल्या सिद्धांतात बचतीला अनन्य साधारण महत्त्व दिले आहे. आर्थिक विकासासाठी बचत वाढली पाहिजे. न्यून विकसित देशात राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४ ते ५ टक्के बचत केली जात असते. हे प्रमाण १२ ते १५ टक्केपर्यंत वाढले पाहिजे. त्यामुळे भांडवल निर्मितीचा (भांडवल संचयाचा) वेग वाढेल. थोडक्यात अप्रगत देशात बचतीत वाढ झाली तर भांडवल संचयाचा वेग वाढून आर्थिक विकासाचाही वेग वाढतो.

लेविस यांनी आपल्या सिध्दांतात बँक पैशाला/पतपैशाला सुध्दा महत्व दिले आहे. भांडवली अधिक्याची पुनर्गुंतवणुक करून जशी भांडवल निर्मिती होते, तशी व्यापारी बँका जी पतनिर्मिती करतात त्या पतपैशामुळेही भांडवल निर्मिती होत असते. पतनिर्मितीत वाढ झाली की पैशांचा एकूण पुरवठा वाढतो. यामुळे भांडवल निर्मितीत सुध्दा वाढ होते. पतपैसा जर योग्य प्रकारे गुंतवला तर रोजगारात, उत्पादनात, लोकांच्या खरेदी शक्तीत आणि प्रभावी मागणीत मोठी वाढ घडून येते. आणि आर्थिक विकासाचा वेगही वाढतो.

**वृध्दी प्रक्रियेचा शेवट (End of the Growth Process)**

प्रा. लेविस यांनी आपल्या सिध्दांतात आर्थिक विकासाची प्रक्रिया कशी चालते ते स्पष्ट केले आहे. अप्रगत देशात उपलब्ध असलेल्या अमर्याद श्रमपुरवठयाला/अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रात वळवून भांडवली अधिक्यात वाढ घडवून आणता येते. जोपर्यंत देशात अमर्याद श्रमपुरवठा उपलब्ध असतो, तोपर्यंत आर्थिक विकासाची किंवा भांडवल निर्मितीची प्रक्रिया निरंतर चालू राहते. परंतु अतिरिक्त श्रमिकांचा पुरवठा संपला की आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा अंत होतो. म्हणजे विकास प्रक्रियेचा शेवट होतो. आर्थिक विकासाची प्रक्रिया का थांबते? याची काही कारणे लेविस यांनी दिली आहेत. ती पुढीलप्रमाणे.

१) जेंव्हा अप्रगत देशात असलेला अमर्याद श्रमपुरवठा संपतो तेंव्हा आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबते.

२) भांडवली क्षेत्राचा जसजसा विकास होत जातो, तसतशी निर्वाह क्षेत्रातील लोकसंख्या वेगाने कमी होऊ लागते. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांची सरासरी उत्पादकता वाढू लागते. यामुळे भांडवली आधिक्य (नफा) कमी होतो. त्यामुळे भांडवल निर्मिती कमी होते.

३) विकास होत असताना निर्वाह क्षेत्राच्या तुलनेत भांडवली क्षेत्राचा अधिक विस्तार होतो. अन्नधान्याच्या व कच्च्या मालाच्या किंमती वाढतात. त्यामुळे भांडवली क्षेत्रातील श्रमिकांना वेतन वाढवून दयावे लागते. त्यामुळे अधिक्य कमी होऊन भांडवल निर्मिती कमी होते.

४) निर्वाह क्षेत्रात (शेती क्षेत्रात) आधुनिक नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांची उत्पादकता वाढते व त्यामुळे त्यांचे मजुरीचे दर वाढतात. त्यामुळे भांडवली आधिक्य (नफा) कमी होतो.

५) कामगार संघटना भांडवलदार वर्गावर दबाव आणून वेतनात वाढ घडवून आणतात. त्यामुळे भांडवली आधिक्य कमी होऊन भांडवल निर्मितीचा दर कमी होतो.

वरील कारणांमुळे न्यून विकसित देशातील विकासाची प्रक्रिया संपुष्टात येते असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे.

**खुली अर्थव्यवस्था (Open Economy) :-**

बंदिस्त अर्थव्यवस्थेत अतिरिक्त श्रमपुरवठा संपला की किंवा वरीलपैंकी इतर कारणांनी आर्थिक विकासाची प्रक्रिया कालांतराने थांबते. परंतु खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला तर आर्थिक विकासाची प्रक्रिया मंद होत नाही किंवा तिचा अंत होत नाही असे लेविस यांनी म्हटले आहे. वरीलपैकी एका किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे अर्धविकसित देशातील विकासाची प्रक्रिया जर खंडित झाली तर खुली अर्थव्यवस्था स्वीकारुन (बंदिस्त अर्थव्यवस्थेचा त्याग करुन) खालील मार्गाने भांडवल निर्मितीची प्रक्रिया चालू ठेवता येते असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे.

१) इतर देशातील श्रमिकांना आपल्या देशात स्थायिक होऊ देणे (Mass Immigration)

ज्या देशात अतिरिक्त श्रमपुरवठा आहे, त्या देशातील श्रमिकांना आपल्या देशात स्थायिक होण्यास प्रोत्साहन देऊन (by encouraging Immigration) भांडवलदार आर्थिक संकट टाळू शकतात. न्यून विकसित देशातील श्रमिकांचा पुरवठा संपला की बाहेरच्या देशातील श्रमिक आणून भांडवल संचय चालू ठेवता येतो.

**२) भांडवलाची निर्यात (Export of Capital) :-**

ज्या देशात अमर्याद श्रमपुरवठा आहे आणि श्रमिक निर्वाह वेतनावर काम करतात अशा देशात भांडवलाची निर्यात करून (by exporting capital) भांडवलदार भांडवल निर्मिती चालू ठेऊ शकतात. असे दोन उपाय प्रा. लेविस यांनी सुचवले आहेत. यापैकी पहिला उपाय योग्य वाटत नाही. कारण बाहेरच्या देशातून कामगार आणण्याला कामगार संघटना विरोध करतील. कारण यामुळे देशातील कामगारांच्या मजुरीत घट होण्याचा धोका असतो. दुसऱ्या उपायाला कामगार संघटना विरोध करणार नाहीत. कारण कामगार वर्गाचे यामुळे काही नुकसान होत नाही. त्यामुळे दुसरा उपाय स्वीकारार्ह व व्यावहारिक वाटतो. या दुसऱ्या मार्गाने भांडवलदार दुसऱ्या देशात भांडवलाची निर्यात करून अधिक नफा मिळवतील व तो नफा ते आपल्या देशात गुंतवतील. त्यामुळे भांडवलनिर्मितीची प्रक्रिया अखंड चालू राहील आणि आर्थिक विकासांची/ आर्थिक विस्ताराची प्रक्रियाही निरंतर चालू राहील. त्यासाठी न्यूनविकसित देशांनी खुली अर्थव्यवस्था स्वीकारावी असे लुईस यांनी म्हटले आहे.

**प्रा. लेविस यांच्या सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण**

प्रा. लेविस यांच्या आर्थिक विकासाच्या अमर्यादित श्रमपुरवठा सिध्दांतावर काही अर्थतज्ज्ञांनी खालीलप्रमाणे टीका केल्या आहेत.

**१) सर्वच अविकसित देशात श्रमपुरवठा अमर्यादित असतो हे चूक**

प्रा. लेविस यांनी अविकसित देशात श्रमाचा पुरवठा अमर्यादित असतो असे म्हटले आहे. भारत, चीन इत्यादी देशांच्या बाबतीत त्यांचे हे विधान खरे आहे. परंतु दक्षिण आफ्रिका, लॅटिन अमेरिका इत्यादी अविकसित देशात लोकसंख्या कमी आहे. सर्वच अल्पविकसित राष्ट्रात लोकसंख्या आणि श्रमाचा पुरवठा अमर्यादित नसतो.

**२) कुशल श्रमिकांची टंचाई ही तात्पुरती समस्या असते हे चुक :-**

प्रा. लेविस यांनी आपल्या सिध्दांतात कुशल मजुरांचा तुटवडा (Shortage of Skilled labour) ही तात्पुरती समस्या असते असे म्हटले आहे. पण टीकाकारांच्या मते ही समस्या अस्थाई स्वरुपाची नसते. श्रमिकांना शिक्षण व प्रशिक्षण देऊन कुशल बनवण्यासाठी खूप वेळ लागतो. त्यांना कुशल बनवण्यासाठी लागणारी साधनेही अपुरी असतात. त्यामुळे ही प्रक्रिया अल्पकालीन नसते तर दीर्घकालीन असते.

**३) धाडसी संयोजकांचा अभाव :-**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत संयोजकांची भूमिका महत्वाची असते. लेविस यांनी संयोजकांचा वाढता पुरवठा गृहीत धरला आहे. परंतु अविकसित देशात धाडस करुन धोका पत्करुन गुंतवणूक करणाऱ्या संयोजकांची/ उदयोजकांची खूपच कमतरता असते. भांडवली क्षेतात गुंतवणूक करण्याऐवजी सट्टेबाजीचे व्यवहार करुन नफा मिळवण्याकडे त्यांचा कल असतो.

**४) भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतन दर स्थिर असतो हे चूक :-**

लेविस यांनी अविकसित देशातील भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतन दर स्थिर असतात असे म्हटले आहे. पण टीकाकारांच्या मते, वेतन दर स्थिर नसतात. देशात अमर्याद श्रमपुरवठा असूनही वेतनाचे दर ज्यास्त असतात. कारण अनेक देशांनी किमान वेतनाचे कायदे केले आहेत. तसेच कामगार संघटना प्रबळ आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात (भांडवली क्षेत्रात) वेतन दरात वाढीचीच प्रवृत्ती दिसते.

**५) प्रभावी मागणीकडे दुर्लक्ष :-**

प्रा. लेविस यांच्या सिध्दांतावरील आणखी एक टीका म्हणजे त्यांनी आपल्या सिद्धांतात परिणामकारक किंवा एकूण मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. लेविस यांनी असे गृहीत धरले आहे की, भांडवली क्षेत्र ज्या ज्या वस्तूंचे उत्पादन करते त्या सर्व वस्तूंचा त्याच क्षेत्रात उपभोग घेतला जातो किंवा त्याची निर्यात केली जाते. भांडवली क्षेत्रात तयार होणाऱ्या या उत्पादनांची मागणी निर्वाह क्षेत्राकडून सुध्दा केली जाईल याचा विचार लुईस यांनी केलेला नाही. भांडवली क्षेत्रातील वस्तूंच्या मागणीत घट झाली तर विकास प्रक्रियेत खंड पडेल. निर्वाह क्षेत्रातून भांडवली क्षेत्रातील वस्तूंना मागणी वाढली नाही तर भांडवली (औद्योगिक) क्षेत्रातील वस्तूंना मोठा खप येणार नाही. पण याकडे लेविस यांनी दुर्लक्ष केले आहे.

**६) श्रमिकांच्या गतिक्षमतेचे गृहीत पूर्णतः खरे नाही :-**

निर्वाह क्षेत्रातील (ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रातील) अतिरिक्त श्रमिक शहरात (औद्योगिक क्षेत्रात) वळवून बेकारी कमी करता येते व आर्थिक विकास घडवून आणता येतो असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे. परंतु ते पूर्णतः खरे नाही. किंवा असे करणे इतके सोपे नाही. कारण अप्रगत देशातील श्रमिकांची गतिशीलता कमी असते. हे श्रमिक अशिक्षित, अकुशल, अंधश्रध्दाळू असतात. त्यामुळे आपला भाग सोडून शहरात जाण्यास ते सहजासहजी तयार होत नाहीत. त्यांची गतिक्षमता खूपच कमी असते. आपला भूभाग, जमीन, कुटुंब, नातेवाईक सोडून शहरात जाण्यास कामगार तयार नसतात. तसेच भाषा, रुढी परंपरा, शहरातील राहणीमानाचा मोठा खर्च यामुळे सुध्दा त्यांची गतिक्षमता कमी असते. त्याचा विचार लेविस यांनी आपल्या सिध्दांतात केलेला नाही.

**७) श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते हे चूक :-**

लेविस यांनी आपल्या सिध्दांतात अमर्याद श्रमपुरवठा असलेल्या देशात श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते असे म्हटले आहे. परंतु शुल्टझ (Prof. Schultz) सारख्या अर्थतज्ज्ञांनी लेविस यांचे हे मत अमान्य केले आहे. त्यांच्या मते, श्रमिकांची सीमांत उत्पादकता जर शून्य राहिली तर निर्वाह वेतनही शून्य राहील. म्हणून लेविस यांचे विधान/गृहीत पूर्णत: चुकीचे आहे.

**८) निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांच्या स्थलांतराच्या दुष्परिणामाकडे दुर्लक्ष :-**

टीकाकारांच्या मते, अविकसित देशातील श्रमिक भांडवली क्षेत्रात जेंव्हा स्थलांतरित होतात तेंव्हा निर्वाह क्षेत्रातील (शेती क्षेत्रातील) एकूण उत्पादन आणि उत्पादकता यामध्ये घट होते. परंतु त्याचा विचार लेविस यांनी केलेला नाही. निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांच्या स्थलांतरामुळे कृषी उत्पादनावर काहीच परिणाम होत नाही हे लेविस यांचे मत चुकीचे आहे.

**९) उत्पन्नातील विषमता वाढण्याचा धोका :-**

प्रा. कुझनेटस सारख्या टीकाकारांच्या मते, जर अविकसित देशात प्रा. लेव्हिस यांचे वृध्दी प्रतिमान अंमलात आणले तर त्या देशात उत्पन्नातील विषमता वाढण्याचा धोका अधिक आहे. उत्पन्नात विषमता असेल तर उत्पादक गुंतवणूकीत वाढ होत नाही. अशी विषमता विनाशकारी ठरते असे टीकाकारांनी म्हटले आहे.

**१०) भाववाढ (चलनवाढ) आत्मविनाशी असते हे चूक :-**

लेविस यांनी आपल्या आर्थिक वृध्दीच्या प्रारुपात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारी भाववाढ ही स्वयं विनाशकारी (self destructive) असते असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, लेविस यांचे हे विधान खरे नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण झालेली भाववाढ उच्च उपभोगामुळे दीर्घकाळ टिकून राहू शकते. टीकाकारांच्या मते, भाववाढीवर बाह्य घटकांचा प्रभाव पडत असतो. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली की, वस्तूंच्या किंमती खाली येतील हे लेविस यांचे मत पटत नाही. भाववाढ आत्मविनाशी नसते. तर दीर्घकाळ टिकून राहू शकते. भाववाढ स्वत:चाच नाश करु शकत नाही.

**११) उच्च उत्पन्न गटातील लोकच बचत करतात हे चूक**

प्रा. लेविस यांनी आपल्या सिध्दांतात उच्च उत्पन्न गटातील लोकच फक्त बचत करतात असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते न्यून विकसित देशातील गरीब लोक सुध्दा बचत करत असतात असे दिसून आले आहे. म्हणून गरीब देशात फक्त श्रीमंत लोकच बचत करतात हे चुकीचे आहे.

**१२) अविकसित देशात गुंतवणूक गुणक कार्यरत नसतो :–**

टीकाकारांच्या मते, अविकसित देशात गुंतवणूक गुणक दिसून येत नाही. भांडवलदार सतत भांडवली आधिक्याची (नफ्याची) भांडवली क्षेत्रात गुंतवणूक करत राहतात तेंव्हा भांडवल निर्मितीची प्रक्रिया चालू राहते. पण टीकाकारांच्या मते, अप्रगत देशात गुंतवणूक गुणक कार्य करत नाही.

**१३) अकार्यक्षम कर प्रशासन :–**

भांडवल निर्मितीसाठी आवश्यक असणारे उत्पन्न लोकांच्यावर कर बसवून वसूल करता येईल असे लेविस म्हणतात. परंतु टीकाकारांच्या मते, अप्रगत देशात हे तितकेसे शक्य नसते. कारण अप्रगत देशातील करवसुली यंत्रणा फारशी कार्यक्षम नसते. त्यामुळे भांडवलनिर्मितीसाठी पुरेसे भांडवल या यंत्रणेला गोळा करता येत नाही. न्यून विकसित देशातील सरकारची कर प्रशासन व्यवस्था फारशी कार्यक्षम नसते. त्यामुळे पुरेसा कर वसूल होत नाही. त्यामुळे भांडवल निर्मितीही पुरेशी होत नाही. परंतु या बाबीकडे लेविस यांनी लक्ष दिले नाही. अशी त्यांच्यावर टीका केली जाते.

**समारोप :–**

प्रा. लेविस यांच्या सिध्दांतात वरीलप्रमाणे काही उणिवा असल्या तरी या सिध्दांताचे महत्व कमी होत नाही. ज्या न्यूनविकसित देशात प्रचंड लोकसंख्या आहे आणि श्रमाचा पुरवठा अमर्यादित आहे. त्या देशांना लेविस यांचा सिध्दांत मार्गदर्शक आणि उपयुक्त आहे. अमर्यादित श्रमपुरवठ्याचा उपयोग करून आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरु करता येते हा लेविस यांचा विचार महनीय आहे. आर्थिक विकासाच्या प्रारुपात प्रा. लेविस यांनी विकासावर परिणाम करणाऱ्या बाबींची चर्चा केली आहे. बंदिस्त अर्थव्यवस्थेत आणि खुल्या अर्थव्यवस्थेत अविकसित देश विकास प्रक्रिया कशी सुरू करू शकतात याची माहिती लेविस यांना आपल्या वृध्दी प्रतिमानात दिली आहे. भांडवलाची टंचाई असणारे गरीब देश अमर्यादित श्रमपुरवठ्याव्दारे आपला विकास घडवून आणू शकतात हा लेविस यांचा विचार जगातील गरीब देशांना दिलासा देणारा आणि मार्गदर्शक आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारची भूमिका महत्वाची असते असे लेविस यांनी स्पष्ट केले आहे. गरीब देशात तांत्रिक प्रगती घडवून आणली तर उत्पादकता, नफा आणि रोजगार वाढतो हा ही लेविस यांचा विचार महत्वाचा आहे. लेविस यांनी गरीब देशांचा आर्थिक विकास नफ्याची पुनर्गुंतवणूक, पतनिर्मिती, सरकारचा हस्तक्षेप, तांत्रिक प्रगती, कुशल श्रमिकांची उपलब्धता, भांडवल निर्मिती या घटकावर कसा अवलंबून असतो, ते परिणामकारकपणे स्पष्ट केले आहे. म्हणून लेविस यांचा आर्थिक विकासाचा अमर्यादित श्रमपुरवठा सिध्दांत अविकसित आणि विकसनशील देशांना अत्यंत उपयुक्त आहे. लेविस यांच्या सिध्दांतातील काही आर्थिक विचार विकसित देशानाही उपयुक्त आहेत. म्हणून लेविस यांच्या सिध्दांतावर कितीही टीका झाल्या असल्या तरी त्यांच्या सिध्दांताचे मोल कमी होत नाही.

## २.३ सारांश : (Summary)

एकोणीसाव्या शतकाच्या सुरवातीला औद्योगिक क्रांतीच्या माध्यमातून प्रामुख्याने पश्चिम युरोपमध्ये नेत्रदिपक अशी आर्थिक प्रगती घडून आली. तिचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न काही अर्थतज्ज्ञांनी केला आणि यातूनच आर्थिक विकास विषयक सिध्दांतांच्या मांडणीला सुरुवात झाली. डेव्हीड रिकार्डो, कार्ल मार्क्स, हावे, लायबेंन्स्टिन, गुन्नार मिर्डाल, रोझेंन्स्टिन रोडान, फे-रॅनिस इ. अर्थतज्ज्ञांनी आपल्या सिध्दांताद्वारे आर्थिक विकासाचे निकष, आर्थिक विकासाच्या अवस्था वा टप्पे यांचा सविस्तर अभ्यास विकसनशील देशांच्या विशेष संदर्भासह या घटकात करण्यात आला आहे.

आर्थिक विकासाच्या परंपरेतील 'सनातनवादी आर्थिक विचार' (Classical School of Economics) ही एक महत्त्वपूर्ण विचारधारा आहे. या संप्रदायाचा संस्थापक असलेल्या ॲडम स्मिथपासून ते डेव्हीड रिकार्डोपर्यंत त्यानंतर जॉन स्टुअर्ड मिल, थॉमस माल्थस या अर्थतज्ज्ञापर्यंत अनेकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या सर्व विचार वस्तूंनी आर्थिक विकासासंबंधी मांडलेले विचार हे भिन्न असले तरी त्यांना आर्थिक विकासाची अपेक्षित असलेली उद्दिष्टे जवळपास सारखीच आहेत. याच समान उद्दिष्टांतून त्यांची आर्थिक विचारांबाबतची जी मध्यवर्ती कल्पना ध्वनीत होते तिलाच 'सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांत' असे म्हणतात. सनातनवाद्यांच्या मते, नफ्याच्या दरातील वाढ ही गुंतवणुकीच्या दरातही वाढ घडवून आणते. त्यातून अस्तित्वातील भांडवली साठ्यामध्ये देखील वाढ घडून येते. या सर्वांचा सकारात्मक परिणाम होऊन उत्पादन तंत्रामध्ये देखील सुधारणा होते. अशाप्रकारे जसजसा भांडवल संचय वाढत जातो. तसतसा वेतन निधी देखील वाढत जातो. त्यामुळे वेतनाचे दर वाढू लागतात. त्यातून राहणीमानाचा दर्जा सुधारुन लोकसंख्येतही वाढ होते. या लोकसंख्यावाढीमुळे अन्नधान्याच्या मागणीत वाढ होते. ही वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी शेती उत्पादनामध्ये श्रम, कच्चा माल, तंत्रज्ञान यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करुन उत्पादनात वाढ घडवून आणली जाते. मात्र कालांतराने शेती क्षेत्रामध्ये घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम लागू होता. परिणामी उत्पादन खर्च वाढून वेतन व खंडाचे दर वाढू लागतात. मात्र दुसरीकडे नफ्याच्या दरात घट होऊ लागते. शेवटी अर्थव्यवस्था 'स्थितीशील' होते. अशाप्रकारे आर्थिक विकास सिध्दांतांच्या प्रारंभीच्या काळात सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी केलेले हे विवेचन मुलभूत स्वरूपाचे होते.

यानंतर आपण डेव्हीड रिकार्डो याचा 'आर्थिक विकासाचा सिध्दांत' पाहिला. सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांतांचा मांडणीला ॲडम स्मिथपासून प्रारंभी होत असला तरी याच्या शास्त्रशुध्द मांडणीचे महत्त्वपूर्ण योगदान रिकार्डोनी दिले. रिकार्डोनी भूमी, श्रम, भांडवल या उत्पादन घटकांद्वारे उत्पादन फलनाची संकल्पना मांडली. रिकार्डोनी आपली ही सैध्दांतिक मांडणी सनातनवादी विचारांच्या चौकटीच्या गृहीतकांद्वारे मांडलेली आहे. रिकार्डोनी समाजामध्ये भांडवलदार वर्ग, जमीनदार वर्ग आणि श्रमिक वर्ग असे समाजाचे प्रमुख तीन वर्ग सांगितलेले आहेत. रिकार्डोने भूमी या उत्पादन घटकाला त्याच्या उपजत व अविणनाशी गुणधर्माच्या अनुषंगाने पाहले असून नैसर्गिक वेतनदर आणि बाजार वेतनदर या संकल्पना स्पष्ट केल्या. रिकार्डोने स्थिर भांडवल आणि खेळते भांडवल या दोन संकल्पनांच्या आधारे भांडवल निर्मितीची प्रक्रीया स्पष्ट केली आहे. भांडवल निर्मितीची प्रक्रीया कशाप्रकारे गतीमान असते, याचेही विश्लेषण त्यांनी आपल्या सिध्दांतात दिलेले

आहे. रिकार्डोच्या मते आर्थिक विकास होत असताना प्रत्येक अर्थव्यवस्थेची प्रवृत्ती ही स्थितीशिल अवस्थेकडे जाण्याची असते. कारण एक किमान आर्थिक विकासाचा स्तर गाठल्यानंतर लोकसंख्येचा दर स्थिर असतो. भांडवल निर्मिती मंद होते. नफा किमान पातळीवर स्थिरावतो. रिकार्डोने अविकसित अर्थव्यवस्थांची वर्गवारी 'अविकसित अर्थव्यवस्था' आणि 'अति लोकसंख्या असलेली अर्थव्यवस्था' अशा दोन प्रकारात केलेली आहे.

यानंतर आपण कार्ल मार्क्सचा विकास विषयक सिध्दांत अभ्यासला. मार्क्सचे विकासविषयक, विचार हे फक्त आर्थिक विचार नसून ते सामाजिक व ऐतिहासिक उत्क्रांतीशी संबंधित आहेत. मार्क्सने आपल सैध्दांतिक विश्लेषण हे उत्पादन फलन, नवप्रवर्तन या दोहोंचे स्वरुप आणि भांडवल संचयाची प्रक्रिया या आधारे मांडलेले आहे. अर्थव्यवस्थेतील उत्पादन प्रक्रिया याला मार्क्स महत्त्वाचे स्थान देतो. त्याच्या मते, उत्पादन प्रक्रियेतील श्रम हा मुख्य घटक असून त्यानंतर भांडवल आणि तांत्रिक ज्ञान यांचा क्रम येतो. मार्क्सने समाजातील उत्पादनाचे संबंध हे उत्पन्नाचे स्वरूप, वैज्ञानिक ज्ञान, उत्पादन प्रक्रियेचे ज्ञान, कामगारांचे समाजातील स्थान या बाबींवर अवलंबून असते असे सांगितले. प्रत्येक समाजाची विकासाची प्रक्रिया स्पष्ट करताना मार्क्सनी सामाजिक बदलाचा सिध्दांत मांडला. यामध्ये त्याने प्रत्येक मानवी समाज हा प्राथमिक साम्यवाद, गुलामगिरी, सरंजामशाही आणि शेवटी भांडवलशाही अशा अवस्थांत उत्क्रांत होत जातो असे सांगितले. ही भांडवलशाही अवस्थाही नष्ट होऊन तिच्या जागी साम्यवादी समाज सत्ता अस्तित्वात येईल असे मार्क्स म्हणतो. मार्क्सने अतिभांडवल संचय आणि नफ्याच्या वाढत्या अभिलाषेतूनच भांडवलशाहीत अंतर्गत विसंगती निर्माण होऊन ती नष्ट होईल असे भाकीत केले होते.

यानंतर रोझेंन्स्टिन रोडान यांनी मांडलेला प्रबळ धक्का सिध्दांत आपण पाहिला. ज्यामध्ये गतीहीन अर्थव्यवस्थेला असलेले मुळचे जडत्व नष्ट करुन तिला जास्तीत जास्त उत्पादनक्षम करण्याच्या दृष्टिने अनेक छोटे छोटे व वेगवेगळ्या कालखंडात विभागलेले प्रयत्न करण्यापेक्षा एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर, सुसंघटीत व व्यापक स्वरूपाचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. ही या सिध्दांतांची मध्यवर्ती कल्पना आहे. रोडानच्या मते असे केल्यास त्या अर्थव्यवस्थेला उत्पादन फलन, मागणी, बचत इ. अविभाज्यता प्राप्त होतात.

यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रादेशिक विषमता सांगणारा प्रो. गुन्नार मिर्डाल यांचा चक्रिय कार्यकारण संबंधाचा सिध्दांत आपण पाहिला. मिर्डालनी आपल्या आंतरराष्ट्रीय विषमतेच्या मिमांसेमध्ये विविध घटकांच्या चक्रिय कार्यकारण संबंधाची चर्चा केली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणारे विस्तारक आणि प्रतिसारक घटक विषमता वाढवितात आणि वर्धमान प्रक्रियेद्वारे त्यामध्ये जास्त वाढ होत जाते. आपल्या विश्लेषणातून प्रो. मिर्डालनी हे दाखवून दिले आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेची गती आणि प्रगती ही विस्तारक आणि प्रतिसारक परिणामांवर अवलंबून असते. विकसीत देशांमधील विकास प्रक्रियेमध्ये विस्तारक परिणाम हे अधिक प्रबळ असतात. त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास हा सातत्यपूर्णरित्या व जलदगतीने होतो. मात्र याउलट अविकसित देशांच्या आर्थिक विकास प्रक्रियेमुळे प्रतिसारक परिणाम वेग व गती मंद असते. परिणामी यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भयावह अशी प्रादेशिक विषमता वाढताना दिसून येते. यातुन आपण अखिल मानवजातीचे कल्याण करण्यामध्ये कितपत यशस्वी ठरतो याचा प्रत्यय येतो. आज जगामध्ये फार

थोडे अतीश्रीमंत देश एका बाजूला सुख, चैन व विलासी जीवन जगताहेत तर दुसरीकडे बहुसंख्य देश दारिद्र्य, गरिबी यांनी त्रस्त आहेत.

यानंतर आपण प्रो. हार्वे लायबेन्स्टिन यांनी मांडलेले निर्णायक किमान आवश्यक प्रयत्न आणि न्यून संतुलन सापळा सिध्दांत समजावून घेतला. त्याचा हा सिध्दांत समतोल विकासाच्या गृहीतकांशी संबंधीत असून तो रोझेन्स्टिन रोडान यांच्या मोठा धक्का सिध्दांतांशी मिळता जुळता असा आहे. अविकसित देशांमध्ये उत्पन्नात प्रेरित वाढ करणाऱ्या घटकांपेक्षा उत्पन्न अवरोधीत करणारे घटक अधिक प्रभावी असतात. परिणामी अर्थव्यवस्था न्यून संतुलनाच्या सापळ्यात अडकते. यातून त्या अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्याकरता लायबेन्स्टिन यांनी किमान मोठी अशी निर्णायक गुंतवणूक कऱ्याची शिफारस केली ज्यायेगे उत्पन्न अवरोधक घटकांपेक्षा उत्पन्न प्रेरित वाढ करणारे घटक वाढतील व आर्थिक विकास वेगाने घडून येईल.

**२.४ पारिभाषिक शब्द : (Pantheistic Words)**

१. स्थैतिक : कोणत्याही बदलाशिवाय स्थिर अवस्था.

२. अवरोधक घटक : विकासाला विरोध करणारे.

३. प्रतिसारक परिणाम : चांगल्या घटकांचे परिणाम कमी करणारे घटक

४. कुंटीत अवस्था : गती न पकडता येणारी स्थिर स्थिती.

५. वर्धमान प्रक्रिया : एखाद्या गतीक्षम क्रियाला अधिक वेगाने चालना देणारी प्रक्रिया.

**२.५ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :** (Questions for Self Learning)

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आर्थिक भांडवल संचयाची मुख्य कल्पना कोणत्या विकास सिध्दांतात गृहीत धरलेली आहे.

२. उत्पादन फलनामध्ये रिकार्डोने कोणत्या नविन घटकाची भर टाकली.

३. कार्ल मार्क्सने भांडवलशाहीच्या जागी कोणती व्यवस्था येईल असे भाकीत केले?

४. रेषीय एकजिनसी प्रथम श्रेणीचे उत्पादन फलन असे कोणाच्या उत्पादन फलनास संबोधले जाते.

५. आर्थिक अविभाज्यता हे संकल्पना कोणी मांडली?

**ब) योग्य पर्याय निवडून पुढील रिकाम्या जागा भरा.**

१. द्वि-क्षेत्रीय आर्थिक विकास सिध्दांत............ यांनी मांडला.

अ) ॲडम स्मिथ ब) कार्ल मार्क्स क) शुंपीटर ड) फे-रॅनिस

२. आर्थिक विकाससंबंधीचा किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांत ......... यांनी मांडला.

अ) गुन्नार मिर्डाल ब) पॉल सॅम्युअल्सन क) प्रो. हार्वे लायबेन्स्टिन ड) ए. सी. पीगू

३. श्रमाचा अतिरिक्त पुरवठा ........... क्षेत्रात असतो.

अ) सेवा ब) उद्योग क) शेती ड) सार्वजनिक

४. मार्क्सच्या मते ....... हा उत्पादन प्रक्रियेतील मुख्य घटक आहे.

अ) तंत्रज्ञान ब) श्रम क) भांडवल ड) संयोजक

५. एशियन ड्रामा हा सुप्रसिध्द ग्रंथ .................. यांनी लिहिला.

अ) थॉमस माल्थस ब) अमर्त्य सेन क) ॲडम स्मिथ ड) गुन्नार मिर्डाल

**२.६ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :**

**अ) उत्तरे :**

१. आर्थिक भांडवल संचयाची मुख्य कल्पना ही सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांतांत मांडलेली आहे.

२. उत्पादन फलनामध्ये रिकार्डोने तंत्रज्ञान या नव्या घटकाची भर घातली.

३. कार्ल मार्क्सने भांडवलशाहीच्या जागी 'साम्यवादी' समाजव्यवस्था येईल असे भाकीत केले.

४. रेषीय एकजिनसी प्रथम श्रेणीचे उत्पादन फलन असे कॉब डग्लस उत्पादन फलनास संबोधले जाते.

५. आर्थिक अविभाज्यता ही संकल्पना प्रो. रोझेन्स्टिन रोडान यांनी मांडली.

**ब) उत्तरे :**

१. इ) फे-रॅनिस

२. ब) प्रो. हार्वे लायबेन्स्टिन

३. क) शेती

४. ब) श्रम

५. ढ) गुन्नार मिर्डाल

**२.७ अधिक सरावासाठी प्रश्न : (Questions for Extra Practice)**

१. सनातनवादी आर्थिक विकास सिध्दांताचे परिक्षण करा.

२. डेव्हीड रिकार्डोनी मांडलेल्या आर्थिक विकास सिध्दांताचे सविस्तर विवेचन करा.

३. कार्ल मार्क्सच्या सामाजिक बदलाच्या सिध्दांताचे वर्णन करा.

४. मार्क्सनी मांडलेली 'अतिरिक्त मूल्य' संकल्पना सविस्तर लिहा.

५. प्रो. रोझेंन्स्टिन रोडान यांचा 'प्रबळ धक्का' सिध्दांत सविस्तर लिहा.

६. गुन्नार मिर्डाल यांनी केलेल्या आंतरराष्ट्रीय प्रादेशिक विषमतेचे टिकात्मक परिक्षण करा.

७. प्रो. हार्वे लायबेंन्स्टिनी मांडलेला 'न्यून संतुलन सापळा' सिध्दांत सांगून त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग सांगा.

८. फे-रॅनिस यांनी मांडलेल्या विकासाच्या द्वि-क्षेत्रीय प्रतिमानातील शेती क्षेत्राच्या आर्थिक विकासातील योगदान स्पष्ट करा.

**२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :** (References books for extra readings)


1. Hans W/Singer 'Dualism Revisited' A New approach in Journal of Development Studies Jan. 1970, 60-62

2. Higgins B (1959) : Economic Development : W.W. Norton, New York.

3. Todaro M. P. (1996) : Economic Development : Sixth Edition Economic Development : Longman, London.

4. Misra S. K. & Puri V. K. (2017) Economics of Development & Planning, Himalaya Publication House, Mumbai.

5. डॉ. र. पु. कुरूलकर : विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत (२००४), विद्या प्रकाशन, नागपूर.

६. डॉ. विजय कवीमंडन : विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन (२०११), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

७. डॉ. जे. एफ. पाटील (संपादीत) : वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र (२०००) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. डॉ. सौ. मृणालिनी फडणवीस : विकासाचे अर्थशास्त्र, सिध्दांत (२००९), विद्या प्रकाशन, नागपूर.


***

# घटक – ३

# विकासाचे सामाजिक व क्षेत्रीय दृष्टीकोन

**(Social and Sectoral Aspects of Development)**

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ उत्पादन तंत्राची निवड, सुयोग्य तंत्रज्ञान व रोजगार

३.२.२ शेती व उद्योगातील व्यापार शर्ती

३.२.३ आर्थिक विकासाचे मापन व विकासातील अंतर, कुझनेट वक्र

३.२.४ मानव विकास निर्देशांक व विकासाचे इतर निर्देशांक व जीवन दर्जा

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयंअध्ययन प्रश्न

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस :

१) उत्पादन तंत्राची निवड व गुणन तंत्रज्ञान कोणते ते समजून घेता येईल.

२) उत्पादन तंत्र व रोजगार यामधील संबंध समजून घेता येईल.

३) शेती व उद्योग यामधील व्यापार शर्ती समजून घेता येतील.

४) आर्थिक विकासाचे मापन व विकासातील अंतर संकल्पना समजून घेता येईल.

५) मानव विकास निर्देशांक व इतर निर्देशांकाचे ज्ञान होईल.

### ३.१ प्रास्ताविक :

विकसनशील देशापुढे उपलब्ध संसाधनांचा पर्याप्त वापर करुन आर्थिक वृध्दीस गती देण्याबाबतीत महत्त्वपूर्ण पुश्न आहे. बहुसंख्य विकसशील देशामध्ये विपुल प्रमाणात श्रमशक्ती उपलब्ध आहे. मात्र याच वेळी भांडवल टंचाईही मोठ्या प्रमाणात आहे. मोठ्या प्रमाणातील श्रमदल व कमी प्रमाणातील भांडवल उपलब्धता यातून उत्पादन तंत्राच्या निवडीबाबत गुंतागुंत निर्माण होताना दिसते. आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यासाठी भांडवल प्रधान तंत्र उपयोगी ठरते. मात्र याच वेळी मोठी बेरोजगारी निर्माण होण्याची भितीही असते. आज बहुसंख्य विकसशील देश बेरोजगारीच्या मोठ्या समस्येस तोंड देताना दिसतात. विकासाच्या सामाजिक व क्षेत्रीय दृष्टीकोनामध्ये शेती व उद्योग ही दोन महत्त्वाची क्षेत्र आहेत. विकसनशील देशामध्ये शेती ही परंपरागत पध्दतीने केली जाते व शेतीमध्ये प्रच्छन्न किंवा छुपी बेरोजगारी आढळून येते. उद्योग व शेतीतील व्यापार शर्ती या उद्योगास अनुकूल असल्याचे दिसून येतात. यामध्ये योग्य समन्वय साधून आर्थिक विकास घडवून आणणे महत्त्वाचे आहे. अलिकडील काळामध्ये विकासातील अंतर वाढून असमानता मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे दिसून येते. भारतासारख्या देशामध्ये समग्र राष्ट्रीय उत्पन्न वेगाने वाढत असताना आर्थिक असमानता वाढत असल्याचे दिसून येते. कुझनेट यांनी याबाबत विस्तृत असे विश्लेषण केले आहे. आर्थिक विकासाचे लाभ मोजत असताना मानव विकास निर्देशांकाचे व इतर निर्देशांकाचे मोजमाप आवश्यक ठरते. आर्थिक विकासाचा वेग हा मानव विकास वाढविणारा असला पाहिजे व मानव विकास निर्देशांकास अलिकडील काळामध्ये जागतिक पातळीवर महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षी जगभरातील सर्वच देशाची मानव विकास निर्देशांकानुसार क्रमवारी लावली जाते. यामध्ये प्रत्येक देश हा आपली क्रमवारी सुधारण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.

### ३.२.१ विषय विवेचन :

**उत्पादन तंत्राची निवड, सुयोग्य तंत्रज्ञान व रोजगार : (Choice of Technology, Appropriate Technology and Employment)**

उत्पादन तंत्राच्या निवडीचा प्रश्न हा उद्योगाने श्रम व भांडवल व तंत्रज्ञानाचा समुह निवडण्याबाबतीत असणे एखाद्या विशिष्ट उद्योगातील याचा समुह हा तंत्रनिवड दर्शवितो. विकसनशील देशापुढे उत्पादन तंत्र निवडीचे दोन पर्याय उपलब्ध असतात. १) श्रम-प्रधान उत्पादन तंत्र व २) भांडवल प्रधान उत्पादन तंत्र यापैकी कोणते तंत्र कोणत्या उद्योगात वापरावे याबद्दचल निवड महत्त्वपूर्ण ठरते. उत्पादन तंत्र हे साधनाच्या उपलब्धतेवर दुर्मिळतेवर अवलंबून असते. लहान उद्योग व अवजड उद्योग उघोग व कृषी इ. मध्ये वेगवेगळ्या उत्पादन तंत्राचा अवलंब करणे फायदेशीर ठरते. अलीकडील काळामध्ये मोठ्या प्रमाणावर शोध व संशोधनावर खर्च करत असल्याचे दिसते. अनेक मोठ्या उत्पादन संस्था ही यावर खर्च करत आहेत. यातून नवनवीन उत्पादन प्रक्रीया तंत्रज्ञान अस्तित्वात येत आहे. उद्योजकापुढे अनेक प्रकारची उत्पादन तंत्रे उपलब्ध आहेत. त्यापैकी कोणत्या तंत्राची निवड करावी हे त्याच्याकडे असलेल्या उपलब्ध संसाधनावर अवलंबून असते. आर्थिक विकास करत असताना विविध तंत्र निवडीसाठी वेगवेगळ्या व्यूहरचना अवलंबिल्या जातात. अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी विविध प्रयत्न केले जातात. उपलब्ध तंत्रापैकी जे तंत्र जास्त कार्यक्षम असते त्याचीच निवड केली जाते.

कार्यक्षम उत्पादन तंत्र म्हणजे असे तंत्रा की ज्याद्वारे तेवढ्याच साधनाद्वारे जास्त उत्पादन शक्य होणे किंवा पूर्वीइतकेच उत्पादन कमी साधनाने साध्य होणे होय. विकसनशील देशापुढे जलद रोजगार निर्मिती, उपभोग वृध्दी व जलद आर्थिक विकास ही महत्त्वाची आव्हाने असतात. उत्पादन तंत्र असेच निवडणे योग्य ठरेल की ज्यामुळे हे साध्य होईल.

विकसनशील देशांमध्ये भांडवलाची कमतरता दिसून येते. भांडवलाचा खर्चही जास्त येतो. मात्र मोठी लोकसंख्या असल्यामुळे श्रम मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते व ते भांडवलाच्या किंमतीच्या तुलनेने कमी दरामध्ये उपलब्ध होते. विकसनशील देशामध्ये श्रमाची किंमत कमी असते. उद्योजक कमी किंमतीत मिळणाऱ्या आदानांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करताना दिसतात. तांत्रिक विकासाची प्रक्रिया लक्षात घेताना आपणांस ऐतिहासिक प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. पूर्वीच्या काळी अगदी साधे तंत्र वापरले जात होते व स्थानिक गरजा पूर्ण गेल्या जात होत्या. मात्र आधुनिक काळामध्ये गुंतागुंतीचे तंत्रे विकसीत केले गेले व जागतिक बाजारामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादन येण्याची गरज निर्माण झाली. कुझनेट यांनी तंत्रज्ञान विकासाचा भिन्न असा आकृतीबंध खालील चार टप्प्यामध्ये मांडला आहे. १) वैज्ञानिक शोध (Scientific Discovery) किंवा तांत्रिक ज्ञानामध्ये वृध्दी २) शोधबुध्दी (Invention) त्यामुळे अस्तित्वातील ज्ञानाचा उपयुक्त वापर ३) नवनिर्मिती (Innovation) याद्वारे शोधबुध्दीच्या आधारे आर्थिक उत्पादन केले जाते. ४) सुधारणा यामध्ये शोधबुध्दी व नवनिर्मिती यात सुधारणा केली जाते व विकासासाठी त्याचा अवलंब केला जातो. या चारही टप्प्यातून गेल्यानंतरच नवीन उत्पादन तंत्र निर्माण होते व ते वापरले जाते व त्यामध्ये सातत्याने सुधारणा केल्या जातात. तंत्रज्ञान निर्माण होण्यासाठी चार घटकांची आवश्यकता असते. १) वैज्ञानिक ज्ञानामध्ये सातत्याने वाढ होणे आवश्यक अट आहे. २) प्रत्येक टप्प्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक व कौशल्यपूर्ण श्रमदलाची आवश्यकता असते. ३) नवनिर्मितीसाठी उपकृमशीलता कौशल्य व शोधबुध्दीतून फायदेशीर वापर करणे आवश्यक असते व ४) नवनिर्मितीचा विस्तार या लोकांच्या स्वीकारावर (वस्तू स्वीकार व तंत्र स्वीकार) अवलंबून असतो. या टप्प्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य होते. आर्थिक वृध्दीसाठी तंत्रज्ञान विकास ही एक आवश्यक अट असते. विकसनशील देशामध्ये कुझनेट यांची प्रक्रिया अवलंब करणे आव्हानात्मक असते. कारण विकसनशील देशामध्ये शिक्षण व संशोधन सुविधा अपुऱ्या असतात. कौशल्यपूर्ण श्रमिक उपलब्ध असतात व उपक्रमशीलता क्षमताही कमी असते. विकसनशील देशातील लोकांची उत्पन्न पातळी कमी असते. उपभोग व बचतही कमी व खालच्या पातळीवर असते, यामुळे बाजाराची आकारही लहान असतो.

मागासलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संस्थांमुळे नवनिर्मिती होत नाही. त्यामुळे विकसीत देशातील तंत्रज्ञान निर्मितीसारखे तंत्रज्ञान विकसनशील देशामध्ये निर्माण होत नाही. यामुळे जगातील बहुसंख्य विकसनशील देश तंत्रज्ञान आयात करतअसताना आढळून येतात.


उत्पादन तंत्र हे दोन प्रकारचे असताना १) श्रम-प्रधान उत्पादन तंत्र व २) भांडवल प्रधान उत्पादन तंत्र हे दोन्ही उत्पादन तंत्र हे त्यांच्या वापरावयाच्या प्रमाणाने निश्चित होतात. वरीलपैकी कोणतेही एक तंत्र वापरणेसाठी बंधनकारक नसते. तंत्राचा वापर हा आदानाची उपलब्धतता निश्चित करते. काही वेळा आदानाचा

अभ्यास करुन मध्यममार्गी तंत्रज्ञान स्वीकारले जाणे हा काही वेळा आदानाचा अभ्यास करुन मध्यममार्गी तंत्रज्ञान स्वीकारले जाते व काही वेळा आपल्या देशातील परिस्थितीमध्ये युक्त तंत्रज्ञान कोणते याचाही विचार केला जातो.

**१) श्रमप्रधान उत्पादन तंत्र : (Labour Intensive Technique)**

उत्पादन तंत्राची निवड करत असताना, उत्पादन वाढ करणारे उत्पादन तंत्र वापरले जाते. जे तंत्रज्ञान श्रम उत्पादकता वाढवते व कमी भांडवलाची आवश्यकता असते. त्यास श्रमप्रधान उत्पादनतंत्र म्हटले जाते. ज्या उत्पादनतंत्रामध्ये जास्त प्रमाणात श्रमाचा वापर केला जातो, त्यास श्रमप्रधान उत्पादन तंत्र म्हटले जाते. प्रा. रेड्डावे यांच्या मते ज्या उत्पादन तंत्रात कमी भांडवलाच्या जोडीस मोठ्या प्रमाणात श्रम वापरले जातात. त्या उत्पादन तंत्रास श्रमप्रधान उत्पादन तंत्र म्हटले जाते. 'Labour intensive technique is one in which a large amount of labour is combined with a smaller amount of capital.' प्रा. मिंट यांनी केलेली श्रमप्रधान तंत्राची व्याख्या अधिक शास्त्रशुध्द व अचूक आहे. त्यांच्या मते ज्या उत्पादन तंत्रात भांडवलाच्या प्रति एककामागे अधिक श्रमिक लागतात. त्यास श्रमप्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात, 'Labour intensive methods of productions are these that require a large quantity of labour with a given unit of capital.'

**आकृती क्रमांक ३.१**




वरील आकृतीमध्ये श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केला असता उत्पादन पातळीमध्ये काय बदल होतो याचे विश्लेषण केलेले आहे. आकृतीमध्ये A व B असे दोन भाग आहेत. A या भागामध्ये OX अक्षावर श्रमप्रमाण तर OY अक्षावर भांडवल प्रमाण दर्शविले आहे. Q व $Q_1$ व $Q_2$ हे उत्पादन वक्र आहेत. Q द्वारे आरंभीला उत्पादन पातळी दर्शविली आहे. OK एवढ्या भांडवलाच्या साह्याने $Q_1$ या वक्रावर उत्पादन मिळते. ते Q पेक्षा जास्त आहे व वरच्या पातळीवर आहे. $Q_1$ या उत्पादन पातळीवर $OL_1$ एवढे श्रमिक वापरले जातात. ते पूर्वीच्या OL पेक्षा जास्त आहेत. या तंत्राने दोन उद्देश सफल होतात. एक म्हणजे कौशल्यामध्ये वाढ होते

व दुसरे भांडवलाची बचत होते. उदा. शेतीतील उत्पादन हे लघु सिंचन प्रकल्पाने वाढ करता येते व त्याचबरोबर चांगली साधलेने कमी कालावधीत उत्पादन देणारी बियाणे व खतांचा उपयोग या साधनाने तेवढ्याच जमिनीत जास्तीचे उत्पादन घेता येते.

विकसनशील देशामध्ये श्रमिक विपुल प्रमाणात असल्यामुळे श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केला जावा असे म्हटले जाते. मात्र यामध्ये श्रम, कौशल्यही महत्त्वाची भूमिका बजावते. विकसनशील देशातील आर्थिक, सामाजिक व प्रशासकीय प्रतिकारामुळे जुनेच तंत्र वापरले जाते व त्यातून उत्पादन वाढ होण्यास अडथळे निर्माण होतात. प्रा. नर्क्स, प्रा. आर्थर लेविस व मेयर यांच्या सारखे तंज्ञ विकसनशील देशांनी श्रमप्रधान उत्पादन तंत्र वापरावे असे सुचवितात. अलिकडील काळामध्ये म्हणजेच २१व्या शतकामध्ये, श्रमिकांचे कौशल्य वाढले, तरच श्रमप्रधान उत्पादनतंत्राचे फायदे घेता येतील असे म्हटले जाते. कौशल्यास व उपक्रमशीलेस जास्त महत्त्व आहे.

**श्रमप्रधान उत्पादन तंत्र निवडीचे समर्थन :**

श्रमप्रधान उत्पादन तंत्र निवडीचे समर्थन आपणास खालीलप्रमाणे पाहता येईल :

**१) रोजगारविषयक समर्थन :**

विकसनशील देशामध्ये अमर्याद श्रमपुरवठा असतो. बरेचसे श्रमिक बेरोजगार असतात. या श्रमिकांना फक्त श्रमप्रधान तंत्राच्या साह्यानेच रोजगार उपलब्ध करुन देता येतो. यामुळे बेरोजगारीचा दर कमी करता येतो.

**२) उत्पन्नाचे वितरण :**

श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा स्वीकार केल्यामुळे अनेक श्रमिकांना रोजगार उपलब्ध होतो व त्यांच्या उत्पन्नात भर पडते. उत्पन्नाची वितरण झाल्यामुळे अनेक लोकांकडे उत्पन्न येते व त्यांची बाजारातील वस्तूंना मागणी वाढते. यातून एक मोठा उपभोग वर्ग तयार होतो. यातूनच देशामध्ये एक मोठामध्यम वर्ग तयार होतो.

**३) संसाधनांचा पर्याप्त वापर :**

विकसनशील देशामध्ये भांडवलाची कमतरता असते. यातून उपक्रमशीलताही कमी होते. अनेक पडून असलेली दुर्मिळ संसाधने वापरात येवून उत्पादन वाढ घडून येते. त्यामुळे श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब केल्यास मोठया प्रमाणावर वापर शक्य होतो.

**४) विदेशी चलनाची बचत :**

श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब केल्यामुळे देशातील श्रमांचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. श्रमप्रधान उत्पादन तंत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर यंत्रे लागत नाहीत. त्याचबरोबर कमीत कमी साधनांद्वारे उत्पादन शक्य होते. त्यामुळे विकसनशील देशाचे परकीय चलनाची बचत होते व आयात कमी होते.

**५) भाववाढ नियंत्रण :**

विकसनशील देशामध्ये श्रमिकांना काम मिळाल्यानंतर ते बाजारात जावून वस्तूची खरेदी करतात. तात्काळ

उपभोग्य वस्तूची मागणी झाल्यामुळे भाववाढ नियंत्रण करता येते. श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केल्यामुळे बाजारातील वस्तूंचा पुरवठाही नियमित होतो व वस्तूंचा तुटवडा होत नाही. उत्पन्न व उत्पादन यामध्ये फार फरक राहत नाही व यामुळेच भाववाढीवर नियंत्रण मिळवता येते.

**६) उपभोगात वाढ :**

श्रमप्रधान उत्पादन तंत्रामुळे श्रमिकांना रोजगार मिळतो. यातून त्यांचे उत्पन्न वाढते. कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तींची सीमांतउपभोग प्रवृत्ती जास्त असल्यामुळे तात्काळ बाजारामध्ये वस्तूंची मागणी वाढते. उत्पन्नात वाढ झाल्यामुळेही मागणी वाढते व अशी अर्थव्यवस्था उपभोग्य अर्थव्यवस्था म्हणून उदयास येते. भारतीय अर्थव्यवस्थेकडे एक मोठी उपभोग्य अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जाते.

**७) मक्तेदारीस आळा घालणे :**

श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केल्यामुळे उद्योग विखुरले जातात व यातून विकेंद्रीकरण होते व मक्तेदारी व आर्थिक शक्तीचे केंदीकरण होत नाही. याचाच परिणाम म्हणून बाजारातील शोषणास आळा बसतो. मक्तेदारी प्रतिबंधासाठी श्रमप्रधान उत्पादन तंत्र फायदेशीर ठरते.


**८) ग्रामीण व लघु उद्योगांचा विकास :**

श्रमप्रधान तंत्र हे प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात वापरात येवू शकते. यातून ग्रामीण व लघु उद्योगाचा विकास होतो व यातून उद्योगांच्या विकेंद्रीकरणास चालना मिळते व उद्योगांचा विकास होतो.

वरील प्रमाणे श्रमप्रधान तंत्राचे अनेक फायदे आपणास आढळून येतात. विकसनशील देशानी देशाचा आर्थिक विकास करत असताना श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा पुरस्कार केला असता मोठा विकास घडून येतो असे अनेक तज्ञांनी म्हटले आहे.

**भांडवलप्रधान उत्पादन तंत्र :**

विकसनशील देशांनी पर्यायी तंत्रज्ञान म्हणून भांडवल प्रधान उत्पादन तंत्राकडे पाहिले. विकसनशील देश तंत्रज्ञानाचा मार्ग अवंबण्यामध्ये कमी पडत असल्यामुळे त्यांनी विकासाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये या तंत्राकडे वळावे. भांडवलप्रधान उत्पादन तंत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवलाचा वापर केला जातो. या तंत्राच्या साह्याने वेगवान उत्पादन घेता येते. उत्पादन वाढीचा वेग अनेक पटीने वाढतो. उच्च तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढ होणे व यातून यशस्वी औद्योगिक विकास होतो. मोठ्या प्रमाणात भांडवलाचा वापर केल्यामुळे विकासाचा वृध्दीदर वाढतो. यामध्ये उत्पादनाची वाढ सातत्याने गुणाकार पध्दतीने येते. या तंत्रामुळे काम करण्याच्या पध्दतीमध्ये व सवयीमध्ये बदल होतो. जगण्याची स्थिती बदलते व सामाजिक संस्थामध्येही मोठा बदल होतो.




वरील आकृतीमध्ये भांडवल तंत्राचा अवलंब करुन उत्पादन केल्याचा उत्पादन वक्र दर्शविले आहे. यामध्ये OX अक्षावर श्रममात्रा व OY अक्षावर भांडवल मात्राचे मोजमाप केले आहे. आकृतीमध्ये Q हा उत्पादन वक्र असून या ठिकाणी OK एवढ्या भांडवलाच्या मात्रा OL एवढ्या श्रमाच्या मात्रा वापरल्या जातात. यामध्ये श्रमिकांचे प्रमाण कमी व भांडवलाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

विकसनशील देशामध्ये भांडवलप्रधान उत्पादन तंत्रांचा अवलंब शक्य होत नाही. कारण भांडवल हा दुर्मिळ उत्पादन घटक असतो. प्रा. रॅग्नर नर्क्से यांच्या मते आर्थिकदृष्ट्या प्रगत देशात वापरलेले जाणारे तंत्रज्ञान विकसनशील देशात वापवरले जावू नये व ते वापरण्यास त्यांना तशी परवानगी असू नये. कारण विकसनशील देशामध्ये मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी असते व त्याचबरोबर भांडवलाची कमतरताही असते. आधुनिक तंत्रज्ञान हे भांडवल सधन असते. त्यामध्ये श्रमाच्या बचतीचे अनेक पर्याय असतात. त्याचा खर्चही जास्त असतो व ते विकसनशील देशास संयुक्तीतक नसते. यंत्रे व साधने आयात करण्याचा खर्च मोठा असतो व त्याबरोबरच त्याची दुरुस्ती व देखभाल व सुट्टे भाग मिळणे अवघड असते. युनायटेड नेशन्स यांच्या अहवालानुसार विकसनशील देशामध्ये कुशल श्रमिकांचा फार मोठा तुटवडा असतो. त्यामुळे विकसीत देशात वापरले जाणारे तंत्र यंत्रे त्यांना संयुक्तीक ठरत नाहीत. कारण त्याची देखभाल खर्च फार मोठा येतो अशी साधने विकसशनील देशानी वापरल्यास त्यांचे उत्पादन विकसित देशातील त्याच तंत्रवापरापेक्षा कमी येते. यातून फार मोठा नुकसान होवू शकते. आधुनिक तंत्र वापरासाठी कुशल श्रमिक उपलब्ध असावे लागतात. त्याच्यामध्ये तांत्रिक व व्यवस्थापनीय कौशल्य असावी लागतात व असे श्रम विकसनशील देशामध्ये उपलब्ध नसतो. विकसनशील देशामध्ये बाजार विखुरलेला असतो. त्यामुळे भांडवल प्रधान तंत्राने एकाच ठिकाणी उत्पादन करणे व ते बाजारापर्यंत पोहचविणे खर्चिक बनते. त्यामुळे लहान उद्योगांचा विकास करणे फायदेशीर ठरते. विकसनशील देशात मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान आयात केले तर ते फायदेशीर ठरू शकत नाही. कारण या देशामध्ये असे तंत्रज्ञान सर्वत्र उपलब्ध नसते व त्यामुळे या तंत्रज्ञानाचे फारसे लाभ मिळत नाहीत. स्थानिक तंत्र व आयात तंत्र यामध्ये जेवढे अंतर जास्त असते. तेवढी जास्त अशांती असते. मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी देशामध्ये पर्याप्त वीज, साधने, दळणवळण, वाहतूक मोठे प्रमाणावर तांत्रिक कोशल्य व त्यांच्याशी संबंधीत मोठ्या प्रमाणावर सेवा उपलब्ध असाव्या लागतात या सुविधा उपलब्ध नसताना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब

केल्यास याचा परिणाम हा यंत्रे वारंवार बंद पडणे, कमी उत्पादन घेणे, खर्चामध्ये वाढ होणे व भांडवलाचा नाश होणे असे होतात.

**भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचे समर्थन :**

गॅलेन्सन व लॅबेनस्टीन या अर्थतज्ञांच्या मते यशस्वी आर्थिक विकास साध्य करण्यासाठी भांडवल प्रधान तंत्र फायदेशीर ठरते. देशानी असेच उत्पादन प्रकल्प निवडले पाहिजेत, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवलाचा वापर केला जातो. त्याच्या मते खालील बाबतीत हे तंत्रज्ञान फायदेशीर ठरते.

१) जे उद्योग भांडवलप्रधान उत्पादन तंत्र वापरतात त्यामध्ये याचा लाभ उपक्रमशीलतेस जास्त मिळतो व वेतन प्रत्यक्ष कमी मिळते, भांडवलदारांची बचत प्रवृत्ती जास्त असते व यामुळे मोठ्या प्रमाणावर बचत वाढते व ती बचत पुर्नगुंतवणूक होते यातून आर्थिक विकासाचा वेग वाढतो व त्यास गती मिळते.

२) भांडवलप्रधान तंत्रामध्ये वृध्दीदर जास्त असल्यामुळे यातून उद्योग वाढतात व याचा परिणाम म्हणून दीर्घकाळात रोजगार मोठ्या प्रमाणावर वाढतो.

३) बहुसंख्य विकसनशील देशामध्ये लोकसंख्येचा वृध्दीदर जास्त असल्याचे आढळून येते. मात्र जोपर्यंत भांडवलप-श्रम प्रमाण वाढत नाही तो पर्यंत दरडोई उत्पादनात वाढ होत नाही. याचा विपरीत परिणाम भांडवल संचयावर होतो. त्यामुळे विकासाची गती कायम राखण्यासाठी भांडवलप्रधान तंत्राचा अवलंब आवश्यक ठरतो.

४) भांडवलाने गरीब असलेल्या देशामध्ये भांडवल झीज जास्त होते व ती लवकरच कालबाह्य ठरते हे टाळण्यासाठी विकसनशील देशांनी भांडवल प्रधान तंत्राचा अवलंब करुन भांडवल झीज व व्यय कमी करावा. भविष्यात भांडवल बदलण्याचा खर्चही कमी राहतो व मोठ्या प्रमाणावर उत्पादनाचे फायदे मिळतात.

५) श्रम-प्रधान उत्पादन तंत्रापेक्षा भांडवलप्रधान उत्पादन तंत्र हे जास्त नफा मिळवून देते. भांडवलप्रधान तंत्रामध्ये उत्पादकता जास्त असते व खर्चाच्या तुलनेत ती जास्त वेगाने वाढते असे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाने शक्य होते.

६) वास्तवामध्ये भांडवलप्रधान उत्पादन तंत्रामुळे गुणवत्तापूर्ण वस्तूची निर्मिती होते व खर्चही कमी राहाते. कमी खर्च म्हणजे कमी किंमत व यातून जीवनस्तर वाढतो. हर्षमन यांच्या मते विकसनशील देशामध्ये तंत्रज्ञानांच्या विरुध्द बाबीची जास्त काळजी घेतल्यामुळे जीवनस्तरामध्ये वाढ होत नाही.

७) आर्थिक वृध्दीवर भांडवल प्रधान तंत्राचे फार मोठे परिणाम होतात. थोड्याशाच भांडवलप्रधान तंत्रांच्या वापरामुळे श्रमप्रधान तंत्रापेक्षा जास्त फायदे आढळून येतात.

८) हर्षमन यांच्या मते, भांडवल प्रधान तंत्राने कौशल्य व कार्यक्षमता वाढते व याचा सकारात्मक परिणाम आर्थिक विकासावर होतो.

भांडवलप्रधान तंत्राचे समर्थन वरीलप्रमाणे दिसून येते. आज बहुसंख्य विकसनशील देश भांडवलप्रधान तंत्राचा अवलंब करीत असताना दिसून येतात. उत्पादनसंस्था याही भांडवल प्रधान तंत्रास प्राधान्य देताना दिसून येतात. त्यामुळे श्रमप्रधान तंत्र सोयीचे व भांडवल प्रधान तंत्र उपयोगाचे यामध्ये अनेक मते मतांतरे दिसून येतात.

मात्र अलीकडील काळामध्ये उद्योगनिर्णय तंत्र बदलत असताना दिसून येते व आज तंत्रज्ञान हस्तांतरही सोपे झाले आहे व गुंतवणूकीच्या विविध माध्यमातून ते विकसनशील देशांमध्ये पोहचलेले आहेत. उत्पादनाचा वेग वाढवण्यावर मोठ्या प्रमाणावर भर दिला जात आहे.

आज जगातील विकसित देशांकडून मोठ्या प्रमाणावर शोध संशोधनाद्वारे तंत्रज्ञानाची निर्मिती केली जात आहे व याचा परिणाम उत्पादन व उत्पादन घटकातील बदलाद्वारे दिसून येत आहे. श्रम प्रधान तंत्राने अल्पकाळात उत्पादन पातळी रोजगार व उत्पन्नात वाढ होते. मात्र दीर्घकाळात त्याचे लाभ मिळतील का नाही याबाबत साशंकता आहे. विकसनशील देशाने कोणते तंत्रज्ञान वापरावे याबाबत अनेक प्रश्न आहेत. अविकसित देशाने श्रमप्रधान तंत्रांचा अवलंब करुन कमी दराने विकास करावा का? त्यानी मागासलेले तंत्रच वापरावे का विकसित देशाचा तंत्रज्ञानाचा मार्ग अवलंबावा? हा मार्ग अवलंबिला तर त्याचे कोणते परिणाम होतील? इत्यादी अनेक प्रश्न आहेत. त्यामध्ये जपान या देशाचे उदाहरण पाहिल्यास आपणांस चांगले समजून घेता येईल. जपानमधील कापड उद्योगाचा इतिहास पाहिला असता प्रथमत: ते ब्रिटनमधील जुनी यंत्र खरेदी करुन कापड उत्पादन करत असत. इस्त्राईल व अर्जेंटिना हेही देश विकसित देशातील वापरलेली जुनी यंत्रे खरेदी करुन त्यावर उत्पादन घेत असत. जरी जुनी यंत्रे कमी दराने मिळत असले तरी ती मध्येच बंद पडणे व त्यावर होणारा दुरुस्ती खर्च जास्त असल्याचे अनुभवास आले. त्यामुळे अशा विकसनशील देशांनी विकसित देशातील तंत्रज्ञानाचा वापर करताना आपल्या देशाची आर्थिक सामाजिक स्थितीचा विचार करुन यात दुरुस्त्या करुन अवलंब करावा.

**मध्यममार्गी तंत्रज्ञान :**

प्रा. शुंपीटर हे मध्यममार्गी तंत्रज्ञानाचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते प्रत्येक कामाच्या ठिकाणाच्या यंत्राचा खर्च हा महत्त्वाचा घटक आहे. या तंत्रामध्ये विकासाचा विभागीय दृष्टिकोन पाहिलेला आहे. त्यांच्या मते कामाचे ठिकाण हे श्रम वस्तीत काढावे. त्यामुळे स्थलांतरण कमी होईल व गैरसोय टाळली जाईल. कामाचे ठिकाण हे स्वस्त असावे. जेणेकरुन त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आयात करावी लागणार नाही. उत्पादनाची पध्दत अत्यंत साधी असावी व त्यामध्ये कमी कौशल्याची आवश्यकता असावी व त्यातून देखभाल खर्च कमी व्हावा. उत्पादन हे स्थानिक कच्चा मालावर आधारित असावे व वस्तूचा वापर हा स्थानिक बाजारातच व्हावा. मध्यममार्गी तंत्र हे श्रमप्रधान असावे व लहान उद्योगांना उपयुक्त असावे.

**सुयोग्य तंत्रज्ञान : (Appropriate Technology)**

सुयोग्य तंत्रज्ञान निवडीबाबत अनेक विचारवंतामध्ये एकमत असल्याचे निदर्शनास येते. यात ब्रोझन यांच्या मते एखाद्या क्षेत्रातील सुयोग्य तंत्रज्ञान वापर व तेथील संसाधने, आकृतीबंध व बाजारावर अवलंबून असतो. स्थानिक संबंधीत समुदायाची प्रश्ने व समस्या सोडविणारे तंत्र, कौशल्य हे मध्यममार्गी तंत्र म्हणून ओळखले जाते. लोकांच्या गरजा पूर्ण करणारे व सामाजिक न्याय मिळवून देणारे तंत्र वापरात आणले पाहिजे. ते तंत्र त्या संबंधीत देशास परवडणारे असले पाहिजे. तांत्रिक दृष्टीने ते सोयीस्कर असले पाहिजे व लोकांच्या सामाजिक, आर्थिक साच्यामध्ये बसले पाहिजे. ते तंत्र असे असले पाहिजे की ज्याद्वारे आपण काही अधिक्य निर्माण करुन शकू. ज्यातून पुढे भोडवल संचय वाढेल व विकासास गती मिळेल. या तंत्राच्या साह्याने स्थानिक संसाधने वापरात आणता आली पाहिजेत व ते स्वस्तही असले पाहिजे. स्थानिक पातळीवर संसाधनावर नियंत्रण मिळवणारे तंत्र उपयोगी ठरते हे दोन्ही असावे, श्रम प्रधान व भांडवल प्रधान या तंत्राच्या साह्याने श्रमिकांना

कामाचे ठिकाण, साधने व लाभ याबाबत जवळीकता वाटणारे तंत्रज्ञान असावे, याच्या साह्याने बहुसंख्य लोकांकडून उत्पादन व्हावे ही फक्त बहुसंख्यासाठीच नसावे. या तंत्रज्ञानाचा वापरातून स्वयंपूर्णता यावी. या तंत्रज्ञानामध्ये अनविकरणक्षम ऊर्जेवर अवलंबित नसावे. त्यामध्ये नवीनता करता यावे, हे तंत्र स्थानिक नसावे तर ते गतिमान असावे व त्यामध्ये नवनिर्मिती सामावून घेण्याची क्षमता असावी. ते कार्यक्षमता वाढविणारे व त्याचबरोबर उत्पादकता वाढविणारे असावे. सुयोग्य तंत्रज्ञान हे काळानुसार बदलता येणारे असावे. त्यामध्ये ताठरता नसावी. ते लोकांनी स्वीकार करण्यासारखे असावे व बदलत्या वातावरणास पुरक असावे, पर्यावरणासही पूरक असावे. ते तंत्रज्ञान पूर्णत: परंपरागत ज्ञानावर आधारित नसावे तर त्यातच आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास योग्य असावे. सर्वच विकसित देशामध्ये अनेक लहान उद्योग आहेत ते शेती क्षेत्रात आहेत जेथे फार मोठे तंत्रज्ञान वापरले जात नाही व यंत्रे ही कमी भांडवल सधनतेची आहेत. साधे व पर्यायी तंत्रज्ञान निवडणे अधिक चांगले ठरते. लहान उद्योगामध्ये श्रमप्रधान तंत्राचा अवलंब करुन मोठ्या प्रमाणात वृध्दी साध्य करता येते. विकसनशिल देश कमी खर्चीक व जास्त उत्पादकता असणारी यंत्रे विकसित देशाकडून खरेदी करु शकतात व त्यामध्ये देशांतर्गत बनावटीचे नवे तंत्रज्ञान निर्माण करु शकतात. भारत हा देश मोठ्या प्रमाणावरील देशीय बनावटीची कृषी यंत्रे तयार करतो. ज्यामध्ये यांत्रिक नांगर व त्याचबरोबर प्राण्याद्वारे ओढता येणारा नांगर, हस्तसाधने, सिंचन यंत्रे, डेअरी व पोल्ट्री फार्म यंत्रे तयार करणे ज्यातून गरज पूर्ण होते व कामाचा वेग वाढतो. यासच सुयोग्य तंत्रज्ञान म्हणतात.

वकील व ब्रम्हानंद यांच्या मते प्रत्येक विकसनशील देशाने त्यांच्या गरजेनुसार तंत्रज्ञानाचा विचार करावा ते खालीलप्रमाणे तंत्राचा पुरस्कार करताना दिसतात. त्याच्या मते विकसनशील देशांनी खालील तंत्रे दिली आहेत.

१) जे तंत्रज्ञान कमी वेळात सहज शिकता येते.

२) ज्यामध्ये आरंभिक गुंतवणूक कमी असेल.

३) ज्यामध्ये गुंतवणूक व परतावा यामधील कालावधी कमी असेल.

४) ज्यामध्ये कौशल्यपूर्ण व विशेषीकृत श्रमिक तयार करण्याचा खर्च कमी असेल.

५) ज्याच्या साह्याने दुर्मिळ साधनांची बचत करता येते.

६) ज्याच्या साह्याने उत्पादन वाढ होईल व खनिजे व विजेचा पुरवठा वाढविता येईल.श

वरील बाबींचा विचार करुन तंत्रज्ञान आत्मसात केले व उपयोगात आणले असता विकासाचे तंत्र वाढविण्यात यश येईल. तंत्रज्ञानाचा वापर व विकास अनेक ठिकाणी होणे आवश्यक आहे. काही विशिष्ट अशा मोठ्या उद्योगाचे सुयोग्य तंत्रज्ञान वापरणे व इतर ठिकाणी नसेल तर विकासामध्ये असमतोल निर्माण होतो. सुयोग्य तंत्रज्ञानाच्या साह्याने कौशल्यात वाढ करता येते व वितरणामध्ये समानता आणता येते. याद्वारे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. विकसनशील देशाच्या औद्योगिकरणाच्या प्रारंभीक टप्प्यामध्ये असे सुयोग्य तंत्रज्ञान फारच उपयुक्त ठरते. या तंत्राच्या साह्याने मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करता येतो.

**तंत्रज्ञान व रोजगार :**

उत्पादन तंत्र व रोजगार या दोन अर्थव्यवस्थेमधील महत्त्वाच्या संकल्पना आहेत. विकसनशील देशांचा विचार केला असता आपणांस फार मोठी लोकसंख्या दिसते. या देशातील लोकसंख्या प्रामुख्याने तरुण गटात जास्त मोडते. जन्मदर जास्त असल्यामुळे लोकसंख्या वृध्दीदरही जास्त असतो. तरुण लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यामुळे काम मागणारे लोकही जास्त असतात. यांना रोजगार पुरवठा तेथील सरकारसमोर मोठे आव्हान आहे. विकसनशील देशामध्ये श्रमिकांचा दर्जा कौशल्य हे कमी असल्याचे आढळून येते. हा दर्जा वाढविण्यासाठी तेथील शिक्षण व्यवस्था प्रबळ व मजबूत करणे आवश्यक आहे. जागतिक विचारमंचच्या २०१९ च्या अहवालानुसार विकसनशील देशातील प्रचलित कामगारांना कौशल्य वाढीसाठी किमान ४० दिवसांचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्याच्यात कौशल्याचा अभाव असल्यामुळे त्याची उत्पादकता कमी होते व याचा फटका उद्योजकांना बसतो. श्रमिकांच्या दर्जावरच उत्पादनाचा दर्जा अवलंबून असतो. विकसनशील देशामध्ये फार मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य आहे. यामुळे शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. उच्च शिक्षणातील समग्र नावनोंदणी दर (Gross Enrollment Ratio) फक्त २६% आहे. हे प्रमाण विकसित देशाच्यातुलनेत नगण्य आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक खर्च वाढविणे आवश्यक आहे. जसे झाले नाही तर भविष्यात कुशल कामगार मिळणे अवघड होईल व याचा विपरीत परिणाम औद्योगिक विकासावर होईल.

आज जगातील सर्वच देश भारताकडे एक मोठी अन्नपुरवठा करणारी बाजारपेठ म्हणून पाहतात. जगातील इतर देशांच्या तुलनेत भारत हा देश तरुण देश आहे. भारतावर जागतिक बाजारपेठेत श्रमाचा पुरवठा करणारा महत्त्वाचा देश म्हणून जबाबदारी आहे. श्रमिकांना मानव संसाधन म्हणून ओळखले जाते. हे संसाधन गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. लोकसंख्या लाभांश साध्य करावयाचा असेल तर ती लोकसंख्या कौशल्यपूर्ण असल्याचे अनिवार्य आहे. सद्यस्थितीत भारतातील रोजगारविषयक स्थिती समाधानकारक नसल्याचे दिसते. बेरोजगारी वाढत असल्याचे दिसते. एकूण रोजगारामध्ये ८५% रोजगार हा असंघटित क्षेत्रात आहे. त्याच्यासाठी कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुविधा उपलब्ध नाहीत. असंघटित क्षेत्रातील रोजगार हा कौशल्यपूर्ण नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये कौशल्य वाढविणे आवश्यक आहे. अलीकडील काळामध्ये स्वयंरोजगार निर्मितीवर भर दिला जात आहे. त्यासाठी अनेक प्रकारच्या योजना उदा. मुद्रा योजना, स्टार्ट अप, स्टँड अप, मेक इन इंडिया इ. सुरु केल्या आहेत. भारतीय सरकारपुढे रोजगार निर्मिती हे मोठे आव्हान आहे. यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना राबविणे गरजेचे ठरणार आहे. उद्योग क्षेत्राची गरज लक्षात घेवून शिक्षण देणे आवश्यक ठरत आहे उद्योगाची गरज व शिक्षण यामधील दरी कमी करावी लागेल यासाठी भारत सरकारने स्कील इंडिया सारखे नवीन उपक्रम सुरु केले आहेत. यामधील गुंतवणूक वाढवून त्यांना गती देणे आवश्यक आहे. रोजगार निर्मितीचा विचार करताना या मार्गातील अनेक अडथळे दूर करणे आवश्यक आहेत. भारतामध्ये एकूण रोजगारातील महिलांचा हिस्सा अत्यंत कमी असल्याचे दिसते. त्यांच्यातील कौशल्यामध्ये वाढ करुन विकास प्रक्रियेतील त्यांचे योगदान वाढविणे आवश्यक आहे. लिंगभेद कमी करुन त्याचा विकास करणे आवश्यक आहेत. एकंदरीत पाहता रोजगारवृध्दी हे मोठे आव्हान आहे. मात्र मग हे एक उत्पादनाचे फक्त साधन न समजता

त्यास मानवी साधनसंपत्ती म्हणून पाहणे आवश्यक आहे. तरच मोठ्या प्रमाणावर कुशल श्रम तयार करता येईल व विकासातील योगदान वाढविता येईल.

### ३.२.२ शेती व उद्योगातील व्यापार शर्ती :

**(Terms of Trade between Agriculture and Industry)**

देशाची आर्थिक विकासाची कामगिरीचे विश्लेषण करण्यासाठी देशांतर्गत शेती व उद्योगातील व्यापार शर्ती हे एक महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. यामध्ये आपण अनेक बाबींचा विचार करतो. यामध्ये देशातील गुंतवणूक व वृध्दी निशिचत करणारे सार्वजनिक धोरण हे क्षेत्रीय व समग्रलक्षी आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यासले जातात. यामध्ये भारतामध्ये आपणांस शहराकडे झुकलेली धोरणे मोठ्या उद्योग संस्था कडून प्रभावीत होताना दिसतात. यामध्ये क्षेत्रीय धोरणे महत्त्वाची भूमिका बजावतात. अर्थव्यवस्थेतील शेती व उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक कशी आहे त्यावरुनच आपणांस व्यापारशर्ती समजून येतात. भारतातील व्यापारासाठी सदैव शेतीस प्रतिकूल असल्याच्या दिसतात.

व्यापारशर्ती ही आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्वाची संकल्पना आहे. निर्यात वस्तूच्या मोबदल्यात आयात केल्याचा वस्तूच्या प्रमाणावरुन या निशिचत होतात. या वस्तूंचा विनिमय दर विचारात घेतला जातो. एखाद्या देशाला निर्यात केलेल्या वस्तूंच्या प्रमाणाच्या तुलनेत आयात केलेल्या वस्तूचे प्रमाण जास्त असेल तर व्यापारशर्ती अनुकूल आहेत असे म्हणता येते व निर्यात वस्तूंच्या प्रमाणाच्या तुलनेत आयात वस्तूचे प्रमाण कमी असेल तर त्या प्रतिकूल समजल्या जातात. व्यापारशर्ती आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये जरी विचारात घेतल्या जात असल्यातरी त्या देशांतील आंतरक्षेत्रीय बाबतीतही आपणास विचारात घेता येतात.

आयात व निर्यात व्यापारातील शेती वस्तू व औद्योगिक क्षेत्रातील वस्तूंच्या किंमती विचारात घेवून व्यापरशर्तीची अनुकूलता व प्रतिकूलता ठरविता येते. कृषी व उद्योग क्षेत्राच्या वस्तूच्या किंमतीचा विचार करुन त्या व्यापारशर्ती ठरविल्या जातात. त्यांना शुध्द वस्तू व्यापार शर्ती असे म्हटले जाते. काही वेळा व्यपारशर्ती उत्पन्नावरही ठरविल्या जातात.

व्यापारशर्तीद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एखाद्या देशाच्या निर्यातीची खरेदी क्षमता आयात वस्तू बाबत विचारात घेतली जाते. देशास व्यापारातून तेव्हाच फायदा झाला असे म्हणता येते जेव्हा निर्यात वस्तूच्या मोबदल्यात जास्त आयात वस्तू मिळतात. व्यापारशर्ती अनेक प्रकारच्या असतात. वस्तू व्यापार शर्ती (Commodity Terms of Trade) यामध्ये निर्यात वस्तूंची किंमत व आयात वस्तूंची किंमत विचारात घेतली जाते. यास सूत्ररुपाने $Tc = Px / Pm$ असे लिहिले जाते. Tc वस्तू व्यापारशर्ती, Px निर्यात किंमत व Pm आयात किंमत, या व्यापारशर्तीचा उपयोग आंतरराष्ट्रीय व्यापारातून लाभ झाला किंवा नाही ते ठरविण्यासाठी केला जातो. दुसरे म्हणजे समग्र वस्तू व्यापार शर्ती (Gross Barter Terms of Trade) होय. यामध्ये निर्यात वस्तूचे व आयात वस्तूंचे संख्यात्मक प्रमाण मोजले जाते. तिसरे म्हणजे उत्पन्न व्यापार शर्ती (Income Terms of Trade) होय. यामध्ये देशाच्या निर्यातीची मात्रा विचारात घेतली जाते व निर्यात व आयात किंमती विचारात घेतल्या जातात. यामध्ये देशाची निर्यातीतील बदल क्षमता व आयातीतील बदल क्षमता विचारात घेतली जाते.

चौथे म्हणजे उपयोगिता व्यापारशर्ती (Utility Terms of Trade). होय. यामध्ये एका निर्यात वस्तूच्या उत्पादनापासून होणारी उपयोगितेतील घट व एका आयात वस्तूमधून उपयोगीतेत होणारी वाढ यावर अनाधारीत निर्देशांक तयार केले जातात. यामध्ये तुलनात्मक उपयोगितेचा विचार केला जातो.

एका विशिष्ट देशाच्या व्यापारशर्ती खालील घटकांनी प्रभावीत होतात ते घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) **परस्पर मागणी : (Reciprocal Demand)** : देशाच्या व्यापारशर्ती परस्पर मागण्यांवर अवलंबून असतात. यामध्ये एका देशाच्या आयात वस्तूंची लवचिकता कशी आहे याचा विचार केला जातो. समजा व्यापारामध्ये दोन देश आहेत. जर्मनी व इंग्लंड जे ताग व कापडाचे उत्पादन करतात. जर जर्मनीची इंग्लंडच्या कापडास असलेली मागणी जास्त अलवचिक असेल तर कापडाची किंमत तागांच्या किंमतीपेक्षा जास्त वाढेल व व्यापारशर्ती जर्मनीस प्रतिकूल बनतील व इंग्लंडला अनुकूल बनतील व याउलट

२) **घटक संघटनेतील बदल (Changes in Factor Endowment)** : घटक सधनतेतील बदलाचा व्यापारशर्तीवर परिणाम होतो. या बदलामुळे निर्यात वाढू शकते किंवा कमी होवू शकते.

३) **तंत्रज्ञानातील बदल (Changes in Technology)** : तंत्रज्ञानातील बदलामुळे व्यापारशर्ती अनुकूल होण्यास मदत होते. विकसित देशामध्ये मोठ्या प्रमाणावरील तंत्रज्ञान विकासामुळे व्यापारशर्ती त्यांना अनुकूल असल्याचे दिसते.

४) देशातील लोकांच्या चवीमध्ये बदल झाल्यामुळे त्याचा परिणाम व्यापारशर्तीवर परिणाम होतो. जर देशातील लोकांची पसंती ही आयात वस्तूपेक्षा देशात तयार होणाऱ्या वस्तूस मिळाली तर व्यापारतोल अनुकूल बनतो.

५) जेव्हा देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढत असते तेव्हा आर्थिक वृध्दी घडून येते व या वृध्दीचा व्यापारशर्तीवर परिणाम होतो.

६) प्रशुल्कामध्ये व्यापारशर्तीवर परिणाम होतो. जेव्हा देशाद्वारे आयात वस्तूवर प्रशुल्क लावले जातात. तेव्हा त्याची मागणी कमी होवून व्यापारतोल देशास अनुकूल बनतो.

७) चलनाचे अवमूल्यन केल्यामुळे आयात वस्तूची देशांतर्गत किंमत वाढते व व्यापारतोल देशास अनुकल बनतो.

वरीलप्रमाणे अनेक घटकांचा व्यापारतोलावर परिणाम होतो.

**आंतरराष्ट्रीय व्यापार तोलार : (Internationalo Terms of Trade)**

व्यापारशर्ती ही संकल्पना एखाद्या विशिष्ट अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी वापरली जाते. या संकल्पनेची चर्चा अनेक अर्थतज्ज्ञांनी केली आहे. आंतरक्षेत्रीय व्यापारशर्तीद्वारे व्यापारशर्ती कोणत्या क्षेत्रास अनुकूल आहेत हे माहीत होते. यामध्ये एका क्षेत्रातील निर्यातीच्या किंमतीच्या तुलना दुसऱ्या क्षेत्रातील आयातीच्या किंमतीशी केली जाते. आर. भामराजक्षी यांनी निर्यात किंमतीचे आयात किंमतीशी

असल्याने गणोत्तर लक्षात घेवून व्यापारशर्ती मोजमाप केल्या. त्यांच्या मते पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात व्यापारशर्ती शेती क्षेत्रास अनुकूल ठरल्या. वस्तूरुपी व्यापारशर्ती शेती क्षेत्रास ०.५१ टक्के अनुकूल ठरल्या. त्याच्या मते देशाच्या आर्थिक विकासाचे लाभ शेतीक्षेत्रास झाले.१९७४-७५ ते १९८७-८८ या काळात व्यापारशर्ती शेती क्षेत्रासाठी प्रतिवर्षी सरासरी ०.९९% घसरल्या.

प्रा. कहलोन व त्यागी यांच्या मते श्रीमती भामराजक्षी यांनी चुकीच्या दृष्टीकोनावर आधारित व्यापारशर्ती मोजमाप केले. त्यांच्या मते व्यापारशर्ती १९६७-६८ ते १९७७-७८ यादरम्यान १२०.५% वरुन ८९.९% इतक्या घसरल्या. त्यांच्या मते बहुसंख्य वेळी व्यापारतीशर्ती शेतीस प्रतिकूल राहिल्याचे दिसते. श्री एस. एल. शेट्टी यांनी औद्योगिक वस्तूंच्या किंमतीशी शेतमालाच्या किंमतीची टक्केवारी विचारात घेतली. १९५५-५६ ते १९६१-६२ या काळात औद्योगिक वस्तूच्या किंमतीची शेतमाल किंमतीशी टक्केवारी १०० किंवा त्यापेक्षा थोडी कमी निदर्शनास आली, त्यामुळे व्यापारशर्ती अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही आढळून आल्या.

भारतामध्ये विकासाच्या प्रारंभीच्या काळामध्ये वृध्दीस सुरुवात शेती क्षेत्रातून झाली. मात्र नंतर भांडवल व श्रम हे औद्योगिक क्षेत्रामध्ये वळविण्यात आले. जसा विकास वाढत गेला तशी शेतमालाची मागणीही वाढत गेली. जॉरगनसन यांच्यामते जसे औद्योगिकरण वाढते तसे व्यापारतोल औद्योगिकीकरण वाढते. तसे व्यापारतोल शेतीस अनुकूल बनतो. जेव्हा व्यापारतोल उद्योगास प्रतिकूल बनते तेव्हा औद्योगिक विकास खुंटतो. त्यामुळे अनेक देशामध्ये व्यापारतोल औद्योगिक क्षेत्रास अनुकूल ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

### ३.२.३ आर्थिक विकासाचे मापन, विकासातील अंतर व कुझनेट वक्र :
### (Measuring Development and Dvelopment Gap, Kuznet Curve)

**आर्थिक विकासाचे मापन : (Measurement of Economic Development)**

जगातील प्रत्येक देश आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करताना दिसतो. मात्र आपल्या देशाचा आर्थिक विकास झाला किंवा नाही व झाल्यास तो किती प्रमाणात झाला हे ठरविणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक विकासाचे मापन करणे गुंतागुंतीचे जरी असते तरी ते करणे आवश्यक असते. विकासाचे मापन केल्यानंतरच पुढील विकासाची दिशा ठरविता येते. विकासाच्या बाबतीत इतर देशाशी तुलनाही या मोजमापाद्वारे करता येतो. आर्थिक विकासाच्या मोजमापाच्या दिलेल्या निर्देशांकावर आधारित पुढील पध्दतीने विकासाचे मापन केले जाते. आर्थिक विकास ही दीर्घकाळातील बदलाची प्रकिया असते.

**१. राष्ट्रीय उत्पन्न पध्दत : (National Income Method)** सायमन कुझनेट मेजर व बाल्डवीन हीक्स, सॅम्युअलसन व पिजन या विचारवंतांच्या मते राष्ट्रीय उत्पन्न ही अतिशय चांगली पध्दत आहे. देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी वाढ होत असेल तर विकास होत आहे असे मानले जायचे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा विचार, विकासाचे मापन करताना प्रथमत: केला जातो. राष्ट्रीय उत्पन्नावरुन जगातील देशाची क्रमवारीही लावली जाते. उत्पन्न विचारात घेताना पैशातील उत्पन्नापेक्षा देशामध्ये एका वर्षाच्या कालावधीत उत्पादीत झालेल्या वस्तू व सेवांचे उत्पादन विचारात घेतले जाते. यामध्ये भाववाढ विचारात घेतली जात नाही. प्रा. मे. डे. मेनटेन यांच्यामते एकूण राष्ट्रीय उत्पन्न मोजमापन योग्य मोजमाप आहे. यामध्ये अंतिम वस्तूच

मोजल्या जातात. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही सातत्यपूर्ण असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय उत्पन्न मोजताना देशाच्या मालकीच्या साधनाच्या साह्याने केलेले उत्पन्न मोजले जाते. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय दरडोई उत्पन्न वाढत नाही.

२) **दरडोई वास्तव उत्पन्न : (Per Capital Real Income)** : वास्तव दरडोई उत्पन्नातील वाढ हा महत्त्वाचा घटक आहे. दरडोई उत्पन्न हे एकूण राष्ट्रीय उत्पन्नास लोकसंख्येने भागाकार करुन मिळते. देशातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा सरासरीत किती वर गेला याची कल्पना दरडोई वास्तव उत्पन्नातून येते. चार्ल पी. किंडलबर्जर यांनी या पध्दतीचे समर्थन केले. दरडोई वास्तव उत्पन्न हे देशातील प्रत्येक नागरिकाच्या उत्पन्नाची सरासरी असते. यामध्ये लोकांच्या राहणीमानात वाढ करण्याचा हेतू असतो. दरडोई उत्पन्नातील वाढ व घट या आधारे राहणीमानाचा दर्जा उंचावला किंवा खालावला हेही सांगता येते. उत्पन्नाच्या वितरणावर हे बरेचसे अवलंबून आहे. अलिकडील काळात राष्ट्रीय उत्पन्न वाढत असताना बेरोजगारी वाढताना दिसते. उत्पन्नातील विषमतेमुळे फार मोठ्या प्रमाणावर दर्जा वाढल्याचे सांगता येत नाही. देशाच्या उत्पन्नात वाढ होताना लोकसंख्या वाढली असता दरडोई उत्नातील वाढ प्रभावी ठरणार नाही. आर्थिक, सामाजिक कल्याण फक्त दरडोई उत्पन्नावर अवलंबून नसते तर ते कोणत्या वस्तूचे उत्पादन घेतले जात आहे यावरही अवलंबून असते. दरडोई उत्पन्नातील मोजमापामध्ये अनेक त्रुटीदिसून येतात. त्यामुळे हे परिपूर्ण मापन ठरू शकत नाही.


**३) आर्थिक कल्याण : (Economic Welfare)** : राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न हे परिपूर्ण मोजमाप होवू शकत नसल्यामुळे आर्थिक कल्याण मोजमाप होवू शकत नसल्यामुळे आर्थिक कल्याण मोजमाप मांडले गेले. आर्थिक विकासाचे मोजमाप करताना देशातील नागरिकांच्या आर्थिक कल्याणामध्ये वाढ झाली काय ते पाहणे आवश्यक असते. जर आर्थिक कल्याणात भर पडली तर विकास झाला असे म्हणता येईल. आर्थिक कल्याण साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप करणे आवश्यक असते. त्याचबरोबर किंमतीमध्ये स्थैर्य राखणे महत्त्वाचे असते. तेव्हा पैशाची खरेदीशक्ती वाढते. तेव्हाच आर्थिक कल्याण होते. जेवढ्या उच्च पातळीचे आर्थिक कल्याण असेल तेवढाच उच्च पातळीचा आर्थिक विकास मानला जातो. मात्र बरेचसे अर्थतज्ञ यामधील मोजमापाचे अडथळे विचारात घेवून हे परिपूर्ण मापन नसल्याची टिका करतात.

४) **तुलनात्मक संकल्पना : (Comparative Concept)** : आर्थिक विकास ही एक तुलनात्मक संकल्पना आहे व यातून ती चांगल्या पध्दतीने समजून घेता येते. ही तुलना खालील दोन पध्दतीने करता येते.

**अ. देशामधील तुलना :** यामध्ये आपणास दीर्घ काळाचा विचार करावा लागतो व त्यास दोन भागात उत्पन्न विभागावे लागते. यामध्ये १९५० मधील राष्ट्रीय उत्पन्न १९९० मधील राष्ट्रीय उत्पन्न होय. त्यामध्ये आपणांस वाढ व घट विचारात घेता येते.

**ब. दुसरे म्हणजे इतर देशाशी तुलना होय :** यामध्ये आपण आपल्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा इतर देशाच्या उत्पन्नाशी व वृध्दीशी तुलना करणे ही तुलना करताना प्रवृत्ती विचारात घेतली जाते.

**आकृती क्र. ३**




वरील आकृतीमध्ये OX या अक्षावर कालावधी व OY अक्षावर उत्पन्न दर्शविले आहे. आकृतीमध्ये A व B असे दोन देश आहेत. B या देशाने ४०० इतक्या उत्पादन पातळीवरुन सुरुवात केली आहे. त्यावेळी A हा देश १०० इतक्या उत्पादन पातळीवर आहे. A या देशाने वेगवान प्रगती केल्याचे दिसते. A या देशाचे ५ वर्षाच्या कालावधीतील उत्पादन १०० वरुन ५०० पर्यंत वाढले आहे व B या देशाचे ४०० वरुन ५०० पर्यंत वाढले आहे. A या देशाने वेगाने उत्पन्नवाढ केल्याचे दिसून येते. या पध्दतीद्वारे चांगल्या पध्दतीने तुलना करता येते.

५. **सामाजिक निर्देशांक : (Social Index)** : श्री. हॅजेल व अनरिंड, मॉरीस डी, मॉरीस, प्रा. मायेर इ. अर्थशास्त्रज्ञांनी ही पध्दत स्वीकारली. यामध्ये आरोग्य, शिक्षण, अन्न, साक्षरता, तंत्रशिक्षण, रोजगार स्थिती, मुलभूत गरजांचा उपभोग, चांगली घरे, खेळ, मनोरंजन, सामाजिक सुरक्षितता इ. बाबींचे मोजमाप केले. त्यांनी आर्थिक विकासांची गुणात्मक बाजू मांडली. यामध्ये व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा व सर्व प्रकारच्या उपभोगाचा विचार केला गेला. कल्याणकारी राज्याची कर्तव्यही अशाच प्रकारची असल्याचे दिसतात. या पध्दतीने मापन करत असताना भार कसे द्यावेत या बाबतीत अनेक तज्ञांमध्ये दुमत आहेत. व्यक्तीपरत्वे भार बदलत असल्यामुळे व्यवहार्य वाटत नाही.

६. **व्यवसायिक आकृतीबंध : (Occupational Pattern)** : आर्थिक विकासाचे मापन करत असताना लोकसंख्येचे विविध व्यवसायामध्ये विभाजन कसे झाले आहे हे विचारात घेतले जाते. यावरुन आर्थिक विकासाचे स्वरुप समजून येते. कोलीन क्लार्क यांच्या मते व्यवसायिक संरचना व आर्थिक विकास यामध्ये अत्यंत जवळचा संबंध आहे. त्यांनी व्यवसायीक संरचना तीन विभागात विभागली तर प्राथमिक क्षेत्र (कृषी, मासेमारी, जंगले व खणीकाम इ.) द्वितीय क्षेत्र (उद्योग, व्यापार, बांधकाम इ.) व तृतीय क्षेत्र (बँका, विमा कंपन्या, वाहतूक, दळणवळण इ.) विकसनशील देशामध्ये बहुसंख्य लोकसंख्या, प्राथमिक क्षेत्रात कार्यरत असल्याचे दिसते व विकसित देशात बहुसंख्य लोकसंख्या तृतीय क्षेत्रात कार्यरत असते. लोकसंख्या जेव्हा

प्राथमिक क्षेत्रातून द्वितीय व द्वितीय मधून तृतीय क्षेत्रात स्थलांतरित होते. तेव्हा आर्थिक विकास होत आहे असे म्हणता येते. या पध्दतीमध्ये मोजमाप करताना लोकसंख्येचे व्यवसायानुसार वर्गीकरणे करणे अशक्य असते त्यामुळे मर्यादा येते.

७. **जीवनमान दर्जा विकास : (Standard of Living Criterion / Method)** : या पध्दतीमध्ये जीवनमान दर्जावरुन विकासाचे मापन केले जाते. या पध्दतीचा उद्देश हा लोकांचा दर्जा मोजणे आहे व जीवनमान दर्जा उंचावला तरच आर्थिक विकझास झाला असे म्हणता येईल. यामध्ये सरासरी उपभोगातील वाढ मोजली जाते. ही पध्दतही व्यक्तीनिष्ठ असल्यामुळे मोजमापावर मर्यादा येतात.

आर्थिक विकासाचे मापन वरील सात पध्दतीने केले जाते. प्रत्येक पध्दतीचे गुण व दोष आहेत. सर्वच पध्दतीद्वारे विकास मोजला जाणे शक्य आहे असे म्हणता येईल.

**विकासातील अंतर : (Development Gap)**

जगातील सर्वच देशाची वर्गवारी उत्पन्नावर आधारीत केली जाते. ढोबळमानाने या देशाचे विकसित विकसनशील व अविकसित असे वर्गीकरण केले जाते. विकसित देश हे उच्च उत्पन्न गटात येतात तर अविकसित देश हे निम्न उत्पन्न गटात मोडतात. विकसनशील देश हे विकासाच्या मार्गावर असतात व त्याच्यामध्ये आर्थिक विकास वाढीची स्थिती दिसून येते. आजच्या स्थितीत जगातील विकसित देश व अविकसित याच्यामधील आर्थिक विकासामध्ये फार मोठी दरी निर्माण झालेली आहे. मागील काही दशकापासून हे अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला जात असून त्यास फारसे यश मिळालेले नाही. अत्यंतिक दारिद्र्य, उपासमार, निरक्षरता व बेरोजगारी ही विकास मंद असल्याची प्रमुख कारणे असल्याचे दिसून येते. विकासामधील हे अंतर असेच वाढत गेले तर भविष्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर असमानता निर्माण होवून शोषणाचे प्रमाण वाढत जाणार जसे निश्चितपणाने म्हणावे लागेल.

अविकसित देशामध्ये अत्यंतिक दारिद्र्य आहे. तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न अत्यंत अल्प आहे. बहुसंख्य लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगताना दिसतात. या देशामध्ये भांडवली गुंतवणूक फार अल्प प्रमाणात असल्यामुळे अशा देशामध्ये लोक प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असतात. यातील काही देशामध्ये विकास करण्याचे प्रयत्न होताना दिसून येतात. मात्र तो विकासही परकीय महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांची प्रभावित होताना दिसत आहेत. या देशामधील शेती परंपरागत पध्दतीने केली जात आहे. उद्योगाचा विकास झालेला नसल्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. या देशाला तंत्रज्ञान व भांडवलासाठी विकसित देशावरच अवलंबून रहावे लागत आहे. या देशातील बेरोजगारी प्रच्छन्न बेरोजगारी असल्यामुळे दरडोई उत्पन्न अत्यल्प आहे. देशातील लोकांचे दारिद्र्य असल्यामुळे उत्पन्न कमी आहे व यातून बचत कमी होते. याचा परिणाम म्हणून भांडवल संचयाचा दर कमी राहतो. यामुळे गुंतवणूक कमी व उत्पादन कमी व अंतिमत: रोजगार कमी पातळीवर राहतो. हे एक प्रकारचे दुष्ट चक्रच या देशात अनुभवण्यास मिळते. लोकसंख्या वाढल्यामुळे दरडोई उत्पन्न कमी होते व यातून मागणी कमी प्रमाणात होते. अविकसित देशामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येते. बहुसंख्य विकसनशील देशामध्ये सुध्दा उच्च शिक्षणांती व एकूण नावनोंदणी दर (Gross Enrollment Ratio) हा २५%

च्या आसपास दिसून येतो. शिक्षणावर पुरेशा प्रमाणात गुंतवणूक केली जात नाही. आरोग्याची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. प्राथमिक आरोग्य सुविधा या देशामध्ये कमी प्रमाणात दिसून येतात. लोकांचे आरोग्य चांगले राहीले तर त्याची कार्यक्षमता वाढते. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका खंडातील बहुसंख्य देश अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे दिसून येतात. रोजगार ठिकाणची स्थितीही फारशी समाधानकारक नाही. अविकसित देशातील दारिद्र्य भयावह आहे. हृदय हेलावून टाकणाऱ्या स्थितीमध्ये तेथे लोक जगत आहेत. पायाभूत सुविधाही अत्यंत मागासलेल्या स्थितीमध्ये दिसून येतात. दारिद्र्य, बेरोजगारी यामुळे मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी असल्याचे दिसते. नशील्या पदार्थांचे अवैध व्यवसाय, स्त्रियांची विक्री यासारखे अत्यंत गंभीर गुन्हे तेथे सहज केले जातात. या सर्वांवर उपाय म्हणजे शिक्षणाचे प्रमाण वाढवून रोजगार निर्मिती केली पाहिजे. लोकांना काम मिळाले तर ते गुन्हेगारीकडून परावृत्त होतात व विकासकामामध्ये त्याचे योगदान देतात.

श्रीमंत व गरीब देशातील दरी वाढवण्यास खालीलप्रमाणे अनेक कारणे कारणीभूत आहेत.

१. **भूगोल :** काही देशामध्ये मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. त्यामध्ये इंधन तेल, लोह आयात व सोने, चांदी इ. होय. त्याचबरोबर स्वस्त असे जलपरिवहनही उपलब्ध आहे. जगातील सर्वात महान शहरे ही नदीकाठावरच व समुद्रकिनारी असल्याचे दिसतात. वातावरण व पाऊस परिस्थिती याचाही विकासावर परिणाम होतो.

२. **कमी क्षेत्राची स्थिती :** बहुसंख्य देशामध्ये उद्योगाच्या विकासासाठी शेती कारणीभूत आहे. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती, कृषी क्रांतीनंतर घडून आली. विकसनशील देशातील शेती मात्र तुकडयामध्ये विभागली गेली आहे व ती मागास आहे. निसर्गाच्या लहरीपणावरच तिचे अस्तित्व अवलंबून आहे. त्या देशामध्ये, शहरामध्ये लक्ष केंद्रीत झाल्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष होत आहे.

३. **लोकसंख्या आकार :** बहुसंख्य विकसनशील देशातील लोकसंख्या आकाराने मोठे आहेत. त्याच्यामध्ये उच्च जन्मदर व अल्प मृत्यूदर आहे. यातून दारिद्र्य वाढत जाते. वाढत्या लोकसंख्येचा दबाव संसाधनावर येतो व यातून कृषीची उत्पादकता कमी राहते.

४. **कमी प्रमाणावरील मानवी भांडवल संचय :** विकसनशील देशामध्ये आधुनिक तंत्रज्ञान नसते. त्यामुळे तो तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेले राहतात. शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे मानवी भांडवल विकसित करता येत नाही.

५. **वसाहतवाद :** अनेक विकसनशील देशामध्ये ब्रिटिशांची सत्ता होती. स्वातंत्र्यापूर्वी ते एक वसाहत होते. या देशामध्ये विकास झाला नाही व त्यातून त्याचे अवलंबित्त्व वाढत गेले.

६. **संस्थाचा विकास :** विकसनशील देशामध्ये संस्थात्मक विकास झालेला नसतो. या देशामध्ये संस्थांची निर्मिती करण्यामध्ये सरकारची भूमिका महत्त्वाची असते.

७. **भ्रष्टाचार :** विकसनशील देशामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार असल्याचे दिसते. भारतातील परवाना राज याचेच एक उदाहरण आहे. अर्थव्यवस्थामध्ये सार्वजनिक खर्च परिणामकारकपणे केला जात नाही.

८. **आर्थिक धोरणे व संस्था :** सरकारची आर्थिक धोरणे विकासास दिशा देण्यासाठी महत्त्वाची असतात. १९९१ मध्ये भारत व चीन या देशातील दरडोई उत्पादन एकसारखेच होते. मात्र नंतरच्या काळात चीनचे दरडोई उत्पन्न अल्प काळात दुप्पट झाले. आज चीन विकसनशील देश असूनही महासत्ता बनू पाहत आहे. धोरण निर्मिती व त्याची अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची आहे. विकसनशील देशात धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी होताना दिसत नाही. विकासास ही पायाभूत सुविधा निर्माण करणे अत्यंत आवश्यक असते.

वरीलप्रमाणे विषयावर अनेक घटकांचा परिणाम होत असतो.

**आंतरराष्ट्रीय असमानता :**

यामध्ये जगातील विकसित देश व अविकसित देश यांच्या विकासामधील अंतर विचारात घेतले जाते. आर्थिक विकासाच्या आकडेवारीवरुन असे लक्षात येते की विकसित देश मोठी प्रगती साध्य करीत आहेत. मात्र विकसनशील देशात अजूनही मुलभूत प्रश्न सोडवता आलेले नाहीत. विकसित व विकसनशील देशाच्या उत्पन्नातील अंतर कमी करावयाचे असेल तर अविकसित देशांना फार वेगाने प्रगती करावी लागेल. विकासाचा विचार करत असताना देशांच्या संपत्तीतील वाढीबरोबर मानव विकास दर्जाचाही अविकसीत काळामध्ये विचार केला जातो. विकासातील अंतर कमी व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्राने चिरंतन विकास ध्येय (Sustainable Development Goals) जाहीर केले आहेत व जगातील समस्या उदाहरणार्थ शिक्षणाच्या दर्जा, उपासमार, पाणीपुरवठा इ. चा कालबध्द कार्यक्रम जाहीर केला आहे. २०१८ च्या जागतिक असमानता अहवालामध्ये जागतिक असमानतेचे मापन केलेले आहे. सामाजिक निष्कर्षावरुन असे लक्षात येते की, मागील दशकामध्ये जगातील सर्वच खंड व देशामध्ये असमानता वाढत आहे याची पातळी मात्र वेगवेगळ्या देशात वेगवेगळी आहे. जागतिक असमानता ही युरोप खंडात कमी दिसते. तर मध्य आशियामध्ये उच्च प्रमाणावर आहे. देशातील १० टक्के लोकांकडे ४१% संपत्ती, रशियामध्ये ४५%, अमेरिका व कॅनडामध्ये ४७% व आफ्रिका, ब्राझील व भारतामध्ये ५५% संपत्ती असल्याचे दिसून येते. आर्थिक असमानता ही भांडवलाच्या मालकीतून निर्माण होते. भांडवल हे सार्वजनिक व खाजगी मालकीचे असते. १९८० पासून सार्वजनिक क्षेत्रातून खाजगी क्षेत्राकडे भांडवलाचे हस्तांतर मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते. काही देशांमध्ये सार्वजनिक संपत्ती शून्यावर आलेली आहे. यामुळेच सरकाराच्या धोरणाच्या माध्यमातून असमानता दूर करण्यात यश येत नसल्याचे दिसून येते. मागील दशकामध्ये जगातील बरेच राष्ट्रे श्रीमंत झाली. मात्र याचवेळी तेथील सरकार गरीब झाली. सार्वजनिक संपत्ती व खाजगी संपत्तीतील संतुलन हा एक महत्त्वाचा निधार्रक असतो. काही मोजक्या विकसित देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये जवळजवळ ४०० ते ७००% वाढ झाल्याचे दिसते. १९७८ ते २०१३ या कालावधीत चीनमध्ये सार्वजनिक भांडवलातील घट जवळपास ४०% ने झालेली आहे. मागील दशकामध्ये रशिया व अमेरिका या देशामध्ये संपत्तीची असमानता मोठ्या प्रमाणावर नसल्याचे अहवालात नमुद केलेले आहे. आज जगातील १००% लोकसंख्येकडे ६०% संपत्ती आहे. भारतातील असमानता चीन, युरोप, मधील देश रशिया, अमेरिका व कॅनडा या देशातील असमानतेपेक्षा जास्त वेगाने वाढत आहे.

**कोष्टक क्र. ३.१**

**उत्पन्न गटानुसार जागतिक वृद्धीचा हिस्सा : १९८०-२०१६**

| उत्पन्न गट | चीन | युरोप | भारत | रशिया | अमेरिका व कॅनडा | जग |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | १००% | १००% | १००% | १००% | १००% | १००% |
| खालची ५०% लोकसंख्या | १३% | १४% | ११% | २४% | २% | १२% |
| मधली ४०% लोकसंख्या | ४३% | ३८% | २३% | ७% | ३२% | ३१% |
| वरची १०% लोकसंख्या | ४३% | ४८% | ६६% | ११७% | ६७% | ५७% |
| वरची १% लोकसंख्या | १५% | १८% | २८% | ६९% | ३५% | २७% |
| वरची ०.१% लोकसंख्या | ७% | ७% | १२% | ४१% | १८% | १३% |
| वरची ०.०१% लोकसंख्या | ४% | ३% | ५% | २०% | ९% | ७% |
| वरची ०.००१% लोकसंख्या | २% | १% | ३% | १०% | ४% | ४% |

वरील कोष्टकावरून आपणास जागतिक वृद्धीचा हिस्सा समजून घेता येतो. यामध्ये वृद्धीदर हा असमान असल्याचे दिसते. चीनमध्ये मधली ४०% लोकसंख्या व वरची १००% लोकसंख्येचा वृद्धीचा हिस्सा असमाना असल्याचे दिसते. भारतामध्ये मात्र वरील १००% लोकसंख्येचा वृद्धीतील हिस्सा ६६% असून तो इतर गटापेक्षा सर्वोच्च असल्याचे दिसते. असमानतेची स्थिती रशियामध्ये फारच वेगळी असल्याचे दिसते. रशियामध्ये वरच्या १% लोकसंख्येचा वृद्धीतील हिस्सा सर्वोच्च ६९% असल्याचे दिसते. कॅनडा व अमेरिकेतील वरची १% लोकसंख्येचा वृद्धीदर हिस्सा ३५% आहे. जागतिक पातळीवर विचार केला असता १९८० ते २०१६ या कालावधीतील खालच्या ५०% लोकसंख्येचा हिस्सा १२% व वरच्या १% लोकसंख्येचा हिस्सा २७% असल्याचे दिसते. जागतिक असमानता सातत्याने वाढत असल्याचे दिसते. एकूण ९०% लोकसंख्येचा हिस्सा हा ४३% व वरच्या १०% लोकसंख्येचा हिस्सा हा ५७% असल्याचे दिसते. १९८० ते २०१६ या काळामधील सार्वजनिक क्षेत्रातील खाजगी क्षेत्राकडे संपत्तीचे हस्तांतरण फार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते.


**कुझनेट वक्र (Kuznet Curve) :**

जगातील अर्थतज्ञामध्ये आर्थिक विकास व विषमता याबद्दल अनेक मतमत्तांतर आहेत. काही विचारवंत आर्थिक विकास होत असताना उत्पन्न विषमता वाढते असे म्हणतात. तर काही विचारवंत उत्पन्न विषमता कमी होते असे म्हणतात. प्रा. कुझनेट यांनी सर्वप्रथम अनुभवजन्य पुराव्याच्या आधारे या समस्येचा अभ्यास केला. त्यांच्या मते विकासाच्या आरंभिक अवस्थेत तुलनात्मक उत्पन्न असमानता वाढते. त्यानंतर काही काळात ती स्थिर राहते व नंतर कमी होते हे त्यांनी उलट्या U आकाराच्या वक्राने दर्शविलेले आहे.

कुझनेट यांनी गिनी सहसंबंध विचारात घेतला आहे. त्यांनी आर्थिक विकासासोबत विषमता सुरूवातीस


वाढते व नंतर कमी होते ही गिनी सहसंबंधाद्वारे दर्शविली आहे.

**आकृती क्र. ४**




वरील आकृतीमध्ये OX अक्षावर दरडोई उत्पन्न व OY अक्षावर गिनी सहसंबंधाचे मापन केलेले आहे. OK हा वक्र उलट्या आकाराचा Uअसून तो सुरूवातीला असमानता दर्शवितो व ती वाढत जाते. विशिष्ट पातळीनंतर ती कमी होत जाते. असमानतेचा संबंध हा दरडोई उत्पन्नाशी असतो. हा विकसित देशापेक्षा विकसनशील देशामध्ये असमानता मोठ्या प्रमाणावर आढळून येते. गिनी सहसंबंध हे असमानता मोजण्याचे चांगले साधन समजले जाते. हे सहसंबंध ० ते १ या दरम्यान असते. ० च्या ठिकाणी पूर्ण समानता तर १ च्या ठिकाणी पूर्ण असमानता असते. सहसंबंधाचे मूल्य जेवढे अधिक तेवढी असमानता जास्त असते.

**आकृती क्र. ५**



वरील आकृतीमध्ये गिनी सहसंबंध याचे मापन केलेले आहे. यामध्ये A/A+B किंवा A/Δ ODD हे प्रमाण मोजमाप केलेले आहे. हे प्रमाण जेवढे जास्त असेल तेवढे उत्पन्नाचे असमानता जास्त असते. लॉरेन्झ वक्र हा जेवढा ४५° अंश रेषेचा खाली तेवढी असमानता जास्त असते. A या आरेखीत भागातील लॉरेन्झ वक्र हा OCD या त्रिकोणाच्या ३७% भाग आहे व तो विकसित देशातील असमानता दर्शवितो व B या भागातील लॉरेन्झ वक्र हा OCD या त्रिकोणाच्या ४४% भाग व्यापतो व ते विकसनशील देशातील असमानता दर्शवितो.

कुझनेट यांनी १९५५ मध्ये केलेल्या अभ्यासात खालील आकडेवारीच्या साह्याने विश्लेषण केलेले आहे.

**कोष्टक क्र. ३.२**

**१९५० च्या दरम्यानची विविध देशातील तुलनात्मक उत्पन्न असमानता :**

| अ.क्र. | देश | उत्पन्न हिस्सा % | | प्रमाण = श्रीमंत २०% / गरीब ६०% | |
|---|---|---|---|---|---|
| | | गरीब ६०% | श्रीमंत २०% | | |
| १) | भारत १९४९-५० | २८ | ६६ | १.९६ | अल्पविकसित |
| २) | सिलोन १९५० | ३० | ५० | १.६७ | देश |
| ३) | पिरोटो-रिको १९५० | २४ | ५६ | २.३३ | |
| ४) | इंग्लंड १९५० | ३४ | ४४ | १.२९ | विकसित |
| ५) | अमेरिका १९४७ | ३६ | ४५ | १.२५ | देश |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की विकसनशील देशातील गरीब ६०% जनतेस ३०% पेक्षा कमी उत्पन्न मिळते. विकसीत देशातील ६०% जनतेस इंग्लंडमध्ये ३४% व अमेरिकेत ४५% उत्पन्न मिळते. विकसनशील देशातील श्रीमंत २०% जनतेने ५०% पेक्षा जास्त उत्पन्न मिळते व हेच प्रमाण विकसीत देशामध्ये ४५% एवढे आहे. याचे प्रमाण गुणोत्तर हे विकसनशील देशामध्ये भारत १.९६, सिलोन १.६७ व पिरोटो-रिको २.३३ एवढे असून इंग्लंडमध्ये ते १.२९ अमेरिकेमध्ये १.२५ एवढे आहे. विकसीत देशातील उत्पन्नाची असमानता कमी व अविकसीत विकसनशील देशामध्ये ते जास्त आहे.

वरील आधारावर आजच्या असमानतेचा विचार केला तर दक्षिण आफ्रीकेमध्ये विषमता जगातील सर्वात जास्त विषमता दिसते. विकसीत देशाचा विचार केला तर रशियामध्ये ही फार मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसून येते.

**१) विकासासोबत उत्पन्नातील विषमता वाढण्याची कारणे :**

a) अल्पविकसीत देशामध्ये भौगोलिक, सामाजिक वित्तीय व तांत्रिक द्वैतवाद असतो. जेव्हा देशातील कृषी क्षेत्रातून औद्योगिक क्षेत्रामध्ये समाज संघटीत होतो. तेव्हा उत्पन्न असमानता वाढते. संरचनात्मक बदलामुळे रोजगारसंधी वाढतात. संसाधनाचा वापर वाढतो व तंत्रज्ञानात सुधारणा होते. यातून दरडोई उत्पन्न वाढते. नागरी भागातील कामगार, व्यवस्थापन व उद्योगजकाचे उत्पन्न जास्त वेगाने वाढते. मात्र शेतीत काम करणाऱ्या कामगाराचे दरडोई उत्पादन घटते.

b) औद्योगिक क्षेत्रात भांडवल प्रधान तंत्राचा अवलंब केला जातो व शिक्षित, कौशल्याधारीत श्रमिकाचा रोजगार वाढतो. या क्षेत्रातील कामगाराचे उत्पन्न जास्त असते व उद्योजकाचा नफा जास्त असतो. ग्रामीण निर्वाह क्षेत्रापेक्षा औद्योगिक क्षेत्रात मोठा विकास होतो व असमानता वाढते.

c) ग्रामीण भागातून शहरामध्ये स्थलांतरीत कामगारांना मिळणाऱ्या रोजगार संधी या अकुशल कामगारांना चांगले वेतन मिळवून देत नाहीत. त्यामुळे असमानता वाढते.

d) शहरी भागामध्ये तांत्रिक विकास झाल्यामुळे वित्तीय सुविधा साखळी निर्माण होते व यातून नवीन उद्योजक वर्ग निर्माण होतो. यातून त्याचे उत्पन्न वेगाने वाढते.

e) वित्तीय संसाधन वाटणीत नागरी भागांना झुकते माप मिळते व यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मागासलेली राहते.

f) सरकारद्वारे जमीनसुधारणा प्रभावीपणे केल्या जात नाहीत व यातून जमीन मालकीचे केंद्रीकरण होते.

g) विकसनशील देशातील सरकारे आर्थिक दृष्टीने कमकुवत असल्यामुळे त्याची शिक्षण, आरोग्य इ. मधील गुंतवणूक कमी राहते व यातून असमानता पुन्हा वाढते.

वरील कारणामुळे अल्प विकसीत देशातील उत्पन्न असमानता कळते असे स्पष्ट होते.

**२) आर्थिक विकासासोबत उत्पन्न विषमता कमी होण्याची कारणे :**

कुझनेट यांच्या मते, देश आर्थिक विकासाच्या नंतरच्या उच्च अवस्थेत प्रवेश करतो तेव्हा उत्पन्नातील विषमता कमी कमी होत जाते. एक म्हणजे उच्च उत्पन्न गटातील लोकांचे दरडोई उत्पन्न घटते. कारण त्याचे मालमत्तेपासूनचे उत्पन्न घटते. दुसरे म्हणजे जेव्हा सरकार शिक्षण, आरोग्य सेवा, उत्पन्न कर, सामाजिक सुरक्षा, पूर्ण रोजगार व आर्थिक सवलत याबाबतीत कायदेशीर तरतूद करते तेव्हा खालच्या उत्पन्न गटातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढते.

A) जेव्हा विकास वाढतो तेव्हा औद्योगिक क्षेत्राचा एकत्रित विस्तार होतो. त्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ होते. यातून कृषी उत्पादनास मागणी वाढते व ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न वाढते. यास हर्षमन यांनी झिरवठा परिणाम, Trickling Down Effect असे म्हटले तर  यांनी मिर्डाल विस्तार परिणाम Spread Effect असे म्हटले.

B) मोंटेक सिंग अलुवालिया यांनी विकासाच्या दुसऱ्या किंवा नंतरच्या अवस्थेत उत्पन्न वितरणाला सुधारणा ही उत्पादन संरचनेतील बदल शिक्षण विस्तार व कौशल्यपूर्ण श्रमिकांची निर्मिती व लोकसंख्येचा घटता वृद्धीदर यामुळे होत असल्याचे नमूद केले आहे.

कुझनेट यांचे उलट्या U आकाराची परिणामकता हा अनुभवजन्य पुराव्यावर आधारीत असल्यामुळे नंतरच्याही अनेक अर्थतज्ञांनी त्यावर काम केलेले आहे. काव्हींस यांच्या विकसनशील व विकसीत देशांच्या अभ्यासावरूनही असेच दिसून येते. अडेलमन व मॉरीस यांनी ४३ विकसनशील व १३ विकसीत देशाचा अभ्यास केला. त्यामध्येही विकासाच्या सुरूवातीस असमानता वाढते व नंतरच्या काळात ती कमी होते असे दिसते. या विश्लेषणावर टिका करताना टिकाकार त्यांचे नमुने फार कमी असल्याची टिका करतात.


### ३.२.४ मानव विकास निर्देशांक व विकासाचे इतर निर्देशांक व जीवन दर्जा :

**(Human Development Index and other Indices it Developement and Quality of life)**

आर्थिक विकासाचे परंपरागत पद्धतीने मापन करत असताना स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) हा आधार घेतला जात असे. स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हे विकासाच्या मापण्याचा परिपूर्ण मापदंड मानला जात असे. अलिकडील काळामध्ये फक्त स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हे विकासाचे परिपूर्ण मापन नसल्याबद्दल अनेक विचार पुढे आले. त्यातूनच मानवी विकासाची निर्देशांकाची संकल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाद्वारे (UNDP) मांडण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९० मध्ये पहिला मानव विकास अहवाल प्रकाशीत केला. पाकिस्तानमधील अर्थतज्ञ मेहबुब-उल-हक यांनी १९९० मध्ये प्रथमत: मानवी विकास फक्त उत्पन्न आधारीत नसून लोककेंद्रीत असाव असा विचार मांडला. यामध्ये त्यांनी राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाकडून लोककेंद्रीत मोजमाप करण्याचा विचार मांडला. मानवी विकास अहवाल तयार करण्यासाठी मेहबुब-उल-हक यांनी विकास अर्थतज्ञांचा एक गट तयार केला. यामध्ये पॉल हरीटेन, फ्रान्सीस टिव्हर्ट, गुस्ताव रेनसी, केम गिफीन, सुधीर आनंद व मेघनाद देसाई यांचा त्यामध्ये समावेश होता. नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन यांनी मानवी क्षमतांवर अभ्यास करण्यासाठी हक्क याच्या अभ्यासाचा आधार घेतला. नंतरच्या काळात मानवी विकास निर्देशांकाप्रमाणे अनेक निर्देशांकाचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये अलीकडील काळातील Happyness Index आनंद निर्देशांक याचाही विचार करावा लागेल हे सर्व निर्देशांक मानवाच्या कल्याणा सभोवती फिरताना दिसतात. यामध्ये जास्तीत जास्त मानवी कल्याण मोजण्याचा विचार करण्यात आला व तसे मापनाचे अनेक निर्देशांक विकसित केले गेले.

**मानवी विकास निर्देशांक संकल्पना खालील प्रवाह तक्ता मधून चांगल्या पद्धतीने समजून घेता येईल.**

**मानवी विकास निर्देशांक**



मानवी विकासाचे मोजमाप करणे फार कठीण आहे. यामध्ये अनेक निर्देशांक काढावे लागतात. यामध्ये गुंतागुंत असते. जसा आर्थिक विकास स्थूल राष्ट्रीय उत्पादन व दरडोई उत्पन्नाच्या साह्याने मोजला जातो, तसा मानवी विकास वेगवेगळ्या दृष्टीकोनातून मोजला जातो. मानवी विकास मोजण्यासाठी विविध विकास निर्देशांकाचा विचार केला जातो. उत्पन्न निर्देशांक मानवी विकास निर्देशांक मोजण्यासाठी एक आधारभूत निर्देशक आहे.

**मानवी विकास निर्देशांकाची रचना : (Construction of Human Development Index)**

१) दीर्घायुष्य (longivity) दीर्घ व आरोग्यदायी जीवन

२) ज्ञान (knowledge) व

३) जीवनमान (चांगला राहणीमान दर्जा) (Decent standard of living)

मानवी विकास निर्देशांक तयार करत असताना वरील तीन निर्देशांक विचारात घेतले जातात.

मानव विकास निर्देशांक अधिक वास्तवदर्शी होण्यासाठी मानवाच्या जीवनाशी संबंधित वरील तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

दीर्घायुष्य हे आयुष्याच्या साह्याने मोजले जाते. ज्ञान हे शैक्षणिक कौशल्य किंवा प्रौढ साक्षर प्रमाण किंवा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व शिक्षणाचे प्रमाण याच्या साह्याने मोजले जाते. अलिकडील काळात उच्च शिक्षणाचा समावेश मोजमापात केल्याचे दिसते. जीवनमान दर्जा वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या साह्याने किंवा पैशातील खरेदी शक्ती क्षमता साह्याने मोजले जाते.

मानव विकास निर्देशांक तयार करताना प्रत्येक निर्देशांकाचे स्थिर, कमाल व किमान मूल्य हे निश्चित केले जाते.

१) सरासरी आर्युमान - २५ ते ८५ वर्षे

२) प्रौढ साक्षर प्रमाण - ० ते १०० टक्के

३) एकत्रित स्थूल नावनोंदणी दर - ० ते १०० टक्के

वास्तव स्थूल राष्ट्रीय दरडोई उत्पन्न - १०० डॉलर ते ४०००० डॉलर

मानवी विकास निर्देशांकामध्ये उत्पन्नाबरोबरच शिक्षण आणि आरोग्याचे मोजमाप केले जाते. मानव विकास निर्देशांकाचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आपणास पाहता येतील.

**१) मानव विकास निर्देशांक : (Human Development Index)**

१९९० पासून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) मानवी विकासाचे मोजमाप केले जाते व त्याचे प्रकाशन मानव विकास अहवालामध्ये केले जाते. जगातील विविध देशाचे मानव विकास निर्देशांक विचारात घेवून त्याचे मोजमाप केले जाते. मानव विकास अहवाल हा वार्षिक अहवाल असतो. या अहवालामध्ये तीन प्रमुख निर्देशांकाचे मापन केले जाते. आर्युमान प्रौढ साक्षर प्रमाण व साक्षरता व तसेच दरडोई उत्पन्न मानव विकास निर्देशांक व आर्युमान निर्देशांक शिक्षण निर्देशांक व दरडोई राष्ट्रीय उत्पन्न निर्देशांक यांची सरासरी असते.

ज्या देशामध्ये मानव विकास निर्देशांक मूल्य ०.५ पेक्षा कमी असते ते देश मानव विकासामध्ये कमी विकासाचे देश म्हणून ओळखले जातात. ज्या देशाचा मानव विकास निर्देशांक ०.५ ते ०.८ या दरम्यान आहे. त्यांना मध्यम देश व ज्याचे मूल्य ०.८ पेक्षा जास्त आहे. त्यांना उच्च मानव विकास देश म्हणून ओळखले जाते.

**कोष्टक क्र. ३.३ :**

**निवडक देशाचा मानव विकास निर्देशांक २०१९**

| HDI क्रम | देश | HDI मुल्य | जन्मावेळीचे आयुर्मान | सरासरी शालेय वर्षे | अपेक्षित शालेय वर्षे | दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (PPP$) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अति उच्च मानव विकास** | | | | | |
| १ | नॉर्वे | ०.९५४ | ८२.३ | १२.६ | १८.१ | ६८०५९ |
| २ | स्वित्झरलँड | ०.९४६ | ८३.६ | १३.४ | १६.२ | ५९३७५ |
| ३ | आर्यलंड | ०.९४२ | ८२.१ | १२.५ | १८.८ | ५५६६० |
| १५ | अमेरिका | ०.९२० | ७८.९ | १३.४ | १६.१ | ५६१४० |
| १९ | जपान | ०.९१५ | ८४.५ | १२.८ | १५.२ | ४०७९९ |
| | **उच्च मानव विकास** | | | | | |
| ६३ | सर्बिया | ०.७९९ | ७५.८ | ११.२ | १४.८ | १५२१८ |
| ६६ | मॉरिशस | ०.७९६ | ७४.९ | ९.४ | १५.० | २२७२४ |
| ७१ | श्रीलंका | ०.७८० | ७६.८ | ११.१ | १४.० | ११६११ |
| ७६ | मेक्सीको | ०.७६७ | ७५.० | ८.६ | १४.३ | १७६२८ |
| ७९ | ब्राझील | ०.७६१ | ७५.७ | ७.८ | १५.४ | १४०६८ |
| | **मध्यम मानव विकास** | | | | | |
| ११७ | व्हिएतनाम | ०.६९३ | ७५.३ | ८.२ | १२.७ | ६२२० |
| १२० | इराक | ०.६८९ | ७०.५ | ७.३ | ११.१ | १५३६५ |
| १२६ | गाटेमाळा | ०.६५१ | ७४.१ | ६.५ | १०.५ | ७३७८ |
| १२९ | भारत | ०.६४७ | ६९.४ | ६.५ | १२.३ | ६८२९ |
| १५२ | पाकिस्तान | ०.५६० | ६७.१ | ५.२ | ८.५ | ५१९० |
| | **निम्न मानव विकास** | | | | | |
| १५८ | नायजेरिया | ०.५३४ | ५४.३ | ६.५ | ९.७ | ५०८६ |
| १६६ | सेनेगल | ०.५१४ | ६७.७ | ३.१ | ९.० | ३२५६ |
| १७० | अफगाणिस्तान | ०.४९६ | ६४.५ | ३.९ | १०.१ | १७४६ |
| १८७ | चाद | ०.४०१ | ५४.० | २.४ | ७.५ | १७१६ |
| १८९ | नाइजर | ०.३७७ | ६२.० | २.० | ६.५ | ९१२ |

स्त्रोत : Human Development Report 2019 (UNDP)

**कोष्टक क्र. ३.४**

**लिंग विषयक विकास निर्देशांक (Gender Development Index)**

| देश | GDP चे मूल्य | HDI ची क्रमवारी |
|---|---|---|
| **अति उच्च मानव विकास** | | |
| नॉर्वे | ०.९९० | १ |
| स्वित्झरलँड | ०.९६३ | २ |
| अमेरिका | ०.९९१ | १५ |
| जपान | ०.९७६ | १९ |
| फ्रान्स | ०९८४ | २६ |
| **उच्च मानव विकास** | | |
| सर्बिया | ०.९७६ | ६३ |
| मॉरिशस | ०.९७४ | ६६ |
| मेक्सीको | ०.९५७ | ७६ |
| ब्राझील | ०.९९५ | ७९ |
| **मध्यम मानव विकास** | | |
| व्हिएतनाम | १.००३ | ११८ |
| इराण | ०.७८९ | १२० |
| भारत | ०.८२९ | १२९ |
| पाकिस्तान | ०.७४७ | १५२ |
| **निम्न मानव विकास** | | |
| नायजेरिया | ०.८६८ | १५८ |
| सुदान | ०.८३७ | १६८ |
| अफगाणिस्तान | ०.७२३ | १७० |
| चाद | ०.७९५ | १८८ |
| नाइजर | ०.२९८ | १८९ |

स्त्रोत : Human Development Report 2019 (UNDP)

लिंग विषयक विकास निर्देशांकामध्ये महिलांच्या मानव विकास निर्देशांकाचे पुरूषांच्या मानव विकास निर्देशांकाचे गुणोत्तर काढले जाते. यामध्ये महिलांचे दीर्घ व आरोग्यदायी जीवन, जीवनमान दर्जा व ज्ञान यांचे मापन केले जाते. मानव विकास निर्देशांकातील सर्वच मापक वापरले जातात व त्याची पुरूषाच्या निर्देशांकासोबत तुलना केली जाते.

लिंगविषयक मानव विकासामध्ये भारत हा मध्यम विकसीत देशामध्ये मोडतो.

### ३) आनंद निर्देशांक : (Happyness Index)

मानव विकास निर्देशांक व लिंगविषयक विकास निर्देशांकानंतर आज नवीन आनंद निर्देशांक काढला जात आहे. युनायटेड नेशन्स च्या चिरंतन विकास उपाय जाळे यांच्यातर्फे प्रतिवर्षी प्रकाशित केला जातो. यामध्ये जागतिक देशातील लोकांच्या आनंदाने मोजमाप केले जाते. युनायटेड नेशन्स च्या सर्वसाधारण सभेमध्ये जुलै २०११ मध्ये प्रथमत: व्यक्तीच्या आनंदा बाबतीत विचार केला गेला. यानंतर पहिला World Happyness अहवाल १ एप्रिल २०१२ रोजी प्रकाशित झाला. या अहवालामध्ये जागतिक लोकांची आनंदाची स्थिती, आनंदाची व दु:खाची कारणे व धोरणे यांचा अभ्यास केला गेला. यामध्ये प्रातिनिधीक नमुने निवडून सर्वेक्षण केले जाते व त्याच्या समोर ० ते १० यामध्ये जीवन जगण्याबाबतीत प्रश्नावली तयार करून माहिती घेतली जाते. ० म्हणजे अत्यंत दु:खी जीवन व १० म्हणजे अत्यंत सुखी जीवन यामध्ये अर्थशास्त्र, मानसशास्त्र, सर्वेक्षण विश्लेषण, राष्ट्रीय सांख्यिकी व चांगले जीवनमान, या आधारे देशाची प्रगती मोजली जाते. त्याचबरोबर यामध्ये मानसिक आजार ही विचारात घेतले जातात. नैतिकतेचे महत्त्व धोरणाचा परिणाम इत्यादींचाही यामध्ये विचार केला जातो.

वरील सर्व बाबीवर आधारीत सर्वेक्षण करून जागतिक आनंद अहवाल (World Happyness Report) तयार केला जातो. यामध्ये (The Gallup World Roll Questionnaire) तयार केला जातो व त्यामध्ये खालील १४ बाबींचा समावेश असतो. १) व्यवसाय व अर्थशास्त्र २) नागरीक सहभाग ३) दळणवळण व तंत्रज्ञान ४) सामाजिक बाबतीत विभेदता ५) शिक्षण व कुटुंब ६) भावना ७) पर्यावरण व उर्जा ८) अन्न व निवारा ९) सरकार व राजकारण १०) कायदा व सुव्यवस्था, सुरक्षितता ११) आरोग्य १२) धर्म व नैतिकता १३) वाहतूक १४) काम

**कोष्टक क्र. ३.४ : निवडक देशांचा आनंदी निर्देशांकाचा क्रम –२०१९**

| देश | (Happyness Score) आनंदाचा प्राप्तांक | (Rank) श्रेणी |
|---|---|---|
| फिनलंड | ७.७६९ | १ |
| डेन्मार्क | ७.६०० | २ |
| नॉर्वे | ७.५५४ | ३ |
| कॅनडा | ७.२७८ | ९ |
| ऑस्ट्रेलिया | ७.२२८ | ११ |
| जर्मनी | ९.६८५ | १७ |
| अमेरिका | ६.८९२ | १९ |
| ब्राझील | ६.३०० | ३२ |
| जपान | ५.८८६ | ५८ |
| पाकिस्तान | ५.६५३ | ६७ |
| इंडोनेशिया | ५.१९२ | ९२ |
| भारत | ४.०१५ | १४० |
| साऊथ सुदान | २.८५३ | १५६ |

स्त्रोत : World Happiness Report 2019

आनंद निर्देशांकामध्ये भारताचा क्रम फारच खालच्या पातळीवर असल्याचे दिसते. भारतात फार मोठ्या प्रमाणावर दारिद्रय आहे. उपासमार, अनारोग्य, वैद्यकीय सुविधांचा अभाव, शिक्षण विषयक सुविधांचा अभाव व वाढता भ्रष्टाचार इ. कारणे असल्याचे दिसते.

**जीवन दर्जा (Quality of Life) :**

मॉरीस डी मॉरीस या अर्थतज्ञांनी जीवनाचा भौतिक दर्जा (Physical Quality of life Index) १९७९ मध्ये २३ विकसनशील देशांचा अभ्यास करून तयार केला. यामध्ये त्यांनी तुलनात्मक अभ्यास केला. यामध्ये त्यांनी तीन निर्देशांकाचा वापर केला. १) अर्भक मृत्यू दर २) पहिल्या वर्षीची आर्युमान व ३) १५ वर्षाची साक्षरता यामध्ये त्यांनी आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, पोषण व स्वच्छता या बाबींचा आधार घेतला.

प्रत्येक निर्देशांक ० ते १०० या प्रमाणात मोजले ० म्हणजे अतिशय वाईट स्थिती व १०० म्हणजे चांगली स्थिती. या तिन्ही निर्देशांकाची सरासरी म्हणजे जीवन निर्देशांकाची भौतिक गुणवत्ता (PQLI) होय. यामध्ये उत्पन्नापेक्षा किती लोकांना त्याचे लाभ मिळतात याचा विचार केला.

**कोष्टक क्र. ३.५**

**स्थुल राष्ट्रीय उत्पादन (दरडोई) वृद्धीदर व नविन निर्देशकाची भौतिक गुणवत्ता** (PQLI)

| देश | जीवन निर्देशनाची भौतिक गुणवत्ता | | | दरडोई सरासरी स्थूल राष्ट्रीय उत्पादन वृध्दी दर |
|---|---|---|---|---|
| | १९५० | १९६० | १९७० | |
| भारत | १४ | ३० | ४० | १.८ |
| श्रीलंका | ६५ | ७५ | ८० | १.९ |
| इटली | ८० | ८७ | ९२ | ५.० |
| अमेरिका | ८९ | ९१ | ९३ | २.४ |

स्त्रोत : **The Economics of Development and Planning**
**33rd Revised Edition M.L.J Jhingon - 1997**

वरील कोष्टकाच्या साह्याने मॉरीस डी मॉरीस यांनी भारतातील जीवन निर्देशांकाची भौतिक गुणवत्ता इतर देशाशी तुलना केलेली आहे. चार देशापैकी सर्वात कमी वृद्धीदर हा भारताचा असून भारताने १९५० ते १९७० या २० वर्षामध्ये सुधारणा केली. मात्र ती समाधानकारक नाही. भारतासारखा वृद्धीदर असलेली श्रीलंका या देशाची स्थिती फार चांगली असल्याचे त्यांना आढळून आले. इटली या देशाचा वृद्धीदर सर्वोच्च असूनही अमेरिकेतील भौतिक दर्जा निम्याने कमी वृद्धीदर असूनही चांगला असल्याचे आढळून आले. मॉरीस यांच्या मते राष्ट्रीय उत्पन्न व जीवन निर्देशांकाचा भौतिक दर्जा यामध्ये आपोआप संबंध नसतो. त्यांच्या मते सामाजिक संबंध, पोषण स्थिती, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, कौटुंबिक वातावरण यामधुनच समाजाचा जीवन निर्देशांकाचा

भौतिक दर्जा निश्चित होतो. जीवन निर्देशांकाचा भौतिक दर्जा सुधारण्यासाठी चांगली संस्थात्मक रचना आवश्यक असते.

वरीलप्रमाणे मानव विकास निर्देशांकाचे विविध प्रकार सविस्तरपणे अभ्यासता येतील.

## मानवी विकास निर्देशांक Human development index (HDI)

**प्रास्ताविक:–**

मानव विकास निर्देशांकाची मूळ संकल्पना भारतीय अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन आणि पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ मेहबूब उल हक यांनी ही संकल्पना मांडली म्हणून मानवी विकास निर्देशांकाचे जनक म्हणून या अर्थशास्त्रज्ञचा उल्लेख केला जातो यांचा आधार घेऊन UNDP ने १९९० मध्ये पहिल्यांदाच जागतिक मानवी विकास निर्देशांक अहवाल जाहीर केला यामध्ये विविध देशाचे मानवी विकास निर्देशांक मोजण्यात आले होते.

२०१० मध्ये मानव विकास निर्देशांक ज्या घटकावरून काढला जातो त्यात बदल करण्यात आला त्यानुसार मानवी विकास निर्देशांक पुढील तीन आयाम व त्यांच्याशी संबंधित चार निर्देशके यावरून काढला जातो.

**१. दीर्घ व आरोग्यमय जीवन:–** देशाचा आरोग्याचा विस्तार मोजण्यासाठी जन्माच्या वेळचे आयुर्मान हा निर्देशांक मोजला जातो किंवा वापरला जातो.

**२. ज्ञान किंवा शिक्षण:–** देशाचा शैक्षणिक स्तर मोजण्यासाठी पुढील दोन निर्देशांक वापरले जातात

१. २५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या प्रोडांची सरासरी शालेय वर्ष.

२. अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांची अपेक्षित शालेय वर्ष. शिक्षणाचा निर्देशांक या दोन्ही निर्देशांकांचा गणिती मध्ये असतो

**३. चांगले जीवनमान:–** देशाच्या जीवन मनाचा दर्जा मोजण्यासाठी दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हा निर्देशांक वापरला जातो प्रथम वरील चार निर्देशांकासाठी किमान व कमाल मूल्य ठरवली जातात त्यांना गोल पोस्ट पोस्ट असे म्हणतात. प्रत्येक देश हा मूल्यांच्या दरम्यान कोठे आहे यानुसार त्या देशाचे वरील चार निदेशांक काढले जातात प्रत्येक निर्देशांक काढण्यासाठी पुढील सूत्र वापरले जाते

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{महत्तम मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

या चार निर्देशांकांच्या भूमितीय सरासरी वरून देशाचा मानवी विकास निर्देशांक ठरवला जातो त्यांची मूल्य शून्य ते एक दरम्यान व्यक्त केले जाते त्यानुसार देशाची पुढील गट केले जातात.

१. निम्न मानवी विकास देश एचडीआय शून्य ते ०.५५० या दरम्यान असतो.

२. मध्यम मानवी विकास देश एचडीआय ०.५५० ते ०.६९९ दरम्यान असतो.

३. उच्च मानवी विकास देश ०.७०० ते ०.७९९ दरम्यान असतो.

४. अतिउच्च मानवी विकास देश एचडीआय ०.८०० पेक्षा जास्त असतो.

२०२१-२०२२ मानव विकास निर्देशांक (HDI) अहवाल हा संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे जारी करण्यात आले.

मानवी विकास निर्देशांक (HDI) मानवी विकासाच्या तीन मूलभूत परिमाणांमध्ये देशाची सरासरी उपलब्धी मोजतो - दीर्घ आणि निरोगी जीवन, शिक्षण आणि एक चांगले जीवनमान. मानवी विकास निर्देशांक चार निर्देशक वापरून काढला जातो - जन्माचे आयुर्मान, शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे, शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे आणि दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्न (GNI).

एचडीआय रँक ऑफ इंडिया २०२३ हा स्कोअर दक्षिण आशियाई क्षेत्राच्या ०.५०८ च्या सरासरी मूल्याच्या तुलनेत उल्लेखनीय सुधारणा आहे आणि जागतिक सरासरी ०.४६५ च्या जवळ आहे आणि भारत १९१ देशांपैकी १३२ क्रमांकावर आहे.

सर्वोच्च मानव विकास निर्देशांक (HDI) सह शीर्ष १० देशांची नावे २०२२

मानव विकास निर्देशांक रँक अहवाल खाली दिलेला आहे.

१. स्वित्झर्लंड - .९६२

२. नॉर्वे - .९६१

३. आइसलँड - .९५९

४. हाँगकाँग (चीन) - .९५२

५. ऑस्ट्रेलिया - .९५१

६. डेन्मार्क - .९४८

७. स्वीडन - .९४७

८. आयर्लंड - .९४५

९. जर्मनी - .९४२

१०. नेदरलँड - .९४१.

**मानव विकास निर्देशांक– भारतीय परिस्थिती:–**

२०२१ मानव विकास निर्देशांक (HDI) मध्ये १९१ देश आणि प्रदेशांमध्ये भारत १३२ व्या क्रमांकावर आहे. २०२० च्या अहवालात, १८९ देश आणि प्रदेशांमध्ये भारत १३१ व्या क्रमांकावर होता. देशाच्या मागील स्तरावरील कामगिरीत झालेली घसरण आयुर्मानात घट झाल्यामुळे होते.

**मानव विकास निर्देशांक– प्रमुख मुद्दे:–**

भारताचे नवीनतम एचडीआय मूल्य ०.६३३ हे देशाला मध्यम मानवी विकास श्रेणीमध्ये ठेवते, जे २०२० च्या अहवालातील ०.६४५ च्या मूल्यापेक्षा कमी आहे. अहवालात २०१९ मधील ०.६४५ वरून २०२१ मध्ये ०.६३३ पर्यंत एचडीआयमधील घसरणीचे श्रेय भारताचे आयुर्मान घटते – सर्वेक्षण कालावधीत ६९.७ वर्षांवरून ६७.२ वर्षे झाले.

भारताची शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे ११.९ वर्षे आहेत, २०२० अहवालात १२.२ वर्षांपेक्षा कमी आहे, जरी २०२० अहवालात शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे ६.५ वर्षांवरून ६.७ वर्षे वाढली आहेत.जरी भारताने लैंगिक विकास निर्देशांकात १३२ वे स्थान कायम ठेवले असले तरी, महिलांचे आयुर्मान २०२० च्या अहवालातील ७१ वर्षांवरून २०२१ च्या अहवालात ६८.८ वर्षांपर्यंत घसरले आहे.त्याच कालावधीत महिलांसाठी शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे १२.६ ते ११.९ वर्षांपर्यंत घसरली.भारताने बहु–आयामी दारिद्र्य निर्देशांक (एमपीआय) मध्ये ०.१२३ गुण मिळवले असून २७.९ टक्के हेडकाउंट गुणोत्तर आहे, ८.८ टक्के लोकसंख्या गंभीर बहुआयामी दारिद्र्याखाली आहे. गेल्या दशकभरात, भारताने बहुआयामी दारिद्र्यातून तब्बल २७१ दशलक्ष वर उचलले आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**मानव विकास निर्देशांक– आशियाई देश**

**मानव विकास निर्देशांक: २०२१ मधील शीर्ष आणि महत्त्वाचे देश**

| HDI rank | Country | HDI Value 2021 |
|---|---|---|
| **1** | **Switzerland** | **0.962** |
| **2** | **Norway** | **0.961** |
| **3** | **Iceland** | **0.959** |
| 4 | Hong Kong, China (SAR) | 0.952 |
| 5 | Australia | 0.951 |
| 6 | Denmark | 0.948 |
| 7 | Sweden | 0.947 |
| 8 | Ireland | 0.945 |

| | | |
|---|---|---|
| 9 | Germany | 0.942 |
| 10 | Netherlands | 0.941 |
| 18 | United Kingdom | 0.929 |
| 19 | Japan | 0.925 |
| **21** | **United States** | **0.921** |
| 79 | China | 0.768 |
| **132** | **India** | **0.633** |

**बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक** Multi Dimensional Poverty Index (MPI)

या निर्देशकांची सुरुवात २०१० मध्ये युएनडीपी आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ यांनी जुलै २०१० मध्ये केली. या निर्देशांकाने १९९७ पासून लागू करण्यात आलेल्या मानवी दारिद्र्य निर्देशांकाची (HPI) ची जागा घेतली. विकासाप्रमाणेच दारिद्र्य सुद्धा बहुआयामी असते हेडलाईन आकडे दारिद्र्याचा बहुआयामीपणा लपवून ठेवतात त्यामुळे या निर्देशांकाची रचना HDI तिन्ही निकषेच्या बाबतीत आढळणारी बहुवंचितता ओळखण्यासाठी करण्यात आले आहे हा निर्देशांक तीन आयाम व दहा निर्देशांकाच्या सहाय्याने काढला जातो.

१. आरोग्य (Health) :- याचा स्तर मोजण्यासाठी

  १. पोषण

  २. बाल मृत्यू प्रमाण हे निकष वापरले जातात

२. शिक्षण (Education) :- याचा स्तर मोजण्यासाठी

  १. शालेय शिक्षण

  २. बालक पटसंख्या यांचा आधार घेतला जातो

३. जीवनमान दर्जा (Living of standards):- याचा स्तर मोजण्यासाठी

  १. मालमत्ता

  २. वीज

  ३. पाणी

  ४. स्वच्छतागृह

  ५. स्वयंपाकाचे इंधन

६. जमीन. इत्यादी निकषांचा आधार घेतला जातो वरील आयाम व निर्देशांकांच्या साह्याने प्रथम बहुआयामी गरीब कुटुंबाची किंवा व्यक्तींची संख्या शोधली जाते त्यावरून दोन दारिद्र्य मापक काढले जातात दारिद्र्याची तीव्रता आणि गरीब व्यक्तीचे प्रमाण या दोन्ही मापकांचा गुणाकार करून बहुआयामी दारिद्र्य निदेशांक काढला जातो.

बहुआयामी दारिद्र्यात राहणारे अंदाजे लोक २३ कोटी आहेत, भारत बहुआयामी गरीबी निर्देशांक २०२२ मध्ये प्रथम क्रमांकावर आहे. भारत देशाने भारतातील बहुआयामी गरीबांमध्ये २०१५-१६ मधील २४.८५% वरून २०१९-२०२१ मध्ये १४.९६% पर्यंत ९.८९ टक्के गुणांची लक्षणीय घट नोंदवली आहे.

**३.३ सारांश :**

विकसनशील व अविकसीत देशांसमोर बेरोजगारी व दारिद्र्य ही फार मोठी समस्या आहे. गुंतवणूकीचा वेग वाढवून बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न अनेक सरकारकडून केला जात आहे. विकसनशील देशामध्ये श्रमिकांचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात श्रमिक सामावून घेण्याची क्षमता नसते. बरेचशे श्रमिक रोजगारीच्या शोधात शहराकडे स्थलांतरीत होताना दिसतात. विकसनशील देशापुढे आर्थिक विकासाचा वेग वाढवून रोजगार निर्माण करण्यासाठी कोणत्या उत्पादन तंत्राचा अवलंब केल्यास जास्त लाभ घेतील याचा विचार केला जातो. भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केला तर मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी होते व श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केला तर विकासाचा दर कमी राहून दारिद्र्य व गरीबी कमी करण्यात यश येत नाही. यासाठी विकसनशील देशांनी मध्यममार्गी तंत्राची निवड करणे संयुक्तीक ठरते. देशास अनुकूल असे तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक व उपयोगी ठरते. विकसनशील देशातील व्यापार शर्ती सातत्याने उद्योगास अनुकूल असल्याचे दिसून येतात. जागतिक पातळीवर पाहिले असता त्या विकसीत देशास जास्त अनुकूल असल्याच्या दिसतात. आर्थिक विकास जास्त असताना उत्पन्नातील असमानता जगातील सर्वच देशामध्ये वाढत असल्याचे दिसून येते. वरील १०% लोकांकडे ५०% पेक्षा जास्त संचयाचे केंद्रीकरण होत असल्याचे दिसते. अलिकडील काळामध्ये समावेशक वृद्धी (Inclusive Growth) ही नवीन संकल्पना उदयास आलेली असली तरी विकास वाढत असताना असमानता वाढत आहे. यामागचे प्रमुख कारण हे सार्वजनिक क्षेत्रातून खाजगी क्षेत्राकडे उत्पादन साधनांचे स्थलांतर होत असल्याचे म्हणता येईल. कुझनेट यांनी यावरील विश्लेषण असमानता दर्शविते. आर्थिक विकास होत असताना मानवाची किती प्रगती झाली हा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे. आर्थिक वृद्धीमध्ये फक्त काही लोकांचेच उत्पन्न वाढताना दिसून येते. विकासाचे लाभ देशातील सर्वच लोकांना मिळत नसतील तर त्याचा विपरीत परिणाम मानव विकासावर होतो. अलिकडील काळामध्ये उत्पादन संस्थांना मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून अनेक लाभ प्राप्त होत असताना पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. मानव विकास निर्देशांकाद्वारे अनेक निर्देशांकाच्या साह्याने मानव विकासाचे मापन केले जाते. विकासाचा मुख्य उद्देश हा मानवाचे कल्याण साधने हा असतो. मानव विकास निर्देशांकाद्वारे जगातील अनेक देशामध्ये तो वेगवेगळ्या पातळीवर असल्याचे दिसते. जीवनमान दर्जा ज्यामध्ये हे विकासाचे प्रमुख उद्दिष्ट्य असले पाहिजेत. वरील प्रमाणे आर्थिक विकास व वृद्धीदर अनेक

सामाजिक व क्षेत्रिय घटकांचा परिणाम होत असल्याचे आपणास मान्य करावे लागेल.

**३.४ पारिभाषिक शब्द :**

**१) श्रमप्रधान उत्पादन तंत्र –** ज्या उत्पादन तंत्रामध्ये श्रमिकांच्या जास्तीच्या मात्रा व भांडवलाच्या कमी मात्रा वापरल्या जातात, त्यास श्रमप्रधान उत्पादन तंत्र म्हटले जाते.

**२) बेरोजगारी –** एखाद्या व्यक्तीकडे शैक्षणिक, शारिरीक क्षमता असून त्याची काम करण्याची तयारी आहे. मात्र त्यास काम मिळत नसेल तर बेरोजगार म्हटले जाते.

**३) खरेदीशक्ती –** वस्तू व सेवा खरेदी करण्याची क्षमता म्हणजे खरेदीशक्ती होय.

**४) सामाजिक निर्देशांक –** आरोग्य, शिक्षण, अन्न, साक्षरता, तंत्रशिक्षण, रोजगार स्थिती, मुलभूत गरजांचा उपभोग, खेळ, मनोरंजन, चांगले निवास व सामाजिक सुरक्षितता इ. चे मोजमाप ज्यामध्ये केले जाते त्यास सामाजिक निर्देशांक म्हणतात.

**५) मानव विकास निर्देशांक –** मानवाच्या विकासाच्या अनेक पैलूचा अभ्यास करून जो निर्देशांक तयार केला जातो तो मानव विकास निर्देशांक म्हणून ओळखला जातो.

**३.५ स्वयंअध्ययन प्रश्न :**

१) मानव विकास निर्देशांकामध्ये ------ चा अभ्यास केला जातो.

अ) आर्युमान ब) ज्ञान क) जीवनमान दर्जा ड) वरील सर्व

२) राष्ट्रीय उत्पन्न मापनांमध्ये ------ बाबींचा समावेश होतो.

अ) दरडोई वास्तव उत्पत्ती ब) आर्थिक कल्याण क) सामाजिक निर्देशांक ड) वरील सर्व

३) मानव विकास निर्देशांकाच्या क्रमवारीमध्ये भारत ------ गटात मोडतो.

अ) उच्च मानव विकास गट ब) अतिउच्च मानव विकास गट

क) मध्यम मानव विकास गट ड) निम्न मानव विकास गट

४) श्रीलंका हा देश जागतिक मानव विकास निर्देशांकाच्या क्रमवारीमध्ये ------ गटामध्ये मोडतो.

अ) उच्च मानव विकास गट ब) अतिउच्च मानव विकास गट

क) मध्यम मानव विकास गट ड) निम्न मानव विकास गट

५) २०१९ च्या जागतिक मानव विकास अहवालानुसार जगातील सर्वोच्च मानव विकास निर्देशांकाचे देश म्हणून ------ देशास ओळखले जाते.

अ) अमेरिका ब) जपान क) नॉर्वे ड) स्वित्झर्लँड

६) पहिला मानव विकास अहवाल ------ साली प्रकाशित झाला.

अ) १९९१ ब) १९९० क) १९९७ ड) १९९८

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) ड २) ड ३) क ४) अ ५) क ६) ब

**३.६ सरावासाठी प्रश्न :**

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) उत्पादन तंत्र म्हणजे काय? भारत देशाच्या आर्थिक विकास वृद्धीसाठी कोणते उत्पादन तंत्र जास्त उपयोगी आहे. तुमचे मत स्पष्टीकरणात मांडा.

२) आर्थिक विकासाचे तंतोतंत मापन करण्यासाठी मानव विकास निर्देशांक संरचना सर्वसमावेशक असल्याचे स्पष्ट करा.

३) आर्थिक विकास मापनाचे विविध घटक सांगून विकासातील अंतर स्पष्ट करा.

**टीपा लिहा :**

१) भांडवल प्रधान उत्पादन तंत्र

२) शेती व उद्योगातील व्यापार शर्ती

३) विकासातील अंतर

४) कुझनेट वक्र

५) मानव विकास निर्देशांकाचे घटक

६) जीवन दर्जा

७) आनंद निर्देशांक

८) विकसित व विकसनशील देशातील असमानता तंत्र

**३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची**


1) Jhingan M. L. (1997) The Economics of Development and Planning Vrinda Publication (P) Ltd., Delhi.

2) वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र (२०१५) दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३) भोसले, काटे (१९९८) विकासाचे अर्थशास्त्र व नियोजन फडके प्रकाशन, कोल्हापूर.

4) Jhingan M.L. (1997) International Economics, Vrinda Publication (P) Ltd., Delhi.

5) Kindleberger C.P. (1997) Economic Development, Mchraw Hill, New York.

6) Surajit D. (2002), The Debate on Agriculture, Industry Terms of Trade in India, Working Paper No. 109, Centre for Development Economics, Delhi School of Economics. Retrive from ww.cdedse.org. on 2nd May, 2020.

7) Global trends in relative and absolute income inequalities, Retrived on 2nd May 2020 from www.scielo.org.w/scielo.pnp & script = Sci - affect & pid - 1657 42062016 000 100003.

8) World inequality Report (2018), The World inequality Lab. Berlin.

9) Human Development Report, 2019 Beyond Income beyond average, beyond today, UNDP, New York.

10) John F, Richard L & Jeffery S. (2019) World Happyness Report Ernestol Foundation for Research Support.

***

# घटक – ४
# स्थूल आर्थिक धोरणे आणि विकास


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ विकसनशिल देशातील मौद्रिक व राजकोषीय धोरणाची भूमिका

४.२.२ सर्वसमावेशक वृद्धी, वाशिंग्टन एकमत सर्वानूमती करार विकेंद्रीकरण व सूक्ष्म पातळी नियोजन

४.२.३ उदारीकरणानंतरच्या भारतीय विकास कामगिरीचा आढावा.

४.२.४ समकालीन विकासविषयक समस्या.

४.३ समारोप

४.४ स्वयंअध्ययन प्रश्न

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ संदर्भ ग्रंथ


**४.० उद्दिष्ट्ये :**

१) विकसनशिल देशातील राजकोषीय धोरणाची उद्दिष्ट्ये समजून घेणे.

२) विकसनशील देशातील मौद्रिक धोरणाची उद्दिष्ट्ये समजून घेणे.

३) समावेशक वृद्धी संकल्पना व गरज यांचा अभ्यास करणे.

४) विकसनशील देशातील विकासामधील वाशिंग्टन एकमत कराराचे महत्त्व काय ते पाहणे.

५) विकेंद्रीकरणाची गरज समजून घेणे व फायदे-तोटे विचारात घेणे.

६) सूक्ष्म पातळी नियोजन संकल्पना समजून घेणे.

७) उदारीकरणानंतरच्या भारतीय विकास कामगिरीचा आढावा घेणे.

८) समकालीन विकास विषयक समस्या जाणून घेणे.

## ४.१ प्रास्ताविक :

अलिकडील काळात राजकोषीय व मौद्रिक धोरणास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक विकासासाठी व आर्थिक स्थैर्यासाठी, करपद्धती, सार्वजनिक कर्जे, सार्वजनिक खर्च इ. स विकासाचे साधन म्हणून वापरले जात आहे. तुटीचा अर्थभरणा हे सरकारच्या हातातील एक महत्त्वाचे आर्थिक साधन बनले आहे. मौद्रीक धोरणामध्ये सरकारच्या पैशाच्या मागणी व पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या धोरणांचा समावेश होतो. उदा. व्याजदर इ. आर्थिक विकासावर सरकारच्या राजकोषीय व मौद्रीक ध्येयधोरणाचा परिणाम होताना दिसून येतो.

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच भारतामध्ये दारिद्र्य निर्मूलन व प्रादेशिक असमतोल कमी करण्यावर भर देण्यात आला. नियोजित मार्गाने विकास साध्य करण्याचे निश्चित केले व १९५१ पासून नियोजनास सुरूवात केली. विविध पंचवार्षिक योजनामध्ये विविध प्रतिमाने वापरण्यात आली. प्रा. हेरॉड डोमर, प्रा. महालनोबीस इ. नी नियोजनाचा पाया बसविण्यास मदत केली. नंतरच्या पंचवार्षिक योजनेमध्ये अर्थव्यवस्थेचे विविध क्षेत्रामध्ये विभाजन केले व क्षेत्रनिहाय उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. पंचवार्षिक योजना काळामध्ये भारताचा आर्थिक वृद्धीदर हा २.३% पासून ७% पर्यंत वाढत गेला. हा वृद्धीदर गाठल्यानंतर भारत हा जगामध्ये महासत्ता म्हणून उदयास येईल, असे भाकितही केले जाऊ लागले.

स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षामध्ये जरी विकासदर वाढला असला तरी अपेक्षित दराने दारिद्र्य कमी करणे शक्य झाले नाही. विकासासोबत उत्पन्न विषमता कमी झाली पाहिजे मात्र ती वाढत असताना दिसते. अनेक पंचवार्षिक योजनामध्ये दारिद्र्य निर्मूलन हे प्रमुख उद्दिष्ट असून ते अजूनही अपेक्षित प्रमाणात साध्य करता आले नाही. दारिद्र्य, बेरोजगारी, विकासातील प्रादेशिक असमतोल, उपासमार, उच्च अर्भक मृत्यूदर, गुन्हेगारी, झोपडपट्टी वाढ इ. अनेक समस्या भारतीय अर्थव्यवस्थेसमोर उभ्या आहेत. विकासाचे लाभ समाजातील सर्वच घटकांना मिळत नसल्याचे दिसून आल्यामुळे अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समावेशक वृद्धी (Inclusive growth) हे उद्दिष्ट ठेवण्यात आले व तेच पुन्हा बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये मांडण्यात आले. यातून सत्तेच्या विकेंद्रिकरणाची गरजही लक्षात आली. भारत हा देश विविधतेनी नटलेला असल्यामुळे विकास करत असताना स्थानिक बाबी विचारात घेण्यात याव्यात हा विचारही पुढे आला.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ विकसनशील देशातील मौद्रिक व राजकोषीय धोरणाची भूमिका :

**मौद्रीय धोरण :**

मौद्रीक धोरण म्हणजे असे धोरण की, देशातील मौद्रीक संस्थेने मौद्रीक बाबीविषयी अवलंबिलेले असते ते धोरण १) मौद्रीक संस्थाचे नियंत्रण, २) देशातील पैसा परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी मौद्रीक संस्थेकडे पतपैशाची क्रियाशील खरेदी व विक्री, ३) विशिष्ट व्याज दर संरचना साध्य करण्यासाठी केलेली पतपैशाची खरेदी व विक्री इत्यादीसंबंधी असते. विकसनशील देशामध्ये मौद्रीक संस्थेची भूमिका महत्त्वाची असते. ज्यामध्ये उपलब्ध पतपुरवठा खर्चास प्रभावित करून आर्थिक विकास साधला जातो. त्याचबरोबर

भाववाढ नियंत्रण व व्यवहारातील संतुलन साधले जाते. वाढता व्यापार, वाढती लोकसंख्या व विस्तारीत मौद्रीक क्षेत्र यांची जुळवणी मौद्रीक धोरणाद्वारे लवचिक पतपुरवठा करून केली जाते.

**मौद्रीक धोरणाची मुख्य उद्दिष्ट्ये :**

डॉ. जे. डी. सेठी यांच्यामते, मौद्रीक धोरण खालील उद्दिष्टांच्यासाठी कार्य करते.

१) संयुक्तीक व्याजदर संरचना आमलात आणणे.

२) पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा यामध्ये पूर्ण संतुलन साध्य करणे.

३) वाढत्या अर्थव्यवस्थेस सुव्यवस्थित वित्तीय सुविधा पुरविणे.

४) पूर्वनियोजित गुंतवणूकीस पतपुरवठा करणे.

५) वित्तीय संस्थाची निर्मिती, विस्तार व कार्यभार पाहणे.

६) कर्ज व्यवस्थापन करणे.

विकसनशील देशामध्ये मौद्रीक धोरणाचे ध्येय हे पैसा व पतव्यवस्था सुधारणे हे असते. विकसनशील देशामध्ये वित्तपुरवठा संस्था या मोठ्या शहरामध्येच केंद्रीत झालेल्या असतात. मात्र विकासासाठी ग्रामीण भागामध्येही वित्तपुरवठा संस्थांची निर्मिती करणे आवश्यक असते. वित्तपुरवठा शेतकरी, लहान-उद्योगधंदे व विक्रेते यांच्यापर्यंत पोहचविणे आवश्यक असते. यासाठी मजबूत व अधिकारयुक्त मध्यवर्ती बँक ही आवश्यक असते. विकसनशील देशामध्ये व्यापारी बँका या अल्पकालीन कर्जपुरवठा करतात. ग्रामीण भागातील जनतेला वित्तपुरवठ्यासाठी असंस्थात्मक म्हणजे सावकारी कर्जावर अवलंबून रहावे लागते. विकसनशील देशमधील हुंडीबाजारही प्रस्थापित झालेला नसतो. ग्रामीण भागतील सावकारी उच्च व्याजदराच्या वित्तपुरवठ्यास लगाम घालने फक्त संस्थात्मक वित्तपुरवठ्याची सुविधा करूनच शक्य होते. वित्तीय सहकारी संस्थांच्या कार्यक्षम कार्याने हे शक्य होते. देशांतील मध्यवर्ती बँक मोठ्या व लहान उद्योगास कर्जपुरवठा करण्यासाठी औद्योगिक बँक व वित्तीय महामंडळे स्थापन करून मदत करू शकते. देशातील मध्यवर्ती बँक ही व्यापारी बँकांना मौद्रीक धोरणाच्या साह्याने निमंत्रित करते.

विकसनशील देशामध्ये व्याजदर संरचना ही उच्च पातळीवर असते. दीर्घकालीन कर्जे व अल्पकालीन कर्जे यावरील व्याजदरामध्येही मोठे अंतर असते. विकसनशील देशामध्ये जास्तीचे व्याजदर हे खाजगी व सार्वजनिक गुंतवणूकीमध्ये अडथळे ठरतात. शेती व उद्योगामध्ये कमी व्याजदाराने खाजगी गुंतवणूक वाढू शकते. विकसनशील देशातील व्यवसाय संस्थांचा अर्जित नफाही कमी असतो व प्रामुख्याने ते बँकांच्या कर्जपुरवठ्यावर अवलंबून असतात. व्याजदर कमी असतील तर जास्त प्रमाणात कर्जे घेतली जातात. सार्वजनिक गुंतवणूक वाढविण्यासाठी कमी व्याजदर असणे आवश्यक असते. कमी व्याजदर धोरण म्हणजे स्वस्त पैसा धोरण. यामुळे सार्वजनिक कर्जे स्वस्त होतात. सार्वजनिक कर्जाचे व्याज कमी झाल्यामुळे कर्जफेडीचे व्याज कमी व यातून आर्थिक विकासासाठी जास्त कर्जपुरवठा केला जातो. कमी व्याजदरामुळे खाजगी विदेशी गुंतवणूक वाढते. मात्र कमी व्याजदरामुळे बचतीचा विपरीत परिणाम होतो. विकसनशील देशामध्ये मध्यवर्ती बँकेस विभेदात्मक

(discriminatory) व्याजदर अवलंबावे लागतात. अनावश्यक व अनुत्पादक कर्जांना जास्त व्याजदर व उत्पादक कर्जांना कमी व्याजदर. विकसनशील देशामध्ये विकास घडून येत असताना किंमतवाढ ही होते. यातून पैशाचे मूल्य कमी होते व बचत प्रवृत्ती कमी होते. स्वस्त पैसा धोरण असताना ते भौतिक नियंत्रणासोबत असणे आवश्यक असते. कमी व्याजदर धोरण ठेवण्यासाठी स्थिर किंमत पातळी असणे आवश्यक असते.

विकसनशील देशामध्ये कर्ज व्यवस्थापन हे मौद्रीक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असते. कर्ज व्यवस्थापनाचे ध्येय हे सरकारी रोखे चालू करण्याची योग्य वेळ, त्यांची किंमत स्थिरीकरण व सार्वजनिक कर्जाचा खर्च कमी करणे असते. देशातील मध्यवर्ती बँक सरकारी रोख्यांची (Government bonds) खरेदी व विक्री करते. सरकारी रोख्याचा बाजार मजबूत व स्थिर करण्यासाठी कमी व्याजदर असणे आवश्यक असते. कमी व्याजदर असताना सरकारी रोख्याची किंमत वाढते. यामुळे ते जास्त आकर्षित बनतात व लोक ते खरेदी करतात. डॉ. सेठी यांच्यामते, बाजारात व्याजदर हे स्वतंत्रपणे व उपयुक्त भूमिका बजावतात. त्यामुळे अशा बाजारात सरकारने प्रतिभूतीची संख्या व विविध प्रकारच्या प्रतिभूती वाढविणे आवश्यक असते. मध्यवर्ती बँकेने या प्रतिभूतिची मागणी निर्माण करणे आवश्यक असते. कर्जव्यवस्थापन हे एक मौद्रीक धोरणाचे साधन म्हणून तेव्हाच यशस्वी ठरू शकते. जेव्हा पैसा बाजार व भांडवल बाजार हा विकसीत असतो व अल्पकालीन व दीर्घकालीन प्रतिभूतीची संख्या जास्त असते. पैसा बाजार व भांडवल बाजार विकसीत नसेल तर कर्जव्यवस्थापन साध्य करता येत नाही.

पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा यामध्ये व्यवस्थित संतुलन असणे आवश्यक असते. पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा यामधील असंतुलन किंमत पातळीवर परिणाम करते. पैशाचा पुरवठा कमी झाला तर वृद्धीवर विपरीत परिणाम होतो. पैशाचा पुरवठा जास्त झाला तर किंमत पातळीवर परिणाम होतो. जसा विकास होतो तशी पैशाची मागणी वाढते. कारण गैर मौद्रीक क्षेत्राचा समावेशही मौद्रीक क्षेत्रात होतो. उदा. कृषी उत्पादन व औद्योगिक उत्पादन वाढते व किंमतही वाढते. व्यवहार हेतू व साठेबाजी हेतूसाठी पैशाची मागणी वाढते. यामुळे पैशाचा पुरवठा वाढतो व तो पैशाच्या वाढलेल्या मागणीपेक्षा जास्त होतो व यातून किंमतवाढ होते. या मौद्रीक संस्थेने साठेबाजी क्रियावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. विकसनशील देशामध्ये मौद्रीक संस्थेने अशाप्रकारे पैसा व पतपुरवठा नियंत्रित केला पाहिजे जेणे करून किंमतवाढ होणार नाही आणि गुंतवणूक व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होणार नाही. मौद्रीक धोरणाचा विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूक व उत्पादन आराखडा (Pattern) यावर प्रभाव असतो. विकास प्रक्रियेमध्ये किंमतवाढ भार नियंत्रित करणे हा मौद्रीक धोरणाचा प्रमुख उद्देश असतो. यासाठी मध्यवर्ती बँक गुणात्मक व संख्यात्मक पतनियंत्रण साधनांचा वापर करते. विकसनशील देशामध्ये खुल्या बाजारातील खरेदी-विक्री किंमतवाढ नियंत्रित साधनांचा वापर करते. विकसनशील देशामध्ये खुल्या बाजारातील खरेदी-विक्री किंमतवाढ नियंत्रित करण्यासाठी यशस्वी ठरत नाही. खुल्या बाजारातील खरेदी-विक्रीचे यश खालील बाबींवर अवलंबून असते.

१) पूर्ण विकसित हुंडी बाजाराचे अस्तित्व.

२) व्यापारी बँकाकडून स्थिर रोख राखीव निधीचे पालन व

३) मध्यवर्ती बँकेची पूर्नवटवणूक सुविधेची अनुपस्थिती.

विकसनशील देशामध्ये हुंडी बाजार लहान व अविकसित असतो. व्यापारी बँका रोख निधी लवचिक ठेवतात. कारण मध्यवर्ती बँकेचे व्यापारी बँकावर पूर्ण नियंत्रण नसते. व्यापारी बँका सरकारी प्रतिभूतीत/ रोख्यात गुंतवणूक करण्यास नाखूष असतात कारण व्याजदर कमी असतात.

विकसनशील देशात बँकरेट धोरण हे सुद्धा कमी प्रभावी असते. कारण व्यापारी बँका मोठ्या प्रमाणावर रोख राखीव जवळ ठेवतात व यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्मिती जास्त असते. अशावेळी मध्यवर्ती बँक अनिवार्य राखीव प्रमाण वाढवून त्यास नियंत्रित करते.

विकसनशील देशामध्ये गुणात्मक पतनियंत्रणाची साधने जास्त प्रभावी ठरतात. विकसनशील देशामध्ये सोने, दागिने, जमीन, मालमत्ता साठेबाजी यामध्ये गुंतवणूक करण्याची प्रवृत्ती जास्त असते. गुणात्मक पतनियंत्रणाच्या साह्याने अशा प्रकारच्या अनुत्पादक गुंतवणूकीवर मर्यादा घालता येतात. गाळा आवश्यकता प्रमाण वाढवूनही त्यावर नियंत्रण आणता येते. पतपुरवठ्यावर विशिष्ट प्रमाणात बंधने घालता येतात.

गुणात्मक व संस्थात्मक पतनियंत्रणाच्या एकत्रित वापरामुळे इच्छीत ध्येय गाठता येतात.

विकसनशील देशामध्ये मौद्रीक धोरणाचा वापर करताना मर्यादा येत असल्या तरी, बँकींग सुविधाचा विकास व बचत संस्थाचा विकास कृषी व उद्योग पतपुरवठ्याचे पुर्नगठन पैसा बाजारातील सुधारणा, मजबूत मध्यवर्ती बँक, सोने व चांदीच्या खुल्या बाजारावर निर्बंध व पतपुरवठा सुधारणा इ. च्या साह्याने बाजारातील त्रुटी दूर करून मौद्रीक धोरणाचा प्रभावीपणे वापर करता येतो व विकास साध्य करता येतो.

**राजकोषीय धोरण :**

राजकोषीय धोरण म्हणजे विकास व स्थिरिकरण यासाठी सरकारद्वारे कराभार, सार्वजनिक कर्जे व सार्वजनिक खर्च यांचा वापर होय. आर्थिक विकास वाढविण्यासाठी राजकोषीय धोरणाचा वापर ही अलिकडील काळातील घटना आहे. केन्स यांचे राजकोषीय धोरण हे आधुनिक अर्थव्यवस्थांना लागू होते. आधुनिक अर्थव्यवस्थामधील वृद्धी दर स्थिरीकरणासाठी राजकोषीय धोरणाचा वापर केला जातो. विकसनशील अर्थव्यवस्थामध्ये राजकोषीय धोरणाचा वापर भांडवल संचयाचा दर वाढविण्यासाठी केला जातो. हे विकासाचे साधन म्हणून वापरले जाते. विकसनशील देशामध्ये, अनेक समस्या असतात. उदा. बचत प्रवृत्ती कमी, उपभोग प्रवृत्ती उच्च इ. विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये राजकोषीय धोरण गतिमान भूमिका निभावते. प्रा. नर्क्से यांच्या मते, केन्स यांचे (General Theory) सर्वसाधारण सिद्धांत हे खर्चाच्या बाजूचे आहेत. नर्क्से यांच्या मते, राजकोषीय धोरण, विकसनशील देशातील भांडवल संचय समस्या सोडविण्यासाठी अतिशय खालच्या पातळीवर असते. झालेल्या बचतीचा काही भाग हा जमीन गुंतवणूक, संग्रहण, दागदागिणे, सोने इ. च्या स्वरूपात असते. मात्र राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून हे सर्व उत्पादक कार्याकडे वळविता येवू शकते. नर्क्से यांच्या मते, देशाचे वाढीव बचत प्रमाण व बचतीची सिमांत प्रवृत्ती हे वृद्धीचे महत्त्वाचे निर्धारक असतात. वाढीव बचत प्रमाण हे सामाजिक व आर्थिक सरकारी खर्च व बँकाची निर्मिती व नविन उद्योग स्थापन करून वाढविता येते. यातून देशातील रोजगार, उत्पादन व उत्पन्न पातळी वाढविता येते. विकसनशील देशामध्ये सक्तीच्या बचतीचे महत्त्वाचे साधन म्हणजे कर होय. करामुळे खाजगी खर्च कमी करता येतो. विकसनशील देशामध्ये अविकसित पैसा बाजार व भांडवल

बाजार असल्यामुळे फक्त मौद्रीक धोरण प्रभावी ठरू शकत नाही. त्यासाठी राजकोषीय धोरण हे महत्त्वाची भूमिका बजावते.

विकसनशील देशातील विकास नियोजनामध्ये राजकोषीय धोरण महत्त्वाची भूमिका बजावते. नियोजनाच्या माध्यमातून वास्तव क्षेत्र व पैसा क्षेत्र यामध्ये संतुलन साधले जाते. भौतिक नियोजन हे वित्तीय नियोजनासोबत सुसंगत करता येते.

**राजकोषीय धोरणाची उद्दिष्टचे :**

राजकोषीय धोरण म्हणजे आर्थिक विकासाला प्रोत्साहन देणे होय.

१) **गुंतवणूक दर वाढविणे :** राजकोषीय धोरणाचे ध्येय खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणूक वाढविणे हे असते. राजकोषीय धोरणाद्वारे अनुत्पादक गुंतवणूकीस परावृत्त केले जाते व उत्पादक गुंतवणूकीस प्रोत्साहन दिले जाते. विकसनशील देशामध्ये विदेशी चलन पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे उपाय म्हणून वाढीव बचत प्रमाण व बचतीची सिमांत प्रवृत्ती वाढविली जाते. यासाठी सार्वजनिक वित्त, कर व सक्तीची कर्जे हे उपाय अवलंबिले जातात. डॉ. आर. एन. त्रिपाठी यांच्या मते, सरकारकडून वाढीव बचत प्रमाण वाढविण्यासाठी खालील ६ उपाय केले जातात. १. भौतिक नियंत्रण, २. अस्तित्त्वातील करामध्ये वाढ, ३. नविन कर, ४. सार्वजनिक उद्योगातील वाढावा, ५. भाववाढेत्तर सार्वजनिक कर्जे, ६. तूटीचा अर्थभरणा, थेट भौतिक नियंत्रण हे अनुत्पादक गुंतवणूकीला आळा घालते. उपभोगावर नियंत्रण आणण्यासाठी पुरोगामी कर, चैनीच्या वस्तुंची आयात निर्बंध, चैनीच्या वस्तूवर आयात कर वाढ, चैनीच्या वस्तू निर्मितीवर निर्बंध इ. उपाय अवलंबिले जातात. खाजगी क्षेत्रात गुंतवणूक वाढण्यासाठी वित्तपुरवठा सुविधा, विदेशी चलन पुरवठा, करसुट्टी, विकास सूट, अनुदान इ. उपायांचा अवलंब केला जातो. वरील सर्व उपायामध्ये कर हा उपाय जास्त प्रभावी आहे. विकसनशील देशामध्ये तूटीचा अर्थभरणा किंमतवाढ करतो. बचतीचे व्याजदर वाढवून गुंतवणूक वाढविण्याचा प्रयत्न केला असता याचा गुंतवणूकीवर प्रतिकूल परिणाम होताना दिसतो.

२) **सामाजिकदृष्ट्या पर्याप्त गुंतवणूकीस प्रोत्साहन :** सामाजिक व आर्थिक खर्च ही जबाबदार सरकारची असते. विकसनशील देशामध्ये सरकार विविध योजना राबवून सामाजिक व आर्थिक खर्च वाढवित असते. आर्थिक खर्च म्हणजे परिवहन, दळणवळण, नदी व ऊर्जा विकास, माती संरक्षण इ. होय. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, तांत्रिक प्रशिक्षण सुविधा इ. सामाजिक खर्च होय. या दोन्ही प्रकारच्या गुंतवणूकीतून बाह्य मित्तव्ययता तयार होतात. यातून खाजगी गुंतवणूकीची सिमांत उत्पादकता वाढते व खाजगी गुंतवणूकीस प्रेरणा मिळते. बाजारास चालना देण्यासाठी सामाजिक व आर्थिक संस्थांच्या खर्चाचा भार सरकारला उचलावा लागतो.

३) **रोजगार संधी निर्माण करणे :** राजकोषीय धोरणाचा मुख्य उद्योग रोजगार निर्मिती हा होय. सामाजिक व आर्थिक सरकारी खर्चामुळे रोजगार वाढतो. यातून अर्थव्यवस्थेची दीर्घकालीन उत्पादन कार्यक्षमता वाढते. विकसनशील अर्थव्यवस्थामध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यामुळे सरकारने स्थानिक सार्वजनिक कार्यक्रम व समुदाय विकास कार्यक्रम राबविले पाहिजेत व यामध्ये श्रमाचा जास्त वापर केला पाहिजे. याचबरोबर कार्यक्रम करसुट्टी, सूट, स्वस्त कर्जे, अनुदाने इ. बरोबरच खाजगी उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. विकसनशील

देशामध्ये लोकसंख्या वेगाने वाढत असते. त्यामुळे रोजगार निर्मिती उद्दिष्ट हे लोकसंख्या वाढीशी अत्यंत जवळचे असते. विकसनशील देशामध्ये विकास तेव्हाच शक्य आहे जेव्हा रोजगारवाढीचा दर व उत्पन्न वाढीचा दर हा लोकसंख्या वृद्धीदरापेक्षा जास्त असतो. राजकोषीय धोरणाच्या साह्याने लोकसंख्या नियंत्रणाचा प्रयत्नही केला जातो. कारण लोकसंख्या नियंत्रणाशिवाय रोजगारवाढीचे उद्दिष्ट यशस्वी होऊ शकत नाही.

४) **आर्थिक स्थैर्य निर्माण करणे :** विकसनशील अर्थव्यवस्था या आंतरराष्ट्रीय चक्रीय बदलाने प्रभावित होत असतात. कारण निर्यात ही प्राथमिक वस्तुची असते व आयात मात्र वेष्टणाधारीत वस्तुची असते. जागतिक बाजारात कृषी व खनिज उत्पादनाच्या किंमती कमी झाल्या तर व्यापारशर्ती विकसनशील देशांना प्रतिकूल बनतात. यातून विदेशी चलन कमी होते व राष्ट्रीय उत्पन्न घटते. जेव्हा कृषी मालाच्या किंमती जागतिक बाजारात कमी होतात तेव्हा विकसनशील देश याचा फायदा उठवू शकत नाहीत कारण पुरवठ्यात वाढ शक्य नसते.

राजकोषीय धोरणाच्या साह्याने बदलत्या आर्थिक परिस्थितीत आर्थिक स्थैर्य गाठण्यास मदत होते. तेजीच्या काळातील आंतरराष्ट्रीय चक्रीय चढ उताराचे परिणाम किमान करण्यासाठी निर्यात व आयातीवर कर लावले पाहिजेत. निर्यात कर लावले असता अचानक होणारा लाभ कमी होतो. जागतिक मंदीच्या परिस्थितीत निर्यात उत्पन्न घटते व याचा निर्यात उद्योगास फटका बसतो. अशा वेळी सरकारने मोठा सार्वजनिक कार्यक्रम हातात घेऊन कार्ये केले पाहिजेत.

राजकोषीय धोरणाकडे दूरदृष्टीने पाहणे आवश्यक असते. याद्वारे अर्थव्यवस्थेचे विविधीकरण करता येते व याचबरोबर अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचा संतुलित विकास घडवून आणता येतो.

५) **किंमतवाढ नियंत्रित करणे :** विकसनशील अर्थव्यवस्थामध्ये भाववाढीची समस्या अंतर्भूत असते. अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून खर्च वाढविला असता खरेदीशक्ती वाढून मागणी वाढते. मात्र पुरवठा अलवचिक असल्यामुळे किंमतवाढ होते. यामुळे वेतन मागणी वाढते व यातून पुन्हा खर्चजन्य भाववाढ होते.

वस्तू करासोबत प्रत्यक्ष कर वाढविले असता विकसनशील अर्थव्यवस्थेतील भाववाढीवर आळा घालता येतो. वाढलेल्या किंमतीवर नियंत्रण आणण्याबरोबरच सर्वसाधारण किंमतपातळी स्थिर ठेवण्याचा प्रयत्नही राजकोषीय धोरणाद्वारे केला जातो. कर धोरण ठरविताना खाजगी गुंतवणूकीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागते. सरकारची राजकोषीय भूमिकेत अडथळे दूर करणे, अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्राचा नियोजित विकास, आवश्यक वस्तुवर भौतिक नियंत्रण, अनुदान देणे व आवश्यक उपभोग्य वस्तू, उद्योगांना संरक्षण इ. चा समावेश होतो. भाववाढ नियंत्रण करण्यासाठी राजकोषीय धोरणासोबत मौद्रीक धोरणाची जोड देणे आवश्यक आहे.

६) **राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे व पूर्नवितरण करणे :** विकसनशील अर्थव्यवस्थेत उत्पन्न व संपत्तीची असमानता टोकाची असते. राजकोषीय धोरणाद्वारे राष्ट्रीय उत्पन्नाचे असे पुनर्विभाजन केले जाते की, त्यातून असमानता दूर होईल. उत्पन्न व संपत्तीतील टोकाची असमानता ही सामाजिक समस्या निर्माण करते. यातून आर्थिक व राजकीय अस्थैर्य निर्माण होते. अशा अर्थव्यवस्थामध्ये बोटावर मोजण्याइतका श्रीमंत लोकांचा वर्ग

हा संपत्तीचा वापर चुकीच्या पद्धतीने करतो. उदा. चैनिचा उपभोग, साठेबाजी, अचल संपत्तीतील गुंतवणूक, सोने संग्रहण इ. गरीब वर्ग  मात्र दारिद्रय व दैन्यावस्था यामध्ये जीवन जगतो. राजकोषीय धोरणाद्वारे गरीब व श्रीमंत लोकांमधील ही दरी कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

राजकोषीय धोरणाद्वारे देशातील गरीब व दारिद्रयात असलेल्या लोकांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. विकसनशील देशामध्ये थेट सामाजिक गुंतवणूकीच्या आधारे उत्पादन पातळी रोजगार व वास्तव उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. यातून बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिती व जीवनमान पातळी उंचावते. अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचा संतुलित विकास साध्य करण्याचा प्रयत्नही केला जातो. अतिउच्च उत्पन्न पातळी कमी करण्यासाठी राजकोषीय धोरणामध्ये अत्यंतिक पुरोगामी व विस्तारित कर संरचना वापरणे आवश्यक असते. यामध्ये अनेक करांचा समावेश होतो. उदा - आयकर, संपत्तीकर, मालमत्ताकर इ. चा समावेश होतो. मात्र राजकोषीय धोरण प्रभावी ठरण्यामध्ये राजकीय दबाव, नैतिकतेचा अभाव व कार्यक्षम व इमानदार प्रशासन इ. अडथळे ठरतात. राजकोषीय धोरणाद्वारे फक्त पुर्नवितरणाचाच विचार केला जात नसून राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा विचारही केला जातो.

राजकोषीय धोरणाद्वारे वरील उद्दिष्ट्ये साध्य करत असताना खालील बाबी महत्त्वाच्या आहेत.

१) यांद्वारे किती रकमेचा महसूल वाढ केली जाते व

२) सार्वजनिक खर्चाची रक्कम किती व दिशा कशी आहे.

**कर : राजकोषीय धोरणाचे महत्त्वाचे साधन :**

कर हे राजकोषीय धोरणाचे महत्त्वाचे साधन आहे. अंदाजपत्रकीय वाढावा, उच्च किंमती व उच्च कर लक्ष्य याद्वारे साध्य केला जातो. विकसनशील देशामध्ये चैनिच्या उपभोग नियंत्रित करण्यासाठी कर हे महत्त्वाचे साधन आहे. करांच्या साह्याने चैनिच्या उपभोगावर नियंत्रण आणून ही संसाधने गुंतवणूकीकडे वळविले जातात. बचत करणे व गुंतवणूक करण्यावर वाढावा दिला जातो. सार्वजनिक गुंतवणूक वाढविण्यासाठी लोकांच्या हातातील संसाधने सरकारकडे हस्तांतरित केली जातात. गुंतवणूक आराखडा बदलला जातो. आर्थिक असमानता कमी केली जाते व आर्थिक वाढवा जमा केला जातो इ. होय.

विकसनशील देशामध्ये दारिद्रयाचे दुष्टचक्र थांबविण्यासाठी राजकोषीय धोरण अत्यंत उपयोगी ठरते. या देशामध्ये कमी उत्पन्न, कमी बचत व कमी गुंतवणूक व कमी रोजगार अशी परिस्थिती निर्माण होते. करांच्या साह्याने सरकार उत्पन्न कर, मालमत्ता कर त्याचबरोबर खर्चावरील कर इ. च्या साह्याने निधी जमा करून सार्वजनिक गुंतवणूक वाढविते. करांच्या साह्याने अनुत्पादित संसाधने उत्पादित मार्गाकडे वळविले जातात. करांच्या साह्याने श्रीमंत व गरीब लोकांच्या उत्पन्नातील अंतरही कमी केले जाते.

**सार्वजनिक कर्जे व आर्थिक विकास :**

विकसनशील देशांमध्ये भांडवल संचय वाढविण्याचे सार्वजनिक कर्जे हे एक महत्त्वाचे साधन आहे. कर हे सक्तीची बचत असतात मात्र कर्जे हे ऐच्छिक असतात. कर देण्यामध्ये लोक उत्सुक नसतात कारण ती

रक्कम परत मिळणार नसते. मात्र कर्जे देण्यास उत्सुक असतात कारण त्यावर व्याज मिळणार असते. सार्वजनिक कर्जाद्वारे भाववाढ नियंत्रणही करता येते. याद्वारे देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले प्रकल्प उभे करता येतात. उदा – वीज निर्मिती, सिंचन प्रकल्प, रस्ते, रेल्वे इ. मात्र विकसनशील देशामध्ये यावर मर्यादा येतात त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दारिद्र्याचे दुष्टचक्र होय. कमी उत्पन्न पातळीमुळे कमी बचत व उच्च उपभोग प्रर्वत्ती इ. होय

**सार्वजनिक खर्च व आर्थिक विकास :**

विकसनशील देशामध्ये मुलभूत सुविधा निर्माण करण्यामध्ये खाजगी गुंतवणूक करण्यास गुंतवणूकदार नाखूष असतात कारण परतावा कालावधी हा खूप मोठा असतो. अशा अर्थव्यवस्थामध्ये वेगाने विकास करणे सार्वजनिक खर्चाद्वारेच शक्य होते. सरकारने पायाभूत सुविधा निर्माण करणे महत्त्वाचे असते. विकसनशील देशामध्ये अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर, रोजगार संधी, राहणीमान दर्जा, असमानता कमी करणे, खाजगी गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे व विभागीय समतोल निर्माण करणे इत्यादी उद्दिष्ट्ये सार्वजनिक खर्चाद्वारे पूर्ण करता येवू शकतात.

वरीलप्रमाणे विकसनशील देशामध्ये राजकोषीय धोरण प्रभावीपणे वापरण्यासाठी कर, सार्वजनिक कर्जे व सार्वजनिक खर्च इ. साधनांचा वापर संयुक्तीकपणे केला असता विकासाच्या व उत्पन्नाच्या पातळीमध्ये वाढ करता येते.

**४.२.२ समावेशक वृद्धी (Incluvsive Growth) :**

भारतास १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यावेळी भारत देशापुढे अन्नधान्य टंचाई, भाववाढ, दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव इ. अनेक समस्या होत्या. भारत सरकारपुढे या सर्व समस्या सोडविणे व देशास प्रगतीच्या मार्गावर नेणे हे मोठे आव्हान होते. भारताने नियोजित मार्गाने विकास करण्याचे ठरविले व १ एप्रिल १९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना सुरूवात केली. नियोजन मंडळ हे धोरणे तयार करणे व अंमलबजावणी करण्याचे कार्य करते. नियोजनामध्ये वृद्धीची लक्ष्ये निश्चित केली गेली व ती साध्य करण्याचा प्रयत्न केला गेला. नियोजनाच्या मार्गाने भारत देशाचा मोठा विकास झाला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत विकासाचा वृद्धीदर हा ३.६% एवढा होता. त्यामध्ये वाढ होऊन अकराव्या पंचवार्षिक योजनेत ७.७% एवढा झाला. नियोजित विकासामुळे उत्पादनात वाढ झाली. रोजगार वाढला व दरडोई उत्पन्नातही वाढ झाली. प्रत्येक योजनेमध्ये विशिष्ट क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला. विकासाचा दर वाढत असताना मात्र उत्पन्नातील असमानता वाढत गेली. दारिद्र्याचे प्रमाण अपेक्षित वेगाने कमी करता आले नाही. शिक्षण सुविधा, प्राथमिक आरोग्य, अर्भक मृत्यूदर इ. बाबीमध्ये मात्र भारत हा देश इतर देशाशी तुलना करता मागे असल्याचे दिसते. भारतामध्ये उत्पादन साधनांची मालकी ही काही श्रीमंत लोकांच्या हातात असल्याचे दिसते. अनेक लोकांकडे श्रम करण्याशिवाय दुसरे काहीही साधन नाही. भारत हा देश खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षामध्ये अजूनही एकूण लोकसंख्येच्या ६०% भाग हा शेतीवर अवलंबून असल्याचे दिसते. ग्रामीण भागामध्ये दारिद्र्य, बेरोजगारी, उपासमार इ. चे प्रमाण भयावह आहे. मानवी विकास निर्देशांकामध्ये भारत हा खूप खालच्या पातळीवर असल्याचे दिसते.

आर्थिक विकास व वृद्धीचा लाभ किती टक्के जनतेस मिळतात हे तपासून पाहणे आवश्यक आहे. जर लाभ मर्यादीत लोकांना मिळत असतील तर विषमता वाढत जाते. आर्थिक विकासाचे लाभ समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचत नसतील तर समाजामधील गरीब व श्रीमंत लोकांमधील दरी वाढत जाते. अकरावी पंचवार्षिक योजना ठरवित असताना असमानता आढळून आली. यामुळे अकरावी पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक वृद्धी हे उद्दिष्ट ठरविण्यात आले. भारतीय नियोजनाची सुरूवात ही सामाजिक न्याय हे तत्त्व पूर्णत: अंमलात न आल्याचे दिसते. समावेशक वृद्धी म्हणजे विकास प्रक्रियेमध्ये समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करून घेणे.

दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते अकराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत प्रत्येक वेळी दारिद्र्य कमी करणे हे एक उद्दिष्ट राहिलेले आहे. मात्र दारिद्र्य निर्मूलन करण्यामध्ये फारसे यश आलेले नाही. १९९० च्या सुरूवातीस आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुरू झाला व सुधारणानंतर वृद्धीदर हा ७% पर्यंत वाढला. याच काळामध्ये बऱ्याच गरीब घटक राज्यांनी वद्धीदर दुप्पट केला. वेगवान वृद्धी कालावधीमध्ये असमानता वाढली. विभागीय असमानते बरोबरच ग्रामीण व शहरी असमानताही वाढली. वरील परिस्थितीमुळे भारत सरकारने अकराव्या पंचवार्षिक योजनेत वेगवान विकासाबरोबरच समावेशक वृद्धी हे महत्त्वाचे उदिष्ट्य ठेवले.

सरकारच्या सामाजिक खर्च व समावेशक वृद्धी यांचा जवळचा संबंध आहे. उपयोगितावादी सामाजिक कल्याण फलनाच्या मते समावेशक वृद्धी ही दोन घटकावर अवलंबून आहे, १) उत्पन्न वृद्धी व २) उत्पन्न विभाजन. उत्पन्नाचे गरीबाकडून श्रीमंताकडे होणारे हस्तांतरण जास्त मोठ्या प्रमाणावर असेल तर समावेशक वृद्धी शक्य नाही. विकास प्रक्रियेमध्ये उत्पन्न वाढ अपेक्षित असून श्रीमंताकडून गरीबाकडे हस्तांतरण वाढणे अपेक्षित आहे.

समावेशक वृद्धी साध्य करण्यासाठी काही सामाजिक आर्थिक लक्ष्ये निश्चित केली व सामाजिक सेवा यावरील सार्वजनिक खर्च वाढविण्यात आले.

**सामाजिक आर्थिक लक्ष्ये (Social Economic Targets):**

१) GDP वृद्धीदर ८ ते १०% एवढा साध्य करणे.

२) शेती वृद्धीदर ४% एवढा साध्य करणे.

३) शिक्षित बेरोजगारी ५% पेक्षा कमी करणे.

४) शाळाबाह्य मुलांचे प्रमाण कमी करणे व गळती थांबविणे

५) साक्षरता दर ८५% पर्यंत वाढविणे.

६) एकूण प्रजनन दर २.१% पर्यंत कमी करणे.

७) योजना कलावधीत सर्वांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करणे.

८) कुपोषण प्रमाण कमी करणे.

९) लिंग प्रमाण २०११-१२ पर्यंत ९३५ पर्यंत वाढविणे.

१०) लहान मुलांना कामाच्या सक्तीतून मुक्त करणे.


११) दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबांना २००९ पर्यंत वीज पुरवठा करणे.

१२) २०१२ पर्यंत सर्व खेड्यांना ब्रॉडबँड सुविधा उपलब्ध करणे.

वरील प्रमाणे सामाजिक सेवावरील लक्ष्ये निश्चित केली गेली व सरकारी खर्चामध्ये वाढ केली गेली.

**सामाजिक स्थलांतरण वक्र (Social Mobility Curve) :**

समावेशक वृद्धीमध्ये उत्पन्नाचे स्थलांतरण ही महत्त्वाची बाब आहे. उत्पन्न वाढीबरोबर उत्पन्नाचे स्थलांतर श्रीमंत व्यक्तीकडून गरीब व्यक्तीकडे झाले नाही तर समावेशक वृद्धी झाली नाही असे म्हणावे लागेल. खालील आकृतीच्या साह्याने आपणास उत्पन्नाचे स्थलांतर कसे होते व समावेशक वृद्धी कशी साध्य केली जाते ते अभ्यासता येईल.



वरील आकृतीमध्ये y हे सरासरी उत्पन्न आहे. आकृतीमध्ये लोकसंख्या ही त्याच्या उत्पन्नानुसार चढत्या क्रमाने मांडलेली आहे. $\bar{y}$ हे सरासरी उत्पन्नाचे मोजमाप हे OY अक्षावर केलेले आहे व लोकसंख्या ही OX अक्षावर मोजमाप केलेले आहे. वक्र AB हा सामाजिक स्थलांतरण वक्र आहे. जर सामाजिक स्थलांतरण वक्र हा वरच्या बाजूस स्थलांतरित झाला तर वृद्धी ही समावेशक आहे असे दिसून येते. समावेशक वृद्धी ही खालील दोन बाबींवर अवलंबून आहे. १) वक्र किती प्रमाणात वरच्या पातळीवर स्थलांतरित होतो (उत्पन्न) व २) उत्पन्नाचे विभाजन बदल (समता) कशी आहे. सामाजिक स्थलांतरण वक्र $A^1B$ हा जास्त समावेशक वृद्धी दर्शवितो. यावरून समाजातील खालच्या स्तरातील लोकांचे सरासरी उत्पन्न वाढल्याचे दिसून येते.

समावेशक वृद्धी शिवाय आर्थिक विकास झालेला आहे असे म्हणता येत नाही.

**वाशिंग्टन एकमत/करार (**Washington Consensus**) :**

विकसनशील अर्थव्यवस्था ह्या आंतरराष्ट्रीय घटकाशी संबंधित आहे. कमी विकसितपणाकडून जास्त विकसितपणाकडे वाटचाल करताना विकसनशील अर्थव्यवस्था या संसाधनाची जुळवणी करतात. त्याचबरोबर संस्थाची निर्मिती करतात या प्रक्रियेमध्ये सरकार ही संस्था सहभागी असते. ही संस्था विकासासाठी लागणारी मदत इतर श्रीमंत राष्ट्राकडून मिळविण्याचे प्रयत्न करते. ही मदत आंतरराष्ट्रीय संस्था उदा – आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) व जागतिक बँक (WB) यांच्याकडून घेतली जाते. सर्वसाधारणपणे विकसनशील देश हे विकसित देशातील विकास प्रक्रियेची नकल करताना दिसतात. इ. स. १९५० व १९६० च्या दरम्यान हे राष्ट्र अविकसित (Underdevelopment) व कमी विकसित (less development) म्हणून संबोधली जात होती. आज मात्र त्यांना विकसनशील (developing) राष्ट्र म्हणून ओळखले जाते. १९८० च्या दशकामध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांनी इ. स. १९८० मध्ये वाशिंग्टन करार या विकास पद्धतीचा पुरस्कार केला. या करारानुसार, सरकारनी अर्थव्यवस्थेमध्ये धोरणात्मक सुधारणा केल्या पाहिजेत असे म्हटले. यामध्ये १) भाववाढ नियंत्रण करून व राजकोषीय तूट कमी करून स्थूल आर्थिक स्थैर्य साध्य करणे, २) व्यापार व भांडवली खात्यावर उदारीकरण करून अर्थव्यवस्था जगातील राष्ट्रांना खुली करावी, ३) देशांतर्गत उत्पादनामध्ये उदारीकरण व घटक बाजाराचे खाजगीकरण करावे असे सुचविण्यात आले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे संरचना जुळवाजुळव धोरण (Structural Adjustment Policies) स्वीकारावे असे सांगण्यात आले. १९८० च्या शेवटी जॉन विल्यमसन् यांनी वॉशिंग्टन करार किंवा एकमत ही संकल्पना मांडली. यामध्ये लॅटिन अमेरिका खंडामध्ये झालेल्या आर्थिक धोरणात्मक सुधारणाचा संदर्भ घेतलेला आहे. वॉशिंग्टन एकमत धोरण हे सरकार केंद्रीत धोरणाकडून बाजाराधिष्ठित (Market Oriental) धोरणाकडील वाटचाल आहे.

वॉशिंग्टन एकमत करार अगोदर विकास प्रक्रियेचे विश्लेषण देशांतर्गत संदर्भावरून निश्चित केलेल्या ध्येय पूर्तता व परिक्षण साच्यामध्ये केले जात होते. देशांतर्गत आर्थिक व सामाजिक प्रवृत्ती यांना विचारात घेऊन धोरणे आखली जात होती. यांना देशांतर्गत घटक म्हणून संबोधले जात होते. विकास धोरणे हे राष्ट्रीय उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या दृष्टिने आखली जात होती. ही धोरणे आर्थिक व राजकीय राष्ट्रवादानेही प्रभावित होत असत. आर्थिक धोरणांची मुख्य उद्दिष्ट्ये ही स्वावलंबन, औद्योगिकीकरण, विदेशी गुंतवणूक वाढविणे, सार्वजनिक

नियंत्रण इ. होते. १९५० व १९६० च्या दशकामध्ये तज्ञामध्ये विकास व्युहरचनेबाबत अनेक वाद निर्माण झाले. उदा – संतुलित विकास का असंतुलित विकास व विकासातील मानवी साधनसंपत्तीची भूमिका कोणती? ज्या राष्ट्रामध्ये सामाजिक उद्दिष्टांना विकास प्रक्रियेमध्ये अग्रक्रम होता त्या राष्ट्राकडून संरचनात्मक बदलास मोठा विरोध झाला. विकसनशील राष्ट्रामध्ये सामाजिक उद्दिष्टांना अग्रक्रम असण्याचे कारण म्हणजे दारिद्र्य व उत्पन्नातील असमानता होय. त्याचबरोबर बेरोजगारीचा प्रश्नही महत्त्वाचा होता.

१९७० च्या शेवटी व १९८० च्या सुरूवातीस बहुसंख्य विकसनशील देशांचा वृद्धी वर घटला. याच कालावधीत अनेक लॅटिन अमेरिकन देशांनी आयात पर्यायीकरण (Import substiution) धोरणाचा स्वीकार केला. यातून विकास घडून आल्यामुळे खुल्या बाजाराचे सकारात्मक परिणाम दिसून आले. सुरूवातीस संरक्षणात्मक धोरणाचा पुरस्कार करणारे अर्थतज्ञ जी. हॅबरलर, एच. मिन्ट व मिल्टन फ्रीडमन हे खुल्या धोरणाचा स्वीकार करू लागले. यातूनच राष्ट्राचा विकास करण्यासाठी विकसनशील देशांनी नवीन दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे व तो म्हणजे वॉशिंग्टन एकमत करार होय. नविन धोरणामध्ये नविन नियम आणले ते म्हणजे बाजार खुले करण्याची वचनबद्धता, खाजगी मालमत्ता व व्यक्तिगत हित हे होय. यास नविन नाव देण्यात आले ते म्हणजे LIEO (Liberal International Economic Order) हे होय. १९८० मध्ये निर्हस्तक्षेपी उदारीकरणाचा पुरस्कार केला. यामध्ये बाह्य व्यापार उदारीकरण व भांडवल स्थलांतरण उदारीकरण स्वीकारण्यात आले. १९९० मध्ये उत्पादन व्यवस्थेच्या जागतिकीकरणास प्रारंभ झाला. व्यापारांवरील अवलंबित्व वाढले. विदेशी चलनाची मोठ्याा प्रमाणात गरज जाणवू लागली. ज्या देशांनी उदारिकरणाचा स्वीकार केला त्यांना लक्षात घेतले जावू लागले. अशा देशामध्ये विदेशी थेट गुंतवणूक येऊ लागली. तंत्रज्ञान हस्तांतरण वाढले. या बाह्य वातावरणाचा अशा देशांना फायदा होत असल्याचे दिसून आले.

वाशिंग्टन एकमत करारामध्ये खालील १० धोरणात्मक सुधारणांची चर्चा केलेली आहे.

१) अंदाजपत्रकीय तूट ही कमी असावी, भाववाढ करावी लागू नये. समग्र आर्थिक स्थैर्ये हे विकासासाठी आवश्यक बाब आहे. किंमत स्थैर्य साध्य केल्यानंतरच समग्र आर्थिक स्थैर्य साधता येते.

२) राजकीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रावर केला जाणारा सार्वजनिक खर्च हा इतर महत्त्वाच्या सुविधावर व उत्पन्न विषमता कमी करणाऱ्या क्षेत्रावर केला पाहिजे. उदा. प्राथमिक आरोग्य, शिक्षण व पायाभूत सुविधा.

३) कर सुधारणा करून कर आधार (Tax Base) वाढविला पाहिजे. १९९० च्या आरंभी अनेक देशांनी करसुधारणेस सुरूवात केली व मूल्यवर्धित करा(VAT) ची सुरूवात केली.

४) वित्तीय उदारीकरण हे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. यामध्ये व्याजदराची बाजारानुसार निश्चिती, बँकांना कार्यात्मक स्वायत्तता, बाजाराधिष्ठित पतपुरवठा वाटप, आंतरराष्ट्रीय भांडवल उदारीकरण इ. चा समावेश होतो.

५) अपंरपरागत वस्तू निर्यात वाढविण्यासाठी विनिमय दर निश्चित करणे.

६) व्यापारावरील संख्यात्मक व्यापार बंधने कमी करून प्रशुल्क आकारावे. प्रशुल्क टप्प्याटप्प्याने कमी करून ते १० ते २०% या पातळीवर आणावे.

७) थेट विदेशी गुंतवणूकीवरील निर्बंध कमी करावे.

८) सरकारी मालकीच्या उद्योगांचे खाजगीकरण करावे.

९) नविन उत्पादनसंस्थावरील अति नियंत्रित कलमे कमी करून स्पर्धा वाढवावी.

१०) कायदेशीर व्यवस्थेने सुरक्षित मालमत्ता अधिकार प्राप्त करून द्यावेत.

वरीलप्रमाणे काही महत्त्वाच्या बाबी या वाशिंग्टन एकमत करारामध्ये नमूद केलेल्या आहेत.

**विकेंद्रीकरण (Decentalisation) :**

विकेंद्रीकरण म्हणजे अधिकाराचे वरील पातळीवरून खालच्या पातळीवरील अधिकाऱ्याकडे हस्तांतरण होय. अलिकडील विकासाच्या प्रक्रियेमध्ये विकेंद्रीकरणास महत्व प्राप्त झाले आहे. अलिकडील काळामध्ये उत्पादन प्रक्रिया ही गुंतागुंतीची होत आहे. उत्पादन विस्तार होत आहे. उद्योगातील अधिकारी व्यक्ती व सरकारमधील अधिकारी व्यक्ती वाढत आहेत. विकेंद्रीकरणाची गरज याच गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून निर्माण झाली. उत्पादन संस्थेमध्ये वस्तू निर्मिती क्षेत्रात अनेक वस्तू निर्मिती उद्योग सुरू झाले. विशिष्ट कामासाठी विशिष्ट विभागाची स्थापना झाली. याबरोबरच अधिकाराच्या विकेंद्रीकरणाचाही विचार झाला.

**व्याख्या (Definition) :**

१) " Decentralisation means the division of a group of functions and activities into relatively autonomous units with overall authority and responsibility for their operation."

**- Earl P. Strong**

२) " Decentralisation is simply a matter of dividing up the managenal work and assigning specific duties to the various executive skills ."

**- Newman, Sumer & Wairen**

व्यवस्थापकीय कामांचे वितरण व उत्पादन संस्थेतील संस्थेतील विविध कौशल्य असलेल्या व्यक्तींना विशिष्ट कामाचे वाटप म्हणजे विकेंद्रीकरण होय.

विकेंद्रीकरणामध्ये निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण अभिप्रेत आहे.

**विकेंद्रीकरणाचे प्रकार (Types of Decentralisation) :**

१) **प्रशासकीय विकेंद्रीकरण (Adminlstrative Decentralisation) :** धोरणे व कार्यक्रम ठरविण्याचे अधिकार किती प्रमाणात कोणत्या अधिकार पदावर आहेत याचा विचार केला जातो. स्थानिक अधिकारी वर्गांना यामध्ये अधिकार आहे किंवा नाही हे पाहिले जाते.

२) **राजकोषीय विकेंद्रीकरण (Fiscal Decentralisation) :** उपविभागीय घटकांना, महसूल वाढीचे व खर्चाचे अधिकार किती प्रमाणात आहेत याचा समावेश होतो.

३) **राजकीय विकेंद्रीकरण (Political Decentralisation) :** उपअधिकारी वर्गांना त्याचे प्रशासन व जबाबदाऱ्या निभावण्याचे अधिकार आहेत का याचा विचार केला जातो. उदा- अधिकारी नियुक्ती इ.

**विकेंद्रीकरणाचे टप्पे (Forms of Decentralisation) :**

विकेंद्रीकरण हे जास्त प्रमाणात आहे का कमी प्रमाणात आहे, याचा विचार केला जातो. स्थानिक अधिकाऱ्यांना कितपत अधिकार आहेत हे याद्वारे कळते.

१) **विकेंद्रीकरण (Decentralisation) :** यामध्ये कार्याचे हस्तांतरण खालील पातळीच्या अधिकाऱ्याकडे किती प्रमाणात आहे हे समजते. यामध्ये निर्णयप्रक्रिया व धोरण निश्चिती ही केंद्रीय पातळीवरच असते. यामध्ये स्थानिक व विभागीय पातळीवर काही अधिकार प्रदान केले जातात.

२) **प्राधीकारांचे प्रत्यायोजन (Delegation of Authority) :** यामध्ये धोरणे ठरविण्याचे व उद्दिष्ट्ये निश्चित करण्याची जबाबदारी ही खालच्या पातळीवरील निम स्वायत्त संस्थेवर सोपविली जाते. मात्र केंद्र सरकारवरही याची जबाबदारी असते. उदा- शाळाचे नियंत्रण व व्यवस्थापनाची जबाबदारी स्थानिक पातळीवर सोपविली मात्र निधी पुरविण्याचे काम हे सरकारचेच असते.

३) **केंद्रीय सत्तेकडून स्थानिय सत्तेकडे अधिकाराचे हस्तांतरण (Devolution) :** यामध्ये अधिकाराचे हस्तांतरण केंद्रीय सत्तेकडून स्थानिय सत्तेकडे केले जाते. स्थानिय सत्ता ही धोरण ठरविणे व अंमलबजावणीचे कार्य करते. यामध्ये उद्दिष्ट्ये, पद्धती व सेवा पोहचविण्याची कार्ये ती स्थानिक सत्ता करते.

भारतामध्ये अधिकाराचे हस्तांतरण हे केंद्रीय सत्तेकडून राज्य सत्तेकडे व राजसत्तेकडून स्थानिक सत्तेकडे होताना दिसून येते. मागील काही वर्षामध्ये विकेंद्रीकरणाचा पुरस्कार मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. पंचायत राज व्यवस्थेस मिळालेले अधिकार हे त्याचाच एक भाग आहे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक व्यक्तीचे योगदान महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीस किंवा व्यवस्थापनातील काही व्यक्तीस अधिकार प्रदान केले तर ते विशिष्ट कार्य प्रभावीपणे होईल व कार्यक्षमतेचा पूर्णपणे वापर करता येईल.

**विकेंद्रीकरणाचे फायदे (Advantages of Decentralisation ) :**

**१) उच्च पदावरील अधिकाऱ्यावरील कामाचा ताण कमी होतो –** विकेंद्रीकरणामुळे धोरणे निश्चित करणे व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विभागली जाते. व्यवस्थापन श्रेणीमधील इतर अधिकाऱ्यावर काही जबाबदार सोपवली जाते. यातून उच्च पदावरील अधिकारी वर्गाचा वेळ वाचतो व व्यवस्थापनाचे आणखी काही आवश्यक निर्णय घेऊ शकतात.

**२) विविधता आणण्यास मदत होते –** विकेंद्रीकरणामुळे उत्पादनाचे विविधीकरण करणे शक्य होते. अनेक वस्तू निर्माण करण्याचे प्रयत्न केले जातात. उत्पादन प्रक्रियेमध्ये विविधता आणता येते. नविन बाजार शोधले जातात. अधिकाराचे केंद्रीकरण झाल्यास मात्र अस्तित्वात असलेल्या उत्पादन, उत्पादन प्रक्रिया इ.वरच जास्त वेळ खर्च होतो. मात्र विकेंद्रीकरणामुळे विविधीकरणास मदत होते.

**३) बाजारामध्ये नविन वस्तुंचा समावेश करता येतो –** जेव्हा नवनिर्मिती होते, शोध व संशोधन वाढते तेंव्हा बाजारात नविन वस्तुंचा समावेश होतो. याचाच परिणाम म्हणून जुन्या वस्तुस मोठी स्पर्धा निर्माण होते. ग्राहकांच्या मागणीमध्येही बदल होतो. अशा परिस्थितीमध्ये सत्तेचे/अधिकाराचे विकेंद्रीकरण झाले व विभागीय अधिकाऱ्याना बाजारात तात्काळ झालेले बदल लक्षात घेऊन किंमत, दर्जा, वितरण इ.मध्ये बदल करण्याचे अधिकार दिले तर बाजारासोबत राहता येते.

**४) अधिकाऱ्याचा विकास (Executive Development) –** जेव्हा अधिकाराचे विकेंद्रीकरण होते तेव्हा उत्पादन संस्थेतील काही अधिकाऱ्यांना आपले कौशल्य वाढविण्यास वेळ मिळतो. ते व्यवस्थापकीय संरचनेत महत्त्वाचे बदल सुचवू शकतात. आधुनिक काळात उत्पादन संस्थेची प्रगती ही व्यवस्थापकीय कौशल्यावरच अवलंबून आहे.

**५) प्रेरणा वाढते –** अधिकार विकेंद्रीकरणामुळे काही लोकांच्या हातात अधिकार येतात यातून त्यांना त्यांची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते. त्यांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेतल्यामुळे प्रेरणा मिळते.

**६) नियंत्रण व पर्यवेक्षण सुधारणा होते –** खालच्या पातळीवरील कर्मचाऱ्यावर योग्य नियंत्रण ठेवावयाचे असेल तर विकेंद्रीकरण हे खूप महत्त्वाचे आहे. कारण स्थानिक लोकांचा स्वभाव हा स्थानिक लोकांनाच माहिती असतो.

**७) निर्णय प्रक्रिया जलद होते –** विकेंद्रीकरणामुळे निर्णयप्रक्रिया जलद होते. कारण विविध पातळीवर अधिकारी व्यक्ती वेगवेगळ्या असतात. त्यांना काही अधिकार दिलेले असतात व ते त्यावर निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे निर्णय लवकर घेतले जातात व याचा परिणाम उत्पादनसंस्थेच्या विकासावर होतो.

**विकेंद्रीकरणाचे तोटे (Disadvantages of Decentralisation) :**

विकेंद्रीकरण हे फायद्याचे असले तरी ते धोकादायक सुद्धा ठरू शकते. खालीलप्रमाणे विकेंद्रीकरणाचे तोटे दिसून येतात.

**१) एकसारखी धोरणे आखली जात नाहीत –** प्रत्येक व्यवस्थापक त्याच्याकडे असलेल्या कौशल्यानुसार धोरणे ठरवितो व त्याची अंमलबजावणी करतो. त्यामुळे सर्व धोरणे सारखी राहत नाहीत व एकसारखा विकास दिसून येत नाही.

**२) सुसंगतपणाची समस्या –** अधिकाराचे हस्तांतरण केल्यामुळे सुसंगतपणा राहत नाही.

**३) वित्तीय भार वाढतो –** विकेंद्रीकरणामध्ये अधिकार स्विकारणारी व्यक्ती ही प्रशिक्षित असावी लागते. छोट्या उद्योगामध्ये विविध क्षेत्रानुसार कौशल्य असलेली व्यक्तीची नेमणूक केली तर खर्चामध्ये वाढ होते.

**४) पात्र व्यक्ती नसतात –** बऱ्याच वेळा विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेस कमी पात्र व्यक्तीकडे अधिकार जातात व त्याचा उत्पादनसंस्थेच्या विकासावर विपरीत परिणाम होत असतो.

**५) कलह निर्माण होतात –** विकेंद्रीकरणामध्ये प्रत्येक अधिकारी व्यक्तीवर नफा मिळविण्याचा दबाव

असतो. बऱ्याच वेळा बैठकामध्ये त्यांनी तयार केलेल्या नफा विश्लेषणावरून बरेच कलह निर्माण होतात.

वरीलप्रमाणे विकेंद्रीकरणाचे फायदे-तोटे नमूद केलेले असले तरी विकेंद्रीकरण हे नियंत्रीत स्वरूपाचे असेल व जबाबदार प्रशिक्षित व्यक्तीकडे अधिकाराचे हस्तांतरण झाले तर उद्योगसंस्थेचा वेगाने विकास होतो.

**सूक्ष्म पातळी नियोजन (Micro Level Planning) :**

जेव्हा राष्ट्रीय पातळीवर नियोजनाचा आराखडा तयार केला जातो व त्याची अंमलबजावणी केली जाते तेव्हा त्यास राष्ट्रीय नियोजन म्हटले जाते. संबंध अर्थव्यवस्थेसाठी ते नियोजन असते. अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्राचा त्यात समावेश होतो. यामध्ये संपूर्ण देशाच्या गरजा व उपलब्ध संसाधने यांचा विचार केला जातो. समग्रलक्ष्मी नियोजनाच्या अंमलबजावणीनंतर असे लक्षात आले की राष्ट्रीय गरजा व यामध्ये अंतर असते त्यामुळे इच्छित उद्दिष्ट्ये पूर्ण करता येत नाही.

सुक्ष्म पातळी नियोजनामध्ये तळापासून नियोजन (Grass root planning) ही संकल्पना आहे. सुक्ष्म पातळी नियोजन ही विकासाची महत्त्वाची संकल्पना आहे. अलिकडील काळामध्ये सुक्ष्म पातळी नियोजनास विभाग नियोजन किंवा क्षेत्र नियोजन असेही म्हटले जाते. सुक्ष्म पातळी नियोजनास विकेंद्रीत नियोजन असेही म्हटले जाते. यामध्ये देशातील सर्वच भागांचा विकास अभिप्रेत आहे. सुक्ष्म पातळी नियोजनामध्ये देशातील सर्व प्रकारच्या संसाधनाचा (उदा- नैसर्गिक व मानवी) पूर्णपणे वापर केला जातो. यामुळे विकासाची फळे समाजातील सर्व स्तरातील लोकांना व विभागांना मिळतात. भारतामध्ये सुक्ष्म पातळी नियोजनाचा अवलंब करण्यामागे प्रादेशिक असमतोल कमी करणे व स्थानिक गरजांची पूर्तता करणे हा उद्देश होता. प्रत्येक विभागाची वैशिष्ट्ये व गरजा या वेगवेगळ्या असल्यामुळे राष्ट्रीय उद्दिष्टांची सांगड ही स्थानिक गरजासोबत बसत नसल्यामुळे सुक्ष्म पातळी नियोजनाची आवश्यकता आहे. विभागीय असमतोल, उत्पन्न विषमता, स्थानिक बेरोजगारी, त्याचबरोबर मोठ्या शहरातील वाढती लोकसंख्या इ. समस्या भारतामध्ये अलिकडील काळात मोठ्या प्रमाणात आहेत व राष्ट्रीय नियोजनाच्या माध्यमातून या समस्या सोडविण्यामध्ये अपेक्षित यश आलेले दिसत नाही. स्थानिक पातळीवरील गरजा लक्षात घेऊन नियोजनाचा प्रवाह हा खालून वरती गेला पाहिजे हे सुक्ष्म पातळी नियोजनामध्ये अभिप्रेत आहे. सुक्ष्म पातळी नियोजनमध्ये सामान्य माणसांचे प्रश्न, स्थानिक प्रश्न, ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतासारख्या विशाल आकाराच्या देशामध्ये प्रादेशिक विविधता मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर मोठी लोकसंख्याही आहे. भारत हा देश खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ६५% लोकसंख्या खेड्यामध्ये राहते. दारिद्र्याचे प्रमाण हे ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य, बेरोजगारी इ. समस्या सोडविण्यासाठी सुक्ष्म पातळी नियोजनची मोठी मदत होते.

भारतामध्ये नियोजनाच्या सुरूवातीलाच देशातील संसाधनाचा पर्याप्त प्रमाणात उपयोग करून लोकांचे राहणीमान उंचावणे हा उद्देश होता. उत्पादन वृद्धीसोबत समाजातील सर्व लोकांना रोजगार निर्माण करून देणे हा उद्देश होता. ग्रामीण भागातील लोकांचे कल्याण व समाजातील मागास वर्गाची प्रगती हा उद्देश ठेवण्यात

आला होता. नियोजनाच्या ६० वर्षानंतर आज समाजातील आर्थिक विषमता वाढल्याचे दिसते. त्याचबरोबर दारिद्र्य निर्मूलनाचे उद्दिष्ट्य अजुनही पूर्ण झालेले नाही. त्यामुळेच अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समावेशक वृद्धी हे मुख्य उद्दिष्ट्य ठेवण्यात आले. चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये सुक्ष्म पातळी नियोजनाची गरज व्यक्त केली गेली. सुक्ष्म पातळी नियोजनामध्ये जिल्हा हा नियोजन घटक म्हणून निवडला जातो व त्यानुसार नियोजन केले जाते.

महात्मा गांधीनी नियोजनामध्ये खेडेगाव हे एक मुलभूत घटक समजले व तेथील प्रशासनव्यवस्था ही व्यक्तिगत स्वातंत्र्य व लोकशाही पद्धतीची असावी असे म्हटले. त्यामागील त्यांचा उद्देश हा नियोजनामध्ये खेड्यातील व्यक्तींचा समावेश असावा हा आहे. ग्रामीण भागातील लोक नियोजन तयार करणे, अंमलबजावणी करणे व त्याचे मुल्यमापन करणे यामध्ये सहभागी असतील तर नियोजनाद्वारे ठरविलेली उद्दिष्ट्ये पूर्ण करता येतात. लोकांचा सहभाग हा त्यांना जबाबदार बनवतो.

गांधीजीनंतर भारतामध्ये व इतर राष्ट्रामध्ये ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम तयार केले गेले. उदा - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, ग्रामीण रोजगार हमी योजना, अन्नासाठी काम योजना, लहान व सिमांत शेतकरी विकास योजना इत्यादी.

| Sr. No. | State | Districts |
|---|---|---|
| 1) | Andhra Pradesh | East Goodavri |
| | | Adilabad |
| | | Anantpur |
| 2) | Assam | Nalbari |
| 3) | Bihar | Manger |
| | | Purnea |
| | | Ranchi |
| 4) | Himachal Pradesh | Shimla |
| | | Mandi |
| | | Kangra |
| 5) | Jammu & Kashmir | Dist.in Jammu Division |
| | | Dist.in Shrinagar Division |
| 6) | Karnataka | Kolar |
| | | Mysore |
| | | Dharwad |
| | | Raichur |
| 7) | Kerla | Kottayam |
| | | Cannanore |
| 8) | Maharashtra | Nashik |
| 9) | Uttar Pradesh | Jhansi |
| | | Hardol Sitapur |

**State and Districts Selected for Pilot Projects in District Planning.**

सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये वरीलप्रमाणे जिल्ह्यांची निवड करण्यात आली.

**सूक्ष्म पातळी नियोजनाचे फायदे :**

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास लवकर होतो.

२) शेती क्षेत्राचा विकास जलद व वेगाने होतो.

३) स्थानिक उद्योगधंदे निर्माण होतात व प्रादेशिक असमतोल कमी होतो.

४) शहरीकरणाची समस्या योग्य प्रकारे सोडविली जाते.

५) देशातील सर्वच भागात मुलभूत अशा आरोग्य शिक्षण व सामाजिक सेवा पुरविल्या जातात.

६) शेती आधारित प्रक्रिया उद्योगाचा विकास होतो.

७) ग्रामीण रोजगारात वाढ होते.

८) ग्रामीण तंत्रज्ञान वाढते.

९) शेतमाल साठवणूक सुविधा निर्माण करता येतात.

वरील प्रकारचे फायदे हे सुक्ष्म पातळी नियोजनामुळे निर्माण होतात. सुक्ष्म पातळी नियोजनामध्ये प्रादेशिक घटक लक्षात घेऊन ते तयार केले जाते. यामध्ये समान वैशिष्ट्ये असणाऱ्या काही खेड्यांचा समूह तयार केला जातो व नियोजनाचा अवलंब केला जातो.

राष्ट्रीय नियोजनास पूरक असे सुक्ष्म पातळी नियोजन तयार केले तर विकसाचा वेग वाढतो व संतुलित विकास होतो.

**४.२.३ उदारीकरणानंतरच्या भारतीय विकास कामगिरीचा आढावा :**

१९९० च्या सुरूवातीस भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या संरचनात्मक बदलत सामोरी गेली. हे आपल्या सर्वांना माहितच आहे. हे बदल आयात पर्यायीकरणाकडून पुन्हा त्याच्याकडे वाटचालीचे होते. आज आपण उदारीकरणानंतरच्या तीन दशकाच्या कामगिरीचा आढावा घेत असताना अनेक बदलांचा मागोवा घेणार आहोत. या मागील तीन दशकातील भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी समजून घेणे आवश्यक आहे. व हा कालावधी विकास कामगिरी समजून घेण्यासाठी पुरेसा आहे. आर्थिक सुधारणानंतरची भारतीय अर्थव्यवस्था वेगवान, वृद्धीदराने वाढत असल्याचे आपणास मान्य केले पाहिजे. आज त्याआधारेच आपण २०२५ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ५ पद्म (Trillion US) अमेरिकन डॉलरचा भविष्य अंदाज करत आहोत. १९९० चा सुधारणा कार्यक्रम व त्यानंतरचा आर्थिक विकास हा व सरंचनात्मक कार्यक्रमामुळे विकास प्रक्रिया ही वेगवान झाल्याचेही दिसते. आज स्थितीमध्ये सर्वात व जास्त वृद्धीदराने (चीनपेक्षा जास्त) भारतीय अर्थव्यवस्था वाढत असल्याचे वास्तव आपणासमोर आहे. १९५०-५१ ते १९९०-९१ या कालावधीमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा सरासरी मधील

विकास दर हा ४.०७ टक्के इतका होता. मात्र १९९० ते २०१० या कालावधीमध्ये ही सरासरी ६.८६% असल्याचे दिसून येते. १९८५ च्या पूर्वीच्या वृद्धी दरात हिंदू वृद्धी दर म्हणून ओळखले जात असे. हिंदू वृद्धी दर म्हणजे खालच्या पातळीवरचा कुंठित वृद्धीदर होय. १९९१ मध्ये नविन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले व त्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अनेक बदल झाले. अर्थव्यवस्थेमध्ये परकीय गुंतवणूकीच्या बाबतीत उदारीकरण स्विकारण्यात आले. त्यानंतर खाजगीकरण करण्यात आले. खाजगी उद्योगावरील निर्बंध कमी करण्यात आले. परवाना राज टप्प्याटप्प्याने संपुष्टात आणण्यात आले. विदेशी व्यापारामध्ये फार मोठ्या प्रमाणावर बदल झाले व त्यातून आयात व निर्यातीवरील प्रशुल्क दर फार मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आले. आर्थिक सुधारणा या दोन टप्प्यामध्ये आपणास पाहता येते. त्यात पहिल्या टप्प्यातील सुधारणा (First Generation Reform) व दुसऱ्या टप्प्यातील सुधारणा (Second Generation Reform) म्हणून ओळखले जाते. २००० पर्यंत पहिल्या टप्प्यातील सुधारणा व २००० नंतर दुसऱ्या पीढीच्या सुधारणा म्हणून ओळखले जाते. दुसऱ्या पीढीच्या सुधारणा काळातील सरासरी वृद्धीदर हा ७.३२ टक्के (२०००-२००९) इतका नोंदवला गेला. आज भारतीय अर्थव्यवस्था जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते.

भारतीय अर्थव्यवस्थेची यशस्वी गाथा ही परकीय गुंतवणूकीत झालेल्या मोठ्या वृद्धीद्वारेही समजून घेणे आवश्यक आहे.

**उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (Liberalization, Privatization and Globalization) :**

भारत सरकारने १९९०-९१ पासून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या नविन धोरणाचा स्वीकार केला. या धोरणाच्या स्विकाराअगोदर भारत हा अनेक संकटातून जात होता. स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) मोठ्या प्रमाणावर पसरले होते. दीर्घकालीन उत्पादनाचे कल हे घटत्या स्वरूपाचे होते. हे या अगोदर भारताने परंपरागत धोरणाचा अवलंब केल्यामुळे घटत होते. औद्योगिक क्षेत्रावर अनेक बंधने लादण्यात आलेली होती. आंतरराष्ट्रीय व्यापार बंदिस्त होता. त्यावर अनेक बंधने लादण्यात आलेली होती. विकास प्रक्रियेमध्ये संसाधनाचा वापर पर्याप्त प्रमाणात होत नसल्याचेही दिसून येते. त्याचवेळी जगातील बहुतांश पाश्चिमात्य देशामध्ये वेगात विकास होत गेला. चीन हा देश विकासाच्या उच्चांकी वृद्धीद्वारे वर पोहोचलेला होता. यावेळी भारतीय अर्थव्यवस्था अनेक संकटांचा सामना करत होती. यामध्ये तांत्रिक विकसाचे मागासलेपण विदेशी चलनांच्या तुटवडा, मोठ्या प्रमाणावरील विदेशी कर्जे, विदेशी चलनातील अर्थव्यवस्थापन कमी पातळीवरील विदेशी चलन राखीव आंतरराष्ट्रीय कर्जे, राष्ट्रीय कर्जभार, वाढता महागाई दर, वाढती बेरोजगारी, यांचा विचार करावा लागेल. अशा स्वरूपाच्या अनेक संकटाने भारतीय अर्थव्यवस्था वेढलेली दिसून येते. उदारीकरण जागतिकीकरण व खाजगीकरणाचा कार्यक्रम हा जुलै १९९१ च्या नविन औद्योगिक धोरणाचा अवलंब करून स्वीकारण्यात आला. या धोरणाचा प्रकल्प उद्देश हा भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सातवी मोठी अर्थव्यवस्था बनविणे हा निश्चित करण्यात आलेला होता. नविन औद्योगिक धोरणाची सुरूवात करून औद्योगिक परवाना राज संपुष्टात आणण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगाचे प्रमाण कमी करण्यात आले व आयात निर्यातीवरील निर्बंध कमी करण्यात आले.

नविन औद्योगिक धोरण (१९९१) हे आर्थिक सुधारणाच्या मध्यवर्ती राहीले. सर्वच आर्थिक सुधारणा या नविन औद्योगिक धोरणाच्या सभोवतीच करण्यात आल्या. नंतरच्या काळातील सुधारणासाठी नविन औद्योगिक धोरणच केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते. देशातील आर्थिक नियमनामध्ये मोठ्या प्रमाणावरील बदल १९९१ च्या नविन आर्थिक धोरणाद्वारे घडवून आणण्यात आले. सुधारणा बदल हे अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर घडून आले. धोरणाचा एक भाग म्हणून सार्वजनिक क्षेत्राची भूमिका पुर्ननिर्धारित करण्यात आली. नविन आर्थिक धोरणाद्वारे सार्वजनिक क्षेत्रामध्ये निर्गुंतवणूक कार्यक्रमास सुरवात केली गेली. प्रमुख सार्वजनिक उद्योग क्षेत्रामध्ये खाजगी उद्योगांना परवानगी देण्यात आली. या धोरणाद्वारे विदेशी थेट गुंतवणूकीस(FDI) परवानगी देण्यात आली. वेगवान वृद्धीसाठी मोठ्या प्रमाणावरील औद्योगिकरण विदेशी थेट गुंतवणूकीशिवाय घडून येणार नाही. म्हणून हे बदल करण्यात आले. या धोरणाद्वारे खाजगी क्षेत्राची व्याप्ती वाढविण्यात आली. यामध्ये विदेशी भांडवल गुंतवणूक व विदेशी तंत्रज्ञान या दोन्ही वरही भर देण्यात आला. उदारीकरणाचा अवलंब करून टप्प्याटप्प्याने विदेशी गुंतवणूक वाढविण्यास प्राधान्य देण्यात आले. औद्योगिक परवाना पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्यात आले ही अत्यंत महत्त्वाची सुधारणा म्हणून ओळखली जाते. औद्योगिक परवाना काढणे धोरणा अगोदर अत्यंत गुंतागुंतीचे होते. त्यामुळे त्यास परमीट राज असे म्हटले जायचे. नवीन धोरणामध्ये लालफिती कारभार कमी करण्यात आला.

औद्योगिक नियमनाबाबतीत मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले.

**भारतीय अर्थव्यवस्थेचा परवाना राज (Permit Raj) ते जागतिकीकरणापर्यंतचा प्रवास :**

**पहिला टप्पा :- १९४७-१९६५**

१. वेष्टणाधारित उद्योगामध्ये सरकार पुरस्कृत गुंतवणूकीवर केंद्रीत धोरण.

२. लोह पोलाद वा रसायने इ. सारख्या विविध उद्योगाच्या स्थापनेस प्राधान्य.

३. यापैकी बरेचसे उद्योग आजही अस्तित्त्वात असून ते त्या त्या क्षेत्रातील मोठे उद्योग म्हणून गणले जातात.

**दुसरा टप्पा :- १९६५-१९८०**

१. सरकारचे उद्योगातील सहभाग वाढला.

२. मजबुत परवाना कायदे सुरू केले गेले, यामध्ये आयात पर्यायीकरणावर विशेष भर देण्यात आला.

३. या कालावधीत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग वाढले, खाजगी क्षेत्रामध्ये लघुउद्योगामध्ये वाढ झाली.

**तिसरा टप्पा :- १९८० ते १९९०**

१. सरकारने अंशत: अर्थव्यवस्था विदेशी व्यापारासाठी खुली केली, त्याचबरोबर कार्यक्षेत्रामध्ये खाजगी सहभाग वाढविला. याद्वारे काही क्षेत्रामध्ये मजबूत वृद्धी घडून आली.

**चौथा टप्पा :- १९९० च्या प्रारंभी**

१. उद्योगामध्ये पुन्हा उदारीकरण करण्यात आले.

२. परवाना पद्धती कमी करण्यात आली.

३. प्रशुल्क कमी करण्यात आले.

४. अनेक क्षेत्रामध्ये विदेशी थेट गुंतवणूकीस (FDI) परवानगी देण्यात आली.

**पाचवा टप्पा :– २००० पासून पुढे**

१. या अवस्थेत अनेक कंपन्यांनी विकासाची कामे घेण्यास सुरूवात केली.

२. अनेक भारतीय उद्योग हे स्पर्धात्मक बनले.

३. अनेक भारतीय उद्योगांनी आंतरराष्ट्रीय बाजारात प्रवेश केला

४. अनेक उद्योगांनी आपला वेगाने विस्तार केला व मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी केली.

**१९९१ च्या नविन औद्योगिक धोरणाची उद्दिष्ट्ये :**

देशातील उद्योगांचा आकृतीबंध व देशातील औद्योगिक क्षेत्रात नियमित व नियंत्रणासाठी प्रक्रीया, तत्वे, धोरणे व नियम यांचा एकत्रित संच होय. १९९० च्या पूर्वीच्या औद्योगिक धोरणाचा भर हा औद्योगिक विकासामध्ये सरकारी हस्तक्षेपावर होता. या धोरणाद्वारे गतिमान विकास होणार नाही हे लक्षात घेवून गतिमान अर्थव्यवस्था जागतिक क्षेत्रात खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९८० च्या दशकामध्ये काही प्रमाणात उदारीकरणास सुरूवात करण्यात आलेली होती. मात्र मोठ्या प्रमाणावरील उदारीकरण हे १९९० नंतर करण्यात आले. या नविन औद्योगिक धोरणामध्ये उद्योगावरील अनावश्यक बंधने काढून टाकण्यात आली. उद्योगांची कार्यक्षमता वाढविण्यात आली. उद्योगातील तंत्रज्ञान व नवनिर्मिती वाढविण्यावर भर देण्यात आला. भारतीय वस्तुची जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. पी.जे. कुरियन यांनी १९९१ चे नविन औद्योगिक धोरण जाहीर केले.

**उद्दिष्टये :**

१. अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करणे.

२. रोजगार विषयक संधी निर्माण करणे.

३. विदेशी सहकार्य व विदेशी गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.

४. सार्वजनिक क्षेत्रास जास्त स्पर्धात्मक बनविणे.

५. मागास भागाच्या विकासास प्राधान्य देणे.

६. अर्थव्यवस्थेस सरकारी बंधनातून स्वतंत्र करणे.

७. उद्योगाची उत्पादन क्षमता व स्पर्धात्मकता वाढविणे.

८. उद्योगाना उत्पादन वाढीस चालना देणे.

९. खाजगी क्षेत्रास स्वतंत्रपणे विकास करण्यास स्वातंत्र्य देणे.

१०. आधुनिक स्पर्धात्मक अर्थव्यवस्था विकास घडविणे.

११. उत्पादन क्षमता वाढविण्यास प्रोत्साहन देणे.

१२. आयात निर्यातीवरील बंधने कमी करणे व त्यास चालना देणे.

१३. विदेशी थेट गुंतवणूकीस (FDI) प्रोत्साहन देणे.

१४. लघु व मध्यम उद्योगाच्या विकसावर भर देणे.

वरील उद्दिष्ट्यास केंद्रीत ठेवून देशाचा औद्योगिक विकास घडवून आणण्याचे निश्चित करण्यात आले. याचाच भाग म्हणून संरचनात्मक सुधारणा कार्यक्रम आखण्यात आला. संरचनात्मक सुधारणा या दीर्घकालीन उद्दिष्ट्ये ठेवून आमलात आणण्याचे निश्चित करण्यात आले. या कार्यक्रमातंर्गत जागतिक स्पर्धात्मकता केंद्रस्थानी ठेवण्यात आली. भारतीय अर्थव्यवस्थेतील ताठरता याद्वारे दूर करण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी स्थिरकरण उपाय म्हणून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसुत्रीचा अवलंब करण्यात आला. यामध्ये उणीवा व कमतरता दूर करून व भांडवल नियंत्रित ठेवून विकास धोरणे राबवण्याचे निश्चित करण्यात आले.

**उदारीकरण :**

उदारीकरणामध्ये देशाच्या आर्थिक विकासाच्या मार्गात असणारे अडथळे दूर करणे व कमी नियंत्रणाद्वारे खाजगी क्षेत्रास सोबत घेवून विकास करण्याचे निश्चित करण्यात आले. यामध्ये कमीत कमी बंधने कशी असतील यावर लक्ष केंद्रीत केले. खाजगी क्षेत्राद्वारे मोठ्या प्रमाणावर विकास करण्याचे निश्चित केले.

**उद्दिष्टये :**

१. देशांतर्गत उद्योगातील स्पर्धात्मकता वाढविणे.

२. नियंत्रित आयात व निर्यातीच्या साह्याने इतर देशासोबतचा विदेशी व्यापार वाढविणे.

३. विदेशी तंत्रज्ञान व भांडवलास प्रोत्साहन देणे.

४. देशासमोरील जागतिक व्यापाराचा विस्तार करणे.

५. देशावरील कर्जाचा भार कमी करणे.

**खाजगीकरण :**

तीन प्रमुख धोरणापैकी खाजगीकरण हे दुसरे धोरण होय. यामध्ये सार्वजनिक क्षेत्राचे प्राबल्य कमी करून खाजगी क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यात आला. यामध्ये सरकारची मालकी व व्यवस्थापन ही भूमिका कमी करण्यात आली. अनेक सार्वजनिक उद्योगास खाजगी उद्योगामध्ये रूपांतरण करण्याचे निर्धारित करण्यात आले. यामध्ये निर्गुंतवणूकीद्वारे व सरकारी उद्योगातील भाग विकून यातील व्यवस्थापन व मालकी कमी करण्याचे धोरण आखण्यात आले. प्रत्येक अंदाजपत्रकामध्ये निर्गुंतवणूकीची उद्दिष्ट्ये ठरविण्यात येतात.

यातून तीन प्रकारे खाजगीकरण करण्यात आले.

१) शासनाची १०० टक्के मालकी खाजगी उद्योगाकडे देणे व यास व्यूहरचनात्मक विक्री (strategic sale) असे म्हटले जाते.

२) आंशिक खाजगीकरण किंवा आंशिक विक्री :- यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे १०० टक्के पेक्षा कमीत कमी भाग खाजगी क्षेत्रास विकले जातात. मालकी व व्यवस्थापनाचे हस्तांतरण खाजगी क्षेत्राकडे जाते. यास आंशिक विक्री म्हटले जाते.

३) या प्रकारामध्ये निर्गुंतवणूकीद्वारे सार्वजनिक उद्योगाचे ५ ते १० टक्के भाग खाजगी उद्योगांना विक्री केले जातात व अंदाजपत्रकीय तूट नियंत्रणात आणली जाते.

**उद्दिष्टये :**

१. सरकारची आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करणे.

२. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगावरील ताण कमी करणे.

३. निर्गुंतवणूकीद्वारे निधी उभा करणे.

४. सरकारी उद्योगाची कार्यक्षमता वाढविणे.

५. ग्राहकांना चांगल्या व सुधारित वस्तू व सेव पुरविणे.

६. समाजामध्ये आरोग्यदायी स्पर्धा निर्माण करणे.

७. भारतामध्ये विदेशी थेट गुंतवणूकीस चालना देणे.

**जागतिकीकरण : (Globalization)**

जागतिकीकरणाद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिक अर्थव्यवस्थेसोबत एकात्म करणे, हे महत्त्वाचे ध्येय होते. जागतिकीकरणामध्ये प्रकल्प लक्ष हे विदेशी व्यापार व खाजगी व संस्थात्मक गुंतवणूकीवर असते. जागतिकीकरण म्हणजे संबंध जगाचे आर्थिक बाबतीत एकत्रिकरण करणे होय. यासाठी विविध व्यूहरचना व धोरणे अवलंबिली जातात. यामध्ये सीमेशिवाय जग अभिप्रेत आहे. एखाद्या देशाची गरज सहजपणे इतर देशातून पूर्ण केली जाते व जगाची एकमेव अशी बाजारपेठ तयार केली जाते. जागतिकीकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे बाह्यस्त्रोत (outsourcing) प्रक्रिया होय. याद्वारे जगातील कोणताही देश किंवा उद्योग कोणत्याही ठिकाणची सर्व प्रकारची संसाधने वापरतो. जागतिकीकरणा अगोदर यावर अनेक बंधने लादली गेली होती. बाह्यस्त्रोतामुळे कोणतेही काम कमी खर्चामध्ये करून घेता येते. उत्पादन विषयक संसाधने किफायतशीरपणे वापरून उत्पादन घेता येते. चांगल्या पद्धतीची संसाधने कमी खर्चामध्ये उपलब्ध होतात. यामध्ये अनेक सेवाही येतात. उदा- कायदेशीर सल्ला, विपणन विषयक सल्ला, तांत्रिक सहकार्य, इ. चा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञानातील विकासामुळे यामध्ये देवाणघेवाण अगदी सुलभ झाली. कंत्राटी कामगाराची देवाणघेवाण सुध्दा सोपी झाली. याद्वारे सर्वच आर्थिक व्यवहार हे जागतिक पातळीवर विस्तारणे सोईचे झाले. जागतिकीकरणानंतर अनेक प्रकारचे संवादाविषयक

व्यवसाय प्रक्रीया बाह्यस्त्रोत उद्योग उदा- कॉल सेंटर जगभर सुरू झाले. त्यांचा व्यवहार हे आयाताच्या माध्यमातून होतात. यामध्ये आरोग्य विषयक सल्ला, बँक सेवा, खाते नोंद सेवा व शिक्षण व वैद्यकिय बाह्यस्त्रोत मोठ्या प्रमाणावर विकसित झाले व हे सर्व व्यवहार विकसित देशातून विकसनशील देशांमध्ये स्थलांतरीत झाले. याद्वारे बहुदेशीय कंपन्याच विस्तार मोठ्या प्रमाणावर झाले. दर कमी झाल्यामुळे किंमत कमी झाली व त्याचबरोबर विक्रीही वाढली. यातून नफाही वाढला. भारतातील कौशल्य यामध्ये मोठ्या प्रमाणावर वापरण्यात आले. भारतामध्ये श्रम हे कमी वेतनावर उपलब्ध होते. त्याचा फायदा जागतिकीकरणामुळे देशामध्ये झाला व अनेक मोठ्या कंपन्यांनाही झाला. आज भारत हा देश बाह्यस्त्रोतासाठी महत्त्वाचे केंद्र झाला आहे.

**उद्दिष्टचे :**

१. देशादेशातील सरकारे व राजकीय संस्थाना जवळ आणणे व त्यांना परस्परपुरक बनविणे.

२. जागतिक बाजारास जवळ आणणे.

३. ग्राहकांचे महत्तम कल्याण साध्य करणे.

४. नवनिर्मिती व नविन विचारात मुक्त प्रवाही करणे.

५. आयात व निर्यातीवरील बंधने कमी करणे.

६. मजबूत नागरी समाज निर्माण करणे.

७. नागरिकांचे अधिकार व मानवविषयक दृष्टिकोन संरक्षित व वृद्धींगत करणे.

**उदारीकरणानंतरच्या भारतीय विकास कामगिरीचा आढावा :**

१९९१ च्या औद्योगिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल घडून आले. उदारीकरणाच्या धोरणाचा अंगिकार केल्यामुळे देशामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवक झाली. त्यातून गुंतवणूकीमध्ये वाढ होवून उत्पानदानामध्ये व रोजगारामध्ये वाढ घडून आली. खाजगीकरणांच्या धोरणाचा अवलंब केल्यामुळे उद्योगाची स्पर्धात्मकता वाढली व तंत्रज्ञान आयात मोठ्या प्रमाणावर झाली. जागतिकीकरणाचा अवलंब केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर व्यापारामध्ये वाढ घडून आली. १९९० मध्ये भारतीय अर्थव्यवस्था फार मोठ्या आर्थिक संकटामध्ये होती. सोने गहाण टाकून सरकारला कर्जे उभे करावे लागले होते. विदेशी चलन साठा फक्त दोन आठवडे पुरेल इतकाच होता. याचाच परिणाम म्हणून रूपयाचे अवमुल्यन केले गेले. या वाईट आर्थिक स्थितीतून बाहेर पडण्यासाठी नविन औद्योगिक धोरण लागू करून संरचनात्मक सुधारणा कार्यक्रम अंमलात आणण्यात आला. भारतीय अर्थव्यवस्थेत झालेल्या प्रगतीचा आढावा खालील विविध कोष्टकावरून आपणांस घेता येईल.

**कोष्टक क्र. १ समग्र राष्ट्रीय उत्पन व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न.**

**(चालू किमतीनुसार कोटी रू. मध्ये)**

| वर्षे | समग्र राष्ट्रीय उत्पन्न कोटी रू. | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न कोटी रू. | दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न रू. मध्ये |
|---|---|---|---|
| १९९०-९१ | ५७८६६७ | ५२६०१७ | ६२७० |
| १९९५-९६ | १२१३२४१ | ११००६५५ | ११८६१ |
| २०००-०१ | २१५४६८० | १९४७७८८ | १९११५ |
| २००५-०६ | ३६६७२५३ | ३३०९५३२ | २९८६९ |
| २००९-१० | ६४३९८२७ | ५७८००२८ | ४९४०२ |
| २०१०-११ | ७७०२३०८ | ६९४२०८९ | ५८५३४ |
| २०११-१२ | ८६५९५०५ | ७७४२३३० | ६३४६२ |
| २०१२-१३ | ९८२७२५० | ८७६६३४५ | ७०९८३ |
| २०१३-१४ | ११०९३६३८ | ९८९७६६३ | ७९११८ |
| २०१४-१५ | ११३२०५२९ | १०९७८२३८ | ८६६४७ |
| २०१५-१६ | १३६१२०९५ | १२१६२३९८ | ९४७९७ |
| २०१६-१७ | १५१८५९८६ | १३५९५२६१ | १०४६५९ |

Re = Revised Estimate

Source - Economic Survey 2019-20 Volume II

१९९०-९१ मध्ये ५७८६६७ कोटी रू. असलेले समग्र राष्ट्रीय उत्पन्न हे इ.स. २०१६-१७ मध्ये १,५१८५९८६ कोटी इतके वाढले. ही वाढ अंदाजे ३० पट इतकी असल्याचे दिसते. निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नामध्येही अशीच वाढ आपल्यास आढळून येते. दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न हे मागील २७ वर्षामध्ये ६२७० रू. (१९९०-९१) पासून १०४६५९ रू. (२०१६-१७) इतके वाढले आहे. दरडोई उत्पन्नामध्ये १६ पट इतकी वाढ झाल्याचे आढळून येते. ही वाढ उदारीकरण जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या परिणामातून दिसून येते. दरडोई उत्पन्न वाढीमुळे बाजारात उपभोग्य खर्चामध्ये वाढ होते. समग्र राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा दर हा आर्थिक सुधारणानंतर वाढला असल्याचे दिसते. तो दर इ.स. २०००-०१, २००१-०२, २००२-०३ ही वर्षे वगळता दोनअंकी असल्याचे दिसते. हा दर २००१०-११ मध्ये सर्वोच्च १९.६ असल्याचे आढळते. निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नातील वृद्धीचा दरही २०००-०१, २००१-०२ व २००२-०३ ही वर्षे वगळता दोन अंकी असल्याचे दिसते. २०१०-११ मध्ये तो सर्वोच्च २०% इतका दिसून येतो. दरडोई उत्पन्न वाढीचा दर हा १९९७-९८, २०००-०१, २००१-०२ व २००२-०३ ही वर्षे वगळता दोनअंकी असल्याचे दिसते. हा दर इ.स. २०१०-११ मध्ये सर्वोच्च १८.५% असल्याचे दिसते. २०१४-१५ नंतर हा दर कमी येत असल्याचे दिसून येते. २०१४-१५ - ९.५% २०१५-१६ - ९.४% व २०१६-१७ - १०.४% इतका दिसून येतो. हा दर वाढणे आवश्यक असून तो शुन्य वाढीस चालना देतो.

**कोष्टक क्र. २ समग्र देशांतर्गत बचत दर व समग्र भांडवल संचय दर**
**(% to GDP at Current Market Price)**

| Year | समग्र देशांतर्गत बचत दर २००४-०५ Series | समग्र भांडवल संचय दर |
|---|---|---|
| १९९० - ९१ | २२.९ | २४.९ |
| १९९५ - ९६ | २३.६ | २६.१ |
| २००० - ०१ | २३.७ | २४.१ |
| २००५ - ०६ | ३३.४ | ३४.३ |
| २००९ - १० | ३३.७ | ३६.३ |
| २०१० - ११ | ३३.७ | ३६.५ |
| | २०११ - १२ Series | |
| २०११ - १२ | ३४.६ | ३९.६ |
| २०१२ - १३ | ३३.९ | ३८.३ |
| २०१३ - १४ | ३२.१ | ३४.० |
| २०१४ - १५ | ३२.२ | ३४.३ |
| २०१५ - १६ | ३१.१ | ३२.१ |
| २०१६ - १७ | ३०.० | ३०.२ |
| २०१७ - १८ | ३०.५ | ३०.९ |

Source - Economic Survey 2019-20 Volume I

समग्र भांडवल संचय दर हे एक स्थूल अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. १९३० पासून ही संकल्पना वापरली जाते. संख्याशास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास याद्वारे नवीन भांडवली भत्ता निर्मितीचे मोजमाप केले जाते. याद्वारे उद्योग क्षेत्र, सरकारी क्षेत्र व कौटुंबिक क्षेत्रामध्ये किती प्रमाणात स्थिर मालमत्ता निर्माण झाल्या हे ही मोजता येते. या समग्र देशांतर्गत उत्पादनावरील खर्च मोजला जातो. यातून गुंतवणूकीची पूर्ण कल्पना येते. समग्र भांडवल संचय दराद्वारे एकूण गुंतवणूकीचे मोजमाप करता येत नाही. कारण याद्वारे फक्त निव्वळ वाढ लक्षात घेतली जाते. या दरास प्रवाह मूल्य म्हणूनही ओळखले जाते. स्थिर मालमत्ता विक्री, वस्तू व्यापार भांडवल हस्तांतरण, वित्तीय करार, इ. द्वारे धारण केल्या जातात व या विक्री, वस्तू, व्यापार व भांडवल हस्तांतरण याद्वारे कमी होतात. या स्थिर मालमत्ता यंत्रे, उद्योग संचय, जमीन इमारत वाहन याद्वारे मोजल्या जातात. उद्योगाच्या बाबतीत या वस्तूंवर आधारीत उद्योग, बांधकाम व सेवा यामध्ये मोजतात तर आर्थिक क्षेत्रामध्ये या निवासी इमारत व अनिवासी इमारत खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र व बाजार क्षेत्र व बाजार विरहीत क्षेत्र यामध्ये मोजल्या जातात. गुंतवणूक ही चक्रीय स्वरूपाची असते. मंदीच्या काळात ती मोठ्या प्रमाणावर कमी होते व यातून भांडवल संचय दर कमी होतो.

कारण उत्पादनसंस्था कमी नफा अपेक्षित असतात. २०११ मध्ये चीनमध्ये हा दर ४५.५० टक्के इतका होता. जपानमध्ये तो २२.९० टक्के इतका होता. गुंतवणूक वाढल्यामुळे समग्र मागणी वाढते व भविष्यातील उत्पादन क्षमता वाढते. समग्र स्थिर भांडवल संचय दराच जगातील सरासरी २०% (GDP %) इतकी दिसून आली. काही गरीब देशामध्ये गुंतवणूक फारच कमी असल्याचे दिसते. उदा. झिंबाब्वे या दशाचा हा दर ३% (GDP च्या) एवढा अल्प असल्याचे दिसते. गुंतवणूकीचा दर वाढला असता वृद्धीदरही वाढतो. भारतामधील हा दर भारतामध्ये आर्थिक सुधारणानंतर वाढल्याचे दिसते. तो ३९ टक्क्यापर्यंत वाढल्याचे दिसते. सुधारणा अगोदर तो २२% पर्यंत कमी असल्याचे दिसते.

बचत दर हा आर्थिक विकास प्रक्रियेत विविध भूमिका बजावते. यास दीर्घकालीन विकासास गती देणारा महत्त्वाचा घटक म्हणून ओळखले जाते. देशांतर्गत बचत दर हा उपभोक्त्याची व उद्योजकाची सिमांत बचत प्रवृत्ती दर्शविते. १९५०-५१ मध्ये समग्र देशांतर्गत बचतीचा दर हा ९.५% (GDP च्या) इतका होता. त्यामध्ये वाढ होवून १९७० मध्ये तो १४.१% इतका झाला. १९९० मध्ये तो २१.३% इतका वाढला मात्र, आर्थिक सुधारणाच्या अवघ्या वीस वर्षामध्ये तो ३३.७% (२००९-१०) इतका वाढला. बचतीच्या दरातील ही वाढ अत्यंत महत्त्वाची ठरली. सुधारणांचा देशाच्या समग्र बचत दरावर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसते.

**कोष्टक क्र. ३**

**उदारीकरणानंतरच्या काळातील भारताच्या विदेशी चलन मालमत्ताची प्रवृत्ती - १९९०-९१ ते २०१८-१९**

| वर्षे | विदेशी चलन मालमत्ता कोटी रुपये |
|---|---|
| १९९०-९१ | ४३८८ |
| १९९५-९६ | ५८४४६ |
| २०००-०१ | १८४४८२ |
| २००५-०६ | ६४७३२७ |
| २००९-१० | ११४९६५० |
| २०१०-११ | १२२४८८३ |
| २०११-१२ | १३३०५११ |
| २०१२-१३ | १४१२६३१ |
| २०१३-१४ | १६३०९१४ |
| २०१४-१५ | १९८५४५८ |
| २०१५-१६ | २२१९०६१ |
| २०१६-१७ | २२४४९३९ |
| २०१७-१८ | २५९७५६९ |
| २०१८-१९ | २६६५५६४ |

Source - Economic Survey 2019-20 Volume I

१९९० मध्ये भारताकडे फक्त दोन आठवड्याच्या निर्याती इतके विदेशी चलन मालमत्ता उपलब्ध होती. उदारीकरणा नंतरच्या आर्थिक सुधारणा कर्यक्रमांर्तगत ही मालमत्ता २६६५५६४ कोटी इतकी वाढली. मोठ्या प्रमाणावर विदेशी चलन साठा भारताकडे आकर्षित झाला. गुंतवणूकीवरील अनेक बंधने शिथिल करण्यात आली. या राखीव प्रकारामध्ये सोने, नाणेनिधीतील राखीव, विशेष आहरण अधिकार (SDR) इ. चा समावेश होतो. विदेशी चलन मालमत्तेची टंचाई कमी होवून पुढील दहा वर्षामध्ये ४२ पट इतकी वाढ झाल्याचे दिसते. हा परिणाम पहिल्या टप्प्यातील सुधारणा कार्यक्रमाचा होय. पुढील १० वर्षाच्या काळात जवळपास ६ पट वाढ नोंदवली गेली. विदेशी चलन मालमत्तेच्या बाबतीत भारताची स्थिती चांगली असल्याचे दिसून येते. विदेशी राखीव मालमत्तेद्वारे देशास चलन मूल्य स्थिर राखण्यास मदत होते. याद्वारे रोखता नियमित केला जातो व भाववाढीवर नियंत्रण ठेवता येते. याद्वारे पायाभूत क्षेत्रास भांडवल पुरवठा ही करता येतो.

**कोष्टक क्र. ४ : विदेशी थेट गुंतवणूक प्रवृत्ती – २०००–०१ ते २०१८–१९ (रु. कोटीमध्ये)**

| वर्षे | देशात झालेली विदेशी थेट गुंतवणूक |
|---|---|
| २००० – ०१ | १८४०४ |
| २०१२ – १३ | १४६९५४ |
| २०१४ – १५ | २१५८९० |
| २०१५ – १६ | २९४२५८ |
| २०१६ – १७ | २८३९१३ |
| २०१७ – १८ | २५३९१३ |
| २०१८ – १९ | ३०१९३२ |
| २०१९ – २० एप्रिल ते सप्टेंबर | १८८०१० |

Source - Economic Survey 2019-20 Volume I

जागतिकीकरणा अंतर्गत अनेक सुधारणा स्विकारण्यात आल्या. बहुराष्ट्रीय कंपन्यांना सर्वच सरकारानी आकर्षित करण्याचे प्रयत्न करताना आपल्यास आढळून आले. विदेशी गुंतवणूक दोन प्रकारची असते. १) विदेशी थेट गुंतवणूक व २) विदेशी संस्थात्मक गुंतवणूक (FII) या गुंतवणूकीद्वारे आर्थिक विकासास चालना मिळते. व रोजगार वाढतो. विदेशी थेट गुंतवणूक ही दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून ओळखली जाते, ही गुंतवणूक भांडवल संचयामध्ये वाढ करते. या गुंतवणूकीसाठी सरकारची जबाबदारी कमी असते. जगामध्ये चीन या देशाने विदेशी थेट गुंतवणूकीद्वारे दैदिप्यमान प्रगती केल्याचे दिसून येते. भारत सरकारकाडूनही मागील ३० वर्षाच्या काळामध्ये विदेशी थेट गुंतवणूक वाढविण्यास प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. तंत्रज्ञान हस्तांतरणाद्वारे मोठ्या प्रमाणावर विदेशी चलन आपल्या देशाकडे आकर्षित होताना दिसते. अजुनही बऱ्याचशा सुधारणा करणे आवश्यक असून त्या व्यवसाय करणे सोयीस्कर करणे अपेक्षित आहे. आजही Ease of doing business या निर्देशंकामध्ये भारत हा ६८ व्या स्थानी असल्याचे दिसते. विदेशी थेट गुंतवणूकीवरील बंधने शिथिल करणे आवश्यक आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या भारताकडे मोठी बाजारपेठ म्हणून पाहताना दिसतात. त्यांचा उद्देश फक्त स्थानिक बाजार एवढाच नसून

शेजारील देशांना निर्यात करणे हा ही आहे. वाढता मध्यमवर्ग दरडोई उत्पन्नातील वाढ, जास्तीची सीमांत उपभोग प्रवृत्ती या विदेशी थेट गुंतवणूकीस आकर्षित करताना दिसतात.

विदेशी थेट गुंतवणूक वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक असते. या सुविधा व्यवसाय विकासासाठी आवश्यक असतात. यामध्ये दळणवळण, रस्तेवाहतूक सुविधा, सर्वच प्रकारच्या परिवहन सुविधा, पाणीपुरवठा व खात्रीचा विजपुरवठा होय. या सुविधामध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूकींची आवश्यकता असल्याचे मान्य करावे लागेल. २०२५ पर्यंत ही गुंतवणूक दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विदेशी थेट गुंतवणूक वाढण्यामध्ये अमेरिका व चीन या दोन महाशक्तीमधील व्यापारयुद्ध फायदेशीर ठरू शकते. त्याचा लाभ भारताने घेणे आवश्यक आहे. जपानसारखे विकसीत देश भारतातील पायाभूत क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी अनुकूल असल्याचे दिसते. बुलेट ट्रेन प्रकल्पामध्ये जपानने अंदाजे १२५००० कोटी रू. इतकी गुंतवणूक करण्याचे निश्चित केले आहे. भारतामध्ये उद्योग, रस्ते उभारण्यासाठी भूसंपादन विषयक कायाद्यामध्ये अलिकडील काळात २०१३ मध्ये सुधारणा करून भूसंपादन सुलभ केल्याचे दिसून येते.

विदेशी थेट गुंतवणूकीद्वारे जगातील अनेक देशांनी मोठ्या प्रमाणावर विकास केल्याचे दिसले. यामध्ये मेक्सिको, ब्राझील, चीन, उरुग्वे, चीली, कॅनडा इ. देशांचा समावेश होतो. आर्थिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत विदेशी थेट गुंतवणूक व विदेशी संस्थात्मक गुंतवणूक वाढविण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. दीर्घकालीन वृद्धीसाठी विदेशी थेट गुंतवणूकीस प्रोत्साहन देऊन आकर्षित करणे आवश्यक आहे. अनेक प्रतिबंधीत क्षेत्रात ही अलिकडील काळामध्ये विदेशी थेट गुंतवणूकीस परवानगी देत असल्याचे दिसून येते.

आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा अवलंब केल्यानंतर आज भारत जगातील ५ वी मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आल्याचे आपणास दिसत आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या ही कमी झालेली आहे. दरडोई उत्पन्नातील वाढ ही आपणास मागणी वाढ दर्शविते. मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गाचा उदय होवून यातून बाजारास चालना मिळत आहे. भारत हा तरुण लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. मानवी साधनसंपत्ती विपूल प्रमाणात आहे. मात्र ती वापराविना पडून असल्याचे दिसते. शिक्षीताची वाढती बेरोजगारी व आर्थिक विकासाद्वारे विदेशी थेट गुंतवणूक (FDI) आकर्षित करून कमी करता येवू शकते. भांडवल संचयाचा दरही वाढत असल्याचे दिसते. बचतीचा दरही वाढत असताना दिसतो. उत्पादनांमध्ये तंत्रज्ञान हस्तांतरण अलिकडील काळामध्ये महत्त्वाचे ठरत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या या तंत्रज्ञानाचे साह्याने आपला विस्तार करत असताना दिसत आहेत. विदेशी चलन राखीवही मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसते. अलिकडील काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत दोन मोठे धोरणात्मक बदल झाल्याने त्याचा बाजारावर मोठा परिणाम होत असल्याचे दिसते. नोव्हेबर २०१६ मध्ये विमुद्रीकरण (Demonetization) करण्यात आले. यानंतरच्या काळात त्याचे आर्थिक विकासावर परिणाम दिसून येतात. हे धोरण विकासविरोधी म्हणूनही अनेक टीका केल्या गेल्या. जुलै २०१७ मध्ये वस्तू व सेवा कर (GST) कायदा अंमलात आणण्यात आला व यानुसार सर्व देशभर एकच कर व्यवस्था आमलात आणण्यात आली. संबध देश एकाच प्रकारची करव्यवस्थेच्या अंतर्गत आणण्यात आली. आज भारत सरकारला वर्षाकाठी जवळपास १२ लाख कोटी रू. इतका महसूल यातून जमा होत आहे. यात

आणखी सहजता व सोपेपणा आल्यास व कररचना व करदर नियंत्रित केल्यास मोठ्या प्रमाणावर उद्योग वाढ –शक्य असल्याचे दिसते. एकंदरीत उदारीकरणानंतर वेगवान आर्थिक विकास साध्य झाल्याचे मान्य करावे लागेल.

**४.२.४ समकालीन विकासविषयक समस्या (Contemporary Development Problems) :**

स्वातंत्र्यानंतरच्या ४ दशकांमध्ये भारतामध्ये वाढती लोकसंख्या विकासाच्या प्रक्रियेतील मोठा अडथळा म्हणून पाहिले जात होते. दारिद्र्य, बेरोजगारी यामागचे प्रमुख कारण लोकसंख्या आहे. याबाबत विचारवंतामध्येही एकमत झाले होते. २१ व्या शतकामध्ये मात्र लोकसंख्या समस्या मागे पडली व व्यक्तीस मानव संसाधन असे संबोधण्यात येवू लागले. २०१९ च्या लोकसंख्या आकृतीबंधाकडे पाहिले असता आपणास लोकसंख्येची पूर्ण कल्पना येते. जुलै २०१८ ची अंदाजित लोकसंख्या ही १२९ कोटी ६८ लाख एवढी आहे. यामधील ० ते १४ वयोगटातील लोकसंख्या ही २६.९८% एवढी आहे. १५ ते २४ या वयोगटातील लोकसंख्या ही १७.७९% एवढी आहे. तर २५ ते ५४ वयोगटातील लोकसंख्या ४१.२४ % एवढी आहे. भारतीय लोकसंख्येचे मध्यम वय (median age) हे २८.१ वर्षे इतके आहे. २०१८ मधील लोकसंख्या वृद्धीदर हा १.१४% एवढा अंदाजित आहे. जन्मदर १८.७ दर हजारी व मृत्यूदर ७.३ एवढा अंदाजित आहे. २०२५ पर्यंत भारतातील ४० टक्के एवढी लोकसंख्या नागरी भागात वास्तव्यास असेल असेही अंदाज मांडले आहेत. भारतामध्ये शिक्षणावरील खर्चाचे जी.डी.पी.शी प्रमाण हे ३.८% असून आरोग्यविषयक खर्चाचे प्रमाण हे ३.९% इतके आहे. हे दोन्ही प्रमाण मिळून १२% असणे आवश्यक आहे. तेव्हाच शिक्षण व आरोग्य चांगले राखणे शक्य होईल. भारतीय विकासविषयक समकालीन समस्या या भिन्न प्रकारच्या आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्था व नियोजनकार यांनी वेळोवेळी विविध धोरणे व विकासविषयक व्युहरचनेद्वारे विकासाचा अपेक्षित दर साध्य करण्याचे अनेक प्रयत्न केले आहेत. काही अपेक्षित दर साध्य करणे शक्य झाले मात्र काही बाबतीत संसाधनाच्या मर्यादेमुळे ते शक्य झाले नाही.

**समकालीन विकास विषयक समस्या :**

आज देशासमोर व नियोजनकारासमोर अनेक नविन समस्या निर्माण झालेल्या आहेत. आज विकासाचे मोजमाप करताना विकासाचा खर्च विचारात घेणे महत्त्वाचे आहे. मुडी या गुंतवणूक सेवा संस्थेने भारताचा वृद्धीदर २०१८ व २०१९ साठी ७.५% एवढा अंदाजित केला आहे. हा मजबूत मागणीवर आधारीत असल्याचेही म्हटले आहे. कोळसा उद्योग, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, खते, लोह पोलाद, सिमेंट व बीजनिर्मिती हे क्षेत्र विचारात घेवून अंदाज बांधले जातात. मात्र अलिकडील काही आव्हानामुळे तो शक्य होण्याबाबत शंका निर्माण केल्या जातात.

**१) लोकसंख्या वाढ :**

भारत हा लोकसंख्येबाबतीत जगामध्ये चीननंतर दुसरा मोठा देश आहे. लोकसंख्या वृद्धीदराची प्रवृत्ती लक्षात घेता भारत २०३० मध्ये जगातील लोकसंख्येच्या बाबतीत सर्वात मोठा देश म्हणून उदयास येईल असे भाकीत करण्यात येते. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्न तुटवडा, स्वच्छता सुविधेची कमतरता व प्रदुषणामध्ये

दिवसेंदिवस वाढ होत आहे. आर्थिक वृद्धी होत असताना देखील बहुसंख्य लोकांच्या जीवनमान स्तरामध्ये वाढ होताना दिसत नाही. अर्धपोषण कुपोषणाचे प्रश्न अजुनही आहेत. स्वच्छतेच्या बाबतीत भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर समस्या असल्याचे दिसते. लोकसंख्यावाढ ही समस्या आजही देशासमोर असल्याचे दिसून येते.

**२) कौशल्य विकास व भविष्यातील श्रमशक्तीचा रोजगार :**

" The Future of Jobs 2018 " या जागतिक आर्थिक मंच च्या अहवालानुसार भारतातील निम्म्यापेक्षा जास्त श्रमिकांना पुन्हा कौशल्य आत्मसात करावी लागतील असे नमूद केले आहे. हे कौशल्य २०२२ पर्यंत आत्मसात करण्याबाबत सुचविले आहे. त्यांना पुन्हा १०० दिवसाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. भारत हा श्रमाची फार मोठी बाजारपेठ आहे. आर्थिक विकासातील श्रम या घटकाची मुल्यवर्धीमध्ये फार मोठी भूमिका आहे. मात्र हे श्रमिक गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. कौशल्य विकासाच्या आव्हानाचे चार पैलू आहेत. पहिले म्हणजे भारतीय शिक्षण पद्धती ही संकल्पनात्मक ज्ञान आत्मसात करण्यावर भर देणारी आहे. मात्र यातून रोजगारक्षमता वाढत नाही. भारतामध्ये अर्थव्यवस्थेच्या अनौपचारिक क्षेत्रांमध्ये ८०% व औपचारीक क्षेत्रामध्ये २०% रोजगार आहेत. भारतामध्ये राज्यपातळी व विभागीय पातळीवर रोजगारामध्ये तफावत आहे व श्रमदलातील महिलांचा सहभाग हा मात्र २५% इतकाच आहे. २०३० मध्ये भारत हा देश जगातील सर्वात तरूण देश असेल व जगातील कोणत्याही देशापेक्षा श्रमदलात वाढ करणारा मोठा देश असेल. पुढील दशकामध्ये श्रमदलात १ कोटी इतकी वाढ अपेक्षित आहे. यास रोजगारक्षम बनविण्यासाठी चांगले शिक्षण व कौशल्य असणे आवश्यक आहे. भारतामध्ये प्रचलित श्रमिक व भविष्यकालीन श्रमिक यांना कौशल्यपूर्ण बनविण्यासाठी खाजगी व सरकारी क्षेत्रांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

भारतामध्ये " Ministry of Skill Development and Entrepreneurship " ची स्थापना केली. यामध्ये श्रम बाजारातील मागणी विचारात घेवून कौशल्य देणेबाबत कृती कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे.

**३) ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास प्रक्रियेत समावेश :**

२०३० पर्यंत भारतातील ४०% लोकसंख्या शहरी लोकसंख्या म्हणून ओळखली जाईल. लहान आकाराचे ५०००० ते १००,००० लोकसंख्येची अनेक शहरे निर्माण होतील. यामध्ये भौतिक जोडणी (Physical Connectivity) ही रस्ते व विजेची जोडणी महत्त्वाची ठरणार आहे. डीजीटल जोडणी ही महत्त्वाची ठरणार आहे व वित्तीय समावेशकता वाढविण्यासाठी बँका व वित्तीय संस्थाचे जाळे निर्माण करावे लागणार आहे. नागरी व ग्रामीण यामधील अंतर कमी केल्याशिवाय विकास शक्य नाही. सरकार व व्यवसाय संस्था या दोघांसमोर मोठे आव्हान असणार आहे. यामध्ये सुधारण करण्यावर मोठ्या प्रमाणावर प्राधान्य पायाभूत सुविधा देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नास जुळणाऱ्या वस्तू व सेवांचा पुरवठा करावा लागेल. यामध्ये ब्रॉडबॅन्ड जोडणी व मोबाईल सेवा आवश्यक असणार आहेत. लोकांना पेपरविना व रोखीविना व्यवहार करणे शिकविणे गरजेचे असेल. या सर्व पायाभूत सुविधा व जनतेच्या प्रवृत्तीतील बदल हे मोठे आव्हान असणार आहे. भौतिक पायाभूत सुविधा, रस्ते निर्मिती, वीजपुरवठा, दूरसंचार सुविधा याच पुढील विकासाचे मुख्य प्रेरक ठरणार आहेत.

### ४) आरोग्यदायी व चिरंतन भविष्य :

जसा जसा विकास वाढत जातो त्याचबरोबर देशासमोर नवीन आव्हाने उभी राहतात. याचबरोबर आरोग्यविषयक काही प्रश्न निर्माण होतात. विकासाची केंद्रे निर्माण झाल्यामुळे तेथे वाहतूक गर्दी, प्रदुषण निर्माण होते व याचे विपरीत परिणाम होवू लागतात. यातून लोकांच्या जीवनाचा दर्जा खालावतो. समग्र पातळीवर आरोग्यविषयक दर्जेदार सुविधा व शहराची ओळख बदलणे आवश्यक आहे. आरोग्यविषयक सुविधा परवडणाऱ्या दरात पुरविणे आवश्यक आहेत. भारतातील एकूण मृत्यूपैकी असंसर्गजन्य झाल्याने ६३% लोक मृत्यू पावतात. यामध्ये जीवनशैली, खानपान चा मोठा परिणाम दिसून येतो. शहरातील वायुप्रदुषण, जलप्रदुषण घटल्यास व्यवस्थापन व शहरी भागातील गर्दी यावर तत्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. जगातील एकूण दहा प्रदुषीत शहरापैकी ९ शहरे भारतातील आहेत.

परंपरागत विचार केला तर भारतीय अर्थव्यवस्था ही पर्यावरणाबाबतीत सजग समजली जाते. ते पुन्हा साध्य करण्यासाठी भारतातील गरजा लक्षात घेवून घरे, रस्ते निर्मिती, दळणवळण सेवा इ. बाबतीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा आवश्यक आहेत. यावरच जीवनाचा मुलभूत दर्जा अवलंबून आहे. यासाठी फक्त शासकीय पातळीवरील प्रयत्न पुरेसे ठरणार नाहीत. जनतेचा, प्राचीन संस्था, अशासकीय संस्था यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. उद्योगाचे काही प्रमाणात विकेंद्रीकरण करून प्रदुषण व गर्दीसारख्या समस्या सोडविता येवू शकतात व यातून प्रादेशिक विकासामध्ये समतोल निर्माण करता येवू शकतो व स्थलांतरण मोठ्या प्रमाणावर कमी करता येते.

### ५) व्यवसायातील सुलभता (Ease of Doing Business) :

अलिकडील काळातले तंत्रज्ञान हस्तांतरण व थेट विदेशी गुंतवणूक (FDI) मुळे भांडवलाची ये-जा मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. आधुनिक विकासामध्ये यांची भूमिका मोठ्या प्रमाणावर अधोरेखित झालेली आहे. यांच्या साहाय्यानेच चीनने दैदिप्यमान प्रगती साध्य केलेली आहे. विदेशी गुंतवणूक ही ज्या देशामध्ये स्थैर्य आहे व धोरणे कठोर नाहीत अशाच देशाकडे आकर्षित होते. व्यवसाय करण्यामध्ये कमीत कमी अडथळे असतील तरच ही गुंतवणूक केली जाते. जगातील प्रमुख देशामध्ये अशी गुंतवणूक आकर्षित करण्याची स्पर्धाच लागलेली दिसते. या क्रमवारीमध्ये भारत हा ६८ व्या स्थानी आहे. अशी गुंतवणूक आकर्षित करणे हे एक नविन आव्हान आहे. भारत सरकारही यामध्ये अग्रेसर भूमिका घेत आहे. (Minimum Government & Maximum Governance) यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे.

### ६) पर्यायी इंधन वापर :

इंधन हे विकासासाठी फार महत्त्वाचे साधन आहे. सर्व यंत्रे इंधनावरच चालतात. अखंडित वीजपुरवठा हा उद्योग सक्षमपणे चलविण्यासाठी आवशयक असतो. भारतामध्ये इंधन निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर कोळशाचा वापर केला जातो. एकूण पैकी ६०% वीजनिर्मिती यातूनच होते. मात्र कोळशाचे पर्यावरणावर विपरीत परिणाम होतात. यातून निघणाऱ्या राखेची विल्हेवाट लावणे फार अवघड असते व मोठ्या प्रमाणावर कार्बनडाय ऑक्साईड निर्माण होतो. शहरातील बरेचशे उद्योग कोळसा या इंधनावर चालवले जातात. त्यात

इंधन तेल वापरण्यास परावृत्त करणे महत्त्वाचे आहे. कोलकता शहरामध्ये असे अनेक उद्योग कोळशाचा वापर करतात. त्यातून शहरातील प्रदुषण वाढते.

**७) पर्यावरण सुरक्षा :**

अनेक देशासमोर पर्यावरण सुरक्षा हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. औद्योगिक उत्पादन वाढीतून पर्यावरणावर विपरीत परिणाम होताना दिसत आहेत. उत्पादन व्यवस्थेमध्ये व उत्पादन तंत्रात बदल करून प्रदुषण कमी करण्यासाठीचे प्रयत्न केले जात आहेत. पर्यावरण संरक्षणाबाबतीत जगातील अनेक देशामध्ये अनेक कराराद्वारे एकमत झाल्याचेही आपणास दिसून येते. सरकारी उद्योगसंस्था व व्यक्ती यांच्यासमोर पर्यावरण सरंक्षण हे एक मोठे आव्हान आहे व याबाबतीत अनेक प्रयत्न होताना दिसून येतात.

वरीलप्रमाणे समकालीन विकासविषयक समस्याचा आपण अभ्यास केला आहे.

**४.३ समारोप :**

विकसनशील देशांचा विकास करणे व त्यासाठी संतुलीत असे राजकोषीय व मौद्रीक धोरणे अवलंब करणे महत्त्वाचे असते. मौद्रीक धोरणाद्वारे पैशाचा पुरवठा व मागणी यामध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जातो व राजकोषीय धोरणाद्वारे खर्चाच्या माध्यमातून संतुलीत विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. मौद्रीक व राजकोषीय धोरणे हे परस्परपूरक असणे गरजेचे असते अलिकडच्या काळामध्ये विकास करत असताना असमानता वाढत असल्याचे दिसते. ती असमानता कमी करण्यासाठी सर्व समावेशक वृद्धी धोरण अंमलात आणले पाहिजे. विकासाची फळे समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचली पाहिजेत. विकासाच्या केंद्रिकरणातून अनेक समस्या निर्माण होतात. त्या टाळण्यासाठी विकेंद्रीकरणाचे धोरण अवलंबले जाते. सुक्ष्म पातळी नियोजनाच्या माध्यमातून गरजेनुसार विकास केला जातो. १९९० मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेनी आपली दारे आंतरराष्ट्रीय क्षेत्रासाठी खुली केली. यानंतर विकासाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला व यातून भारताने दुसऱ्या क्रमांकाचा (चीननंतर) वृद्धीदर साध्य (८.५%) साध्य केला. विकासाच्या वृद्धीदर वाढीचे लाभ देशातील सर्वच क्षेत्राला मिळत आहेत. अलिकडील काळामध्ये वेगवान विकास साध्य करून अनेक नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याही समजून घेणे आवश्यक आहेत.

**४.४ स्वयंअध्ययन प्रश्न :**

१) नीति आयोगाची स्थापना ----- रोजी झाली.

अ) १ जानेवारी २०१५ ब) १ फेब्रुवारी २०१५ क) ७ फेब्रुवारी २०१५ ड) १ मार्च २०१५

२) ----- हे मौद्रीक धोरणाचे साधन आहे.

अ) सार्वजनिक कर्जे ब) सार्वजनिक खर्च क) कर ड) व्याजदर

३) वॉशिंग्टन एकमत करारामध्ये ----- चा समावेश होता.

अ) जागतिकीकरण ब) उदारीकरण क) खाजगीकरण ड) वरील सर्व

४) नविन औद्योगिक धोरण ----- या वर्षी आमलात आले.

अ) १९९० ब) १९९२ क) १९९१ ड) १९९५

५) विमुद्रीकरण ( Demonitizaion ) ------ वर्षी करण्यात आले.

अ) २०१५ ब) २०१६ क) २०१७ ड) २०१८

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) १ जानेवारी २०१५

२) व्याजदर

३) वरील सर्व

४) १९९१

५) २०१६

## ४.५ सरावासाठी प्रश्न:

**१) टीपा लिहा :**

१) समावेशक वृद्धी

२) वॉशिंग्टन एकमत

३) विकेंद्रीकरण

४) LPG धोरण

**२) दीर्घोत्तरी प्रश्न :**

अ) आर्थिक विकासातील राजकोषीय व मौद्रीक धोरणाची भूमिका स्पष्ट करा.

ब) उदारीकरणानंतरच्या भारतीय आर्थिक प्रगतीचा आढावा घ्या.

क) समकालीन विकासविषयक समस्याची चर्चा करा.

## ४.६ संदर्भ ग्रंथ :

1. Prakash B.A. The Indian Economy Since (1991-2011) Pearson-Dorling Kindersley Indian Pvt. Ltd. (Second Edition - 2011)

2. Arunachalam P. (2010) Inclusive Growth in India, Serial Publication 2011, New Delhi

3. Mishra and Puri (1989), Development and Planning. Theory and Practice, Hirelay Publishing house New Delhi.

4. Graeme, Handerson & Luke Raikes - "Decentralisation Decade" (2014) Institute of public Policy Feseoren.

5. Charles G. "The Rise and Fall of Washington Consences as a Paradigm of Developing Countries", World Development Report Volume - 28.

6. The Future of Jobs Report (2018) World Economic Forum, Geneva.

7. The future of Consumption in Fast Growth Consumer Markets : India 2019. World Economic Forum, Geneva.

8. www.weforum.org/agenda/2019/01/India-biggest-future Force Challanges Consumption.

9. Economic Survey 2019-20, Statistical Appendix.

10. भोसले, काटे (१९९८) विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

११. पाटील बी.पी., नांगरे एस., पाटील आण्णा, कोंबडे एस.टी. (२०१५) वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

* * *